

# उमलले संवाद

**वाचकांचे अभिप्राय**

‘वाकोदचा वटवृक्ष’

‘वाघूरचं पाणी’

‘पाषाणातून पाझर’

‘कहाणी कष्टलाटांच्या पाणलोटाची’

‘पाषाणातून पाझर’... भाऊंचे उत्तुंग व्यक्तिमत्व... त्यांच्या स्वभावाची ऋजुता... त्यात खेड्यातील शेतमजूर, कारखान्यातील कामगार यांच्या कविता आहेत हे महत्त्वाचे... भाऊंच्या सहवासात काव्यप्रेरणा झाली याची अनुभूति कविंप्रमाणेच वाचकाला होते हा आनन्द अविस्मरणीय आहे...

**नरेश तनखीवाले**, सेवानिवृत्त महाव्यवस्थापक, नाबार्ड.

...पुस्तकांची नावेदेखील वैशिष्ट्यपूर्ण आहेत. त्यामुळे ...मजकुराबद्दल उत्कंठा वाढते ...भवरलालजींच्या व्यक्तिमत्त्वाचे मोठे लोभस दर्शन घडते. ...विज्ञानवादी, जिज्ञासु तरी माणसं सांभाळणारा प्रेमळ माणूस दिसून येतो. ...छायाचित्रांच्या समावेशामुळे ...गोडी वाढली आहे.

**अरुण फिरोदियो**, उद्योगपति, अध्यक्ष, कायनेटिक इन्जि. लि., पुणे.

...श्रद्धेय श्री. भवरलालजी (भाऊ) यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, कार्याचा ...एकत्रित ...परिचय ‘निसर्गाशी नाते’ सांगणाऱ्या आणि ‘पाण्याच्या ध्यासापोटी’ ...जीवन समर्पित करणाऱ्या सर्वांसाठी संदर्भ ग्रंथ ठरावा. ...भाऊ म्हणजे एक चालती बोलती संस्था, एक चळवळ... मुखपृष्ठापासून ते ओघवत्या लेखनशैलीपर्यंत पुस्तकाच्या समृद्धीत भर पडली आहे. ...अनेकांच्या अभ्यासिकेत या पुस्तकांना प्रतिष्ठेचे स्थान मिळेल.

**डॉ. विकास आमटे**, आनन्दवन, वरोरा, जि. चन्द्रपूर.

श्री. भवरलालजींनी शेतीविज्ञानाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतिसाठी प्रयत्न केले. ...पुस्तकांमध्यें त्यांच्या अष्टपैलू नेतृत्वगुणांचे अंतरंग उलगडले आहे. पुढील वाटचालीसाठी ...उपयोगी पडतील.

**डॉ. आर. एस. माळी**, कुलगुरू, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ.

भवरलालजी म्हणजे कर्तृत्वाचे शिखर, ध्येयवादी जीवनाचा आदर्श, व्यावसायिक दृष्टीचा महामानव! नवसृजन, निसर्गरक्षण ...कार्य अनुकरणीय आहे. पुस्तके ...संग्राह्य आहेत.

**सौ. सुरेखा शाह**, लेखिका, ‘जोहड’ कादंबरीवर चित्रपट.

भाऊंचा कर्तृत्ववान जीवनपट अलगद उलगडतात. समाजाला व तरुण पिढीला मार्गदर्शन देणारे हे कर्मयोग्याचे जीवन ...समाजापुढे आणण्याचे कार्य केलेत ...अभिनन्दन.


**श्रीनिवास पंडित**, विख्यात लेखक, व्यवस्थापन सल्लागार.

पुस्तके उत्तम दर्जाची ...भवरलालजींच्या कर्तृत्वाचा सर्व बाजूंनी परिचय घडविणारी ...इतर क्षेत्रातले कर्तृत्व केवढे मोठे आहे हे लक्षात येते. ...त्यांचे बहुआयामी सद्गुणी चरित्र पुढच्या पिढ्यांना दीपस्तंभासारखे मार्ग दाखवत राहील.

**डॉ. भालचन्द्र नेमाडे**, प्राध्यापक, लेखक.

हातात आले एक अति सुंदर पुस्तक. स्फुरणदायी वास्तव कथा. त्या कथेतच गुरफटलो: प्रांजळ पण प्रभावी तपशीलात रंगाळलो. जल विकासाच्या बहुविध प्रयत्नांमधील कहाणी साकारली आहे. अनुभवावी, आत्मसात करावी अशीच.

**माधव चितळे**, जगप्रसिद्ध जलतज्ज्ञ.


उमलले संवाद



भवरलालजी व नातवंडं : अथांग, अभेद्य, अमोली, आशुली.
(दिनांक : २४ ऑगस्ट २००३)

# उमलले संवाद

**संकलन व संपादन**
इंदरचंद दुधेडिया

**रचना प्रकाशन**

# उमलले संवाद

**संकलन व संपादन**
इंदरचंद दुधेडिया

या पुस्तकात पूर्वप्रकाशित/प्रसारित मुलाखती
अंतर्भूत करण्यासाठी परवानगी दिल्याबद्दल
सर्व संबंधितांचे मनःपूर्वक आभार.

**पहिली आवृत्ती** - २००६

**प्रकाशक**
रचना प्रकाशन
फ्लॅट नं. १, निवास ब्लॉसम, कॅनडा कॉर्नर, नाशिक.

**मुद्रक**
प्रिंटवेल
ई/१६/२/५, एम.आय.डी.सी., चिकलठाणा, औरंगाबाद.

**मुखपृष्ठ संकल्पना**
अशोक भवरलाल जैन

**डिझाईन**
विकास मल्हारा, प्रशांत शिंदे

**फोटो**
ईश्वर राणा, राजेंद्र माळी, अबुबकर खान

**अक्षरजुळवणी**
विजय तिवारी

**सहकार्य**
किशोर कुळकर्णी

**किंमत** - १५० रुपये

**© जागतिक हक्क जैन चॅरिटीज्, जैन पाईप पार्क, जैन पाईप नगर, निमखेडी रोड, जळगाव - ४२५ ००१ यांचे स्वाधीन व सुरक्षित.**

जैन चॅरिटीज्ची लेखी पूर्वसंमती असल्याखेरीज या पुस्तकाचे वा त्यामधील कोणत्याही भागाचे पुनर्मुद्रण करणे, कोणत्याही प्रकारे, कोणत्याही पद्धतीने साठवण करणे, कशाही प्रकारे प्रक्षेपण करणे, इलेक्ट्रॉनिक, मेकॅनिकल वा अन्य कोणत्याही पद्धतीने वापरणे हे बेकायदेशीर आहे.

# अनुक्रमणिका


| | | | | |
|---|---|---|---|---|
| **दोन शब्द** | | | | १ |
| **प्रास्ताविक** | सदाशिव अमरापूरकर | | | ३ |
| ठिबक सिंचनः समृद्धीची गुरूकिल्ली | हेमंत काळुंखे | जनशक्ती | ऑक्टो १९८८ | ६ |
| जैन इरिगेशन : एक दृष्टीक्षेप | देवचंद आर छेडा | व्यापार | फेब्रु १९९२ | १४ |
| शेतकरी आणि भूमीशी अतूट नाते जोडणारे दिलदार दृढनिश्चयी उद्योगपती | हेमंत काळुंखे | चाफा | नोव्हें १९९२ | १८ |
| आत्मिक समाधानासाठी परिश्रम हेच अधिष्ठान | विजय बाविस्कर | दै. लोकमत | डिसें १९९२ | २६ |
| थेंबाचे मोती होतात तेव्हा... | मंगेश कपटकर | किर्लोस्कर | मार्च १९९३ | ४० |
| भविष्याचा वेध घेणारा जलयोगी | राबिया हिरा | नार्थ-वेस्ट नेटवर्क | जुलै १९९४ | ५४ |
| दिव्यतेच्या स्वप्नांना वास्तवाचे स्थान | गोरख पगार | अर्थ उद्योग | जाने १९९५ | ६० |
| स्वकष्टानेही मोठं होता येतं | शैलेश वाडेकर, देवेंद्र देशपांडे | कॉलेज कट्टा | मे १९९५ | ७४ |
| तंत्रज्ञानानेच भारतात दुसरी हरितक्रांती होणार | सुशील नवाल, धों. ज. गुरव | दै. देशदूत | मार्च १९९९ | ८४ |
| मंदी अपेक्षितच होती, पण ती कायम टिकणार नाही. | चंद्रगुप्त अमृतकर | महाराष्ट्र टाईम्स | ऑगस्ट १९९९ | ९२ |
| उद्योगाचे घरी देवतालक्ष्मी... | सुलभा कोरे | साहित्य जागर | ऑक्टो १९९९ | ९८ |
| वाढदिवसाची संकल्पना अमान्य; प्रत्येक दिवस संकल्प आणि आव्हानाचा | धों. ज. गुरव | दै. देशदूत | डिसें १९९९ | १३६ |
| जीवनातील संकटे हा खरा परीक्षेचा क्षण | शिबिरार्थी बालगोपाळ | दै. देशदूत | जून २००० | १५० |
| रेल्वेच्या धर्तीवर शेतीसाठी वेगळे केंद्रीय अंदाजपत्रक हवे! | विजय पाठक | महाराष्ट्र टाईम्स | फेब्रु २००१ | १५४ |
| भगवान ऋषभदेवांची कृषी संस्कृती अनुसरली! | आबासाहेब पटवारी | विवेक | फेब्रु २००२ | १५८ |
| व्यक्तिमत्व असे घडते | उत्तम कोळगावकर | आकाशवाणी | मे २००२ | १६४ |
| ...दुःख तळघरात कोंडले | शंभु पाटील | लोक टीव्ही | डिसें २००५ | १७२ |
| सामोपचार आणि सामाजिक बांधीलकीः विकासाचे खरे मंत्र | शामकांत देशपांडे | आकाशवाणी | फेब्रु २००६ | १९० |
| कृषिसमर्पित जीवन : भवरलाल जैन | शिबिरार्थी मुलं-मुली | लो.टि. विद्यामंदीर, चिखलगाव, दापोली | जून २००६ | १९८ |
| **मुलाखतकारांचा परिचय** | | | | २२६ |

## दोन शब्द...

'उमलले संवाद' हे पुस्तक आपल्यापुढे ठेवताना मनोमनी हर्ष होत आहे. विविध वृत्तपत्रीय प्रसार माध्यमांतून भाऊंच्या जीवनावर विविधांगी व आवर्जून नोंद घ्यावी अशा स्वरूपातल्या अनेक मुलाखती प्रसिद्ध झाल्या. त्यातील निवडक मुलाखतींचे संकलन आपल्यापुढे सादर करीत आहोत.

या पूर्वी भाऊंवर इतरांनी लिहिलेल्या कवितांचं संकलन 'पाषाणातून पाझर', लिहिलेले लेख 'वाकोदचा वटवृक्ष' आणि भाऊंनी लिहिलेल्या विविध लिखाणावर आलेल्या पाठकांच्या प्रतिक्रिया 'वाघूरचं पाणी' अशी तीन पुस्तकं प्रकाशित झाली आहेत. या तिन्ही पुस्तकांमध्ये फक्त इतरांच्या मनांमधील भाऊंची प्रतिमा, भाऊंबद्दलचे विचार व भाऊंच्या लेखनासंबंधीची मतं यांचा समावेश आहे. 'उमलले संवाद' या मुलाखतींच्या संकलनात भाऊंनी आपले स्वतःचे विचार मांडलेले आहेत. त्यात मुलाखतकाराच्या प्रश्नाला उत्स्फूर्त उत्तरं म्हणून स्वतःच्या अनुभव आणि विचारांसोबतच वस्तुनिष्ठ माहितीचाही अंतर्भाव आहे. यामुळे या संकलनाला स्वतःचे असे वेगळेपण आहे.

वेगवेगळ्या मुलाखतकारांनी त्या त्या वेळी घेतलेल्या टीपणातील माहितीतून या मुलाखती लिहिल्या आणि प्रकाशित केल्या आहेत. पंढरीनाथ सावे यांच्या म्हणण्यानुसार ''अशा टीपणांमध्ये आणि पर्यायाने लेखांमध्ये काही त्रूटी असू शकतात. काळाप्रमाणे संदर्भ बदलू शकतात. वेगवेगळ्या मुलाखतकारांनी नोंदविलेली निरीक्षणं कधी एकमेकांना छेदू शकतात...'' या सगळ्यांचा तोल सांभाळून या संकलनातून यथार्थ चित्र उभं करायचा प्रयत्न केलेला आहे.

मुलाखतीमध्ये वापरली जाते ती बोल भाषा असते. ज्या वेळी मुलाखतीचे प्रकाशन करायचे असते त्या वेळी भाषा शैलीत योग्य ती सुधारणा करणे अनिवार्य असते. ते स्वातंत्र्य घेऊन वेळोवेळी भाऊंकडून संबंधित बाबींचा खुलासा घेऊन जमेल तसं करायचा प्रयत्न केला आहे.

मनुष्याला सौंदर्याचा ध्यास असतो, परंतु केवळ सौंदर्य महत्त्वाचं नाही. सौंदर्याला कर्तृत्वाची जोड मिळाली तर त्याला दुग्धशर्करा योग असे आपण संबोधितो. जगात अशी दुग्धशर्करायुक्त व्यक्तिमत्वे आहेत. त्यांनी समृद्धी, प्रसिद्धी व लौकिकताही मिळविली आहे. परंतु निसर्गाशी साथ, पर्यावरणाचं भान, मायमातीशी इमान, प्रामाणिक ध्येयवाद, उद्योगशीलता, सामाजिक बांधीलकी व अथक परिश्रम यांच्या मुशीतून उजळलेलं व्यक्तिमत्व विरळच. ही आगळी वेगळी व्यक्ती म्हणजे श्री. भवरलाल जैन ऊर्फ भाऊ.

अशा चतुरस्र, अष्टपैलू गुणी माणसाचे जीवन — उच्चार, आचार, विचार, सृजनता — पुढच्या पिढीसाठी प्रेरणास्थान व आधारस्तंभ असते. त्यातल्या त्यात अशा व्यक्ती सामान्य परिस्थितीवर मात करून शुन्यातून विश्व निर्माण करणाऱ्या असल्या तर त्या सर्वसामान्यांना अधिक जवळच्या वाटतात. अशा व्यक्तींमध्ये सामावलेली प्रखर आकलनशक्ती, प्रदीर्घ धारणाशक्ती व तीक्ष्ण तर्कबुद्धी या भावी पिढ्यांना उद्यमशीलतेकडे जाण्यासाठी प्रेरणादायी ठरतात. असल्या व्यक्तीच्या विविध पैलूंचे दर्शन वाचकांना व्हावं हा या पुस्तक प्रकाशनामागचा हेतु.

भवरलालजींच्या विचारांचं खतपाणी घालून या देशाला जागतिक महासत्ता बनविण्यासाठी नव भारताच्या चैतन्यमय, उद्यमशील, सत्त्वशील उभारणीसाठी संस्कारांची मुळं खोलवर रुजावी, त्यांच्या विचारांचे वाचन, मनन, चिंतन व अनुकरण व्हावे आणि ते विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावे, ही अपेक्षा.

मुलाखती घेणाऱ्यात प्रतिष्ठित वार्ताहरांचा अंतर्भाव आहे, तसेच नामांकित अर्थतज्ज्ञांचाही आहे. मातब्बर समाजकारणीच्या समावेशासोबत प्रस्थापित साहित्यिकही आहे. शिक्षणाचार्यापासून ते अगदी शाळकरी मुलांचाही यात सहभाग आहे. प्रश्नकर्त्यांने विचारायच्या प्रश्नावर कोणत्याही प्रकारचे बंधन नसल्याने अगदी खाजगी जीवनापासून तर पर्यावरणापर्यंतच्या विविध विषयांवरचे प्रश्न विचारले गेले आहेत. परंतु प्रश्न कसेही असो, भवरलालजींनी कोणताही हातचा न ठेवता अगदी थेट सरळ व प्रांजळ उत्तरे दिली आहेत आणि म्हणूनच ती वाचताना हृदयाला जाऊन भिडतात.

इंदरचंद दुधेडिया

## प्रास्ताविक

मी कोणी समीक्षक नाही. साहित्यिकही नाही. मी साधा नट आहे. पाठ केलेले संवाद म्हणणारा, फिल्मी जगात वावरणारा. तरी 'उमलले संवाद' हे मुलाखतवजा पुस्तक वाचताना मला वाटले की, एखादा माणूस स्वकर्तृत्वाने मोठा होतो, समाजधुरीण बनतो, समाजभूषण ठरतो, ही जगरहाटी झाली. पण मला कुतुहल वाटतं ते अशा माणसाबद्दल, जे आपलं मोठेपण सहजपणे वागवतात आणि विसरतातही. बाह्य विश्वाची अभिव्यक्ती स्पष्टपणे नांदत असली तरी आंतरविश्वाला शाबूत ठेवणं हे सुसंस्कृत माणसाचं लक्षण आहे. सतत भौतिक किंवा ऐहिक सुबत्तेच्या सान्निध्यात राहूनही आपली मूळ बैठक, नैसर्गिक प्रवृत्ती यांना अबाधित ठेवणं सर्वांनाच जमत नाही. वर्तमान काळात बाह्य जिवनाच्या विपरीत संस्कारांमुळे विकृती निर्माण होत असल्याचे सर्व दूर आढळते. परंतु तसे न होऊ देता आपल्या संस्कृतीला जागून राहणारे, व्यवसाय बदलला तरीही व्यवहारधर्म तोच ठेवणारे जे माझे मोजके मित्र आहेत त्यात भवरलालजींना (भाऊंना) मी ज्येष्ठ मानतो.

भाऊंच्या रक्तातच व्यापार आहे, व्यवहार आहे. पण त्याच्या जोडीला एक विलक्षण कल्पकता आहे. त्या कल्पकतेमुळेच ते उद्योजक होऊ शकले. गमतीची गोष्ट अशी की, त्यांच्या प्रेरणेने व महत्कष्टाने सुरू झालेल्या 'ठिबक सिंचन' पद्धतीने सामान्य शेतकऱ्याला व्यवहार शिकवला; पाण्याचं व्यवस्थापन शिकवलं. योग्य प्रमाणात पाण्याचा वापर करून उत्पन्नात वाढ आणि शिलकी 'पाण्याची साठवणूक, नव्हे गुंतवणूक' ह्यामुळे परंपरागत दुष्काळी भागातही हिरवळ डोलताना आज आपण पाहतो.

भाऊंचा उद्योग जळगावात सुरू झाला, रुजला, फुलला, विस्तारला. साहजिकच जळगावात पायाभूत सुविधांचा विकास झाला. इतर सहाय्यभूत उद्योगांचा पाया रचला गेला. पण भाऊ एवढ्यावरच समाधानी नाहीत. आपलं जळगाव शहर सुबक, सुंदर व्हावं, तसंच ते सुसंस्कृतही व्हावं असं त्यांचं स्वप्न

आहे, हे सतत जाणवतं त्यांच्या विचारातून बोलण्यातून व यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे कृतीतून. 'उमलले संवाद'हे पुस्तक त्याचा उत्तम व भक्कम पुरावा आहे. त्यांना साहित्यिक आणि कलावंतांबद्दल विशेष ममत्व आहे हे मी स्वानुभवातून सांगू शकतो. गुणांबरोबरच गुणीजनांचा संचय हा भाऊंचा स्थायी स्वभाव.

'उमलले संवाद' ह्या पुस्तकात ठिकठिकाणी भाऊंचे वेगवेगळे पैलू आपल्याला भेटतात. चरित्रलेखनापेक्षाही त्यांच्या या मुलाखतींमधून, गप्पांमधून दिसणारे भाऊ, कधी मोठ्या भावासारखे, कधी मित्रासारखे, तर कधी मार्गदर्शकासारखे वाटतात. अत्यंत साधं-सोपं यशस्वी दिसणारं जीवन जगण्यासाठी, त्यांनी जे शारीरिक व मानसिक कष्ट झेलले, त्यांच्यावर जी संकटे आली, त्याची जंत्री ते सहजच वाचू शकले असते; पण त्या सर्व गोष्टींना बाजूला ठेवून, आपण चुकांतून, अपयशातून कसे शिकत गेलो, हेच त्यांनी विस्ताराने व अत्यंत दिलखुलासपणे मांडलं आहे. पुस्तक वाचताना सतत जाणीव होत राहते की, **सचोटीने व्यवहार, कठोर परिश्रम आणि कल्पकता हीच खरी यशाची चिरस्थायी वहिवाट आहे. या वहिवाटीचा त्यांनी बळकट मार्ग बनविला आणि विकासाचा राजमार्ग रूळवला.** पण ह्याचीदेखील प्रौढी मिरवताना ते दिसत नाहीत. उलट शांतपणे पुढील नवनवीन कामाला ते भिडलेले दिसतात. स्वत:च्या स्वभावाचं विश्लेषण त्यांनी बहारदारपणे केलं आहे. निराशा आणि आनंद ह्यांना समान तागडीत तोलणारे भाऊ स्वत:ला आध्यात्मिक मात्र मानत नाहीत.

भाऊंचा प्रथम ग्राहक हा शेतकरी आहे. तसेच अनेक शेतकऱ्यांचे प्रथम ग्राहक भाऊ आहेत. शेतकऱ्यांच्या कथा आणि व्यथा यांच्याशी ते एकरूप आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे विविध प्रश्न आणि त्यांच्या समस्यांवर भाऊंचं बारीक लक्ष असतं. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे कित्येक समस्यांचे समाधान झालं आहे. शेतकऱ्याला पूरक उद्योग देऊन त्याचे राहणीमान उंचावण्याचं उदाहरण आपल्याला सर्व दूर पहायला मिळतं.

लहान मुलांशी बोलताना भाऊ 'मोठा माणूस' बनण्यापेक्षाही 'चांगला माणूस' बनण्याला जास्त महत्त्व देतात. हे संस्कार आणि पुढे वेळेचे नियोजन हे तत्त्वज्ञान यांचा हा 'समसमा संयोग' फार सुंदर आहे. संस्कारातून विकसित झालेलं तत्त्वज्ञान सर्वसमावेशक आणि समतावादी असतं. वाईट सवयींना पायबंद आणि चांगल्या सवयींचा प्रचार प्रसंगी कर्तव्यकठोर होऊन करावा लागतो.

'खेड्याचं सक्षमीकरण करा' असं सांगणारा मौलिक गांधीविचार आणि जागतिकीकरणामुळे अपेक्षित असलेलं 'जग एक खेडं' हा नवविचार याबद्दल भाऊंचे मार्गदर्शन मिळणे सर्वांसाठीच योग्य ठरेल. आणि हे मार्गदर्शन अशासाठी की, आता श्रमप्रतिष्ठेच्या कल्पना जशा विकसित होत आहेत तशाच बदलतही आहेत.

मध्यमवर्ग वाढत आहे, क्रयशक्तीचा वापर मोठ्या प्रमाणावर घरगुती आणि खाजगी खर्चासाठी होत आहे. **शेती हा व्यवसाय कधी नव्हे इतक्या निम्नस्तरावर अडकला आहे. अशा वेळेला भाऊ व त्यांच्यासारख्या कृषी क्रांतीकारकांची गरज आहे.** आणि मला वाटते भाऊंनी अशा वैचारिक चळवळीचं नेतृत्व करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी लागणारं मनोबल, पूर्वेतिहास, विश्वासार्हता आणि दूरदृष्टीसुद्धा त्यांच्या ठिकाणी आहे. त्यांच्याच शब्दात सांगायचं झालं तर, 'सज्जन शक्तीची देशाला आज गरज आहे.'

दिनांक - २ ऑक्टोबर २००६

सदाशिव अमरापूरकर
पंचधारा, ए/२०१, दुसरा मजला,
ऑफ यारी मार्ग, वर्सोवा,
अंधेरी (प) मुंबई-४०० ०६१.

# ठिबक सिंचन-समृद्धीची गुरूकिल्ली

हेमंत काळुंखे - जनशक्ती, ऑक्टोबर १९८८

ठिबकचा वाचू या इतिहास सारे, वटवृक्षाची आतां चाखतो फळे ।
वर्षे गेली काळ लोटला, ठिबक यशाचा पाया इथला ।

पृथ्वीच्या पाठीवरील पंचेचाळीस टक्के माणसे आजही अर्धपोटीच राहतात हे कटू सत्य आहे. भुकेमुळेही दारिद्र्य व अज्ञान ठाण मांडून राहते. जगातील बरेचसे झगडे, तंटे यांच्याही मुळाशी फक्त भूकच आहे. त्यात जगाची लोकसंख्या दरवर्षी दोन टक्क्यांपेक्षा जास्त वेगाने वाढते आहे, परंतु अन्नधान्याचे उत्पादन मात्र एक टक्क्यानेच वाढते आहे. ही विषमता दूर करण्यासाठी व समृद्धीकडे वाटचाल करण्यासाठी धान्य उत्पादनात झपाट्याने वाढ करण्याची नितांत गरज आहे आणि त्यासाठी जमीन वगळता पाणी हाच एकमेव महत्त्वाचा



जैन ठिबक सिंचन कृषि हितकर चिंतन

घटक आहे. पाण्याचे योग्य पद्धतीने नियोजन करणे ही काळाची हाक आहे. जळगावच्या जैन उद्योग समूहाचे प्रणेते भवरलालजींनी हे अचूक हेरलं. त्यासाठीच त्यांनी जैन ठिबक सिंचन पद्धतीचा प्रचार व प्रसार करण्याचे धाडसी पाऊल टाकलंय...

जळगावच्या खान्देशी मातीत रूजलेलं 'जैन उद्योग समूह' हे नाव आता महाराष्ट्रात नव्हे तर, भारतात सुपरिचित झालं आहे. गेल्या पंचवीस वर्षांपासून मातीशी इमान राखून भवरलालजींनी स्वत:ला शेती, शेतकरी व शेतीनिष्ठ व्यवसायाला वाहून घेतलंय. बी-बियाणं, खतं, जंतुनाशकं, ट्रॅक्टर्स, पपेन, पपई कॅण्डी अन पी.व्ही.सी. पाईप अशा टप्प्याटप्प्याने त्यांनी शेतीशी आपली बांधीलकी यापूर्वीच सिद्ध केली आहे.

पिढ्यानपिढ्यांचा इथल्या शेतीमधील दस्तुरखुद्द अनुभव त्यांच्या पाठीशी आहे. पण पाश्चिमात्य देशात विकसित झालेले अतिप्रगत तंत्रज्ञान या देशात, या मातीत, या माणसात रूजविण्याची त्यांची जिद्द आहे, महत्त्वाकांक्षा आहे, तळमळ आहे, एवढंच नव्हे तर, अशी स्वयंधारित जबाबदारीची जाणीवही आहे ती केवळ जैन उद्योग समूहाकडेच...

जैन ठिबक सिंचन पद्धत हे त्याच जिद्दीने टाकलेले एक धाडसी, साहसी पाऊल आहे.

जैन उद्योग समूहाचे अध्यक्ष श्री. भवरलालजी जैन यांनी तर आता या योजनेत सर्वांना सामावून घेण्यासाठी एक कोटी अकरा लाखाचे इक्विटी शेअर्स बाजारात खुले केले आहेत. या शेअर्स विक्रीचा शुभारंभ येत्या सतरा ऑक्टोबरपासून होत आहे. या निमित्ताने ठिबक सिंचन म्हणजे नेमकं काय? ठिबक सिंचन या योजनेचे शेतीत फायदे काय? या योजनेसंबंधी शेतकऱ्यांमध्ये पसरलेले समज-गैरसमज काय? शासन या योजनेला प्रोत्साहन देत आहे की नाही? या प्रश्नांचा उलगडा करण्यासाठी उद्योगपती व या योजनेचे प्रणेते श्री. भवरलालजी जैन यांनी भेट घेऊन दिलखुलास चर्चा केली. त्यांच्याशी झालेल्या संवादाचा हा आलेख.



पीव्हीसी पाईप यार्डमध्ये पाईपांचा साठा

**हेमंत-** ठिबक सिंचन म्हणजे काय?

**भाऊ-** झाडाच्या मुळांशी थेंब थेंब पाणी ठराविक प्रमाणात हळूहळू देणं यालाच 'ठिबक सिंचन पद्धत' म्हणतात. पिकांच्या गरजेनुसार वेळोवेळी पडणारे पाण्याचे थेंब या पद्धतीत नियंत्रित केले जातात. ही संच योजना स्थिर अथवा सहजासहजी हलविण्याजोगी असते. जमिनीची प्रत, पिकाचा प्रकार, झाडाचं वय, जमिनीतून होणाऱ्या बाष्पीभवनाचं प्रमाण या मूलभूत घटकांचा विचार करून रोपट्यांच्या किंवा झाडाच्या मुळांपाशी पाणी थेंबाथेंबानी तसेच कमी दाबाने गरजेनुसार सारख्या प्रमाणात देण्याचं तंत्र म्हणजेच 'ठिबक सिंचन पद्धती'.

**हेमंत-** या योजनेची सुरुवात कुठे व कशी झाली?

**भाऊ-** इतिहासावर नजर टाकली तर असं लक्षात येतं की, १८६० पासून जमिनीच्या आतून पाणी देण्याचा प्रयत्न जर्मन शास्त्रज्ञांनी सुरू केला. तद्नंतर १९२० ते ३० दरम्यान सच्छिद्र पाईपातून पाणी देण्याची पद्धत काही काळ प्रचलित होती. १९३४ साली अमेरिकेत श्री. रोबे यांनी अगोदर एक ठिबक पाईपाचा प्रयोग केल्याची नोंद आहे. परंतु खऱ्या अर्थाने व्यापारी पातळीवर ठिबकचा उपयोग इस्रायलमध्ये वाळवंटात भाजीपाल्यासाठी केला गेला. त्या वापरावेळी त्यांना पाणी क्षारयुक्त असतानासुद्धा दुप्पट उत्पन्न मिळते असे आढळून आल्याने त्याचा झपाट्याने प्रसार झाला. आज तेथे ऐंशी टक्के उत्पादन या पद्धतीनुसार घेतलं जातं.



'गिनिज बुक' नोंदीचे ठिबकवर डाळिंबाचे उत्पादक जवरीलाल कांकरिया

त्यानंतर १९७७ मध्ये एलएलडीपीई या प्लास्टिक पदार्थाचा शोध लागला. त्यापासून ठिबक सिंचनाच्या तयार झालेल्या ट्यूब्ज (नळ्या) अधिक शक्तीमान ठरल्या. उन्हातदेखील तडे जाणार नाहीत अशी त्यांची घडण बनली. त्याचबरोबर कच्च्या मालापासून पक्का माल बनविण्यासाठी जी यंत्रसामुग्री लागते त्यात संशोधनाने बदल घडवून आणले गेले. उष्ण कटिबंधाच्या देशात म्हणजेच इस्रायल, सौदी अरेबिया, ऑस्ट्रेलिया व पूर्व भागातील देशांमधून याचा खूप वेगाने प्रसार झाला.

**हेमंत-** भारतात अन विशेषत: महाराष्ट्रात या पद्धतीचं जाळं कसं पसरलं?

**भाऊ-** भारतात ठिबक सिंचन पद्धतीचं संशोधन १९७० च्या सुमारास सुरू झालेलं आढळतं. मात्र त्यास खरी गती साधारण १९८० नंतर मिळाली. राहुरी, कोईमतूर, हिसार, जोधपूर इत्यादि संशोधन केंद्रात, कृषी विद्यापीठात ऊस, कापूस, भाजीपाला, केळी, पपई आदि पिकांवर संशोधन होऊन ठिबकमुळे साधारण तीस ते ऐंशी टक्के पाण्याची बचत होते तर उत्पादनात सुमारे तीस ते दोनशे टक्क्यांपर्यंत वाढ होते असं नोंदलं गेलं आहे.

**हेमंत-** शेतीसाठी एवढ्या फायदेशीर ठरणाऱ्या या योजनेला शासन काही प्रोत्साहन देत आहे की नाही?

**भाऊ-** या प्रश्नाचं उत्तर माझ्यापेक्षा शासनकर्तेच अधिक चांगलं देऊ शकतील. माझ्या माहितीनुसार महाराष्ट्रात शेती उत्पादन वाढवायचं असेल तर ठिबक सिंचनाशिवाय दुसरा पर्याय नाही हे शासनाच्याही चांगल्या प्रकारे लक्षात आलं आहे. शासनाने या पद्धतीचा अभ्यास करण्यासाठी नुकतीच एक 'अवर्षण प्रवण

क्षेत्र पुनरावलोकन समिती' स्थापन केली होती. त्या समितीने केलेल्या शिफारशीत ठिबकला फार महत्त्व देण्यात आलं आहे. ठिबकसाठी शासनाने शेतकऱ्यांना कोणकोणत्या सवलती द्याव्यात हेही सुचविलं आहे. पण त्या शिफारशींची अंमलबजावणी अद्याप का होत नाही, हे समजायला मार्ग नाही.

**हेमंत-** भरघोस पिकासाठी खूप खतांची वा इतर द्रव्यांची आवश्यकता असते हे बरोबर आहे काय?

**भाऊ-** भरघोस पिकासाठी, अधिक फळधारणेसाठी किंवा फळांचे वजन वाढण्यासाठी, त्यांची प्रत चांगली येण्यासाठी खूप खतांची वा अन्य द्रव्यांची आवश्यकता असते असा चुकीचा समज शेतकऱ्यात प्रचलित झाला आहे. मात्र वस्तुस्थिती फार वेगळी आहे. कोणत्याही कात-फळात नव्वद ते पंच्याण्णव टक्के भाग पाण्याचाच असतो आणि त्याची वाढ होण्यासाठी हवेतील कार्बन डाय ऑक्साईड वायू सूर्यकिरणांच्या मदतीने वापरला जातो. याबरोबर जमिनीतील सकसपणा व त्यास आवश्यक असलेली द्रव्ये यांचा उपयोग केला जातो.

भारतात, विशेषत: महाराष्ट्रात सूर्यप्रकाश, हवा, सर्वसाधारण जमिनीचा सुकाळ आहे. पण असं असूनही पाण्याची कमतरता असल्याने त्यांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करून घेता आलेला नाही. तेव्हा शेतीचा खऱ्या अर्थाने विकास करायचा असेल तर पाणी हा महत्त्वाचा घटक मानला जाऊन त्याच्या नियोजनाकडे लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. पाण्याच्या नियोजनाची आणि उत्पादनवाढीची गुरूकिल्ली म्हणून ठिबक सिंचनाकडे बघितलं जातं. हा दृष्टीकोन स्वीकारला नाही तर शेतीचीच नव्हे तर, राज्याची व पर्यायाने देशाची प्रगती खुंटेल असं मला वाटतं.

**हेमंत-** ठिबक सिंचन पद्धतीचे फायदे काय?

**भाऊ-** ठिबक सिंचन पद्धत ही शेतीला वरदान ठरणारी पद्धत म्हणून इतरत्र ओळखली जाऊ लागली आहे. या पद्धतीमुळे झाडांना-पिकांना तहानपीडा होत नाही किंवा जमीन पाणथळ होत नाही. ठिबक सिंचनामुळे सर्व झाडांना सारखं पाणी पुरविलं जातं. त्यामुळे पिकांची वाढ समप्रमाणात व जोमाने होते. जे पाणी खराब किंवा अनुपयुक्त म्हणून वाया जाते त्यावर रासायनिक प्रक्रिया करून त्याचा उपयोग ठिबक सिंचनात केला जातो.

तुषारपद्धती किंवा सरीने पाणी देण्याच्या पद्धतीपेक्षाही ठिबक पद्धतीला वीज कमी लागते. 'ठिबक' जास्त कार्यक्षमपणे काम करते, त्यामुळे विजेची बचत होते.



ठिबकवर केळीची बाग

पिकांची होणारी वाढ जोरदार व सारखी होत असल्याने फळांवर एक विशिष्ट प्रकारची कांती येते व त्यामुळे फळे जास्त टवटवीत दिसतात. तसेच जमीन ओढणे, खोदणे, वाफे बांधणे-तोडणे इत्यादींवर होणारा अनाठायी खर्च वाचतो. खते व औषधी ही केवळ पिकांसाठी वापरली जात असल्यामुळे व तणवाढ कमी होत असल्यामुळे याबाबींवरील खर्च निम्मे होतो.

**हेमंत–** जैन ठिबक सिंचन पद्धती ही अधिक खर्चिक असल्याने शेतकऱ्यांना न परवडणारी आहे असं बोललं जातं, त्याबाबत आपणास काय वाटतं?

**भाऊ–** हा देखील शेतकऱ्यांचा गैरसमज आहे. महाराष्ट्रात आजपावेतो एकोणतीस जिल्ह्यातून वेगवेगळ्या एकूण बावीस पिकांवर तीन हजार तीनशे एकर जमीन ठिबक सिंचनाखाली आणली गेली आहे. राज्याबाहेर मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक व गुजरातमध्येही सदर प्रचारास सुरुवात झाली आहे. एकूण तेराशे शेतकऱ्यांनी आजपावेतो ठिबक सिंचन पद्धतीचा फायदा शेतांवर करून घेतला असून त्यांच्या अनुभवानुसार पहिल्या एक-दोन पिकातच त्यांची ठिबकवर केलेली गुंतवणूक वसूल झाली आहे, असा त्यांना प्रत्यय आला आहे.

**हेमंत–** बायवॉल पद्धती म्हणजे काय? तिचे फायदे कोणते?

**भाऊ–** जैन इरिगेशनची एक विशेषता म्हणजे रांगेने लागणाऱ्या पिकांसाठी सुरू केलेली बायवॉल. अशा पिकांकरीता ठिबक सिंचन पद्धती अधिक खर्चिक पडते म्हणून त्याऐवजी बायवॉल पद्धतीचा स्वीकार प्रगत देशात केलेला आहे. ही पद्धती भारतात कोणत्याही उत्पादकाजवळ नसून जैन इरिगेशनने त्याचा श्रीगणेशा

भारतात केला आहे. सदर पद्धतीमुळे ऊसाच्या उत्पादनात २५-३५ टक्क्यांपर्यंत वाढ झाली असून ऊसाचा उताराही १-१.५ टक्क्याने वाढल्याचे आढळले आहे.

**हेमंत-** ठिबक सिंचनाच्या भवितव्याबाबत काय वाटते?

**भाऊ-** ठिबक सिंचनामुळे शेतकऱ्यांना शेती उत्पादन आणि शेती मालाच्या गुणवत्तेतून खूप लाभ होणार हे नक्की. त्यामुळे आपल्या कृषीप्रधान देशात या पद्धतीचे भवितव्य उज्ज्वल आहे आणि त्या दृष्टीने आमची घोडदौड सुरू आहे.

**जैन उद्योग समूह: दोन तपांची यशस्वी वाटचाल**

जळगावच्या खान्देशी मातीत कृषि समर्पित जैन उद्योग समूह आपल्या कार्यकुशलतारूपी मुळांनी इतका रूजला आहे की, त्याचा गौरवरूपी फुलांचा सुगंध सर्व महाराष्ट्रात दरवळला आहे. गेल्या जवळपास पंचवीस वर्षांपासून मातीशी इमान राखून जैन बंधुंनी स्वत:ला शेती, शेतकरी व शेतीनिष्ठ व्यवसायाला वाहून घेतलं आहे.

१९६३ ते १९७८ या प्रारंभीच्या पंधरा वर्षांच्या वाटचालीत रॉकेल, पेट्रोलपंप, औषधी, खते-बियाणे, ट्रॅक्टर्स, इलेक्ट्रीक मोटर्स इत्यादींचा व्यापार खूप मोठ्या प्रमाणावर राज्य पातळीवर व काही बाबतीत राष्ट्रीय पातळीवर जैन बंधुंनी पसरविला.

१९७८ मध्ये बारा वर्षे बंद पडलेला जळगावचा केळी पावडरचा कारखाना त्या वेळच्या जिल्हा सहकारी सोसायटीकडून जैन बंधुंनी खरेदी केला. मशिनरी व गोदाम यांचा उपयोग पपईच्या चिकापासून पपेन बनविण्याकडे त्यांनी मोठ्या कल्पकतेने व दूरदर्शीपणाने करून घेतला. अशा प्रकारे केळीची पावडर बनविणारी फॅक्टरी भारतात सर्वाधिक पपेन उत्पादन करणारी फॅक्टरी झाली.

स्वत:च्या कष्टाने व संशोधकदृष्टी बाळगून सदर मालाची प्रत जागतिक बाजारपेठेत सर्वमान्य करून घेतली. आजही जगात दुसऱ्या क्रमांकाचे पपेन उत्पादक म्हणून सर्वत्र या समूहाचा लौकिक पसरला आहे. फॅक्टरीत निर्माण होणारा पपेन माल पूर्णपणे (१०० टक्के) निर्यात केला जातो व त्यापोटी दुर्मिळ परकीय चलन देशास प्राप्त होते ही बाब सार्थ अभिमानाची आहे.

पपेनसाठी लागणारा पपईचा चिक (लॅटेक्स) काढल्यामुळे बहुतांशी वाया जाणाऱ्या पपईपासून कॅण्डी (टुटी-फ्रुटी) बनविण्याची कल्पनाही या उद्योग



पपई कॅण्डी बनविणारे अत्याधुनिक यंत्र

समूहाने वापरली. यामुळे शेतकऱ्याला उत्पादनाचे दुय्यम साधन प्राप्त झाले आहे. लवकरच 'जैन टुटी-फ्रुटी' अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, कॅनडा यासारख्या प्रगत देशात उड्डाण करू पाहत आहे.

जगभर फोफावण्यासाठी प्रत्येक संस्थेला, उद्योगाला समर्पित व ध्येयवादी संशोधकांची व शास्त्रज्ञांची गरज असते. काळाच्या पावलांची चाहूल घेऊन जैन उद्योग समूहानं प्लास्टिक व तदनुषंगिक इतर अनेक बहु-उपयोगी योजनांवर स्वत:च्या प्रयोगशाळेत सतत संशोधन चालू ठेवले आहे.

या वाटचालीनंतर जैन उद्योग समूहाने १९८० मध्ये पी.व्ही.सी. पाईपांच्या उत्पादनात पाय रोवला आणि 'जेथे हात टाकावा तेथे सोनं निघावं' याप्रमाणं सुरुवातीच्या वर्षांमध्ये वाढती कमान ठेवून वार्षिक उत्पादनाची २८ हजार टनांपर्यंत मजल गाठली आहे. साहजिकच जैन उद्योग समूहाच्या जैन पाईपांनी भारतात आपला प्रथम क्रमांक जपून ठेवला आहे.

गेल्या दोन तपांपेक्षा अधिक काळ शेती, शेतकरी आणि शेती व्यवसाय यांच्याशी बांधीलकीतून जवळीक निर्माण केल्यामुळे जैन उद्योग समूह शेतीला अगदी जवळ असलेल्या ठिबक सिंचनाकडे सहजपणे वळला. त्यातूनच जैन इरिगेशनचा जन्म झाला. आपल्या सुमारे २५ वर्षांच्या तपश्चर्येच्या शिदोरीवर जैन समूहाने सार्वजनिक क्षेत्रात पदार्पण केले आहे. जैन इरिगेशन ही कंपनी जैन समूहाची सार्वजनिक क्षेत्रातील पहिलीच कंपनी. तिचा आकार व व्याप प्रचंड व विस्तृत होणे अपेक्षित आहे. त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा.

## जैन इरिगेशन : एक दृष्टीक्षेप

देवचंद छेडा - व्यापार (मुंबई), फेब्रुवारी १९९२

आधीच खूप गुंतागुंतीचा आधुनिक युगातला व्यापार, शासकीय नियंत्रणांनी आणखीनच क्लिष्ट होतो. तथापि ध्येय, प्रामाणिकपणा आणि पारदर्शकता यांची जाणीवपूर्वक सांगड घातली तर गढूळ वातावरणातही तळातली राष्ट्रभक्ती स्वच्छ दिसते. तीच जाणवते इथे !

**प्रतिनिधी–** अपनी कंपनी जैन ग्रुप ऑफ इण्डस्ट्रीज के बारे में कुछ बताएंगे?

**भाऊ–** जैन इरिगेशन सिस्टीम लि. की बात करें तो अब आगामी एवं अत्यंत निकट भविष्य में यह कंपनी जैन ग्रुप की फ्लैगशिप कंपनी बन जाएगी। माइक्रो इरिगेशन के क्षेत्र में छोटी-बड़ी ७३ कंपनियाँ है, फिर भी देश में ६० प्रतिशत और महाराष्ट्र में ७० प्रतिशत हिस्सा जैन इरिगेशन का है। कई वर्षों के कामकाज के आंकड़े की जांच करें, तो १०० प्रतिशत की विकास दर हासिल की है। आगामी वर्ष में भी यह प्रगति बनी रहेगी।

*९५/९६ तक देश की बड़ी ५० कंपनियों में इसका स्थान होने की हमारी अपेक्षा है। हाल में इसका स्थान बड़ी २५० कंपनियों में है। जैन उद्योग समूह ९५/९६ तक ५०० करोड़ रु. और २००० तक १००० करोड़ रु. का टर्न ओव्हर प्राप्त करना चाहता है।* जिसमें जैन इरिगेशन का हिस्सा सब से अधिक होगा।

*जैन इरिगेशन को ९५/९६ तक १८५/१९० करोड़ रु. का निर्यात सहित कुल ५०० करोड़ रु. का टर्नओव्हर और ५०/५२ करोड़ रु. का नेट प्रॉफिट अवश्य होगा, ऐसा मुझे विश्वास है।*

फिलहाल कंपनी की टपक सिंचन प्रणाली के तहत ६० हजार एकड़ क्षेत्र है, वह आगामी दो-तीन वर्षों में बढ़ कर ढाई लाख एकड़ पहूँच जाएगा। महाराष्ट्र सरकार ने १०० करोड़ रु. खर्च से हार्टिकल्चरल डेवलपमेंट योजना बनाई है। गुजरात सरकार विश्व बैंक की अर्थ सहायता से ५०० करोड़ रु. की तीन योजनाओं पर



डुंगराल प्रदेश का काया परिवर्तन

विचार कर रही है। इन में (१) समुद्र तटवर्ती प्रदेश तथा बंजर भूमि सुधार, (२) डुंगराल प्रदेश का वनीकरण, (३) सरदार सरोवर कमांड एरिया डेवलपमेंट योजनाओं का समावेश है। इन सभी योजनाओं के कारण जैन उद्योग समूह को अधिक लाभ होने की संभावना है।

**प्रतिनिधी–** मेरी जानकारी के अनुसार रिलायंस (RPL) ने अपने माल के प्रयोग के लिए आपको पसंद किया है। उसका माल कैसा है?

**भाऊ–** रिलायंस की तरफ से हमें ८००० किलो पी.वी.सी. पावडर ''ट्रायल'' के लिए मिला है। ''ट्रायल प्रोडक्शन'' अभी चालू है। माल अच्छा है तथा उसकी गुणवत्ता में और भी सुधार होने की आशा है।

**प्रतिनिधी–** विदेशी पोलिमर्स उत्पादकों द्वारा खास कर पी.वी.सी. का भारत में ''डम्पिंग'' किए जाने के समाचारों मे कितना तथ्य है?

**भाऊ–** अंतर्राष्ट्रीय बाजार में पी.वी.सी. के भाव में घटबढ़ की रेंज नीचे में प्रति टन ४९० से ऊपर में ८०० डॉलर प्रति टन तक रही। कुछ हद तक आयात सस्ता हो गया है। परंतु इसका कारण विदेशी उत्पादकों का 'डम्पिंग' नहीं, बल्कि मौसमी तथा माँग और आपूर्ति के तत्त्वों के अनुसार विश्व बाजार में भाव घटा है। खाड़ी संकट और उसके बाद विदेशी मुद्रा का अभाव तथा कड़े आयात नियंत्रण की स्थिति का लाभ उठा कर स्थानीय उत्पादक ३५ प्रतिशत तक अत्यधिक भाव वृद्धि कर चुके हैं। अब विश्व बाजार में भाव टूटने से उन्हें धक्का लगा है। उत्पादन वृद्धि के आंकडे तथा विदेशी मुद्रा बचत के नाम पर निहित स्वार्थवाले एंटी डम्पिंग ड्यूटी

लगाने और उसके द्वारा अपना हित सुरक्षित रखने के लिए 'छाती पीटने का उद्यम' शुरू कर चुके है।

**प्रतिनिधी-** एक आरोप ऐसा है कि आपका प्लास्टिक के कच्चे माल का आयात आवश्यकता से अधिक है, आपने आयात सुविधा का सट्टेबाजी के उद्देश्य से उपयोग किया है।

**भाऊ-** पोलिमर्स अथवा प्लास्टिक के कच्चे माल का मैं एक प्रमुख उपभोक्ता हूँ। आरोप लगाने वाला कौन है? उसे लोग जानते हैं। अपने पोलिमर्स उत्पादकों में मुनाफा बनाए रखने, माल पर ऊंचा 'ऑन' वसूल करने के लिए कौन-कौन क्या करता है, कैसे अनुचित व्यवहार किए जाते है, इसकी लोगों को जानकारी होगी ही। ऐसा करना हमारा काम नहीं है। ऊँचा प्रीमियम मांगनेवालों के साथ मैं कामकाज ही नहीं करता। उनका माल कभी खरीदता नहीं। इसलिए कुछ लोगों को आपत्ति होना स्वाभाविक है।

**प्रतिनिधी-** देशी आपूर्तिकर्ताओं और 'पूलिंग प्राईस सिस्टीम्स' के बारे में कुछ बताएंगे?

**भाऊ-** नोसिल और आईपीसीएल को मैं अच्छा सप्लायर मानता हूँ। उनके साथ हमारे अनुभव अच्छे रहे। कुछ कमियों के बावजूद आईपीसीएल की वितरण प्रणाली संतोषजनक है। इसके 'पूल प्राइस सिस्टीम' के बारे में भी यही दृष्टिकोण है। यद्यपि विश्व बाजार में भाव घटते जा रहे है, उसे देखते हुए 'पूल प्राइस' को त्यागने, उसे समाप्त करने का मैं पक्षधर हूँ।

**प्रतिनिधी-** पोलिमर्स के आयात को ओ जी एल से निकाल कर '**ॲडव्हा**न्स लायसेन्स स्कीम' के तहत डालने की माँग आपको कैसी लगती है?

**भाऊ-** हमारे विचार से पोलिमर्स का बल्क आयात ॲडव्हान्स लायसेन्स स्कीम के तहत कर देने से स्थानीय उत्पादकों को ग्राहकों का शोषण करने के लिए अधिक अवसर मिल जाएंगे। उचित मूल्य की दुकान की ओट में 'राशनिंग शॉप' की प्रवृत्ति विकसित होगी। फिर भी अगर प्लास्टिक के कच्चे माल का आयात ॲडव्हान्स लायसेन्स स्कीम के तहत करना है, तो उससे पहले स्थानीय भाव पर निगरानी रखने वाली प्रभावकारी मशीनरी स्थापित होनी चाहिए। देशी तथा आयातीत माल की तरह ही देशी उत्पादकों को भी 'पूल प्राइस' के तहत शामिल करके उस पर अमल करना चाहिए।

**प्रतिनिधी–** आप इलेक्ट्रॉनिक तथा टेलि-कम्युनिकेशन के क्षेत्र में प्रवेश करने वाले थे, उसका क्या हुआ?

**भाऊ–** खाड़ी संकट और आयात अंकुशों के कारण अपना विचार स्थगित कर दिया है। दो वर्ष से इस क्षेत्र में बढ़ रही प्रतिस्पर्धा भी कारण कहा जा सकता है। फिर भी कोई बीमार इकाई मिल जाए तो उसका अधिग्रहण करने का विचार है। इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स तथा प्रोसेसिंग इलेक्ट्रॉनिक्स के क्षेत्र में कार्यरत बीमार इकाई (युनिट) हमें चल सकती है। नई इकाई नहीं लगानी है।

**प्रतिनिधी–** विविधीकरण करने की कोई योजना?

**भाऊ–** आगामी दो-तीन वर्षों में कार्यरत होनेवाली अनुमानित ७५ से १०० करोड़ रु. के खर्च से कुछ युरोपीय बहुराष्ट्रीय कंपनियों के सहयोग से 'ग्रीन हाऊस', 'तरल उर्वरक' (लिक्विड फर्टिलायझर) परियोजना, एवं इस्राइल की एक प्रमुख कंपनी के सहयोग से 'टिश्यू कल्चर प्रोजेक्ट' पर विचार किया जा रहा है। संभावित स्थान महाराष्ट्र-गुजरात होगा। २५ करोड़ रु. खर्च से विचाराधीन 'ग्रीन हाऊस' प्रोजेक्ट १०० प्रतिशत निर्यातोन्मुखी इकाई होगी, जिस में से कृषि उपज तथा फूलों का निर्यात किया जा सकेगा।

मध्य-पूर्व में वार्षिक ३० लाख डॉलर के बाजार को पहचान कर आबू धाबी में पीवीसी फिटिंग्स तथा असेम्ब्ली प्लांट लगाने पर विचार किया जा रहा है। इस पर अनुमानित लागत ३ से ५ करोड़ रु . है।

इसके अलावा जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. के निर्यात को बढ़ावा देने के लिए विदेश में व्यापार बिक्री के अनुभव और नेटवर्क वाली विदेशी कंपनियों को अधिग्रहण करने का या पारस्परिक इक्विटी सहयोग करने का निर्णय हो चुका है। अब यह मामला सरकार के विचाराधीन है।



जैन हिल्सपर प्रस्थापित अत्याधुनिक हरितगृह

# शेतकरी आणि भूमिशी अतूट नाते जोडणारे... उद्योगपती

हेमंत काळुंखे - चाफा, नोव्हेंबर १९९२

प्लास्टिकचं यंत्र देई ठिबकचं तंत्र, बाजारपेठांचा हाती येई मोठा मंत्र।
पेरलं ठिबक, फोफावलं शेतीत, इतिहास घडला शेतकऱ्यांचे मातीत।
पाय रोविले दांडात, आत्मविश्वास गगनात !




भगवान श्रीकृष्ण चौक

जळगाव शहर एक विकसित सुंदर शहर म्हणून ओळखले जाऊ लागले आहे. या शहराच्या मध्यभागी शास्त्री टॉवर चौकात एक सुशोभित कारंजा आहे आणि या कारंजाच्या मध्यभागी एक कृष्णाची प्रतिमा आहे. तिच्या हातातील बासरी अधिक बारकाईने बघितल्यास ती बासरी नसून पी.व्ही.सी. पाईप असल्याचे निदर्शनास येते. शहराच्या हृदयस्थानी असलेला हा बासरीधारक श्रीकृष्ण, जैन उद्योग समूहाचे जनमानसांच्या हृदयात असलेले स्थान क्षणोक्षणी प्रकट करीत असावा... अशा या जैन उद्योग समूहाचे प्रणेते व संस्थापक अध्यक्ष आहेत सुविख्यात उद्योगपती श्री. भवरलाल जैन.


श्री. भवरलाल जैन यांचा जन्म जळगाव जिल्ह्याच्या सीमेलगत व अजिंठा लेण्याच्या सान्निध्यात असलेल्या वाकोद या गावी झाला. शेतकरी-व्यापारी हिरालालजी जैन यांचे ते सुपुत्र ! पित्याने मनाशी खूणगाठ बांधली की, आपला मुलगा भवरलाल यास कॉलेजात पाठवावा आणि त्याने कायद्याची परीक्षा द्यावी. वडिलांचे हे स्वप्न साकार करण्यासाठी भवरलाल जैन यांनी अथक

परिश्रम केले आणि १९६२ मध्ये कायद्याची पदवी संपादन केली. एवढेच नव्हे तर, १९६३ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने त्यांची प्रांताधिकारी म्हणून निवडही केली होती. परंतु त्यांनी ती साफ नाकारून धंद्यात लक्ष घातले.

१९६३ मध्ये सात हजार रुपये भांडवल व तीन कष्टाळू सहकारी यांच्या मदतीने त्यांनी उद्योगाचा पाया रोवला. प्रारंभीच्या काळात 'एस्सो' कंपनीचा किरकोळ रॉकेल विक्रीचा परवाना त्यांना मिळाला. कायद्याची पदवी खिशात असतानाही धंद्याचे व्यवस्थापन, दृढनिश्चय व परिश्रम आत्मसात केले. त्यांच्या कर्तृत्वावर एस्सो कंपनीने खूष होऊन पुढे त्यांना ऑईल, डिझेल, पेट्रोल, घरगुती गॅस इत्यादि एजंशा दिल्या. एक भरवशाचा विक्रेता म्हणून कंपनी व लोक त्यांच्याकडे बघू लागले.

काळाच्या ओघात हळूहळू धंद्यात प्रगती होऊ लागली आणि आज जैन उद्योग समूहाची उलाढाल कोट्यावधीच्या घरात गेली आहे. यामागील रहस्य जाणून घेण्याच्या उद्देशाने त्यांची भेट घेतली.

सामान्य शेतकरी असो की सरकार दरबारातील उच्चपदस्थ अधिकारी असो, ते आज सर्वांचे 'भाऊ'झाले आहेत. भरभराटीची ही गोड फळे चाखण्यापूर्वी त्यांना तीन दशकांचा खडतर प्रवास करावा लागला. त्यांनी जे पेरले त्याप्रमाणे उगवले. त्यांचेशी झालेली ही मनमोकळी बातचीत...



प्रसन्न मुद्रेत भवरलाल जैन पाईप यार्डमध्ये

**हेमंत-** ठिबक सिंचन पद्धतीकडे कोणत्या हेतूने प्रेरित होऊन शिरकाव केला?

**भाऊ-** तसं आमचं घराणंच मुळी शेती व्यवसायातील आणि आपला देशही शेतीप्रधान! शेती या उद्योगधंद्यावरच आमचे कुटुंब उभं राहिलं आहे. त्यामुळेच शेती संदर्भात नवीन तंत्रज्ञान विकसित करण्याचा आमचा सातत्याने प्रयत्न राहिला आहे. ठिबक सिंचन पद्धतीला इस्रायलमध्ये मिळालेलं अमाप यश पाहून आम्हीसुद्धा या क्षेत्रात शिरकाव केला आहे.

**हेमंत-** भारतात ही कल्पना कितपत रुजली आहे?

**भाऊ-** महाराष्ट्रात अति जलदगतीने ठिबक सिंचन वाढत आहे. त्याचं कारण आपल्या राज्यात पाण्याचे दुर्भिक्ष आहे. अर्थात ही कल्पना नवीन आहे, त्यामुळे रुजायला थोडा वेळ लागेल. आमच्या प्रयत्नांना सरकारच्या सहकार्याची जोड मिळाली की, ही पद्धत लोकप्रिय व्हायला वेळ लागणार नाही. ती गती आता वाढलेली आहेच. ठिबक सिंचन पद्धती केळी, साग, ऊस, फळबागांसह इतर ३५ पिकांसाठी अतिशय कार्यक्षम ठरू शकते.



उपपंतप्रधान श्री देवीलाल (जानेवारी-१९९२) यांच्यासह
सुरेश जैन व भाऊ ठिबक आधारित आंबा बागेचे निरीक्षण करताना

**हेमंत-** एक एकरात ठिबक सिंचन करण्यासाठी किती खर्च येतो?

**भाऊ-** ठिबक सिंचन संच उभारण्यासाठी एका एकराचा खर्च ८ ते १३ हजार रुपये या दरम्यान येतो.

**हेमंत-** एवढा खर्च शेतकऱ्याच्या आवाक्याबाहेरचा वाटत नाही का?

**भाऊ-** होय, ते खरं आहे. सामान्य शेतकऱ्यास ते परवडणारे नाही. परंतु ज्याच्याजवळ चार हेक्टरपर्यंत जमीन आहे तो ह्या पद्धतीचा उपयोग घेऊ शकतो. शिवाय सरकारतर्फे ठिबक संचावर अनुदानही मिळते.

**हेमंत-** गेल्या तीन वर्षात आपण ज्या जलदगतीने म्हणजे वर्षाला जवळजवळ शंभर टक्के प्रगती साधत आहात त्याचे गमक काय?

**भाऊ-** ही पद्धत सामान्य शेतकरी सोडा पण नवश्रीमंत शेतकरी यांनीही अद्यापि स्वीकारली नाही. किंबहुना आम्ही अद्यापपर्यंत पृष्ठभागापर्यंतच पोहोचलो आहोत. ज्या वेळी आम्ही पृष्ठभागावरून खोलवर शिरकाव करू त्या वेळी ठिबक सिंचन अधिक प्रगती करू शकेल. दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की, यासाठी लागणाऱ्या गुंतवणुकीच्या परतफेडीची कालमर्यादा तीन महिने ते दोन वर्षे एवढी कमी आहे. असं असूनही आम्ही जो संच विकतो त्याची ५ वर्षांपर्यंत हमी घेतो. केंद्र सरकार (९१-९२ पर्यंत) जवळजवळ एक लाख हेक्टर जमिनीचे क्षेत्र ठिबक सिंचनात आणण्याची योजना आखीत आहे आणि ५ लाख हेक्टर जमीन आठव्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटपर्यंत ठिबकखाली आणण्याचा सरकारचा संकल्प आहे. सरकारने या योजनेसाठी २५० कोटींची सबसिडी योजना मंजूर केली आहे. त्यामुळे जे सामान्य शेतकरी असतील ते देखील या योजनेचा लाभ घेऊ शकतील.




पॉलिट्यूब फॅक्टरीची अद्यावत यंत्र मांडणी




पाईप फॅक्टरीत माधव गडकरींचे स्वागत करताना भाऊ व आनंद गुप्ते

**हेमंत–** इतर कंपन्यांना अपयश आले त्या ठिकाणी आपण यशस्वी झालात, जैन ठिबकला कमी कालावधीत अमाप यश मिळाले त्यामागील रहस्य काय?

**भाऊ–** याची प्रामुख्याने दोन कारणं आहेत. त्यापैकी एक म्हणजे आमचा पाया ग्रामीण भाग आहे. ही कंपनी ग्रामीण पायावर उभारलेली आहे. आमची पाळंमुळं खेड्यात रुजली आहे. वातानुकूलित खोलीत बसून अशा योजना कार्यान्वित करता येत नाहीत. त्यास शेतीचं यंत्र आणि तंत्र माहित असावं लागतं; जाणीव असावी लागते. दुसरे कारण म्हणजे आम्ही झटून कामाला लागलो आहोत. उदाहरण द्यायचं झालं तर इंजिनिअरिंग क्षेत्रातील आमचं बुद्धीचापल्य बघा - आमच्याकडे चार एक्स्ट्रूजन लाईन्स आहेत. त्यापैकी एक आयात केलेली आहे आणि इतर तीन आमच्या इंजिनियर्सनी स्वतः तयार केल्या आहेत. या तिघांची मिळून किंमत आयात केलेल्या एका लाईनपेक्षा कमी आहे. एका आयात केलेल्या मशिनसाठी एक कोटी रुपये मोजावे लागले, तर तीन मशिनसाठी तेवढीच किंमत. त्याचप्रमाणे आम्ही पी.व्ही.सी. फोमशीट्स् तयार करतो. त्यासाठी आवश्यक ते तंत्रज्ञान स्वतः विकसित केलं असून आम्ही कोणत्याही प्रकारच्या परदेशी तंत्रज्ञानावर मुळीच अवलंबून नाही. या उद्योग धंद्यातील मंडळींना याचं आश्चर्य वाटतं. मात्र ही वस्तुस्थिती आहे.

**हेमंत–** देशातील घरगुती बाजारपेठ आपण काबीज केली आहेच. आता आपल्या कंपनीच्या भविष्यातील योजना काय?

**भाऊ–** प्रामुख्याने आमचा विचार परदेशी बाजारपेठेत शिरकाव करण्याचा आहे. अर्थात त्यासाठी परदेशस्थ कंपन्यांचं सहकार्य घ्यावं लागेल. आम्हाला निर्यात वाढवावी लागेल. १९९१-९२ मध्ये १० कोटी ४ लाखांचा माल निर्यात करण्यात



बिल मेंझिल व डी पावलो यांच्या मेजवानीत भारतीय आदरातिथ्य करतांना भाऊ

आला. विशेष म्हणजे आखाती युद्धाचे सावट असतानाही १० कोटीच्या निर्यातीचं महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट साध्य करण्यात यश मिळालं. एका अमेरिकन कंपनीच्या सहकार्याने आम्ही प्रगत तंत्रज्ञानाच्या साह्याने अधिक श्रेष्ठ दर्जाचा ठिबक सिंचन संच व त्याच्या निरनिराळ्या भागांचे उत्पादन करण्याचा प्रयत्न करीत आहोत. तशा संचांची निर्मिती करण्याचा आमचा मानस आहे. त्याचप्रमाणे इंग्लंडमधील एका कंपनीशी करार करून आम्ही लाकडाला पर्याय म्हणून प्लॉस्टिकच्या ''टिम्बरॉन'' मटेरियलची निर्मिती करण्यासाठी एक प्लान्ट उभा करीत आहोत.

**हेमंत–** येत्या तीन वर्षात जैन ठिबक सिंचन कुठे असेल?

**भाऊ–** येत्या काही महिन्यात आमचा विस्तारीकरण व विस्तृतीकरण प्रकल्प कार्यान्वित झालेला असेल. ९५-९६ मध्ये तो पूर्ण कार्यान्वित होऊन जवळजवळ २७५ ते ३०० कोटी रु. भांडवल यात गुंतलेले असेल. त्यापैकी अर्धा भाग निर्यातीमधून मिळेल.

सध्याचं कंपनीचं ''एक सिंचन व्यवहारातील कंपनी'' हे जे स्वरूप आहे, ते जाऊन ही कंपनी शेती-व्यवसायातील एक आधुनिक कंपनी होऊन जाईल. टिश्यू कल्चर, ग्रीन हाऊसेस आणि पूर्णतः विद्राव्य तसेच घन खतांची उत्पादन योजना पूर्ण झाल्यावर कंपनी शेतांचे कारखान्यात रूपांतर करील. या अशा अत्यंत प्रगत तंत्रांचा वापर उत्पादनक्षमता पटींनी वाढवण्यात होईल व शेतकरी हा स्वावलंबी होण्यास मदत होईल. जगातील ज्या प्रमुख तीन ठिबक सिंचन कंपन्या असतील त्यापैकी एक जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. असेल असा विश्वास आहे.

**यशाचं रहस्य**

या यशाला कारणीभूत आहेत भवरलालजी यांची कल्पकता आणि दूरदृष्टी! आणि सोबत या कंपनीचे संचालक श्री. अशोकभाऊ जैन, श्री. अनिल जैन व सर्व संचालक मंडळ तसेच कर्तव्यदक्ष व निःस्वार्थी अधिकारी व सहकारी कर्मचारी वर्ग...

जैन उद्योग समूह हा एक परिवार बनला आहे. आणि हा परिसर झपाटला आहे तो एकाच ध्येयाने...

जास्तीत जास्त उत्कृष्ट काम,
सहकाराचे जपावे नाम.
'कसं?' आणि 'का?' चा घ्यावा शोध,
उच्च विचारांपासून घ्यावा बोध.
उज्ज्वल भविष्याची स्वप्ने बघावी,
त्याला कृतीची जोड द्यावी.
कौशल्याची कसोटी पहावी,
निःस्पृहता जागी असावी.
हसून निराशा दूर करावी,
सुखाबरोबर दुःखे वाटून घ्यावी.
त्यागाचा नवा आनंद मनी फुलवू या,
धरतीमातेचे ऋण थोडेतरी फेडू या.
ताणतणावात झगडून उजळतो सर्वोत्तमाचा आविष्कार,
तन, मन अर्पिल्याशिवाय येत नाही यशाला आकार.



**ज्योतिषाची भविष्यवाणी खरी ठरली...**

१९६२ मध्ये श्री. भवरलालजी जैन यांनी कायद्याची पदवी घेतली. एक काळ असा होता की, त्यांच्या खिशात फक्त दहा रूपये होते. त्यावेळी ते एका ज्योतिष्याकडे गेले. त्यांचा हात पाहून ज्योतिषाने भविष्यवाणी कथन केली, ''आपण लोह, जमीन आणि तेल या संबंधीच्या क्षेत्रात एक प्रख्यात उद्योगपती व्हाल!'' गमतीची गोष्ट अशी की, त्याच वेळी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून त्यांची प्रांताधिकारी म्हणून निवड झालेली होती. त्यामुळे त्या ज्योतिषाच्या भविष्यवाणीकडे त्यांनी दुर्लक्ष केले.

परंतु थोड्याच कालांतराने भवरलालजींची श्री. सुरेशदादा जैन यांचे पिताश्री स्व. भिकमचंद जैन यांच्याशी भेट झाली. त्यांनी त्यांना धंद्यात पडण्याचा सल्ला दिला व शक्य ते पाठबळ देण्याचे आश्वासनही दिले.

भवरलालजींनी धंद्यात उडी घेतली. कायद्यात देदिप्यमान ठरू पाहणारा तारा निखळून पडला. सात हजार एवढ्या मूळ भांडवलानिशी ते रॉकेलच्या व्यवसायात उतरले.

त्या काळी भवरलालजी दारोदार फिरून रॉकेल विकत असत. कधी सायकलवर तर कधी पायी पायी! यातून त्यांनी परिश्रम व दृढनिश्चय हे गुण आत्मसात केले. त्यांच्या परिश्रमाचे चीज झाले. त्यांनी प्रसिद्ध कंपन्यांच्या पेट्रोल, खते व शेती अवजारांच्या वितरणातून प्रगतीचा मार्ग आखला. नंतर केळीची पावडर बनविणाऱ्या बंद कारखान्याची खरेदी करून शुद्ध पपेनची निर्मिती सुरू केली. त्यातूनच उपशाखा म्हणून पपई पासून टुटी फ्रुटी निर्मितीही सुरू झाली. त्यानंतर १९८९ मध्ये ठिबक सिंचन पद्धतीच्या प्रकल्पाला प्रारंभ झाला. त्यापाठोपाठ गाठली गेली यशाची शिखरे...

आणि भविष्यवाणी खरी ठरली...

# आत्मिक समाधानासाठी परिश्रम हेच अधिष्ठान!

विजय बाविस्कर - दै. लोकमत, डिसेंबर १९९२

अलिप्त वृत्तीचे भवरलालजी लक्ष्मीचं महत्त्व जाणत असताही सरस्वतीचे पूजक कसे होतात? ‘पैसा हे एक साधन आहे, साध्य नाही, ’ असं मानून चतुरस्र जीवन जगणाऱ्या व्यक्तिमत्वाचे अनोखे पैलू.

आंतरराष्ट्रीय ख्याती मिळविलेल्या जैन उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष श्री. भवरलालजी जैन उपाख्य भाऊ यांच्या वयाची पंचावन्न वर्षे पूर्ण होऊन आज त्यांनी छपन्नाव्या वर्षात पदार्पण केलंय. खास हे निमित्त घेऊन ‘लोकमत’ने त्यांच्या व्यक्तीगत व कौटुंबिक जीवनावर प्रकाश टाकणारी प्रदीर्घ मुलाखत घेतली. या मुलाखतीत त्यांनी मनमोकळेपणाने प्रश्नांची उत्तरे दिली. नाना विषयांवरील या संवादातून त्यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पदर उलगडून दाखविण्याचा प्रयत्न झालाय. सामान्य कुटुंबात, ग्रामीण भागात जन्मलेला हा माणूस आज आंतरराष्ट्रीय क्षितिजावर भक्कम पाऊल ठेवून यशाची शिखरं काबीज करतो आहे. त्याची यशोगाथा प्रेरणादायी आहे. असा ‘माणूस’ समाजासमोर मांडण्याचा हा प्रयत्न.....

**विजय-** आपला जन्म केव्हा आणि कुठे झाला?

**भाऊ-** १२ डिसेंबर १९३७ रोजी माझा जन्म झाला. अजिंठ्याच्या पायथ्याशी त्यावेळी ४०० लोकवस्ती असलेल्या वाकोद या खेड्यात मी जन्मलो.

**विजय-** आपल्या आई-वडिलांविषयीची माहिती...

**भाऊ-** माझी आई अशिक्षित अशी आहे आणि वडील अल्पशिक्षित. ते एका कॉटन जिनिंग प्रेसिंग फॅक्टरीचे एजंट म्हणून काम बघत होते. त्यानंतर त्यांनी आपल्या सेव्हिंगमधून काही व्यवसाय रचला आणि त्याबरोबरच शेती रचली.

**विजय–** वाढदिवसाबद्दल आपली भूमिका काय आहे?

**भाऊ–** मी वाढदिवस कधीच साजरा केला नाही आणि आई-वडिलांचीही तशी काही प्रथा नाही. याबाबत मला असं वाटतं की, ही प्रथा आपण पाश्चात्य संस्कृतीकडून घेतली आहे. आमच्या घरात अधून-मधून असं घडत असतं. परंतु सर्व साधारणपणे मला ही कल्पनाही नसते की, आज ही तारीख आहे आणि या तारखेला आपला वाढदिवस आहे.

**विजय–** आपल्या मुलांचा आणि नातवंडांचा वाढदिवस साजरा होतो का? होय, तर कसा? त्यात आपण सहभागी होता का?

**भाऊ–** हा सगळा संस्काराचा भाग आहे. माझ्या आई-वडिलांचे संस्कार माझ्यावर झाले आहेत. माझे जे संस्कार आहेत ते माझ्या मुलांवर झालेले आहेत. सर्वसाधारणपणे 'जे बघतो, ते करतो' अशी प्रवृत्ती असल्यामुळे या विषयात फार मोठा रस माझ्या फॅमिलीला, माझ्या मुलांना आहे असं वाटत नाही. नातवंडांचा वाढदिवस जर घरात कुणी साजरा करणार असतील तर त्याला विरोध करण्याचं काही कारण नाही. पण त्यामध्ये विशेष काही आनंदाची बाब आहे असं मला व्यक्तीश: वाटत नाही. त्याचं कारण असं आहे की, जोपर्यंत माणूस एखाद्या शिखरावर पोहोचत नाही किंवा त्याची यशोगाथा ही सर्वार्थाने समाजापुढे येत नाही तोपर्यंत वाढदिवस साजरे करणे म्हणजे प्रथेमध्ये भर घालण्यासारखं आहे. आपला वाढदिवस साजराच करायचा असेल तर तो इतरांनी साजरा करावा. आपण साजरा करण्यात काही हशील आहे, असंही मला कधी वाटलं नाही. खरं म्हटलं तर या बाबतीत तसा खोलवर विचार करायला कधी संधी मिळाली नाही. पहिल्यांदाच हा प्रश्न विचारला गेला आहे म्हणून माझे विचार व्यक्त केले.

**विजय–** ''नावात काय आहे?'' असे शेक्सपियरने म्हटले असले तरी नावाला अर्थ निश्चित आहे. आपल्याला आपले नाव आवडते का? त्याबाबत आपलं मत काय?

**भाऊ–** शेक्सपियरचं जे वाक्य आहे त्याचा मला अभिप्रेत असलेला अर्थ असा की, माणसाने आयुष्यामध्ये रेप्युटेशन आणि कॅरेक्टर याच्यातला फरक समजून घेतला पाहिजे. दुसऱ्यांना आपली झालेली ओळख, सकृद्दर्शनी माणूस जीवनात जसा वागतो त्याच्यावरून जे ठोकताळे लोकांनी बसवलेत त्याला 'रेप्युटेशन' म्हणायचं. माणूस जीवनात जसं जगतो, तेव्हा ज्या मूल्यांची उपासना करतो

त्याच्यावर आपलं जीवन आधारित करतो आणि ते करीत असताना माणसाचं 'कॅरेक्टर' काही मूल्यांवर आधारित ठेवतो. अशा नावात पुष्कळ काही आहे आणि जो माणूस केवळ रेप्युटेशनच्या मागे धावतो आहे, लोकांनी आपल्याला चांगलं म्हणावं, इतरांनी आपल्याबद्दल चांगलं बोलावं तो माणूस एका प्रकारे दुटप्पी जीवन जगत असतो. अशांच्या नावात काही तथ्य आहे असं मला वाटत नाही. म्हणून नावात काय आहे या प्रश्नाचं उत्तर 'पुष्कळ आहे आणि काहीच नाही' अशा दोन्ही अर्थांने देता येईल. माझं नाव माझ्या आई-वडिलांनी ठेवलं. तो काही माझ्या चॉईसचा प्रश्न नव्हता.

**विजय-** आपल्या चारही मुलांची नावं 'अ' वरून आहेत. आपलं नाव मारवाडी समाजाशी नातं सांगणारं असलं तरी मुलांची नावं मात्र आधुनिक जगाशी नातं सांगतात. याबद्दल काय?

**भाऊ-** माझ्या मुलांची नावं ठेवण्याच्या वेळेला मला विचार करायलासुद्धा वेळ नव्हता, एवढा मी व्यवसायात गर्क होतो. म्हणून सर्वसाधारणपणे ए-बी-सी ही अद्याक्षरे आहेत. 'बी' मी आहे, माझे नाव भवरलाल आहे. आमचं कुळ आमच्या समाजामध्ये चोरडिया आहे. या कुळाचा जैन हा धर्म आहे. म्हणून जर आपण 'ए' जोडला तर 'एबीसी' असं जमेल किंवा 'एबीजे' असे जमेल तेव्हा उच्चार करताना




भाऊ आपल्या मुलांसोबत - अजित, अशोक, अतुल, अनिल

हे सोपं आणि सरळ आहे. अशा पद्धतीने ज्यांनी मला विचारलं, 'हे नाव चांगलं आहे का?' त्यांना मी सांगितलं, 'हो, चांगलं आहे.' जी चांगली गोष्ट असेल त्याला आपण 'ए-वन' असं म्हणतो. एक मुलगा झाला, दुसरा मुलगा झाला त्यांना ए-वन, ए-टू नंतरच्या दोघांना ए-थ्री, ए-फोर असं आम्ही संबोधतो. आता सगळ्या कंपनीतही ते प्रचलित झालंय. कुणी अशोक भवरलाल जैन असं लिहित नाही तर 'ए-वन' असं लिहितात किंवा अनिल भवरलाल जैन असं लिहित नाही तर 'ए-टू' असं लिहितात. त्याला एक अर्थही प्राप्त होतो आणि वेळही वाचतो.

कॅरेक्टर आधारित जर तुमचं जीवन असेल तर नावातच सगळं काही आहे आणि जर तसं नसेल तर कोट्यावधी लोकांपैकी आपणही एक आहात. आपल्या नावात विशेष काय आहे? असा प्रश्न साहजिक सर्वांना पडतो. तेव्हा दिलेलं नाव सार्थक करायचं हे आपल्या हातात आहे.

**विजय-** आपल्या आई-वडिलांबद्दल आपल्या काय भावना आहेत?

**भाऊ-** मनुष्यजीवनात जे काही घडतं त्यात ६० टक्के हे आई-वडिलांचं, घर-घराण्याचं प्रतिबिंब असतं. २० टक्के शिक्षण आणि ट्रेनिंग याच्यातून प्राप्त होते आणि राहिलेलं २० टक्के हे सर्वसाधारणपणे सोबत आणि समाज यामधून आपण



वडील हिरालाल जैन - आई गौराबाई

घडले जातो. १०० पैकी ६० गुण मी माणसाच्या 'रूटस्'ना देतो. माणूस कुठून आलाय, कोणत्या समाजातनं आलाय, कोणत्या घरातनं आलाय, कोण त्याचे आई-वडील होते यावर त्याच्यावर झालेले संस्कार अवलंबून असतात. त्या संस्कारांवर त्याच्या जीवनाची पुढची व्यथा किंवा कथा अवलंबून असते. माझ्या आयुष्यात जर मी काही काम करू शकलो असेल, शकत असेल तर माझ्या आई-वडिलांची ती शिदोरी आहे. माझ्या आई-वडिलांची ती देणगी माझ्या शरीरातनं, माझ्या मनातनं, माझ्या हृदयातनं, माझ्या डोक्यातनं आलेली आहे असा माझा विश्वास आहे. आणि या विश्वासापोटी साहजिक त्यांच्याबद्दल नितांत आदर आहे, आत्मीयता आहे. बरेचसे गुण मी माझ्या आईकडनं घेतलेत. व्यावसायिक प्रावीण्य, सचोटी आणि प्रामाणिकपणा हे गुण माझ्या वडिलांकडून घेतलेत. गुणांचे संवर्धन, संगोपन, जोपासना पुढे समाज, पुस्तके आणि मित्रमंडळी करू शकतात. पण मुळात या सगळ्या गोष्टी येण्यासाठी आई-वडील हे सोर्स (उगमस्थान)आहेत. तुमची संस्कृती त्याचा सोर्स आहे, असंही मी मानतो.

**विजय–** आपल्या पत्नीबद्दल आपल्याला काय वाटतं?

**भाऊ–** केवळ संस्काराचा विचार करायचा असेल तर जीवनाच्या गाडीला दोन चाकं आहेत. त्याच्यातील पत्नी हे एक चाक आहे आणि ते कमी पडत असेल तर तुमच्या गाडीचा वेग आणि दिशा बदलू शकते. गती आणि दिशा बदलली म्हणजे मग जे साध्य आहे, जे ध्येय आहे, डेस्टिनेशन आहे तेही बदलेल. सांसारिक जीवनात हा विषय सगळ्यांना लागू आहे. परंतु मला जे अनुभवायला आलं ते असं की, व्यावहारिक जीवनामध्येसुद्धा, व्यवहारात प्रत्यक्षपणे नसतानाही, आपल्या पत्नीचा खूप मोठा रोल असतो. घरात शांतता नसेल तर जीवनात मोठा पल्ला कुणी गाठू शकेल असं मला वाटत नाही. उलटपक्षी जीवनाला सहकार्याचा हात देऊन आपल्या जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी आपण एक भार उचलायचा आणि दुसरा भार पुरूषाने उचलायचा असा विचार करून पत्नी वागणार असेल तर जीवन आणि यशाचा मार्ग सुकर होतो आणि दोन्ही जण आनंदात राहून परस्परांच्या व्यक्तिमत्वात विलीन होऊन जातात. माझ्यासारखा सर्वसाधारण माणूस असं विलीनीकरण झाल्याशिवाय यशाच्या मोठ्या शिखरावर पोहोचू शकेल असं मला वाटत नाही. नामदेव-तुकारामांसारखी काही अपवादात्मक उदाहरणे असू शकतात. परंतु सर्वसाधारण माणसाला जीवनामध्ये खऱ्या अर्थाने यशस्वी व्हायचं असेल तर



वैचारिक संगती कौटुंबिक प्रगती

धर्मपत्नी आणि स्वतःमध्ये एकात्मता-एकरूपता आणल्याशिवाय ते घडणार नाही. 'बिहाइण्ड एव्हरी सक्सेसफूल मॅन, देअर इज ए वुमन' असं जे म्हणतात त्याचं मूळ कारण हे आहे.

मला प्रत्यक्ष माझ्या व्यक्तिगत जीवनामध्ये या गोष्टीचा आधार मिळत आहे. सबंध आयुष्यात असं आठवत नाही की, पत्नीने डोळ्यात अश्रू आणून स्वत:च्या कथा किंवा व्यथा मला सांगितल्यात. तिने आमच्या घरगुती बाबतीमध्ये कधीही मला काहीही सांगायचा प्रयत्न केला नाही. मीही तिला माझ्या व्यवसायाच्या व्यथा किंवा कथा कधी सांगितल्या नाहीत. माझं ओपिनियन इन्फ्ल्यूअन्स करायचा तिने प्रयत्न केला नाही. माझ्या बिझिनेसच्या बाबतीमध्ये तर तिने कधीही कोणत्याही प्रकारची जिज्ञासा दाखवली नाही. आम्ही जर कधी परस्परांमध्ये बोललो असू तर शांततेने बसलो, हेच आमचं बोलणं झालं. तसंच बसून गप्पा मारतोय, काही विषय चाललाय आणि त्याच्यावर संभाषण चाललंय असं कधी घडलं नाही. पत्नी शिकलेली आहे. बऱ्याच वेळा 'शांतता किंवा अबोला हेच संभाषण असतं' असं म्हणतात, त्याचा एक नमुना मी माझ्या जीवनात अनुभवला.


**विजय-** आपल्या मुलांबद्दल आपण काय सांगाल?

**भाऊ-** मुलं नेमकी आताच कामाला लागलीत. मी कधीही त्यांच्यावर कोणत्याही प्रकारे कम्पल्शन केलं नाही की, तू इंजिनियर व्हायला पाहिजे, तू डॉक्टर व्हायला पाहिजे, तू असं करायला पाहिजे, तसं करायला पाहिजे. सहजगत्या जीवनामध्ये त्यांना एक दिशा मिळाली. त्यांच्यासमोर माझं स्वत:चं जीवन आहे.

ते अहर्निश त्यांनी पाहिलं आहे. त्यातून त्यांना जे काही पाहायला-शिकायला मिळालं ते त्यांना प्राप्त झालं. सर्वसाधारणपणे आपलं शैक्षणिक जीवन पूर्ण करून गेल्या पाच वर्षांपासून त्यांच्यापैकी एक-एक जण व्यवसायात येतो आहे. त्यांची मला खूप मोठी मदत होईल या आशेने मी कधी त्यांच्याकडे पाहिलं नाही आणि ती होणार नाही असं वाटायचं मला काही कारण नाही. कारण जर माझं जीवन आरशासारखं असेल तर त्यांना त्यात प्रतिबिंब दिसेल. त्यामुळे कोणताही मुलगा माझ्या व्यवसायात येणार नाही असा प्रश्न माझ्या मनात कधी आला नाही. आपण बघत आहात की, अशोक, अनिल, अजित आणि अतुल हे सगळे व्यवसायामध्ये मग्न आहेत. जी काही जीवनमूल्ये मी जोपासली ती त्यांच्यापुढे स्व-उदाहरणासहित ठेवायचं काम मी आजही करतो आहे. त्यापेक्षा जास्त माझी त्यांच्याकडून अपेक्षा नाही आणि त्यामुळे मला काही निराशा पदरी पडेल असं वाटत नाही. आशाच केली नाही तर निराशा कशी येईल?

**विजय-** व्यवसायाच्या व्यापात मुलांना आपण वेळ न देऊ शकल्यामुळे मुले वाममार्गाला लागण्याची शक्यता आपल्या मनात डोकावली नाही का?

**भाऊ-** हे बघ, हा फार महत्त्वाचा विचार आहे. आपण आपल्या अपत्यांना किती वेळ देऊ शकलो यावर त्यांचा स्वभाव आणि त्यांची बांधणी अवलंबून आहे हा एक सर्वसाधारण विचार आहे. वेळ ही एक सापेक्ष बाब आहे. आपण कॉन्सेन्ट्रेशन करून दहा मिनिटं बोलू शकलो आणि वर-वर शिष्टाचार म्हणून आपण ५ तास बोलत राहिलो तर त्या दोघांची तुलना नाही होऊ शकत. प्रेमाच्या पोटी स्वत:चे जीवन जर तुम्ही त्यांच्यासमोर ठेवत असाल आणि 'डबल' जीवन जगत नसाल (समोर एक-मागे एक) तर मुलाला ईश्वरकृपेने एवढी आकलनशक्ती असते आणि तो हे सगळं बघत असतो. ज्याला बघण्याची, आत्मसात करण्याची वृत्ती आहे आणि ज्याला जीवन सरळ जगायचं आहे, अशी दोन माणसं एकमेकांसारखी होण्याची शक्यता जास्त आहे. जे बोलून किंवा संभाषण करून गाठलं जाणार नाही ते अशा उदाहरणाने प्रत्यक्ष कृतीमध्ये आपण करू शकलो आणि अधूनमधून व्यवसायाच्या व्यापातून आपण त्यांना घेऊन बसू शकलो तर ते मोअर दॅन सफिशियण्ट आहे असं मला वाटतं. जे मी करतोय ते जर बरोबर असेल तर त्याचं प्रतिबिंब मुलांच्या मनावर उमटलेलं दिसेल. आतापर्यंतचा अनुभव असा आहे की, ते घडलं आणि या गोष्टीचं मला समाधान आहे.



मागील रांगेत- सून निशा, गौराई, नातू अथांगसह भाऊ, बाई, सून ज्योति
पुढील रांगेत- अजित, अशोक, अतुल आणि अनिल

समाजामध्ये असं घडत नाही. सर्वसाधारणपणे 'सो कॉल्ड' मोठ्या लोकांची मुलं वाह्यात निघतात किंवा वाऱ्यानिशी वाहून जातात, हा अनुभव आहे. मला असं वाटतं की, ज्यांना आपण मोठे म्हणतो, ते मोठे आहेत की नाही याबद्दल विचार करण्याची वेळ आली आहे. ज्यांच्याजवळ पैसा आहे त्यांना मोठं म्हणायचं का? एखाद्या उच्चपदावर आहेत त्यांना मोठं म्हणायचं का? तुम्ही खऱ्या अर्थाने मोठे असाल तर तुमच्या पदरी अशा प्रकारची निराशा पडेल असं मला वाटत नाही. तुमच्या कृतीमध्ये, वागण्यामध्ये आणि तुमच्या बोलण्यामध्ये एकवाक्यता असेल, सुसंगती असेल तर तसं घडत नाही, घडू नये. अपवाद प्रत्येक गोष्टीला असतात. तथापि मुलांच्या संस्कारक्षम वयात आपण त्यांना जास्त वेळ देऊ शकलो तर ते अत्यंत आवश्यक आहे, असं आज मला वाटतं.

**विजय-** आपण मुलांवर जाणीवपूर्वक प्रेम व्यक्त केलं का?

**भाऊ-** कधीच नाही. आपण खऱ्या अर्थाने प्रेम करत असू तर ते प्रेम व्यक्त करण्याची गरज भासावी असं मुळीच नाही. व्यक्त करावं लागणारं प्रेम बेगडी असू शकेल, असं मी मानतो. माझ्या मुलाला मी बर्थ डे गिफ्ट दिली नाही, त्याचा वाढदिवस साजरा केला नाही, वेडिंग ॲनिव्हर्सरी साजरी केली नाही म्हणजे प्रेम कमी झालं, असा होतो का? प्रेम दर्शविण्याच्या समाजाच्या प्रचलित प्रथा वरकरणी आहेत. त्यामुळे कृत्रिमपणा येतो. स्वाभाविकता उरत नाही.

**विजय–** शिक्षणाविषयी आपला दृष्टिकोन काय आहे?

**भाऊ–** शिक्षण हा आपल्या जीवनाला दिशा देणारा, जीवनाकडे बघण्याची दृष्टी देणारा, जीवनाचा अविभाज्य घटक आहे. आजच्या एकूण शिक्षण पद्धतीबद्दल मी निराश आहे. जीवन आणि शिक्षण यांचा परस्परांचा मेळ बसत नाही. जीवन आणि शिक्षण यात निर्माण झालेलं अंतर जर कमी करता आलं तर फार बरं होईल.

**विजय–** नोकरी न करता व्यवसायाकडे कसे वळलात?

**भाऊ–** सुरेशदादांचे वडील, माझी आई यांनी दिलेला मौलिक सल्ला आणि ज्योतिषाने सांगितलेले भविष्य या तीन कारणांमुळे माझ्या जीवनाची दिशा मी नोकरीपेक्षा व्यवसायाकडे वळविली.

**विजय–** ज्योतिषावर आपला विश्वास आहे का?

**भाऊ–** ज्योतिष हे एक शास्त्र आहे. अचूक भविष्य सांगणारे ज्योतिषी दुर्मिळ झाले आहेत. केवळ भविष्य सांगणाऱ्यावर विश्वास ठेवून चालावं या गोष्टीला माझा विरोध आहे.

**विजय–** व्यवसायातील आदर्श कोण?

**भाऊ–** व्यवसायांमध्ये अनेक लोकांकडून अनेक गोष्टी मी शिकलो. हांडा साहेबांनी ग्रामीण भागात यशस्वीरीत्या व्यवसाय करण्यासाठी काय-काय करावं लागतं, किती यातना सहन कराव्या लागतात, किती कठोर परिश्रम करावे लागतात याची जाणीव मला करून दिली. माझ्या व्यवसाय जीवनातील तो पहिला धडा मी आजपर्यंत विसरू शकलो नाही. हांडा साहेब आज जैन इरिगेशनचे एक संचालक आहेत. माझे मित्र, मार्गदर्शक आहेत, फिलॉसॉफर आहेत. त्यांच्याबद्दल मला नितांत आदर आहे. शेख चाचांनी केलेलं भरीव सहकार्य अविस्मरणीय आहे.



भाऊंसोबत तत्वज्ञ 'बडी' हांडा

**विजय–** आपलं बालपण कसं गेलं?

**भाऊ–** नदीवर - डोहावर जाणं, तिथे पोहणं हा आपला पराक्रम आहे. आई-वडिलांना कळणार नाही याची काळजी घेणं असे प्रकार चालत. अभ्यासात काही

फार हुशार नव्हतो. सर्वसाधारण विद्यार्थी होतो. ग्रामीण संस्कृतीचे, जीवनाचे संस्कार माझ्यात खोलवर रुजले. शेतीकामात आनंदाने सहभागी व्हायचो. बालपण सर्वसाधारणपणे सर्वसामान्य ग्रामीण व्यक्तीसारखं गेलं.

**विजय–** आयुष्यातला निराशेचा क्षण?

**भाऊ–** या क्षणापर्यंत निराशा माझ्या पदरी पडली नाही. दु:ख पडलं. माझे चुलते वारले. तेव्हा मनस्वी दु:ख झालं. त्यांनी माझ्यावर खूप प्रेम केलं. वडील वारले त्या वेळी आपल्या जीवनाचा उगम तुटल्याचा भास झाला. मी आयुष्यात आशा किंवा अपेक्षा केली नाही. जे समोर असेल त्यावर संपूर्णत: लक्ष केंद्रित करणं हे एकमेव उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवलं. हाती घेतलेला प्रकल्प तडीस नेणं हा हेतू ठेवला. त्यामुळे निराशा आली नाही.

**विजय–** जीवनातील आनंदाचा स्मरणीय प्रसंग?

**भाऊ–** ज्या आनंदाने मी बेभान झालो, अति आनंदाने माझ्या डोळ्यात अश्रू आले किंवा एवढा आनंद झाला की, मला स्वत:चा विसर पडला असाही प्रसंग माझ्या जीवनात घडला नाही. ठरविलेल्या उद्दिष्टांची पूर्ती झाली, त्याचं रिअलायझेशन मला झालं. परंतु मला कधी एक्स्ट्रीम आनंदाचा प्रसंग झालाय, ज्याच्यामुळे मी बेभान होऊन नाचायला लागलोय असा अनुभव आला नाही आणि एवढा भावूक माणूस मी नाही. अशा प्रकाराने जीवनाकडे बघावं असं मला वाटत नाही. अति निराशा, अति आनंद हे माझ्या स्वभावात बसत नाही.

**विजय–** आपला स्वभाव कसा आहे? गुण आणि दोषांसह.

**भाऊ–** गुणी लोकांचा सतत शोध करून त्यांच्या गुणांची कदर करणं हा माझ्यातील गुण आहे. कोणत्याही क्षेत्रातील आऊटस्टॅण्डिंग माणूस मला भेटला तर मला आनंद होतो. अशा व्यक्तीच्या सतत शोधात राहणं आणि सान्निध्यात राहणं हा एक गुण आहे असं मी मानतो. त्यामुळे माझ्यातील उणिवा भरून निघतात. माझ्या पद्धतीने जग चालावं असा अट्टाहास मी कधी धरला नाही. सर्वसाधारणपणे समतोल साधून जीवनाकडे पाहण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक व्यक्तीचा दृष्टीकोन समजून घेण्याचा प्रयत्न केला आणि तो समजून त्याच्याशी वागलो. हा समतोल साधण्यामध्ये जे काही कौशल्य लागतं ते मी जाणीवपूर्वक जोपासलं.

माझ्यात एक मोठा दोष आहे, तो म्हणजे माझ्या अंगी अभिजात उदात्तपणा (नोबिलीटी) नाही. एका विशिष्ट मर्यादेपर्यंत मी कुणाशीही चांगला वागू शकतो.

परंतु जर माझ्या निदर्शनास आलं की, त्याच्यात आणि आपल्यात मूलत: फरक आहे तर मी तिथे थांबून 'त्याच्याशी व्यवहार न केलेला बरा' या निष्कर्षावर येतो. त्याला माफ करून पुढे जाता येणं मला साधलेलं नाही. अंगी जनरॉसिटी असणं चांगलं आहे. परंतु आध्यात्मिक स्तरावरील पुढची पायरी मला गाठता आलेली नाही. माणसामध्ये मॅग्नॅनिमिटी असायला पाहिजे. ती माझ्या अंगी आलेली नाही. अभिमानापोटी दुसऱ्यानेही तसंच वागावं हा अट्टाहास माझ्या मनात येतो. तसं घडत नाही तेव्हा मी आतुर होतो. अशी वृत्तीदेखील मागे खेचण्यास कारणीभूत ठरते. पुढे जायचं असेल तर हे विसरणं आवश्यक आहे.

**विजय-** 'आपण श्रु**ड** आहात' अशी टीका केली जाते. आपल्याला काय वाटतं?

**भाऊ-** मी श्रुड आहे. माझ्याबद्दलचा जो काही रिमार्क आहे तो खरा आहे. नोबिलीटी आणि मॅग्नॅनिमिटी साध्य करायला पाहिजे होती, ती मी अद्याप करू शकलो नाही. म्हणजे अनेक ठिकाणी केवळ हृदयाने काम करायला पाहिजे तिथे बऱ्याच वेळी मी डोक्याने काम करतो. डोकं गहाण ठेवून जर केवळ भावनेच्या, हृदयाच्या आधारावर काम करीत राहिलो तर मला श्रुड कुणी म्हणणार नाही. परंतु मी तसं करीत नाही म्हणून मी श्रुड आहे असं लोक म्हणतात आणि त्यात ते चुकतात असं मला वाटत नाही. कारण मी कोणत्याही क्षणाला माझी बुद्धी गहाण ठेवून काम करीत नाही. मला ते जमत नाही. अगदी माझ्या मुलाशी बोलायचं असेल, माझ्या पत्नीशीही बोलायचं असेल, कौटुंबिक बाबतीतही बोलायचं असेल तरी मला ते जमलेलं नाही. माझा स्वभाव गंभीर आहे.

**विजय-** कोणत्या रंगाचा आणि प्रकारचा पोषाख आवडतो?

**भाऊ-** सगळ्यात जास्त आवडणारा पोषाख म्हणजे पांढरा स्वच्छ सदरा किंवा सफारी. आपण आता म्हातारे होत आहोत, वयस्क होत आहोत हे विसरण्यासाठी अधून-मधून कलरफूल पण फार चट्टया-पट्टयाचा नसलेला पोषाख घालायला हरकत असू नये, या विचारापर्यंत मी पोहोचलो आहे.

**विजय-** कोणकोणते रंग आपल्याला आवडतात?


**भाऊ-** मला शेती, आकाश, माती आणि पाणी यांचे जे रंग आहेत ते आवडतात. हिरवा, पिवळा, तपकिरी आणि निळा या रंगांशीच माझा संबंध आलाय. मी त्यात रमून गेलोय.

**विजय–** खाद्य-पदार्थांबाबत आपली आवड-निवड?

**भाऊ–** तळलेले पदार्थ पूर्वी मी खूप आवडीने खात असे. परंतु हार्ट अटॅक आल्यानंतर ते वर्ज्य करून त्यावर बंधने घातलीत. गोड पदार्थ मला कधी विशेष आवडले नाहीत. आपण जे अन्न घेतो, त्याच्यामुळे आपला स्वभाव घडत असतो. म्हणून भावनांना उत्तेजन न देणारे पदार्थ आपण सेवन करावे असं मला वाटतं.

**विजय–** आपले आवडते लेखक कोण आहेत?

**भाऊ–** शालेय जीवनात वि. स. खांडेकरांचं लिखाण मला खूप आवडायचं. त्या काळात ना. सी. फडके व वि. स. खांडेकर यांच्यातील 'कलेसाठी कला' की 'जीवनासाठी कला' या वादामध्ये मी खूप गुरफटून गेलो. साने गुरूजींचं लिखाण माझ्या जीवनावर प्रभाव टाकू शकलं. जवाहरलाल नेहरू यांच्या लिखाणाने मी भारावलो होतो. महात्मा गांधींबद्दलही बरंच वाचलं. आजचं माझं वाचन व्यवस्थापन या विषयाला धरून होतं आणि क्कोटेशन्स मी नित्याने वाचतो. एक विचार घ्यायचा, त्यावर इतरांनी मांडलेल्या विचारांवर विचार करायचा आणि आपल्या जीवनात ते कुठे 'फिट' होतं आहे का याचा विचार करीत राहायचं.



मातृहृदयी साने गुरुजी



वि. स. खांडेकर

**विजय–** कलेबद्दल आपला दृष्टिकोन काय?

**भाऊ–** जी गोष्ट माझ्या ठिकाणी नाही ती कुठेही असली तर त्याचं खुल्या दिलानं मी स्वागत करतो. म्हणून कोणताही कलाकार मला मनापासून आवडतो आणि त्यासाठी शक्य ते आपण करायला पाहिजे असा विचार मनात असतो.

**विजय–** आपल्याला जीवनात सर्वाधिक प्रिय गोष्ट कोणती?

**भाऊ–** परिश्रम. खूप काम करावं. जे काम करीत असाल त्याला वाहून घ्यायचं, स्वत:ला त्यात झोकून द्यायचं.

**विजय–** आपल्या आयुष्यावर प्रभाव टाकणारी व्यक्ती?

**भाऊ–** माझी आई गौराबाई. माझ्या आईचा माझ्या जीवनावर खूप मोठा प्रभाव आहे. तिचे बरेचसे गुण माझ्यात आले आहेत असं मला प्रकर्षाने जाणवतं.

**विजय-** आपण देव मानता का?

**भाऊ-** मी दैवी शक्ती मानतो. देव मानतो असं नाही. 'सुपर पॉवर' ज्याला आपण म्हणतो ती आहे. यावर माझा विश्वास आहे. कारण जीवनाचं रहाटगाडगं ज्या नित्य-नियमानं व्यवस्थित चालतं त्याला पूर्णपणे सायंटिफिक उत्तर मिळालेलं नाही. पुनर्जन्मावर माझा विश्वास आहे. ज्ञानदेवानं बाराव्या वर्षी ज्ञानेश्वरी लिहिली, तर आधीच्या आयुष्यात तो काही तरी असला पाहिजे. तेव्हाच त्याला हे करणं शक्य झालं. पूर्व जन्मीचं संचित असल्याशिवाय अशा गोष्टी घडत नाहीत.



भाऊ आणि साहित्यिक सुबीर बोस



भाऊ आणि सी. पी. मेहता

**विजय-** आपले जीवलग मित्र कोण-कोण आहेत?

**भाऊ-** माझ्या जीवलग मित्रांमध्ये एक तर सर्वश्रुतच आहेत. आपले सुरेशदादा जैन. तसेच राजाभाई मयूर, ना. धों. महानोर यांचा सहवास मला आवडतो. या शिवाय डॉ. सुभाष चौधरी, सी. पी. मेहता, सुबीर बोस, भाईसाहेब मल्हारा, जिमी फराद, आनंद गुप्ते व संजीव शेळगीकर हे मित्रगण आहेत.



ना.धों महानोर, दलूभाऊ, डॉ. जेठमल डोशी, राजा मयूर, सुरेशदादा जैन आणि भाऊ
मित्र परिवार, भरभक्कम आधार

**विजय–** मैत्रिण आहे का?

**भाऊ–** मैत्रिण... जीवनामध्ये मी फार सिरियस असा माणूस आहे. मैत्रिण या कल्पनेच्या फंदात मी कधी पडलो नाही. त्यामुळे तशी काही डेव्हलपमेंटच झाली नाही. मित्र झाले तेसुद्धा व्यावसायिक, सामाजिक जीवनामधून निर्माण झाले आहेत.

**विजय–** नाटक पहायला आवडतं?

**भाऊ–** हो, अतिशय आवडतं. अगदी मनापासून आवडतं. मी नाटकात कामही केले होते. 'पश्चात्ताप' नावाच्या एका नाटिकेत लक्ष्मीबाई आणि पोलिस इन्स्पेक्टर अशा दोन भूमिका मी केल्या होत्या. जळगावला आठवडे बाजारात दहा हजार लोकांसमोर हे नाटक झालं आणि त्यात पहिलं बक्षीस 'लक्ष्मीबाई' या माझ्या भूमिकेला मिळालं होतं. म्हणजे आवाज सोडला तर हा मुलगा आहे असं कोणाला वाटलं नाही. आवाज मी बदलू शकलो नाही, पण नाटक खूप चांगलं रंगवलं होतं.

**विजय–** आवडते राजकीय नेते कोण?

**भाऊ–** मला राष्ट्रीय स्तरावर आवडणारा राजकीय नेता म्हणजे ज्यांच्या विचारांनी मी प्रभावित झालो, ते जवाहरलाल नेहरू आणि वेगळ्या पातळीवर महात्मा गांधी. आंतरराष्ट्रीय स्तरावर जॉन एफ केनेडी आणि अब्राहम लिंकन. अलिकडच्या काळात ज्याला दैवत मानावं असं नेतृत्व माझ्यासमोर नाही, ही दुर्दैवाची आणि निराशाजनक बाब आहे.

**विजय–** आपलं स्वत:चं जीवन विषयक तत्त्वज्ञान काय आहे?

**भाऊ–** माणसाने जीवनामध्ये 'परिश्रम' या शब्दाला अतोनात महत्त्व द्यायला पाहिजे. श्रमाला पर्याय नाही आणि ते जर आपण साधू शकलो तर कोणतीही गोष्ट कठीण नाही, अशक्य नाही. परिश्रम हेच आत्मिक समाधानाचं अधिष्ठान आहे.

**विजय–** उद्योजक म्हणून मिळवलेलं अफाट यश डोक्यात भिनलं नाही का?

**भाऊ–** ज्याच्या डोक्यामध्ये यश जाणार असेल तो यशस्वी म्हणावाच कसा? यशस्वी होण्याची व्याख्याच मुळी ही आहे की, यश डोक्यात जायला नको. यश पचवता येत नसेल तर तुम्हाला यशस्वी म्हणायचं कसं? आंब्याच्या झाडाला फळं लागतात तेव्हा ते ताठ नाही होत, उलट वाकतं. त्यामुळे खऱ्या अर्थाने आपण काही ज्ञान मिळवलं असेल तर भौतिक प्राप्ती, पैसा हे गौण विषय आहेत. कारण माझ्यापेक्षा कितीतरी अधिक पैसा माझ्यापेक्षा कितीतरी वाईट असणाऱ्या लोकांजवळ आहे. त्यामुळे यशाची व्याख्या समजून घेतली पाहिजे.

## थेंबांचे मोती होतात तेव्हा....

मंगेश कपटकर - किर्लोस्कर, मार्च १९९३

बदलतं सामाजिक जीवन, त्याचा राजकीय जीवनावर पडणारा प्रभाव, स्वतःची मूलभूत वैचारिक बैठकीची मर्यादा यांची जाणीव ठेवून आपण व्यावसायिकच होणं श्रेयस्कर हा झाला वास्तववाद. यशस्वी आयुष्याचं हे चिंतनीय इंगित!

'ठिबक सिंचन' म्हटलं की, डोळ्यासमोर प्रथम नाव उभं राहतं ते जैन पाइप्सचं! जळगावच्या जैन उद्योग समूहाचे नाव आज भारतातच नव्हे तर जगभर मोठ्या आदरानं आणि कौतुकानं घेतलं जातं. या प्रचंड व्यापामागे आहे एक सर्वस्वी आगळं-वेगळं व्यक्तिमत्व भवरलालजी जैन ऊर्फ भाऊ! वेगळ्याच मातीच्या मुशीत हे व्यक्तित्व घडलं आहे. सामाजिक बांधीलकीचा एक मनमोकळा झरा त्यांच्या स्वभावातून वाहतो आहे. जैन पाइपामधून वाहणाऱ्या झुळझुळ पाण्यासारखा... या सगळ्या वाटचालींचा अर्थ लावताना भाऊ एकच भावना व्यक्त करतात - 'जैन कल्चर'! एका पाठोपाठ एक अशी विविध क्षितिजे काबीज करायला निघालेल्या या जिद्दी उद्योजकाची ही प्रेरणादायी यशोगाथा.

मुंबईच्या एका भेटीत आमचे मित्र आनंद गुप्ते यांच्याकडे जाण्याचा योग आला. आनंद गुप्ते हे भवरलालजी जैन यांचेही जवळचे मित्र. सहज गप्पांमध्ये 'जैन उद्योग समूह' ह्या विषयावर ते बोलत होते. मी श्रोत्याची भूमिका बजावली. जैन उद्योग समूह जो आपल्याला आज कोट्यावधी रूपयांची उलाढाल करताना दिसतो त्याची सुरुवात स्वत: भाऊ ऊर्फ भवरलालजी जैन यांनी कशी केली आणि ते संघर्षातून कसे पुढे आले हे सर्व ऐकल्यावर मी गुप्त्यांना मला भवरलालजींना भेटण्याची

इच्छा असल्याचे सांगितले आणि त्याप्रमाणे आनंद गुप्त्यांनी माझी व भवरलालजी जैन यांची भेट जळगावमध्ये म्हणजे भाऊंच्या कर्मभूमीतच घालून द्यायचं कबूल केलं.

मी पूर्वी कधी जळगावला गेलो नव्हतो. त्यामुळे जळगावविषयी फारशी माहिती नव्हती. खानदेशातील जळगाव तसं विकसनशील शहर म्हणावे लागेल. जळगाव रेल्वे स्टेशनवर उतरून भाऊंच्या ऑफिसची चौकशी केली. रेल्वेवरच्या टी.सी. ने मला व्यवस्थित माहिती पुरवली. भवरलालजी तथा भाऊ यांचं नाव जळगावात कुणाला माहीत नाही असा एकही जळगाववासी आपल्याला भेटणार नाही.

भाऊंचं आयुष्य अनेक धडपणाऱ्या उद्योजकांना मार्ग दाखविणारं आहे. चांगली सरकार-दरबारची मानाची नोकरी सोडून, ओसाड मातीतून मोती निर्माण करण्याचं स्वप्न त्यांनी पाहिलं. त्याची सुरुवातही मोठ्या संघर्षातूनच झाली. पेट्रोल-घासलेट-क्रुड ऑईल विकता विकता खतं, बी-बियाणे, जंतुनाशकाचा व्यवसाय सुरू केला.

पुण्या-मुंबईला भाऊंचं कामानिमित्त येणं-जाणं होतच असतं. पण पुण्या-मुंबईत दहा मिनिटेसुद्धा गप्पांसाठी वेळ काढता येत नाही, तर मुलाखतीसाठी तीन-चार तास कसे मिळणार? तेव्हा जळगावातच प्रत्यक्ष कामात असताना जसा वेळ मिळेल तसे मुलाखतीचे काम चालू ठेवावे असे गुप्ते यांनी सुचविल्यामुळे जळगावला भाऊंच्या कर्तृत्वाच्या क्षितिजांचे दर्शन घडविणाऱ्या त्यांच्या कर्मभूमीतच त्यांच्याशी, त्यांच्या कुटुंबीयांशी बातचीत करावी असं ठरलं. भवरलालजींचे वैयक्तिक स्वीय-सहाय्यक धैर्यशील पवार व माझे एक सहकारी जितेंद्र पवार यांचं याबाबतीत मोलाचं सहकार्यही लाभलं.

'भवरलालजी जैन' हा एक ग्रंथाचा विषय आहे. मर्यादित शब्दात त्यांच्या व्यक्तिमत्वाचा शोध घेणं खरोखरच कठीण काम आहे! तरीही भाऊंनी कमीत कमी शब्दात, जास्तीत जास्त आशय व्यक्त होईल अशा पद्धतीने माझ्या सर्व प्रश्नांना उत्तरे दिली. त्याचंच हे शब्दांकन.

**बालपण**

'अजिंठ्याच्या पायथ्याशी' जळगावपासून सुमारे ४५ कि.मी. अंतरावर वाकोद नावाचं छोटंसं गाव आहे. त्या गावात माझा जन्म झाला. मारवाडी कुटुंब, बेताची आर्थिक स्थिती. आई-वडिलांच्या नकळत नदीवर डोहावर पोहायला जाणं हा एक

छंद. शालेय जीवनात अभ्यासात विशेष कामगिरी बजावली. वक्तृत्वसारख्या स्पर्धाही गाजवल्या. वाकोदला शैक्षणिक सुविधा तुटपुंज्या होत्या. त्यामुळे जळगावला स्थलांतर झाले. म्युनिसिपल मराठी शाळेमध्ये शिक्षण झालं.

व्यापारी-मारवाडी कुटुंबात शैक्षणिक पार्श्वभूमी नव्हती. त्यामुळे मी शिकल्यावर इंजिनिअर व्हायचं की डॉक्टर व्हायचं हे काही ठरवलं नव्हतं. मात्र शिक्षण जेवढं जमेल तेवढं करायचं, हे नक्की ठरवलं होतं. कधी कधी गमतीनं घरातले म्हणायचे, 'आलाय मोठा बॅरिस्टर!' तेव्हा फार गंमत वाटायची! याचं कारण म्हणजे आई-वडिलांच्या मते शेवटी आपण व्यापारी आहोत आणि शिक्षण हे व्यापार करण्यासाठी लागणारं एक माध्यम आहे. या पलीकडे त्यांचा मला शिकविण्यामध्ये काही हेतू नसावा.माझं बालपण सर्वसाधारण ग्रामीण मुलांसारखं गेलं. फाजील किंवा फालतू लाड झाले नाहीत. परंतु अमुक एका गोष्टीची आवश्यकता आहे आणि ती मिळाली नाही, असंही झालं नाही. माझी आई कमालीची सोशिक आणि विचारी होती.



म्युनिसिपल शाळा क्र.३ चे ताठे गुरूजी म्हणतातः
''अत्यंत जिज्ञासू, अभ्यासू अशा भाऊंनी चिकाटीने शिकायचं काम केलं, शाळेत आपला नंबर जसा टिकवला तसाच तो भावी जीवनातही टिकवला याबद्दल मला खरोखर अभिमान वाटतो.''

माध्यमिक शिक्षण संपलं. मी ग्रॅज्युएट व्हायचं ठरवलं आणि मुंबईला बी.कॉम. साठी आलो. कॉमर्स ग्रॅज्युएटचं शिक्षण पूर्ण केलं. पुढे एलएल.बी. करावं असं ठरलं आणि बोलता बोलता एलएल.बी.ही पूर्ण केलं. इकडे जळगावात घरची मंडळी होती, त्यांना माझ्या वाढत्या शिक्षणामुळे फार आनंद होत होता. विशेषत: माझ्या आईला! कुटुंब मोठं होतं. एकत्र कुटुंब पद्धती होती. बेताच्या परिस्थितीतसुद्धा मी शिक्षण पूर्ण केलं, म्हणून आईला फार समाधान वाटत होतं. बी.कॉम., एलएल.बी. झाल्यावर पुढे काय करावे हा विचार डोक्यात होताच! तशातच स्पर्धा परीक्षेला बसावं असं मनात आलं. कारण त्या काळी कलेक्टर वगैरेसारख्या क्लास-वन नोकऱ्यांना भरपूर मान असे - पगारही भरपूर असे. ते पाहून आपण असली नोकरी केली तर आपली

परिस्थिती तरी सुधारेल, या विचाराने मी एम.पी.एस.सी.च्या परीक्षेला बसलो आणि पासही झालो. त्या वेळी कॉलेजात असताना माझी नेहमीची जागा म्हणजे लायब्ररी. भरपूर वाचन करायचो. आताही वेळ मिळाला की, वाचन चालूच असते. माझी स्वत:ची लायब्ररी आहे. विविध विषयांवरची पुस्तके माझ्या संग्रही आहेत. 'पुस्तकं ही माझ्या सगळ्यात जवळचे सहकारी आहेत' असं मला वाटतं.

**आई गौराबाई - भाऊंविषयी:**
'मी माझ्याच तोंडानं काय सांगू त्याचं कौतुक. भाऊने मातीचं सोनं केलं खरं, परंतु त्यासाठी खूप कष्ट घेतले. कामाचा आळस कधी केला नाही. कधी कुणाचा द्वेष केला नाही, कुणाशी भांडणही केलं नाही.'
(भाऊंच्या आईचं काव्य पाठांतर वाखाणण्यासारखं आहे, आजही त्यांना बहिणाबाईच्या ओव्या, अहिराणी गीतं तोंडपाठ आहेत. ओव्या म्हणणे त्यांच्या फावल्या वेळाचा छंदच आहे.)


आई गौराबाई

## व्यवसायाची मुहूर्तमेढ

माझ्या हातात तसं पाहता सरकारी क्लास-वन अधिकाऱ्याची नोकरी होती. घरातल्यांना मी क्लास-वन ऑफिसर झालोय याबद्दल आनंद होता. परंतु कुठे तरी माझ्या मनात असमाधान डोकावत होतं. पुन्हा पुन्हा विचार येत असे की, नक्की काय करावं? या नोकरीमुळे मी व माझे कुटुंबीय म्हणजे आई-वडील, भाऊ, बायको-मुले वगैरे सुखी होऊ. परंतु आपल्या इतर गणगोताचं काय? त्यांच्या भविष्यात त्यांना उपयोगी पडेल असं काही तरी आपण केलं पाहिजे, असं सारखं मनात येत होतं. आईकडे हा विचार बोलून दाखवला. तिनं सांगितलं की, व्यापार हा आपला धर्म ! नोकरी वगैरे काही खरं नाही. शिक्षणाचा उपयोग व्यापारासाठी झाला पाहिजे, असं तिला वाटत होतं. सुरेशदादा जैन यांचे वडील भिकमचंद जैन यांच्याशीही मी याबाबत विचारविनिमय केला. त्यांनीही नोकरीसाठी फारशी अनुकूलता दाखविली नाही. 'मारवाडी माणसाने नोकरीत पडू नये. धंदा, व्यापार-उदिम करावा.' असं त्यांचं स्पष्ट मत पडलं.

एलएल.बी. झाल्यावर सुमारे सहा महिने मी जळगावातील रायसोनी वकिलांकडे ज्युनिअर वकील म्हणून काम केलं होतं. रायसोनी वकील केस चालवीत असत, पण कोर्टात काय बोलायचं त्याच्या नोट्स् मी त्यांना काढून देत असे. मला

सरकारी नोकरी मिळाल्याचे मी त्यांना सांगितले. तसे ते म्हणाले, ''नोकरी वगैरेच्या भानगडीत पडू नकोस. येत्या चार-पाच वर्षात तू जळगावातल्या नामांकित वकिलांच्या रांगेत बसशील. जे मी गेल्या २५ वर्षात करू शकलो नाही, ते तू लवकरच करशील आणि राष्ट्रीय पातळीवर एक नामांकित सॉलीसिटर म्हणून नाव कमवशील.'' रायसोनींचा विचार हा असा, तर माझ्या आईचा व भिकमचंदजींचा व्यवसाय करण्याचा सल्ला.

भिकमचंदजी यांनी मग त्या वेळचे एस्सो कंपनीचे डेपो मॅनेजर नूर मोहम्मद शेख यांची भेट घालून दिली. त्यांच्या मदतीने भिकमचंद जैन यांचा मुलगा सुरेशदादा जैन व मी असे आम्हा दोघांच्या नावाने पेट्रोल पंप सुरू केला. पुढे तीन महिन्याच्या आतच मी तो व्यवसाय एकट्याने करू लागलो. त्यालाच जोडून क्रुड ऑईल व केरोसिनची एजन्सी घ्यायचं ठरवलं. त्यात फार अडचणी येऊ लागल्या. त्यामुळे एसो कंपनीच्या एका एजंटाच्या हाताखाली उमेदवारी करायला कंपनीने मला सुचविले. माझ्या व्यवहारावर खुश होऊन पुढे मला त्या एजंटाने क्रुड-ऑईल व केरोसिन एजन्सी कंपनीकडून डायरेक्ट मिळावी अशी शिफारस केली.

सर्व प्रकारची वैभव संपन्नता असूनही भाऊंना कोणतेही व्यसन नाही. नेहमी 'हाय' सोसायटीत वावरणाऱ्या भाऊंनी परदेशातही आपली वेगळी अशी प्रतिमा उमटवली आहे. कोणत्याही प्रकारच्या व्यसनापासून त्यांनी स्वत:ला दूर ठेवले आहे. सुपारीच काय ते चहा-कॉफीही घेत नाहीत. एवढंच काय, कारखान्यातील कर्मचाऱ्यांनासुद्धा चहा-कॉफी मिळत नाही. धुम्रपान-तंबाखू याला सक्त बंदी आहे. कामगारांना चहा-कॉफीऐवजी दूध दिले जाते. 'कामगारांच्या आरोग्यालाही जपलं पाहिजे,' असं भाऊंना मनापासून वाटतं.

उद्योग व्यवसाय करायला भांडवल हा एक मोठा घटक होताच. खिशात पाच पैसे नव्हते. घरात वस्तुस्थितीची कल्पना दिली. त्या काळी आमच्या घरात सर्वांचे मिळून केवळ सात हजार रूपये शिलकी होते. तेवढे सगळे पैसे धंद्यात घातले आणि पुढे मागे धंदा चाललाच नाही तर? अशी सर्वांची मन:स्थिती असताना आईने सगळ्यांना धीर दिला आणि ''वडिलोपार्जित इस्टेटीमधला मला कोणताच हिस्सा देऊ नका, त्या बदल्यात आहेत ते शिल्लक पैसे भाऊला

एकाच वेळी शंभर जणांना कामाला लावायची भाऊंची हातोटी विलक्षण आहे आणि सतत कामात मग्न असणे त्यांना आवडतं. तशी माणसं त्यांना आवडतात. म्हणूनच प्रवासात जाणारा वेळही ते अगदी निर्धारपूर्वक, पूर्व नियोजनाने कामी लावतात.




गिरीधर ओसवाल, शिवराज जैन, दलीचंद ओसवाल, हिरालाल जैन, बन्सीलाल जैन, भवरलाल जैन, कांतीलाल जैन
संयुक्त परिवार, समर्थ मूलाधार

धंद्यासाठी द्या,'' असं निक्षून सांगितले. मग धंद्यासाठी ७,००० रुपये कौटुंबिक भांडवल मिळाले. व्यवसायाची रीतसर सुरुवात झाली.

सर्वप्रथम ट्रेडिंग करायचं ठरवलं होतं. त्यानुसार पेट्रोल पंप, क्रूड ऑईल, डिझेल, गॅस एजन्सी अशा एकेक पायऱ्या गाठल्या. हे झालं, तरीही काहीतरी वेगळे करून दाखविण्याची खुमखुमी होतीच. शेतीत वेगवेगळे प्रयोग करून काय साध्य होतंय ते पहायचं ठरवलं. जळगाव तसं मागासलेलं होतं. पाण्याचा खडखडाटच होता. अशा परिस्थितीतही काही मार्ग सापडतोय का हे पाहिलं आणि अखेरीस बराच विचार करून आईच्या इच्छेनुसार 'शेती-प्रधान' उत्पादने करण्याचा निर्णय घेतला.

कृषीक्षेत्रात प्लास्टिकचा चांगल्या प्रमाणावर वापर होऊ शकतो, असे लक्षात आल्यावर मी प्लास्टिकचे वेगवेगळे पाईप वापरून शेतीला पाणी देण्यासाठी 'फवारा' पद्धतीचा अवलंब केला. थोडक्यात, 'ठिबक सिंचन' पद्धतीची ही सुरुवातच म्हणा ना! जास्त पाण्यामुळे किंवा इतर काही कारणांमुळे नापिक झालेल्या जमिनीचे क्षेत्र आपल्या देशात त्रेचाळीस दशलक्ष हेक्टर आहे. या जमिनीचा वापर करायचा असेल तर छिद्र असलेले प्लास्टिक पाईप वापरणे सोयिस्कर आहे. नापिक झालेली जमीन केवळ ठिबक-सिंचन पद्धतीमुळेच परत वापरात आणणे शक्य होणार आहे. *या देशात दुसरी हरित क्रांती ठिबक सिंचनाद्वारेच होणार आहे.*

प्लास्टिक पाईपच का वापरावेत? याचं एक महत्त्वाचं कारण, लोखंडी पाईपांना गंज चढतो व कालांतराने छिद्रं पडतात. जपानमध्ये तर लोखंडी पाईप वापरावर बंदी घातलेली आहे. सिमेंटचे पाईप लावायला व काढायला जिकिरीचे असतात हे सर्व लक्षात घेऊनच आम्ही पी.व्ही.सी. पाईपकडे वळलो.



उभे: अनिल, अजित, अशोक, सून ज्योति, अतुल जैन
बसलेले: भाऊ, वडील हिरालालजी, आई गौराबाई, पत्नी कांताबाई (१९८९).

आम्ही १९८०-८१ मध्ये पाईपची निर्मिती सुरू केली तेव्हा भारतात पीव्हीसी पाईपांचे केवळ चारच उत्पादक होते आणि या चार कंपन्या भरमसाट नफा कमवित होत्या. सुरुवातीची पाच वर्षे अत्यंत निकराची झुंज दिली. १९८५ पर्यंत पाईपाच्या ज्या किंमती होत्या त्याच कायम ठेवण्यात आम्ही यश मिळवले. कच्च्या मालाच्या किंमती वाढूनही पाईपांच्या किंमती कायम राहिल्या. आज आम्ही पाईप उद्योगात प्रथम क्रमांकावर आहोत.

## पपेनची निर्मिती

पपेन हे आमचे पहिले उत्पादन. पपईपासून तयार होणारं ते एक एन्झाईम आहे. कच्च्या पपईच्या चिकापासून हा पदार्थ तयार करण्यात येत असे. याबाबत तर फार मोठा धोका आम्ही स्वीकारला. दहा-बारा वर्षांपासून बंद पडलेली फॅक्टरी आम्ही विकत घेतली. 'बाहेरचा कुणी येऊन ती घेण्यापेक्षा आपणच का घेऊ नये?' असा विचार मनात आला आणि थोडे थोडे पैसे जमवून ती फॅक्टरी लिलावात विकत घेतली.

पाच कारखाने आणि न्यूयॉर्कपासून ते हाँगकाँगपर्यंत ऑफिसेस. वार्षिक उलाढाल कोट्यावधी रूपयांची. दररोज पाच वाजता गेल्या चोवीस तासातील प्रत्येक मशिनचे उत्पादन, रोजच्या झालेल्या कामाचे आराखडे त्यांच्यासमोर येतात. भाऊ घरी जळगावला असोत, मुंबईत ओबेरॉयला असोत वा युरोप-अमेरिकेत असोत, रिपोर्टचा टेलेक्स्, फॅक्स आलाच पाहिजे, ही शिस्त आजही लागू आहे.

शेतकऱ्यांना आग्रहानं सांगितलं, 'पपई लावा.' आमच्यावर शेतकऱ्यांनी पूर्ण विश्वास दाखवला. पपईच्या चिकाचा प्रामुख्याने पपेनमध्ये वापर केला जातो. शेतकऱ्यांना भरपूर भावही दिला. आज अति उच्चप्रतीचे परिष्कृत पपेन आम्ही बनवतो आहोत. जगात पपेनच्या दर्जाच्या बाबतीत आमचा प्रथम व सप्लायच्या बाबतीत दुसरा नंबर लागतो. सध्या टिश्यू-कल्चरने पपया रोपे तयार करायचा व हा व्यवसाय वाढवायचा विचार चालू आहे.

नव्या गोष्टी, वस्तू, नवी यंत्रे, नवीन तंत्रे यांचा भाऊंना नेहमी ध्यास असतो. नव्या जागा पाहणे, नव-नवीन व्यक्तींचा परिचय करून घेणे, नव्या विषयांचे ज्ञान मिळवणे यासाठी ते धडपडत असतात. नवीन-चांगली पुस्तके कोठे मिळतात याचा ते शोध घेतात. 'पुस्तके म्हणजे दिवाणखान्याची शोभा नव्हे,' असं त्यांचं मत आहे. अखंड अभ्यास हे त्यांच्या यशाचं आणखी एक गमक आहे.

**परदेश यात्रा**

परदेशात मी बऱ्याचदा जातो, पण व्यवसायासाठी. शिक्षणासाठी परदेशात जावं, असं काही वाटलं नाही. किंबहुना लोकांमध्ये अजूनही परदेशात शिक्षण घेण्याचं एक फॅड आहे असंच मला वाटतं. काही लोक आपापल्यापरीनं तो एक 'प्रेस्टीज इश्यू' करतात. खरं सांगायचं तर ज्या वेळा मला हे शक्य होतं आणि माझ्या मुलांनाही शक्य होतं तेव्हाही मी परदेशात शिक्षणाला जाण्यासाठी प्रोत्साहन दिलं नाही. माझ्या देशाचा इतिहास आणि भूगोल शिकायला मला अमेरिकेत कशाला जायला हवं? माझ्या देशात करायचं काम मी दुसऱ्या देशात कशाला करायचं! माझ्या मुलांनाही मी स्पष्ट सांगितलं की, डॉलर कमवले म्हणजे सर्व काही कमवलं असं नाही. माझ्या वैयक्तिक जीवनात पैसा हा विशेष घटक नाही. अविरत आणि योग्य दिशेने श्रम घेतले तर पैसा येतोच. त्यासाठी परदेशातच जायला हवं असं नाही. इतकंच काय, पण मी मुलांना कॉन्हेंटच्या शाळेतही घातलं नाही. माझा असा समज होता की, मुलं मोठी होईपर्यंत इंग्रजी भाषा संपलेली असेल, सर्व लोक स्वच्छ मराठीच बोलतील. पण दुर्दैवाने माझा हा समज चुकीचा ठरला.

**कार्पोरेट फिलॉसॉफी**

'फ्यूचर बिलाँग्ज् टू दोज हू कॅन थिंक कलेक्टिव्हली, कन्सल्ट ॲन्ड कोऑपरेट!' ह्या तिन्ही गोष्टी जर आपण करू शकलो तर पुढचा काळ उज्ज्वल आहे हे नक्की. केवळ आत्मकेंद्रित वृत्ती ठेवून चालणार नाही. आपण सगळे जण जर कोऑपरेट करू शकलो नाही तर विकासाचा वेग मंदावेल हे नक्की!



श्रमातून झिरपणाऱ्या आत्मानंदासाठी श्रमू या...

एखादी इंडस्ट्री सुरू होईल त्या दिवसापासूनच कंपनीत काम करणाऱ्या डायरेक्टरपासून ते चपराश्यापर्यंत सर्वांना व्यवस्थापनाचं महत्त्व पटवून दिलं पाहिजे. शाळा-कॉलेजात हे शिकवलं जात नाही. त्यामुळे विद्यार्थी नामक मटेरियल कितीही चांगलं असलं तरी त्याचा विधायक उपयोग होत नाही. 'व्यवस्थापन' हा तुमच्या उद्योगाचा आत्माच आहे. त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. म्हणूनच अगदी तळातल्या कामगारांना समजलं पाहिजे की, आपण नेमकं काय करतो आहोत. तो करीत असलेल्या कामात त्याला रस निर्माण झाला पाहिजे. तो शरीरानं आणि मनानंही कामात एकरूप झाला पाहिजे. आमच्या कंपनीत अशा प्रकारचे 'वर्क-कल्चर' आणण्याचा आमचा प्रयत्न आहे.

आम्ही नजिकच्या काळात अशा प्रकारचं व्यवस्थापनाचं प्रशिक्षण देण्यासाठी मोठी जागा घेतली आहे. तिथे अगदी कामगारांपासून ते संचालकांपर्यंतच्या व्यक्तिला केवळ या प्रकारचे प्रशिक्षण दिले जाईल. अमेरिकन, जापनीज, युरोपिअन मॅनेजमेंटची पुस्तकं मी आवर्जून वाचतो. त्यातील आपल्याला जे योग्य होईल त्याचा वापर करायचा प्रयत्नही करतो. आपण या बाबतीत जपानच्या फार जवळ आहोत. त्यांची 'लाईफ-टाईम एम्प्लॉयमेंट' ही कल्पना फार चांगली आहे.

सामाजिक ऋण मानणाऱ्यांची जातकुळी असते. समाजाबद्दल ओढ असणे आणि ती केवळ बोलण्यातून नव्हे तर, कृतीमधूनही व्यक्त होणे जास्त महत्त्वाचे असते. म्हणूनच जैन फाऊंडेशन या संस्थेची स्थापना झाली आणि आज हजारो लोकांना त्याचा लाभ होत आहे.

## सामाजिक वातावरण

सध्याच्या स्पर्धेच्या जगात प्रत्येकाचा दृष्टीकोन बदलला आहे. मानवी मूल्यांवर परिणाम झाला आहे. कधी कधी दिशा हरवलेल्या वाऱ्यासारखं समाजमन भरकटत जातं. ते कुठे तरी थोपवलं पाहिजे. मुख्य म्हणजे नवी पिढी निकोप विचाराने समृद्ध-संपन्न बनवण्याकडे लक्ष दिलं पाहिजे. त्यांचं 'वर्क-कल्चर' एक ठेवलं पाहिजे.

## राजधानी दिल्ली

कोणत्याही प्रकारचं उत्पादन न करता दिल्लीचं 'पर कॅपीटा इन्कम' भारतात सर्वात जास्त आहे. याचं कारण अगदी स्पष्ट आहे की, तेथील लोकांकडे पैसा आहे. तिथे आसपास राहून सरकारला मोल्ड करण्याचा उद्योग केला जातो. एकदा सरकारला मोल्ड केले की, पैशाची खाण मोकळी होते. दिल्लीचा औद्योगिक विकास हा काही फारसा झाला नाही. दिल्लीच्या आसपास जेमतेम बोटावर मोजता येतील इतकेच उद्योग उभारलेले आहेत. तिथे 'बाबूगिरी'ला विशेष महत्त्व आहे. सरकारी अधिकारीसुद्धा 'पब्लिक सर्व्हंट' व्हायच्या ऐवजी 'पब्लिक मास्टर' झाले आहेत. पार्लमेंट म्हणजे तरी दुसरं काय? न वाचता कायदे बनवण्याचा कारखाना.

राजकीय दडपण वगैरे माझ्यावर कधी आलं नाही. राज्य किंवा देश पातळीवर आमच्यावर कुणी फोर्स करेल अशी आमची स्टेज नाही. माझे सगळे प्रॉडक्ट शेतीवर आधारित असल्याने कोणत्याही प्रकारचं नियंत्रण किंवा परवाने याची मला आवश्यकता नाही. नॅशनल प्रायॉरिटीत ज्या गोष्टी बसतात त्याच मी करीत आहे.

मी राजकारणात का पडलो नाही, त्याबद्दल माझी काही ठाम मतं आहेत. या क्षेत्रात आपण जाऊ नये असा माझा निर्णय पक्का होता. कारण



श्री. मुरलीधर टेकावडे भाऊंचे एक जवळचे मित्र म्हणतात - ''जैन उद्योग समुहाचे प्रवर्तक भवरलालजी जैन हे एक असामान्य व्यक्तिमत्व आहे. स्वकर्तृत्वावर, स्वबळावर, आर्थिक परिस्थितीवर मात करून शून्यातून एवढे मोठे विश्व निर्माण करणे ही साधी गोष्ट नाही. 'सहसा लक्ष्मी आणि सरस्वती एकत्र नादंत नाहीत,' असे म्हणतात. परंतु भाऊंच्याबाबतीत मात्र त्याला अपवाद आहे. दुर्दम्य इच्छाशक्ती व अविरत परिश्रम हे त्यांच्या यशाचं रहस्य आहे.''

राजकारणामध्ये तुम्हाला सर्वसाधारणपणे सत्यच बोलावं लागेल, बोललं पाहिजे असं शक्य होत नाही. प्रसंग आणि वेळ बघून, पुढच्याला जे आवडेल तेच बोलावं लागतं. त्यासाठी तुम्हाला मूल्यांची पायमल्ली करावी लागते. स्वत:ची अशी स्प्लिट पर्सनॅलिटी असावी, असं मला कधी वाटलं नाही. आपल्याकडे राजकारण हे माजघरापर्यंत जाऊन पोहोचलं आहे! तात्पर्य एवढंच की, राजकारण हेच जीवनाचं सर्वस्व आहे, अशी एक समाजधारणा झाली आहे ती बदलली पाहिजे. अमेरिकेसारख्या देशात राजकारण हा क्वचित चर्चेला घेतला जाणारा विषय आहे. आपल्या जीवनातून राजकारण वजा केलं की, कदाचित आपली खरी ओळख आपल्याला पटू शकेल. मी राजकारणापासून दूरच राहिलो. मी हाक मारल्याबरोबर पाचशे लोक गोळा व्हावेत अशी कधी माझी अपेक्षा राहिली नाही. त्यापेक्षा पन्नास लोकांच्या जीवनात मी काही बदल घडवून आणू शकलो तर खऱ्या अर्थाने माझे जीवन कृतार्थ होईल, अशीच माझी भावना राहिली.

**निर्णय प्रक्रिया**

गेल्या तीन वर्षांपासून व्यवसायाच्या कोणत्याच बाबतीत मी एकटा निर्णय घेत नाही. मुलांनी घेतलेल्या निर्णयाला दिशा देण्याचं काम मी करतो. निर्णय प्रक्रिया कलेक्टिव असावी असं मला वाटतं. तसा प्रयत्नही मी करीत आहे. कधी कधी मला समजत असतानाही किंवा परिणामांची जाणीव होऊनही त्यांच्या चुकीच्या निर्णयांना मी विरोध करीत नाही. चूक झाल्याशिवाय शहाणपण कसं येणार...?

**स्वभावातील दोष**

मनाचा मोठेपणा मी मिळवला, परंतु दुसऱ्याची झालेली चूक ही त्याच्या दृष्टीने बरोबरच असते हे जर मी काही वेळेस गृहीत धरून त्याच्याशी वागलो असतो तर बरं झालं असतं. नेहमी तसा विचार माझ्याकडून व्हावा असं वाटतं.

**पहिली चूक**

चूक झाली असेल तर ती मी लगेचच सुधारली. पण बहुतेक वेळा चूक होण्यासारखे प्रसंग मी टाळलेच आहेत. त्यामुळे ठळकपणे सांगता येईल अशी गोष्ट मला आता आठवत नाही. पण व्यवसायासाठी पैसा उभा करीत असताना कुठे लांड्या-लबाड्या, भ्रष्टाचार केला नाही. जे काही असेल ते समोरच्या माणसापुढे स्वच्छ-स्पष्टपणे सांगितलं. आता ही जर 'चूक' असेल तर त्याचं फळ म्हणजे 'जैन उद्योग समूह' हे आपण पाहताच आहात.

## व्यावसायिक आदर्श



स्फूर्तीस्थान : जे.आर.डी. टाटा

जे.आर.डी. टाटांनी त्यांच्या पद्धतीनं आपले व्याप वाढवले व व्याप वाढवूनही स्वत:ची अशी लाईफ स्टाईल जपली. त्यांच्याप्रमाणेच मलाही माझ्या पद्धतीने जगता यावं, म्हणूनच तर ही सगळी तपश्चर्या आहे. यश वगैरे डोक्यात भिनलं नाही. कारण जे काही केलंय ते 'बाय डिझाईन' केलंय. अचानक कुणीतरी काही जादूने आणून दिलं नाही. त्यामुळे 'यश' मिळालं ही हवा वगैरे मला बाधली नाही. पण तरीही मी माझ्या व्यावसायिक जीवनात शंभर टक्के यशस्वी झालोय असं नाही. जितक्या वेगानं मी पुढं जाऊ शकलो असतो तेवढ्या वेगानं मी गेलो नाही, कारण कुठेही तडजोड करायची नाही असा माझा स्वभाव आहे. माझ्या मुलांमध्येही हेच गुण तुम्हाला आढळतील. कारण कोणत्याही बाबतीत तडजोड केली की, त्याचे अनिष्ट परिणाम व्यवसायावर होतात. मग गाडी उतरंडीला लागायला सुरुवात होते. परिस्थितीनुसार समाजमूल्येही बदलतात, परंतु प्रामाणिकपणा हा अत्यंत महत्त्वाचा गुण धंद्याला हवा. त्याशिवाय चिरकालीन यश अशक्य आहे.

**'कॅन्सर रिलीफ सेंटर हे भाऊंचे स्वप्न!**

विविध विषयांवर भाऊंशी बोलताना रंजल्या-गांजल्यासाठी, समाजासाठी काहीतरी करण्याची त्यांची तळमळ त्यांच्या बोलण्यातून निश्चित जाणवत होती. या तळमळीतूनच जळगावला उभं होणार आहे 'कॅन्सर रिलीफ सेंटर'! कर्करोगाने त्रस्त झालेल्या रूग्णांना होणाऱ्या यातना भाऊंनी जवळून पाहिल्या आहेत. मुंबईमध्ये टाटा इस्पितळात सर्वसामान्य रूग्णांची होणारी गर्दी, उपचाराआधी त्यांना होणारा मानसिक त्रास, मुंबईतील त्यांच्या निवासाचा खर्च हा सर्व भाग कर्क रोगाने ग्रासलेल्या रूग्णास मरणाआधी मरण देणारा असाच असतो. त्यांना कुठेतरी सहृदयता वाटावी, मरणही आले तरी ते आनंदाने स्वीकारावे अशी वातावरण निर्मिती व्हावी असा हेतू डोळ्यापुढे ठेवून 'कॅन्सर रिलीफ सेंटर' ची उभारणी व्हावी असा भाऊंचा मानस आहे.

''पाईपच्या निर्मितीकडून एकदम रूग्णसेवेकडे आपण कसे वळलात?'' या प्रश्नावर भाऊ थोडे गंभीर झाले अन म्हणाले, ''बहुतेकांचा हाच प्रश्न आहे. त्यातही मी मारवाडी म्हणजे कट्टर व्यवसायी आहे. पण माझा स्वभाव, व्यवसाय व जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन खूप भिन्न आहे. या समाजाला मला उभं करायचंय. माझ्याजवळ असलेल्या बुद्धीचा समाजाला उपयोग व्हावा, कामगारांना काम मिळावे म्हणून मी पाईपचा कारखाना काढला. पाच-पन्नास मजुरांना हाताशी घेऊन या कारखान्याची त्यांच्याच उदंड सहकार्याने उभारणी केली. आज शेकडों कामगार जैन पाईपमध्ये कार्यरत आहेत. सर्व कारखान्याचं आधुनिकीकरण केलंय, हे सर्व त्यांच्याच सहकार्यानं! पण इथेही मी 'व्यवसाय' सांभाळलाय! व्यवहार, मग तो आर्थिक असो, नाही तर उत्पादनाचा असो, तो सांभाळण्यासाठी वेगळी व्यवस्था आहेच.

माझ्या जीवनामध्ये मी जे काही अनुभवलंय ते समाजाला देऊ इच्छितो. हे माझं ध्येय आहे. हा सर्व समाज, मग तो कुठलाही असो, माझ्या जीवनाचं एक अंग आहे. म्हणूनच या इस्पितळाची उभारणी करणार आहे. कॅन्सर आज तरी असाध्य रोग आहे. रूग्णाचं उरलेले आयुष्य सुसह्य करावं या हेतूनं जैन फाऊंडेशनचं कॅन्सर रिलीफ सेंटर काम करील.

जागा आणि यंत्रसामुग्री या संदर्भात मी विचारलं तेव्हा भाऊंनी सांगितलं, ''जळगाव नगर परिषदेकडे टी.बी. सॅनेटेरियमची सुमारे ६७ एकर जागा पडून

होती, तीच जमीन या इस्पितळासाठी उपयोगात आणावयाची आहे. मात्र यंत्रसामुग्री आम्ही विकत घेणार आहोत. विशेषत: कॅन्सर सेंटरमध्ये कोबाल्ट युनिट प्रमुख असतं. त्याची तपासणी केन्द्र सरकारच्या तज्ज्ञ मंडळीकडून होते. ती झाली की युनिटचं काम सुरू होईल.''

या इस्पितळाची उभारणी कशी करताहात? यावर भाऊ म्हणाले, ''इस्पितळात महागंभीर वातावरण नकोय. येथे सुंदरशी बाग राहील. तलाव, सॅनेटेरियम, खेळाचं ग्राऊंड आणि निवासाची व्यवस्था असं सर्व काही येथे राहणार आहे. येथे जे जे लागेल ते ते करण्याचा माझा संकल्प आहे.'' भाऊंचा हा संकल्प जबरदस्त आहे. सर्व काही समर्पित भावेनेनं करण्याचा त्यांचा निर्धार निश्चित कौतुकास्पद आहे.

कर्मयोग जन्मभर शिकून येत नाही तर, काहींच्या आचरणातच तो असतो. परंतु आपण जे आयुष्य जगतो आहोत, तोच खरा कर्मयोग, हे भाऊ ओळखून आहेत. भाऊ म्हणतात, ''मी मातीतला माणूस आहे. या धरतीची मी थोडीफार सेवा केली तर तिनं मला भरभरून दिलं. त्याची परतफेड तर करायलाच हवी.''

# भविष्याचा वेध घेणारा 'जलयोगी'

हिरा राबिया - नार्थ-वेस्ट नेटवर्क, ऑगस्ट, १९९४

औद्योगिक क्षेत्रात यशस्वीरित्या वावरताना शिक्षण क्षेत्राकडे नीर-क्षीर विवेकानं पाहणं, जागतिक शिक्षण पद्धतीचं मूल्यमापन करणं, त्यातली तकलादू कवचं काढून टाकणं आणि अस्सल नाती, मूल्यांसाठी अट्टाहास धरणं हा भवरलालजींचा मूळ स्वभाव.

काही गावे अशी असतात की, एखाद्या व्यक्तिमुळे त्या गावांचे नाव नकाशावर ओळखले जाते. त्या व्यक्तिचे कर्तृत्व हे त्या शहराचे भूषण होऊन बसते. जळगाव हे असेच एक गाव. केळ्यांसाठी प्रसिद्ध असलेले हे गाव आता जैन पाईपमुळे ओळखले जाते आहे आणि 'जैन पाईप' म्हटले की, आठवतात ते भवरलाल जैन. जळगावला स्वतःचा चेहरा मिळवून देणारे एक संपन्न व्यक्तिमत्त्व. शून्यातून विश्व निर्माण करणारे शिल्पकार.

कायद्याची पदवी आणि खिशात दहा (नव्हे ७०००) रूपये एवढ्या भांडवलावर भवरलाल यांनी तरूण वयात रॉकेल विक्री व्यवसाय सुरू केला.



नातवंडांशी खेळण्यात रममाण आजोबा भाऊ, आजी कांताबाई

त्यांचे घराणे प्रतिष्ठित, शेती करणारे. पण तरीही या नव्या व्यवसायाला पाठिंबा मिळाला. एका ज्योतिष्याने भविष्य वर्तविले, 'हा तरूण लोखंड, माती आणि तेलाचा मोठा व्यावसायिक होईल.' रॉकेलपासून रिक्षाचे सुटे भाग, पेट्रोल, डिझेल, लुब्रिकेटिंग ऑईल, घरगुती गॅस, पपेन, पीव्हीसी पाईप, ठिबक सिंचन अशा अनेक दिशांनी त्यांनी आपल्या व्यवसायाचा व्याप वाढविला आणि जळगावच्या प्रगतीशी आपल्या व्यवसायाचे नाते गुंफले.

आज 'सामाजिक जाण असलेला हाडाचा उद्योजक' असा भवरलाल यांचा लौकिक आहे, तो केवळ महाराष्ट्रात नव्हे तर, जगभरात. पण फक्त व्यवसाय आणि व्यवसाय हेच त्यांच्या जीवनाचे उद्दिष्ट नाही. विविध कलांवर प्रेम असणाऱ्या भवरलाल जैन यांनी नाशिकच्या शिल्पकार सुधीर देशपांडेसारख्या कलाकारांना प्रोत्साहन दिले. 'गिनिज बुक' मध्ये ज्या सर्वात उंच आणि वजनदार शिल्पाची नोंद आहे ते 'सूर्यमानव' शिल्प सुधीर देशपांडे यांनी भवरलाल जैन यांच्यासाठी बनवले आहे. भरपूर वाचन, चिंतन आणि सतत नव्याला सामोरे जाण्याची वृत्ती ह्यामुळे आज हे दोन नातवांचे आजोबा मागील पिढीतील वाटत नाहीत. सध्याच्या शिक्षण पद्धतीपासून गॅट करारापर्यंत विविध विषयांवरील त्यांची मते.


प्रसिद्ध शिल्पी सुधीर देशपांडे

**राबिया–** कामाबाबतचे तुमचे स्वत:चे तत्त्वज्ञान काय आहे?

**भाऊ–** केवळ तीन शब्दांमध्ये हे तत्त्वज्ञान सांगता येईल. 'काम हेच जीवन,' या एकाच वाक्यातून आमच्या व्यवसायातील कामाची संस्कृती स्पष्ट होते.

**राबिया–** जळगावबाबत तुमच्या भावी योजना काय आहेत? जळगावात मॅनेजमेंट कॉलेज सुरू करण्याबाबतची योजना प्रत्यक्षात केव्हा येणार आहे?

**भाऊ–** माझ्या उद्योग विस्ताराच्या व गुंतवणुकीच्या ज्या भावी योजना आहेत त्या जळगाव किंवा आसपासच्या भागात राबविण्यासाठी मी स्वत:लाच वचनबद्ध केले आहे. जळगावची भूमी, येथील माती, येथील लोक यांच्यामुळे मी मोठा झालो, असे मी मानतो. हे ऋण फेडण्यासाठी येथील लोकांना काम उपलब्ध करून

देणे याला मी माझी जबाबदारी, माझे कर्तव्य मानतो. विकासात्मक कामाचा पहिला भाग म्हणून सध्या भारतातील शेतकऱ्यांना आधुनिक कृषि तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देणारे केन्द्र सुरू करण्याची योजना हाती घेतली आहे. तो प्रकल्प पूर्णत्वाला गेल्यावर ग्रामीण व्यवस्थापन संस्था सुरू करून नंतर शेवटचा टप्पा म्हणजे व्यवस्थापन शास्त्राचे प्रशिक्षण देणारे परिपूर्ण केंद्र सुरू करावे, असा विचार आहे.

**राबिया–** इस्रायली तंत्रज्ञानाचा वापर करून एक आदर्श कृषि प्रकल्प जैन ग्रुपतर्फे कोठे सुरू होणार आहे? त्यात कोणत्या तंत्रज्ञानाचा समावेश असेल? त्याचा देशाला कोणत्या स्वरूपात फायदा होईल?

**भाऊ–** कृषि क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्यासाठी जैन फाऊंडेशन आणि सिनॅडको (CINADCO) यांच्या संयुक्त प्रयत्नाने असे पहिले केंद्र १३ जून ९४ रोजी सुरू झाले. या तंत्रज्ञानाच्या वापराने जमिनीची प्रत सुधारेल. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही आपोआप वाढ होईल. या तंत्रज्ञानाचा वापर केल्याने शेतीवर आधारित सर्व उत्पादने आंतरराष्ट्रीय दर्जाची निर्माण होऊन देशाला परकीय चलनाचा लाभ मिळू शकेल. शेतीमालावर आधारित, फळे वा इतर धान्यावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांनाही त्यामुळे मदत होऊन राष्ट्रीय आर्थिक धोरणावरसुद्धा त्याचे परिणाम दिसू लागतील.


**राबिया–** आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सर्वोच्च स्थान पटकावण्यात भारतीय उद्योजक मागे पडतात याची कोणती कारणे आहेत? सर्वोच्च स्थानावर जाण्यासाठी जी व्यावसायिक वृत्ती लागते त्यात भारतीय कमी पडतो असे आपल्याला वाटते का?

**भाऊ–** मुख्यत: अनेक शासकीय निर्बंध ही भारतीय उद्योजकाच्या पायातील बेडी ठरली आहे असे मला वाटते.

*हे निर्बंध कमी होऊन पुढे जाण्यात अडसर ठरणाऱ्या या बेड्या निघाल्या, समान संधी भारतीय उद्योजकांना मिळाल्या तर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारतीय उद्योजक यशस्वी होतील, सन्मानाचे स्थान पटकावतील.*

नवीन तंत्रज्ञान अवगत करायचे कसब आपण कमावले आहे. आपल्याकडे उत्पादन खर्च कमी असल्याने आंतरराष्ट्रीय स्पर्धेत त्याचा फायदा आपल्याला आहे.

*आपण आपली सनातन नैतिक मूल्ये जपू शकलो व त्याची सांगड नवीन तंत्राशी घालू शकलो तर औद्योगिक क्षेत्रात आगामी दशकात आपण सर्वोच्च स्थान नक्कीच पटकावू शकतो.*



विचारमंथनात मग्न भाऊ

**राबिया-** डंकेल प्रस्तावाबाबत आपले मत काय?

**भाऊ-** गॅट जागतिक व्यापार परिषदेतील वाटाघाटी व डंकेल प्रस्तावामुळे देशातील कृषि व औद्योगिक क्षेत्राला नक्कीच आर्थिक लाभ होणार आहे. आज इतरांच्या छायेतून बाहेर पडून आपण आंतरराष्ट्रीय मुख्य प्रवाहात सामील होण्याची गरज आहे. या प्रवाहात येताना स्पर्धेतील विविध ताणतणावांना आपल्याला सामोरे जावे लागेल. आव्हाने समोर ठाकल्याखेरीज आपला विकास साध्य होणार नाही. विकसनशील अर्थव्यवस्थेकडून विकसित अर्थव्यवस्थेकडे प्रवास करायचा तर ही स्पर्धा, त्यातील ताण, नवनवी आव्हाने हे अटळ आहे. खाणीत सापडणाऱ्या ओबडधोबड हिऱ्यावर पैलू पाडल्याशिवाय तो अनमोल बनत नाही. माणसाचं कर्तृत्वही संकटकाळातच उजळतं.

*औद्योगिक आणि कृषि क्षेत्रात भारतीय उद्योजक आणि शेतकरीसुद्धा जगात आघाडीवर असलेल्या देशांच्या तोडीची सर्वोत्तम कामगिरी करू शकतील याविषयी मला पूर्ण विश्वास आहे.*

**राबिया-** विविध अंगांनी वाढणाऱ्या व्यवसायाची धुरा आपण अनेक वर्षे यशस्वीपणे सांभाळत आहात. सध्याच्या आर्थिक वातावरणात व्यवसायाची प्रमाणबद्ध वाढ करण्यासाठी, राखण्यासाठी कोणती सूत्रे आपण वापरता?

**भाऊ-** व्यावसायिक वृत्ती ही कोणत्याही व्यवसायाच्या, उद्योगाच्या वाढीची पहिली गरज आहे. याखेरीज संधी शोधणं आणि त्या संधीचं सोनं करण्यासाठी धोका पत्करण्याचीही तयारी ठेवणं हेही आवश्यक आहे. उद्योग-व्यवसाय

वाढवण्यासाठी अडचणींवर मात करून दिलेल्या वेळात आणि ठरवून दिलेल्या आर्थिक तरतुदीमध्येच काम करण्याचा निर्धार असलेल्या स्थिर मनाचीही गरज आहे. ह्या गोष्टी असल्या म्हणजे उपलब्ध साधन-सामुग्रीचे उत्तम नियोजन हाही एक घटक आहे. पण तो दुसऱ्या टप्प्यात येतो असे मला वाटते.

**राबिया-** पर्यावरणाच्या महत्त्वाच्या प्रश्नाबाबत आपण विशेष जागरूक आहात, त्या संदर्भात आपण काही ठोस निर्णय, कार्यक्रम हाती घेतले आहेत काय?



जैन सौरबंब कॉलनी

**भाऊ-** पर्यावरणाच्या विविध प्रश्नांबाबत वाटणारी काळजी व जवळीक आमच्या विविध उत्पादनांमधून व्यक्त होते. ठिबक सिंचन योजनेमुळे पाणी वाचते. आम्ही जी विविध प्रकारची प्लास्टिक शीट्स् तयार करतो, त्यांचा लाकडाऐवजी वापर करता येतो. शिवाय ऊर्जा वाचविण्याचा एक उपाय म्हणून सोलर हिटर्सचे (सौर उर्जेवर चालणारे हिटर्स) उत्पादनही आम्ही सुरू करणार आहोत.

**राबिया-** कामाव्यतिरिक्त आपली अन्य व्यवधाने कोणती? काही छंद जोपासायला तुम्हाला वेळ मिळतो का?

**भाऊ-** मी भरपूर वाचतो आणि जेव्हा वेळ मिळेल तसा समाजकल्याणासाठी वेळ देतो. हाती घेतलेले काम पूर्णपणे यशस्वी करण्यासाठी स्वत:चे शरीर आणि मनही पूर्णपणे सक्षम ठेवणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे, असे मी मानतो. त्यामुळे या दोन गोष्टींसाठी मी निश्चितच वेळ देतो.

**राबिया-** आपल्या देशात मुलांना योग्य शिक्षण दिले जात आहे, असे तुम्हाला वाटते का? नसल्यास त्याबाबत काय करता येईल?

**भाऊ-** भावी पिढ्यांसाठी आपल्या शिक्षण व्यवस्थेचा पूर्णपणे फेरविचार करण्याची आज गरज आहे. स्वतंत्र, चैतन्याने भारलेल्या आणि सदैव पुढे जाण्याची आस असलेल्या देशासाठी ही मूल्ये देणाऱ्या शिक्षणक्रमाची गरज आहे. सध्याची

व्यवस्था भ्रष्टाचारामुळे पूर्ण सडली आहे. त्यामुळे ती बदलण्याखेरीज आता पर्याय उरलेला नाही. आगामी पिढी सुशिक्षित असावी अशी तर गरज आहेच.

*कठोर श्रम, श्रमप्रतिष्ठा, एकात्मता आणि उद्दिष्ट प्राप्तीसाठी धडपड करण्याची वृत्ती मुलामुलीत बाणायला हवी. या गोष्टींचा मूल्ये म्हणून त्यांनी आयुष्यात स्वीकार करायला हवा.*

**राबिया–** तुमच्या नातवाला आय.आय.टी.ला पाठवण्याची वेळ आल्यास तुम्ही कोणत्या संस्थेची निवड कराल? अमेरिका-इंग्लंडमधील सर्वोत्तम संस्थांशी भारतातील शिक्षण संस्थाची तुलना होऊ शकेल?

**भाऊ–** माझ्या मते व्यवस्थापकीय शिक्षण देणाऱ्या भारतातील काही संस्था या जगातील सर्वोत्तम संस्थांच्या तोडीच्या आहेत. पण राजकीय नेते आणि शासकीय अधिकारी यांचा हस्तक्षेप बंद झाला तर! या संस्था चालविण्यास जे लायक आहेत, पात्र आहेत त्यांनीच अशा संस्थांचा कारभार हाताळल्यास त्या जगातील कोणत्याही सर्वोत्तम संस्थेशी स्पर्धा करू शकतील असे मला वाटते. माझ्या नातवाबद्दल विचाराल तर तो त्या वयात आल्यावर कोठे व काय शिकायचे हे स्वत:च ठरवेल.

**राबिया–** आपल्याला आवडणारी पाच पुस्तके कोणती?

**भाऊ–** एखादे विशिष्ट आवडते पुस्तक सांगणे अवघड आहे. तत्त्वज्ञान, कामाची संस्कृती, व्यवस्थापन आणि धार्मिक ग्रंथ अशी विविध प्रकारची पुस्तके मी वाचतो.

**राबिया–** आपला दिनक्रम कसा असतो?

**भाऊ–** पहाटे ५ वाजता उठून काही मित्रांबरोबर मी फिरायला जातो. आमच्या संशोधन आणि विकास प्रकल्प फार्मपाशी माझा नातूही यात सामील होतो. नंतर योगासने आणि ध्यानधारणा झाल्यावर सकाळी ८ पर्यंत मी दैनंदिन कामाला लागतो. मोहाडी येथील घरी किंवा जैन हिल्सवर भेटीगाठी, पुढील योजनांची चर्चा, आखणी होते. ११ वाजता मी फॅक्टरीत जातो. तेथेच मुले, मित्र आणि काही सहकारी यांच्यासोबत दुपारचे जेवण घेतो. नंतर थोडी वामकुक्षी घेऊन पुन्हा कामाला लागतो. सूर्यास्तापूर्वीच संध्याकाळचे जेवण घेऊन मग काही तास मी कुटुंबासमवेत घालवतो. घरी नातवांशी खेळतो. रात्री नातवाला घेऊनच मी व पत्नी फार्मवरील घरात झोपायला जातो.

# दिव्यतेच्या स्वप्नांना वास्तवाचे स्थान

गोरख पगार - अर्थ उद्योग, जानेवारी १९९५

स्वभावातली लवचिकता हे एक असिधाराव्रत. चुकून ती जास्त झाली तर येतो स्वैरपणा. अभ्यासानं आणि आत्मविश्वासानं मात्र तिच्या मर्यादा सांभाळण्याची कुवत अंगी येते. सकारात्मक दृष्टीकोन नवनवी क्षेत्रं आपोआपच खुली करतो. याचा पुरावा म्हणजे हा जीवनप्रवास.

प्लास्टिक उद्योग विशेषांकानंतर 'अर्थ उद्योग'ने कृषि तसेच खाद्यान्न प्रक्रिया उद्योगावर विशेषांक काढला. हा अंक अर्थ-उद्योगच्या बाल्यावस्थेतील मानाचा तुरा ठरला. उद्योग विश्वातील अनेक 'हिऱ्यांची' या अंकात उपस्थिती होती. त्यात सर्वात महत्त्वाचे म्हणजे महाराष्ट्रातील कृषि उद्योगात क्रांती घडविणारे जैन उद्योग समूहाचे चेअरमन श्री भवरलाल जैन, नंदकिशोर कांगलीवाल, प्रवीण फुड प्रॉडक्टसचे हुकमीचंद चोरडिया, सी ॲन्ड एम ग्रुपचे चेअरमन इलियास डिसुझा, डॉ. उर्जिता जैन, मेडीफार्मा इक्विपमेंटस्‌चे श्री व सौ. पिल्ले, यांच्या कथा वाचल्यानंतर उद्योजकतेची मानसिक तयारी होते.

व्यवसायासाठी खंबीरपणे मुलाच्या पाठीशी उभी राहणारी भवरलाल जैन यांच्या आईसारखी आई खरे तर अपवादात्मकच असते. शिवाजी महाराजांना घडविणाऱ्या जिजामातेसारखीच भवरलाल जैन यांचीही आई होती. आज भारतात भवरलाल जैन यांच्यासारख्याच व्यक्तिमत्वांची तसेच त्यांच्या आईसारख्या मातांची गरज आहे.

माणसाला सौंदर्याचा ध्यास असतो. परंतु जीवनात फक्त सौंदर्यालाच महत्त्व नाही. मानवी जीवन सुंदर करण्याचा तो एक भाग आहे आणि हे सौंदर्य जर कर्तृत्वाने उभे राहिले तर? तसे कार्य हे साक्षात ब्रह्मदेवाने सृष्टी निर्माण करण्यासारखे आहे. जगभर कर्तृत्ववान माणसे कमी नाहीत. ती त्यांच्या-त्यांच्या क्षेत्रात महान आहेत. त्यांनी नावलौकिक केला. भरपूर पैसाही त्यांनी



सौंदर्य पारखी उद्योजक भवरलाल जैन

कमविला. पण असे करताना अनेक बाबतीत पर्यावरणाशी फारकत घेऊन, निसर्गाशी नातं तोडून.

निसर्ग आणि मातीशी इमान राखलेले उद्योगपती जगभर तसे दुर्मिळच असतील. त्या दुर्मिळांमधील एक नाव खरेखुरे 'भारतरत्न' आणि जळगावचा 'भूमिपुत्र' भवरलाल जैन! ज्यांचे कर्तृत्व माणसाला नतमस्तक करणारे आहे, ज्यांच्या कर्तृत्वाला फक्त आकाशाच्याच मर्यादा उरल्या आहेत, त्या या माणसाच्या कर्तृत्वातून सृष्टीचे सौंदर्य अनुभवता येते.

कंगाल दीनदुबळा शेतकरीही त्याच्या पदरी थोडी फार जमीन असेल तर 'परीस' बाळगून आहे याची जाणीव होते. तसेच भारतात शेती हाच चांगला उद्योग होऊ शकतो याची खात्री पटते. शेतीतून सोने पिकवता येते. हजारो माणसांचे हात कामाला लागू शकतात. डोळ्यांचे पारणे फेडणारी सुंदर सृष्टी निर्माण करता येते आणि अगदी हलक्या प्रतिची जमिनही नियोजनाने वापरात आणली तर किमया होऊ शकते. भारताचा इस्राईल किंवा कॅलिफोर्निया होऊ शकतो. हे सर्व जैन यांनी त्यांच्या कर्तृत्वातून सिद्ध केले आहे.

भवरलाल जैन यांचे महान तत्त्व कशात, तर शेतीत! हा त्यांचा परंपरागत व्यवसाय नव्हता. 'हाती लागले ते चांगले केले, गरज आहे तेच केले, टाकाऊ आहे ते कारणी लावले, जे जे केले ते ते समरसून केले आणि स्वप्न उराशी बाळगून केले.' जैन यांची ही कार्यप्रणाली आहे. त्यामुळेच यश आणि यशाची

अशी ही एक लाट पुढे अनेक मैलांवर सारखी झेपावत आहे. या लाटेला मर्यादा नाहीत. अर्थात कर्तृत्वाचा उद्योग कसा करावा, कोणत्या पद्धतीने जोपासावा आणि कसा वाढवावा याचे खरेखुरे विद्यापीठ म्हणजे जळगावचा जैन उद्योग समूह, भवरलाल जैन यांची यशोगाथा, त्यांनी केलेले प्रयोग, ते करीत असलेले नवे प्रयोग.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी त्यांच्या भूमीतील ही 'खाण' अवश्य अनुभवावी. म्हणजे शेतीतल्या 'प्राणाची' त्यांना जाणीव होईल आणि काळ्या आईत पुन्हा 'जान' येईल. माणसाला यशस्वी होण्यासाठी गरज असते ती फक्त उमेदीची आणि त्यानंतर कठोर परिश्रमासह थोड्या कल्पकतेची. भाऊंच्या यशाचे गुपित यापेक्षा वेगळे नाही, हे त्यांच्या जीवनकथेतूनच सिद्ध होते.

**उद्योग व्यवसायाची पीठिका**

जळगाव जिल्ह्यामधील वाकोद या छोट्या गावात ते जन्मले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत नातेवाइकांचा आधार घेत ते शिकले. पदवीनंतर चांगली नोकरीही मिळाली. पण अंगी असलेली कष्टाची क्षमता स्वत:च्या व्यवसायात वापरण्याचा निर्णय त्यांनी घेतला आणि भाऊंनी त्यांच्या आईकडून तिच्या आयुष्यभरची पुंजी घेऊन प्रथम रॉकेल विक्रीचा व्यवसाय सुरू केला. तो वाढविला. त्याला पेट्रोल विक्री आणि कृषिउपयोगी साधनसामग्रीच्या विक्रीची जोड दिली. त्यातच उद्योगधंद्याचे 'तत्त्वज्ञान' भाऊंना कळाले आणि भाऊंचा मोर्चा कारखानदारीकडे वळला. व्यवसायात येण्यापूर्वी 'भाऊं'ना उपजिल्हाधिकारी म्हणून नोकरी मिळाली; परंतु दिव्यतेची स्वप्ने पाहणारा माणूस नोकरीत रमेल कसा?

महत्त्वाकांक्षा तसेच सृजनशीलतेसाठीच त्यांचा जन्म झालेला होता. एका विशिष्ट ध्येयाने झपाटलेल्या भवरलाल 'भाऊ' जैन यांनी १९६३ साली 'मोठा' दृष्टीकोन ठेवून सात हजार रूपये भांडवल आणि तीन कष्टाळू सहकाऱ्यांच्या मदतीने जैन उद्योग समूहाची मुहूर्तमेढ रोवली. रस्त्यावर आलेल्या छोट्या-मोठ्या सुखांनी हुरळून न जाता आणि दु:खांनी, पराभवांनी खचून न जाता ते पुढेच चालत राहिले. महाराष्ट्रातील व भारतातील शेतीविषयक गरजा ओळखून त्या त्यांनी अभ्यासल्या आणि त्या भागविण्याच्या मार्गात आलेल्या अडचणींना दूर करण्यासाठी संशोधन केले. देशी संशोधनाला मर्यादा पडतात म्हणून उपग्रहाच्या दृष्टीकोनातून साऱ्या

जगाकडे पाहिले आणि इस्रायल, अमेरिका, फ्रान्स, इंग्लंड, इटली, ऑस्ट्रेलिया या देशांतील उद्योगांबरोबर तंत्रज्ञान सहकार्य केले.

आता श्री. जैन यांना हिरव्यागार जगाचा सम्राट संबोधले जाते. १९९३-९४ या वर्षात जैन उद्योग समूहाचा नफा २१ कोटी रुपयांचा होता. तो १९९४-९५ मध्ये ३३ कोटी ४० लाख रुपये झाला. तर १९९५-९६ मध्ये ४८ कोटी ६० लाख रुपये होण्याची शक्यता आहे. आता जैन उत्पादने भारतभर तर पसरली आहेतच, परंतु युरोप, अमेरिका, मध्य आशिया, दक्षिण पूर्व आशिया, पूर्व आफ्रिका, मध्य पूर्व आशिया या क्षेत्रांतही निर्यात केली जातात. आता कंपनीत कर्मचाऱ्यांची संख्या तीन हजारांच्या पुढे गेली आहे.

जैन उद्योग समूहाने प्रथमच देशात रिफाईन्ड पपेनची निर्मिती केली आणि १०० टक्के निर्यातप्रधान उद्योग सुरू झाला. गत १७ वर्षांपासून जैन उद्योग जगात पपेनची निर्यात करणारा दुसरा मोठा उद्योग समूह आहे. अर्थातच हा समूह देशाला अमूल्य परकीय चलन मिळवून देतो. जैन उद्योग समूह जागतिक गरजेच्या २० टक्के पपेनचे उत्पादन निर्यात करतो.

**ठिबक सिंचन म्हणजे जादूची कांडी**

महाराष्ट्रातील आणि भारतातील शेती लहरी पावसावर अवलंबून आहे आणि आपण शतकानुशतके पावसाच्या लहरीचा अन्याय सहन करत आलो. परंतु थोडा सारासार विचार करून, वैज्ञानिक दृष्टीकोनातून इस्रायलसारख्या प्रयोगांकडे पाहिले, तर आहे त्या अवस्थेत शेती फायदेशीर बनवली जाऊ शकते हे भाऊंनी महाराष्ट्राला आणि भारताला समजावून सांगितले. सुरुवातीला त्यांच्या विचाराला कोणी फारसे गांभीर्याने घेतले नाही. परंतु भाऊंनी जिद्दीने किल्ला एकतर्फी लढवून ठिबक सिंचनाद्वारे पाणी संवर्धनाची कल्पना सर्वांच्या गळी उतरवली. प्रगतिशील शेतकरी जळगावला जातात व जैन संशोधन आणि विकास केंद्रावरील आदर्श प्रयोग पाहून त्याचे सहजपणे अनुकरण करतात. प्रयोग इतका सुटसुटीत आहे की, यशस्वी होण्यासाठी त्याचे अनुकरण केले तरी पुरेसे आहे.

**फक्त फायदे आणि मोठे फायदे**

ठिबक सिंचनामुळे फक्त फायदे होतात. उत्पादनक्षमता इतर बदलत्या परिस्थितीनुसार ३० ते २३० टक्क्यांपर्यंत वाढते. पाण्याचा वापर सुमारे ५० ते ७० टक्के कमी होतो. आपले पीक दर्जेदार तर असते, शिवाय ते लवकर परिपक्व होते.

ठिबकद्वारा फक्त पाणी पुरवठाच होत नाही, तर त्यातून खत पुरवठाही अत्यंत परिणामकारकरीत्या केला जाऊ शकतो. द्रवरूपातील खतांमुळे खत ताबडतोब मातीत मिसळते आणि पिकांना भरवते. दाणेदार खते अनावश्यक ठिकाणीही फेकली जातात आणि त्यांचे पाण्यात मिसळण्याचे प्रमाणही खूप कमी असते. जैन समूह फिनलॅण्डच्या केमिरा ॲग्रोबरोबर सहकार्य करून ही विद्राव्य खते निर्माण करणार आहे आणि त्याच्या वापराची पद्धत शेतकऱ्यांना समजावूनही सांगणार आहे. याशिवाय ठिबक सिंचनाद्वारे ग्रोथ हॉर्मोन्स आणि मायक्रो न्यूट्रियन्टही दिली जाऊ शकतात. यामुळे ३० टक्के खते कमी लागतात. कमी पर्जन्यमानाच्या प्रदेशात ही पद्धत म्हणजे वरदानच म्हणावे लागेल. यामुळे मजुरीतही बचत होते आणि पिकांवरील रोगांना सहजरीत्या आळा घालता येतो.

**पूर्ण भारतात यशस्वी**

ठिबक सिंचनाचा प्रयोग काश्मीरच्या सफरचंदापासून ते थेट केरळच्या नारळापर्यंत वापरात आला आहे. शेती उत्पादन, फलोत्पादन, वनीकरण इत्यादी क्षेत्रांतील ३६ पिकांवर हा प्रयोग यशस्वी झाला आहे. ठिबक सिंचन प्रक्रियेत छोट्या-मोठ्या पाईपलाईनच्या जाळ्याद्वारा रोपांच्या मुळाशीच पाण्याचा संवाद साधला जातो. तोही आवश्यक इतकाच. जैन उद्योग समूहाने अंतर्गत संशोधन आणि जागतिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने यंत्रसामग्री तयार केली आणि ५०० वितरकांचे जाळे तयार केले. फळ उद्योगासाठी हे तंत्रज्ञान अतिशय उपयोगी आहे आणि महाराष्ट्रात आंबा, केळी, काजू या फळांसाठी हवामानही बरेच पोषक आहे.

**गोरख-** आपल्या यशामागे कौटुंबिक संस्काराचा भाग कितपत आहे?

**भाऊ-** माझ्या आईचे-कुटुंबाचे संस्कार माझ्या जीवनात मला उपयोगी ठरले आहेत. वाकोदसारख्या अत्यंत छोट्या खेडे गावात जन्म झालेल्या माझ्यासारख्याने खूप मोठं व्हावं अशी आई-वडिलांची केवळ इच्छाच नव्हती, तर त्यांनी वेळोवेळी मला त्यासाठी उत्तेजनही दिलं. हाच अनुभव माझ्या काकांचाही होता. १९५६


''मी ठरवून मोठे उद्योग केलेले नाहीत. मी बहुतांशी वर्तमान काळातच जगलो, जगतो. कारण भूतकाळात डोकावलं तर मागच्या आठवणींनी मन कटू बनतं, आणि भविष्याची काळजी केली तर उगाचच आयुष्यभर काळजीतच जगावं लागतं व उद्याच्या चिंतेत आज वाया जातो. भविष्याचा मी विचार करीत असलो तरी सतत वास्तववादी वर्तमानात जगतो.''




पदवीच शिक्षण - सिडनहॅम महाविद्यालय, (१९५६)

च्या सुमारास मुंबईरूपी विस्तीर्ण सागरात मी उच्च शिक्षणासाठी प्रवेश केला. सिडनहॅम कॉलेजला प्रवेशद्वारावरच 'पंचावन्न टक्क्यांपेक्षा कमी मार्क असणारांनी प्रवेशासाठी अर्जच करू नये', अशी सूचना लिहिली होती. पण मला प्रवेश मिळू शकला, कारण मला त्यापेक्षा जस्त मार्क होते. ही आठवण सांगायचं कारण इतकंच की, त्या वेळीही काही महाविद्यालयांमध्ये प्रवेश सोपा नव्हता. याच काळात माझ्यावर संस्कार करणाऱ्या व आयुष्यभर स्मरणात राहणाऱ्या काही गोष्टी घडल्या. एक घटना सांगतो. घटना तशी लहानच, पण खूपच परिणामकारक आहे.

काकांची (ज्यांना आता दलुभाऊ म्हणतात) परिस्थिती तशी जेमतेमच होती. मला कॉलेजला जाताना कपडे हवे म्हणून एका दुकानात कपडे खरेदीसाठी मी गेलो. एकंदर सर्व परिस्थितीचा विचार करून मी खाकी रंगाचं साधारण कापड निवडलं. काका प्रीमियर ऑटोमोबाईलमध्ये कामाला असल्याने त्यांच्यासारखेच कपडे मी निवडले. ते कपडे पाहताच काका म्हणाले, 'नाही, नाही. ते कापड तू घेऊ नकोस. उच्च दर्जाचं नायलॉनचं कापड घे. कारण आपल्या वर्तमान परिस्थितीपेक्षा उच्च अभिरूची व दर्जा आपण निवडला पाहिजे.' ही गोष्ट माझ्या मनावर परिणाम करून गेली. तो शर्ट घालून काढलेला फोटो मी आजतागायत जपून ठेवलेला आहे. या घटनेमुळे



नायलॉनच्या शर्टमध्ये भाऊ, (१९५७)

आयुष्यात सतत उच्च गोष्टींचा ध्यास करावा हे माझ्या मनावर कायमचं ठसलं व काकांची प्रतिमाही मनात कोरली गेली.


**गोरख-** तुमच्या यशात शिक्षणाचं स्थान काय?

**भाऊ-** शिक्षणाने मला प्रगल्भता दिली. सुरुवातीला मलाही सनदी नोकऱ्यांचं आकर्षण असल्यामुळे मी अगदी एम.पी.एस.सी. परीक्षेला बसलो, उत्तीर्णही झालो होतो, उपजिल्हाधिकारी म्हणून गॅझेटही झालं होतं. जीवनात पुढे काय करायचं हे मी ठरवलं नव्हतं. पण व्यापाऱ्याच्या पोटी जन्म झालेला असल्याने भोवतालच्या वडिलधाऱ्या मंडळींनी नोकरी करणं हे आपलं काम नाही, हे त्या वेळी पटवून सांगितलं. हे सांगण्यामध्ये त्या काळातील मोठे व्यापारी भिकमचंद जैन हे प्रमुख होते. भिकमचंद जैन म्हणजे जळगावचे विद्यमान आमदार सुरेशदादा जैन यांचे वडील. त्यांनी तर मला व्यवसायासाठी मदतही केली. सांगायचं तात्पर्य इतकंच की, भरपूर पगाराची नोकरी मिळूनही परंपरागत व्यावसायिक वृत्तीमुळे मला व्यवसायाकडे वळता आलं. अर्थात माझी शिकण्याची वृत्ती मात्र आजतगायत जागृत राहिली.

‘‘आपलं काम प्रामाणिकपणे केलं आणि डोळे उघडे ठेवले तर प्रचंड मोठं होता येतं हे सांगणाऱ्या शिक्षण पद्धतीची आता देशाला गरज आहे. आजची शिक्षण पद्धती ही केवळ बाबूगिरी करणारी पिढी निर्माण करीत आहे. सुदैवाने आपल्या देशात विविध क्षेत्रात त्यातही कृषी क्षेत्रात प्रचंड वाव आहे, पण हे काम निर्धाराने मनाचा दगड करणाऱ्यांसाठीच शक्य आहे. कारण कठोर परिश्रमानंतरच फळे मिळतात. झाड लावताच फळ येत नाही. तेवढं थांबायची तयारी असणाऱ्या युवकांना मात्र यात भरपूर वाव आहे.’’

**गोरख-** तुमचा व्यावसायिक प्रारंभ, अडीअडचणी, त्यातून काढलेला मार्ग याबद्दल काही आठवणी...

**भाऊ-** व्यवसाय सुरू करण्यापूर्वी एका गावी सहज उत्सुकतेपोटी ज्योतिषाला हात दाखविला. खरं तर भविष्यावर माझा विश्वास नव्हता. त्या वृद्ध गृहस्थांनी माझा हात पाहून सांगितलं, ‘‘माती, लोखंड, पेट्रोल यांच्याशी संबंधित व्यवसायाचा तू मोठा व्यापारी होशील.’’ मी त्यांना सांगितलं, ‘‘जगातील सर्वच गोष्टी यांच्याशी संबंधित आहेत. म्हणूनच कुठलाही व्यवसाय निवडला तरी तो या तिन्हींशी संबंधितच राहणार ते तुम्ही सांगायची काहीच गरज नाही.’’ या घटनेचा राग येऊन त्या ज्योतिषांनी माझ्याकडून फी घेतली नाही. मात्र हे भविष्य नंतर खरंही ठरलं.



'सूर्यमानव' : कचऱ्यापासून सूर्यापर्यंत धडक मारता येते - जैन हिल्स परिसरात दिमाखाने उभे शिल्प.
सोबत उभा आहे तशी स्वप्नं सातत्याने साकार करणारा माणूस - भवरलाल जैन गृहलक्ष्मी व नातूसह, (१९९५)

**गोरख-** त्या काळातील व्यवसाय सुरू करतांनाची परिस्थिती व आज व्यवसाय सुरू करणारांसाठी परिस्थिती यात फरक झाला आहे का?

**भाऊ-** कुठल्याही व्यवसायाला अथक परिश्रम लागतात. दृष्टी लागते. या गोष्टी पूर्वीही लागत होत्या, आजही लागतात, भविष्यातही लागतील. पूर्वी व्यवसायाला वित्तसंस्था किंवा सरकारी योजनांची मदत मिळवणं ही अवघड गोष्ट होती. आता आजूबाजूला व्यवसाय, नोकरीसाठी प्रचंड क्षेत्रं उपलब्ध आहेत. त्यासाठी न कंटाळता स्वत: योग्य क्षेत्र निवडावं.

**गोरख-** तुमच्या आजूबाजूची पार्श्वभूमी व्यापारी होती. त्यामुळे तुमच्या व्यावसायिकपणाला व्यवहाराची जोड होती असं म्हणता येईल. अशी पार्श्वभूमी नसलेल्या स्थानिक मराठी युवकाने व्यवसायाच्या यशासाठी काय करावं?

**भाऊ-** मी काय स्थानिक मराठी माणूस नाही काय? अहो, माझा जन्म महाराष्ट्रातच झाला. इथल्याच मातीत मी अनेक प्रयोग केले आणि मला तुम्ही परका मानता? मराठी माणसासाठी तुमची व्याख्या काय? मी मराठी माणूस नाही का?

**गोरख-** तसं नाही - पण मारवाडी, गुजराथी माणसं व्यवसायात यशस्वी ठरतात आणि महाराष्ट्रीय माणूस अपयशी ठरतो, अशी परिस्थिती नाही का?

**भाऊ-** याचं कारण वेगळं आहे. पण मराठी माणूस व्यवसायात अपयशी ठरतो असं मला तरी वाटत नाही. हो, एक मात्र आहे. आपलं गाव, राज्य सोडून जे

लोक दुसरीकडे जातात, त्यांच्यात नैसर्गिकरीत्या कष्ट उपसण्याची प्रवृत्ती अधिक असते. तुम्ही कुठलाही मारवाडी माणूस पहा, तो तुम्हाला अहोरात्र कष्ट करताना दिसतो. शिवाय तो इथल्या समाजजीवनाशी इतका एकरूप झालाय की, त्याच्याशिवाय समाज म्हणजे मिठाविना भोजन... आता तुम्ही म्हणाल की, मारवाडी माणूस नोकरीमध्ये कधीच जात नाही, असं का? तर त्यालाही एक पार्श्वभूमी आहे, काही कारणं आहेत.

ब्राह्मण समाजाने इतिहासकालापासून आपली जडणघडण नोकरीच्या अनुषंगाने केली आहे. नोकरीत सुरक्षितता अधिक असते. या समाजात मोठं यश प्राप्त करणे म्हणजे काय, तर क्लार्कऐवजी आय.ए.एस. होणे, म्हणजे परत आली नोकरीच! पण उच्च दर्जाची ब्राह्मण कुटुंबंही आपल्या मुलांना लहानपणापासून नोकरीच्या दृष्टीनेच घडवतात. तर मराठा समाज शेतीव्यवसायात मोठ्या प्रमाणात पडल्यामुळे शेती, त्याला अनुषंगून व्यवसाय किंवा राजकारण, सहकारी संस्था हा त्यांचा स्थायीभाव झाला आहे. इतर समाज आता या वातावरणातून बाहेर पडत आहे. याच्यातून बाहेर पडून ज्यांनी ज्यांनी परंपरागत चौकटी मोडण्याचा प्रयत्न केला, ती माणसं यशस्वी ठरलेलीच आहेत. शंतनुराव किर्लोस्कर, आबासाहेब गरवारे ही त्याची उदाहरणे आहेत. तुलनेने मराठी माणसं बाहेर जाण्याचं प्रमाण कमी आहे. ही व अशी अनेक कारणं आहेत. माणसाची जडणघडण व्यापारी म्हणून होत नाही. या उलट मारवाडी माणूस शिकला तरी व्यवसायात उपयोग होईल म्हणून आपल्या मुलांना सदैव तेच धडे देत असतो.

**गोरख-** कृषीक्षेत्रात युवक-युवतींना आगामी काळात काय भवितव्य आहे?

**भाऊ-** भारत हा कृषिप्रधान देश आहे. सत्तर टक्के लोक शेतीशी संबंधित कामधंदा करतात. इतर देशांची परिस्थिती वेगळी आहे. आपल्याकडे वैविध्यपूर्ण हवामान, भरपूर सूर्यप्रकाश, मुबलक पाणी अशा प्रचंड सुविधा निसर्गाने निर्माण करून दिल्या आहेत आणि या व्यवसायाइतक्या संधी कुठल्याही क्षेत्रात नाहीत. पण कृषी व्यवसायात लगेच पैसा मिळेल अथवा कमी कष्टात पैसा मिळेल असं वाटणाऱ्यांनी येऊ नये. शासनानेही बेरोजगार तरूणांसाठी अनेक कृषीविषयक योजना आखल्या पाहिजेत. उद्योगपतींच्या मदतीने पडीक जमिनीवर शेतीशी संबंधित व्यवसायाला भरपूर सवलती दिल्या पाहिजेत. त्यामुळे बेकारी दूर व्हायला मदत होईल. दुर्दैवाने सध्याचे तरूण केवळ भौतिक गोष्टींचाच विचार करतात.

**गोरख-** व्यवसायात यशस्वी होण्यासाठी कोणत्या गोष्टी टाळाव्या?

**भाऊ-** मुख्य म्हणजे मी कोणत्याही व्यसनात गुरफटलो नाही. मला कोणत्याच प्रकारचं व्यसन नाही. मर्यादेचं कधी उल्लंघन केलं नाही - नेहमी दीर्घ, गंभीर विचार केला, कोणत्याही निर्णयामध्ये घाई केली नाही. झटपट पैसा मिळविण्याच्या नादी लागलो नाही. परिश्रमाची कास सोडली नाही.

**गोरख-** तुमच्या घरातील युवकांना सुख-सुविधा मिळाल्याने त्यांच्या कर्तृत्वाला अडथळा आला वा त्यांची कार्यक्षमता कमी झाली असं वाटतं का?

**भाऊ-** बिलकुल नाही! कारण घरात स्थावर इस्टेट नाही, त्यामुळे निवांतपणे बसता येणं अशक्य. उलट या वयातदेखील मी काम करतो हे पाहून माझ्या कामाचा भार हलका करण्यासाठी आमच्या तरूण पिढीने जास्त कष्ट, परिश्रम केले तरच माझं काम कमी होऊ शकतं - म्हणजे हा उद्योग उभा राहण्यासाठी जेवढे परिश्रम लागले त्यापेक्षा कितीतरी पटींनी अधिक परिश्रमाची कास चालू ठेवण्याची गरज आहे. हे सर्व युवा पिढीला करायचं आहे, त्यामुळे त्यांच्या कर्तबगारीत शिथिलता येईल असं वाटत नाही.

**गोरख-** व्यवसायातील स्पर्धकांवर कशी मात केली?

**भाऊ-** स्पर्धकांवर मात करण्याचा किंवा त्यांना संपवण्याचा विचार कधीच मनाला शिवला नाही. उलट त्यांच्याकडून काही शिकता आलं तर घ्यावं, हाच दृष्टिकोन ठेवला. शिवाय सतत वेगवेगळे प्रयोग करीत असल्याने आम्ही आमच्या व्यवसायात प्रथम क्रमांकावरच आहोत.

**गोरख-** एखाद्या गोष्टीची भीती तुम्हाला वाटते का? किंवा आयुष्यात अमुक एक गोष्ट घडू नये असं वाटतं का?

**भाऊ-** आज भारतीय संस्कृती झपाट्याने बदलते आहे. पाश्चात्यांचं अंधानुकरण वाढत आहे. जीवनातील नीतिमूल्यांचा ऱ्हास होत आहे. हे सर्व पाहिल्यावर मला वाटतं की, जगाच्या बरोबर धावण्यासाठी तुम्हाला बदल करायलाच हवा. परंतु तो आमुलाग्र बदल करू नका. पाश्चात्य संस्कृतीच्या आहारी जाऊ नका. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक करू नका. या अतिरेकापायी भारतीय संस्कृती लयाला जाईल अशी भीती वाटते. ती गोष्ट घडू नये.

**गोरख-** उद्योगपती झाला नसतात तर दुसरं कोणतं क्षेत्र निवडलं असतं?

**भाऊ-** मला वकील किंवा लेखक व्हायला आवडलं असतं.

**गोरख-** नव उद्योजकांसाठी काही सांगाल?

**भाऊ-** जीवनात काही न बदलता येणाऱ्या गोष्टी असतात. आपण आपले आई-वडील बदलू शकत नाही. आपण केवळ बदलू शकतो तो जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन. हा दृष्टिकोन साफ ठेवा. चांगल्या-वाईट यामधील फरक जाणण्याची ईश्वराने बुद्धी दिली आहे, तिचा वापर करा.

*सन्मार्गाने मोठं होण्यासाठी कठोर परिश्रम, प्रयत्न केल्यास यशाचं शिखर गाठणं मुळीच अशक्य नाही. जीवनातील मानसिक शांतता नष्ट होईल असं कोणतंही कृत्य घडणार नाही याची दक्षता घ्या!*


असा माझा अट्टाहास नाही. इतरांचा दृष्टिकोन अभ्यासून स्वत:त सुधारणा होऊ शकतात यावर माझा विश्वास आहे.



गिमी फरहाद

**गोरख-** आई-वडील काय करत होते?

**भाऊ-** आई अशिक्षित, घरकाम करत असे, वडील अल्पशिक्षित. ते कॉटन जिनिंग प्रेसिंग फॅक्टरीचे एजंट होते. नंतर त्यांनी शेती-व्यापार केला.



भाईसाहेब मल्हारा

**गोरख-** उद्योजकतेकडे कसे वळलात?

**भाऊ-** सुरेशदादांचे वडील व आईने दिलेल्या सल्ल्यामुळे.

**गोरख-** आपल्या मित्रमंडळीत कोणकोण आहेत?

**भाऊ-** माझे मित्र व मार्गदर्शक असलेले जैन इरिगेशनचे संचालक श्री. हांडासाहेब, शेख चाचा. जिवलग मित्र- कविवर्य ना. धों. महानोर, सुरेशदादा जैन, राजाभाई मयूर, डॉ. सुभाष चौधरी, सी. पी. मेहता, सुबीर बोस, भाईसाहेब मल्हारा, गिमी फरहाद, आनंद गुप्ते, संजीव शेळगीकर.



संजीव शेळगीकर

**गोरख-** यशाचे रहस्य

**भाऊ-** यश सविनय पचविण्याची क्षमता.

**गोरख-** कलेबद्दल आपला दृष्टिकोन?

**भाऊ-** कोणतीही चांगली कला येणाऱ्या माणसाला शक्य ती मदत करतो. ना. सी फडके व वि. स. खांडेकर यांच्यातील 'कलेसाठी कला' की 'जीवनासाठी कला' या वादात मी खूप गुरफटून गेलो होतो.

''हे परमेश्वरा, जी मी बदलू शकत नाही, ती परिस्थिती स्वीकारण्याचं धैर्य मला दे. जी मी बदलू शकतो, ती बदलण्यांच सामर्थ्य मला दे. या दोन्ही परिस्थितींमधला फरक जाणण्याचं तारतम्यही मला दे.''

**गोरख-** लहानपण कसं गेलं?

**भाऊ-** सर्वसाधारण परिस्थितीत. आई-वडिलांचा डोळा चुकवून नदीवर डोहावर खूप पोहलो. शेतीकामही केलं. अन हो, शाळाही शिकलो.

**गोरख-** शिक्षणाविषयी आपला दृष्टिकोन काय?

**भाऊ-** सध्याचं शिक्षण निराशाजनक आहे. जीवन आणि शिक्षणातील अंतर वाढत आहे. त्यातूनच अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत, होत आहेत.

**गोरख-** सौंदर्यविषयक कल्पना?

**भाऊ-** माणूस निव्वळ भाकरीवर जगतो हे अर्धसत्य आहे. जैन फाऊंडेशनने जळगावच्या सौंदर्यीकरणात सक्रिय भाग घेतला आहे.

**गोरख-** आध्यात्मिक दृष्टिकोन?

**भाऊ-** अंतिम आत्मसुखासाठी चिंतन, ध्यानधारणेला पर्याय नाही. जैन उद्योग समूहाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना डॉ. गुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ध्यानधारणेचं प्रशिक्षण देण्यात आलं आहे.

**गोरख-** मुलांवर ठरवून प्रेम केलंत? मुलांवर संस्कार केले?

**भाऊ-** कधीच नाही. प्रेम व्यक्त करण्याची गरज भासावी एवढं माझं प्रेम कामचलाऊ नाही. प्रेम व्यक्त करण्याच्या 'जगातील' कल्पना वरकरणी, कृत्रिम वाटतात. संस्कार ठरवून, जाणीवपूर्वक असे केले नाहीत. फक्त पारदर्शकपणे त्यांच्यासमोर जगत राहिलो.

**गोरख-** मुलांना किती वेळ दिलात?

**भाऊ-** जास्त वेळ देता आला नाही, मात्र दिला तो दर्जेदार पद्धतीने दिला. मी चांगला असेन तर त्यांच्या मनावरील माझं प्रतिबिंबही चांगलंच असेल. प्रत्यक्षात एक कृती करून बोलण्यात त्याविरूद्ध वागणे असे डबल जीवन जगणे तथाकथित

मोठ्या लोकांनाच जमतं. त्यामुळे त्यांची मुलं वाह्यात निघू शकतात. वाऱ्यावर वाहून जातात. माझ्या मुलांच्या संस्कारक्षम वयात त्यांच्यासमोर चांगलं घडत राहिलं.

**गोरख–** मुलांनी काय व्हावं असं वाटत होतं?

**भाऊ–** त्यांच्यावर कधीच दबाव टाकला नाही मी. माझा व्यवसाय आदर्श वाटला म्हणून अशोक, अनिल, अजित आणि अतुल शिक्षण पूर्ण झाल्यानंतर याच व्यवसायात आले आहेत.

**गोरख–** आपले जीवनविषयक तत्त्वज्ञान?

**भाऊ–** 'परिश्रम हेच आत्मिक समाधानाचं अधिष्ठान आहे.'

**आणि असा जातो त्यांचा दिवस...**

उद्योगपती भवरलाल जैन यांच्या जीवनात वेळेला सर्वाधिक महत्त्व आहे. किंबहुना त्यामुळेच त्यांच्या यशाचा मार्ग सुलभ झाला असे म्हणता येईल. आदरणीय भाऊंचा दिवस सुरू होतो तो सकाळी पाचला. झोपेतून उठून साडे पाचपर्यंत तयार होतात. त्यानंतर साडे सहापर्यंत वाचन व ऑफिस काम करतात. साडे सहा ते साडे सात असा तासभर ते मॉर्निंग वॉक घेतात. या वेळी त्यांचा नातू बरोबर असतो. साधारण पाच किलोमीटर पर्यंत ते चालतात. अर्थात हा वॉक जैन हिल्सूवर असतो. साडे सात ते पावणे आठपर्यंत ते काही ट्रंक कॉल करतात. साडे नऊपर्यंत ते लिंबुपाणी, आवळापाणी, नीमपत्ता रस, तुलसी काढा, दुधीचा रस, एक फळ, मोड आलेल्या धान्याचा रस आदि उपाहार घेतात.

यानंतर साडे नऊ ते साडे अकरा या काळात ते शेतीची पाहणी व भेटी-गाठी घेतात. साडे अकरा ते दीड या वेळात ते पाईप फॅक्टरीचे कामकाज पाहतात व अधिकाऱ्यांच्या बैठका घेतात. दीड ते अडीच या वेळात ते जेवण घेतात. जेवणाच्या वेळी चार/पाच अधिकारी व मुले सोबत असतात. जेवणात उकडलेल्या भाज्या, काकडी, गाजर, फळे व दही आदि आहार असतो.

अडीच ते साडे तीन या वेळात बाहेरगावाहून आलेल्या लोकांच्या भेटी-गाठी होतात. साडे तीन ते साडे चार ते आराम करतात. साडे चारला फॅक्टरीतील संबंधितांशी भेटी. साडे चार ते साडे पाच पत्रोत्तरे. साडे पाच ते साडे सात बैठका. त्यानंतर थोडा वेळ समाजकार्यासाठी. साधारणतः साडे आठपर्यंत भाऊ घरी परततात. त्या वेळी मित्र व कुटुंबातील व्यक्तींशी हितगूज आणि एकत्र भोजन घेतात. त्यानंतर दूध घेऊन साडे दहाच्या सुमारास ते झोपतात.

भाऊंचा हा दिनक्रम पाहिल्यानंतर एखादा माणूस यशस्वी होण्याचे कारण कशात आहे याची खात्री पटते. दोन बायपास सर्जरी होऊनही भाऊंच्या या दिनक्रमात व परिक्रमात बदल झाला नाही, हे विशेष.

## स्वकष्टानेही मोठं होता येतं

शैलेश वाडेकर - कॉलेज कट्टा, मे १९९५

क्षेत्र शिक्षणाचं असो, व्यापाराचं असो व उद्योगाचं. त्यामध्ये राष्ट्रप्रेमाची कास धरणं वैयक्तिक दृष्टया परवडणारं नसतं. तरीही अशाच वैचारिक बैठकीतून स्वतःबरोबर देशाची उन्नती साधणाऱ्या वेगळ्याच घाटाच्या माणसाची ही कथा.

मोठ्ठं होणं सोप्पं नाहीच महाराजा! मोठं, आणखी मोठं होत जायचं असेल, पैसा, कीर्ती मिळवत नैतिकपणे सर्वोच्च पदावर पोहोचायचं असेल तर लागते मेहनत, अपार कष्ट करायची भरपूर तयारी. पण एवढंच असूनही चालत नाही. त्यासाठी लागते, मनाची दुर्दम्य इच्छाशक्ती! श्रेष्ठत्वाचा निखळ ध्यास! सतत धडपडत राहायचा, न कंटाळण्याचा आत्मविश्वास! तेव्हाच राहते उभी शून्यातून स्वत:ला हवी असलेली सृष्टी. अशा स्वसृष्टीचे उद्गाते महाराष्ट्रात अगदी मोजके आहेत. त्यातलंच एक नाव आहे : उद्योगपती भवरलाल जैन!

सामान्य परिस्थितीवर मात करून अद्वितीय कामगिरी करणाऱ्या व्यक्ती पुढच्या पिढ्यांची प्रेरणास्थानं असतात. चांगल्या मार्गाने जगण्याचा प्रयत्न केला तर मोठं होणं शक्यच नाही, अशी एक समजूत एकंदरच महाराष्ट्रीय तरूणांमध्ये रूढ झालेली आहे.



श्रमातून आनंदी भाऊ

अशा परिस्थितीत जैन उद्योग समूहाने सचोटीने व्यवहार करून जळगाव शहराला देशातच नाही तर, जगात एक ओळख करून दिली. आजही जळगावला जाणाऱ्याला ‘काय जैनांकडे काय?’ हे विचारलं जातं. जैन उद्योग समूहाला अशी ख्याती मिळवून देणाऱ्या भवरलाल जैन यांच्या यशाची कारणं, त्यांची मतं

आणि मार्गदर्शन, नोकरी-व्यवसाय निवडताना द्विधा मनःस्थितीत असणाऱ्या युवकांना दिशा निवडीसाठी निश्चितच मार्गदर्शक ठरतील.

**शैलेश-** 'भूमिपुत्रांना आवाहन' या जाहिरातीमागे काय उद्देश होता?

**भाऊ-** सर्व क्षेत्रातील कर्तबगार व्यक्ती मित्र व्हाव्यात आणि त्यांनी जळगावला जगाच्या नकाशावर नेऊन सन्मानाचं स्थान मिळवून देण्यात मदत करावी असं मला सतत वाटतं. कुठलंही शहर, गाव, त्या गावातली माणसं, संस्कृती, विकास व वैशिष्ट्यांमुळे प्रसिद्ध असते. जैन पाईपमुळे जगाच्या औद्योगिक नकाशावर जळगावचं नाव आलं. पण लेखक, कवी, गायक, शास्त्रज्ञ किंवा उत्तम खेळाडू या सर्वांना मी जाहीर आवाहन करतो, 'तुम्ही जळगावला या. तुम्हाला लागणाऱ्या सर्व सुविधा आम्ही देऊ ! यात आमचा स्वार्थ आहे. तुमच्यामुळे जळगावचं नाव सर्व क्षेत्रात आघाडीवर येईल आणि विविध क्षेत्रात तुमच्यासारख्या थोर माणसांमुळे जळगावलाही सन्मान मिळेल.'

ही कल्पना माझ्या मनावर अखंडपणे परिणाम करणाऱ्या 'ने मजसी ने परत मातृभूमिला, सागरा प्राण तळमळला' या वीर सावरकरांच्या कवितेतून आली.

पण ''लेखक, कवी, उत्तम डॉक्टर, गायक, क्रीडापटू, इंजिनियर किंवा आपापल्या क्षेत्रात कर्तबगारी गाजविणाऱ्या, पण पूर्वी संधी नाही म्हणून खानदेश सोडलेल्या विविध क्षेत्रातील लोकांनी जळगावला परत यावं आणि त्यांच्यामुळे प्रत्येक क्षेत्रात देशात जळगावला सन्मानाचं स्थान मिळावं,'' हा जाहिराती मागचा हेतू होता. अशा लोकांचा सहवास आम्हालाही काही आनंदाचे क्षण देऊ शकेल आणि आम्हाला नवं काही शिकवू शकेल, हा स्वार्थही होता.

आनंदाची गोष्ट म्हणजे या जाहिरातीचा योग्य असा परिणाम झालाच. आणि आम्हाला प्रतिसादही चांगला मिळाला.

''तरुणांनो, उद्योगधंद्यात या, असं आवाहन केलं जातं, तेव्हा नोकर कसे मिळणार?'' असा प्रश्न एक जणाने विचारला. तेव्हा मी म्हणालो, 'काम काहीही करा, अगदी झाडू मारणं असो तरी तो इतका चांगला मारा की, त्या स्वच्छतेबद्दल देवानेही गौरवोद्गार काढले पाहिजेत. सर्वच जण उद्योग, व्यवसाय, धंदा करू शकत नाहीत. पण जे काम करायचं आहे त्याची शक्य तेवढी माहिती, भवितव्य जरूर पाहावं. प्रत्येक कृतीआधी विचार करूनच कृती करावी, म्हणजे चांगले जगता येईल.''


आनंद गुप्ते

**शैलेश-** तुमच्या जाहिरातींमधील कल्पकता किंवा आवाहनं समाजमनाला भिडतात. हे सारं कोण करतं?

**भाऊ-** यामधील मूळ कल्पना आमच्या असतात आणि मांडणी 'बीज' या जाहिरात संस्थेच्या आनंद गुप्ते यांची असते. एक उदाहरण सांगतो. 'खानदेशी एनआरआय युवकांनो, परत खानदेशात या' असं एक आवाहन आम्ही प्रसिद्ध केलं होतं. इंडियन एक्स्प्रेस या इंग्रजी वृत्तपत्रानेही अपवाद म्हणून ही मराठी जाहिरात पहिल्या पानावर देशभर प्रसिद्ध केली होती. त्या मागचं कारण होतं की, जैन उद्योग समूहामुळे जगाच्या औद्योगिक नकाशावर जळगावचं नाव दिमाखाने झळकत आहे. या साऱ्या कल्पनांमागे ''पैसा तर कमवायचा, पण तो कमवताना सभोवतालच्या समाजाचं आपल्यावरील ऋणसुद्धा फेडायचं '' ही भावना असल्याने आमच्या जाहिराती जेवढ्या कल्पक होतात, तेवढ्याच त्या वास्तवही असतात.

**शैलेश-** उद्योगधंद्याकडे आजचा तरुण जायला फारसा उत्सुक नसतो याचं कारण काय?

**भाऊ-** आपण प्रामाणिकपणे मोठे होऊ शकत नाही, ही भावना युवकांच्या मनात रुजायलाही सध्याची सामाजिक व्यवस्थाच कारणीभूत आहे. कायद्याच्या कचाट्यात सापडलो की, आपलं काही खरं नाही, ही भावनासुद्धा रुजल्यामुळेच तरूण उद्योगधंद्याकडे वळण्याऐवजी नोकरी करून साचेबंद जीवन जगण्याचं मान्य करतात. त्याचबरोबर आपण हायफाय संस्कृतीशी जुळवून घेतलं तरच सन्मान मिळतो, ही भावनासुद्धा युवकांनी मनातून काढून टाकायला हवी. नवीन क्षेत्रं काबीज केलीच पाहिजेत, पण त्यासाठी वाईट तडजोडींची गरज नाही हे मी अनुभवाने सांगतो. म्हणूनच ही परिस्थिती बदलायला हवी.

**शैलेश-** गॅट करारामुळे तरूणांच्या व्यवसाय-नोकरीच्या निवडीवर काय परिणाम होईल?

**भाऊ-** गॅट कराराबद्दल कुणी काहीही म्हणो अथवा आंदोलनं करो, पण कष्ट करणाऱ्या भारतीयांना गॅट करार ही एक संधी आहे. परदेशी बाजारपेठा काबीज करून आपण इतरांवर मात केली आणि विविध व्यवसाय जगभर पोहोचवले अशी

ज्यांची महत्त्वाकांक्षा असेल त्यांच्यासाठी ही सुवर्ण संधी आहे. अन्यथा बाबुगिरी (नोकरी) करत जगणाऱ्यांसाठी मात्र ती एक मोठी समस्या असू शकेल.

पुस्तकांना माझ्या जीवनात सर्वाधिक प्रभावी स्थान आहे. त्यामुळे मला आनंद आणि समाधान मिळतं.

**शैलेश–** या परिस्थितीत बदल होण्यासाठी काय करावं?

**भाऊ–** या देशातून इंग्रज गेले तरी त्यांनी आखलेली शिक्षणपद्धती तशीच चालू आहे. सध्याची विद्यापीठं म्हणजे नुसतेच पदव्यांचे कारखाने झाले आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष कृतीवर आधारित भविष्याशी निगडीत शिक्षण देणारीच शिक्षण पद्धती हवी. यात विद्यार्थ्यांच्या व्यक्तीत्वाचा सर्वांगाने विकास व्हायला हवा. त्यांचं निरीक्षण अत्यंत सूक्ष्म असायला हवं व प्रयोगशीलतेला महत्त्व हवं.

**शैलेश–** भारतीय शिक्षण पद्धतीविषयी आपल्याला काय वाटते?

**भाऊ–** या देशात शिक्षण घेऊन डॉक्टर, इंजिनिअर होऊन परदेशात जाणाऱ्यांचा मला अत्यंत राग आहे. ५०० शेतकऱ्यांच्या मुलांचे शिक्षणाचे पैसे शासन एका डॉक्टरवर खर्च करते आणि हेच डॉक्टर मात्र केवळ पैशासाठी परदेशात जातात. ते देशद्रोही आहेत, असं माझं स्पष्ट मत आहे. देशाहून लांब असतांना 'ने मजसी ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला' म्हणणारे सावरकर कुठं आणि गरिबांच्या पैशावर डॉक्टर होऊन देश सोडणारे कुठं? म्हणून माझ्या मनावरील सावरकरांच्या या ओळींचा परिणाम मला सतत या मातीत काहीतरी नवीन करून देशसेवा करायची प्रेरणा देतो.



स्वातंत्र्यवीर सावरकर

**शैलेश–** तुमच्या यशाचे रहस्य काय? तुम्ही मिळवलेलं यश टिकवण्यासाठी तुमच्या पुढच्या पिढ्यांना काय करावे लागेल?

**भाऊ–** मी एक व्यापारी आहे. पैसे कमावणं हा माझा व्यवसाय आहे. माझ्या व्यवसायाची उलाढाल कितीही मोठी असली तरी मी काही अवकाशमानव नाही. मीही माणूसच आहे. माझ्यातही काही दोष असतील. पण डोळे उघडे ठेवून नव्याचा



प्रथम पिढीच्या उद्योजकासोबत नवीन पिढीतील उद्योजक A-1, A-2, A-3, A-4, (१९९४)

सतत अभ्यास करून या मातीशी इमान असणारा व्यवसाय कष्टाने केला, म्हणून मला आजचा दिवस पाहता आला. जीवनात व्यसन, मग ते कोठल्याही प्रकारचं असो, जगण्याचा आनंद नष्ट करतं. यशाची महत्त्वाकांक्षा हवी, पण व्यसन नको. कुठलीही अतिरेकी गोष्ट मी टाळली. दारूच काय, चहा- कॉफीसुद्धा मी घेत नाही. म्हणूनच ही यशाची वाटचाल सामर्थ्याने पार करू शकलो. आणि भविष्यातही माझ्या मुलांना कष्टच करावे लागतील, अन्यथा हा व्यवसाय टिकणार नाही, असा हा व्यवसाय आहे.

**शैलेश-** जैन समूह सामाजिक बांधीलकी कशा प्रकारे सांभाळतो?

**भाऊ-** जैन उद्योग समूहाने व्यवसाय हा सामाजिक जाणिवेतूनच केला आहे. आम्ही ''शिक्षण, आरोग्य, संस्कृती व पर्यावरण हे समाजाचे चार मुख्य स्तंभ आहेत'' हे जाणलं. त्यामुळे दुर्लक्षिलेल्या खेड्यापाड्यातील समाजाच्या उन्नतीसाठी 'जैन फाऊंडेशन' ही संस्था १९८२ साली सुरू केली. अर्थातच या संस्थेतर्फे ग्रामीण भागातील लोकांना या स्तंभांविषयी व भारतीय संस्कृतीबद्दल माहिती देत विविध सोयीसुविधा निर्माण केल्या आहेत. शाळा, महाविद्यालय, समाज मंदिर, दवाखाना, व्यायाम शाळा, सांस्कृतिक कार्यक्रम, संगीत समारंभ अशा विविध प्रायोजनातून या संस्थेने आपलं कार्य विस्तारित केलं आहे.

खेळ व आरोग्यासाठी अद्यावत साधन-सामग्री असलेला जिमखाना सुरू केला. तसेच त्यासंबंधात योग्य शिक्षण देणारे कोच ठेवले व त्या संदर्भातील इतर कोर्सही सुरू केले. त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी अधूनमधून सतत विविध स्पर्धा आयोजित करण्यात येतात. यात खो-खो, व्हॉलिबॉल, टेबल टेनिस, बॅडमिंटन, स्वीमिंग, क्रिकेट, ट्रेकिंग इ. विविध स्पर्धा घेण्यात येतात. तसेच ही संस्था खेळाडूंना दत्तक घेऊन त्यांच्यासाठी सर्व सोयीसुविधा, कोच उपलब्ध करते. आणि त्यातून कुशल खेळाडू घडविण्याचा प्रयत्न करते.

**शैलेश–** जैन समूहाच्या विशेष नोंदण्यासारख्या घटना कोणत्या?


**भाऊ–** पपईच्या चिकापासून पावडर तयार करणं हा आमचा उद्योग जगात सध्या उत्पादन गुणवत्तेत पहिल्या आणि उत्पादनात दुसऱ्या क्रमांकाचा आहे. या पावडरला पपेन म्हणतात. या विभागाला आय.एस.ओ. ९००१ हे सर्टिफिकेट मिळालं आहे.

जैन उद्योग समूहाचा पीव्हीसी पाईप विभाग हा भारतातील या क्षेत्रातला सर्वात मोठा उत्पादन विभाग आहे. विशेष म्हणजे या विभागात खूप विशाल रेंजमध्ये पाईप्स बनविले जातात.

जगातील पहिल्या १० ठिबक सिंचन संच उत्पादकांमध्ये जैन इरिगेशन कंपनीचा नंबर लागतो. या विभागाने आतापर्यंत जवळजवळ २ लाख लहान शेतकऱ्यांना ठिबक सिंचन संच बसवून देऊन वेगवेगळ्या पिकांद्वारे अधिक उत्पादन काढण्यास हातभार लावला आहे. शिवाय अधिक जमीन लागवडीखाली आणली आहे.



ब्रायन गिल, बर्मिंगहॅम यांना पपेन फॅक्टरी दाखवितांना वसंत वोरा, (१९८०)



२००० फूट खोल कूपनलिकेस जैन केसिंग पाईप बसवायच्या कामाठिकाणी अजित जैन (१९९४).

जैन उद्योग समूहाच्या विविध उत्पादनांना युरोप, नेपाळ, आबुधाबी इत्यादी अनेक ठिकाणी मागणी आहे. जैन इरिगेशन ही प्लास्टिक शीट्स् बनविणारी आशिया खंडातील सर्वात मोठी कंपनी आहे.

जैन उद्योग समूहातील कामगारांच्या ज्ञान संवर्धनासाठी वेळोवेळी परिसंवाद, प्रशिक्षण वर्ग, सेमिनार इत्यादी घेण्यात येतात. कामगारांना कामाच्या वेळात चहा दिला जात नाही, तर दूध आणि केळी पुरविली जातात. मुळात जैन कुटुंबातील एक-दोन व्यक्ती सोडता कोणीही चहा पीत नाही.

सर्वात महत्त्वाची घटना म्हणजे जैन उद्योग समूहाच्या जागतिक गुणवत्तापूर्ण निर्यात मालामुळे जळगावचं नाव जगाच्या औद्योगिक नकाशावर कोरलं गेलं आहे.


**शैलेश-** मध्यंतरीच्या 'वासनाकाण्ड' प्रकारामुळे सर्व क्षेत्रातील जळगावच्या प्रतिष्ठेवर काही परिणाम झाला असं वाटतं का?

**भाऊ-** आम्ही कष्टाने उभ्या केलेल्या जळगावच्या प्रतिमेला खराब करण्याचा तो कुटिल व राजकीय डाव होता. हा डाव यशस्वी होणार नाही आणि जळगावच्या प्रतिमेवर लागलेला तात्कालिक डाग पुसला जाऊन पूर्वीपेक्षा अधिक तेजाने जळगाव पुन्हा दिमाखाने तळपत राहील.

### जीवन म्हणजे रणभूमी नव्हेच

विवाह ही प्रत्येक माणसाच्या आयुष्यातली महत्त्वाची घटना. भवरलाल जैन यांच्याशी बोलता बोलता विषय त्यांच्या विवाहाकडे वळला, तेव्हा त्यांनी सांगितलेला किस्साः

बऱ्याचदा आपल्या आयुष्यात निवडलेला साथीदार हा आपल्या भविष्यावर परिणाम करीत असतो. विवाह ही जीवनातील अत्यंत महत्त्वाची घटना असते. त्या काळच्या माझ्या आठवणी आजही ताज्या आहेत. एकदा विवाह करायचं निश्चित झाल्यावर वधुसंशोधन सुरू झालं. त्यानुसार नाशिकमधील एका नामांकित वकिलाची मुलगी मी आणि माझा मित्र पंढरीनाथ सावे असं दोघं मिळून पाहायला गेलो.



भवरलाल जैन आणि मित्र पंढरीनाथ सावे, (१९६१)

मुलगी सुंदर, सुसंस्कृत, शिकलेली होती. त्यांच्या घरची आर्थिक परिस्थिती चांगली होती. आयुष्यभर बरोबर राहणारी गोष्ट 'मुलगी' असते म्हणून आर्थिक बाबींबद्दल अर्थातच मला काही देणं घेणं नव्हतं. त्यामुळे मुलगी पाहून लग्न ठरवावं असा विचार करून आम्ही गेलो व तिला काही प्रश्न विचारले. मुलगी हुशार होती. तिने माझ्या प्रत्येक प्रश्नाचं उत्तर प्रतिप्रश्नानेच दिले.

हा सगळा प्रकार संपल्यावर बाहेर आल्यानंतर माझा मित्र म्हणाला, 'भवरलाल, जीवन म्हणजे रणभूमी नाही. जी मुलगी आताच तुला इतके प्रश्न विचारते ती पुढं काय करेल हे सांगता येत नाही. बायको संयमी हवी. अन्यथा तुझं आयुष्य म्हणजे रणभूमीच होईल. किमानपक्षी रंगभूमी तर नक्कीच होईल; प्रश्नोत्तराचं नाटक होईल.' विचारांती मी तो विषय सोडून दिला.

नंतरची मुलगी (म्हणजे वर्तमान पत्नी) पाहायला आम्ही कर्नाटकातील विजापूरला गेलो. मुलगी चांगली, शिक्षणही बी.ए., एकंदर पार्श्वभूमी पाहता मुलगी मला आवडली. पण नंतर प्रश्न होता हुंड्याचा. आमच्या व्यापारी मारवाडी समाजात हुंड्याला तसं भरपूर महत्त्व. आईलाही त्यांच्याकडून हुंडा मिळावा

अशी अपेक्षा होती. त्या वेळचा प्रसंग आजही माझ्या डोळ्यांसमोर जसाच्या तसा चित्रित आहे.

वाकोद गावात आमचं जुनं घर होतं. मातीच्या तशा घरांमध्ये चौक असायचे, तसे आमच्याही घरात होता. त्या चौकात माझी आई भांडी घासत होती. त्या वेळी मी समोर जिना-वजा-ओट्यावर येऊन बसलो आणि विजापूरच्या संबंधाविषयी काय करायचं हे बोलू लागलो. आई म्हणाली, ''भवरू, तू दिसायला इतका चांगला आहेस. शिवाय तुझ्यावर, तुझ्या शिक्षणावर काही खर्चही झाला आहे. तेव्हा हुंडा घ्यायला काय हरकत आहे?''

त्या वेळच्या प्रथा तशा असल्याने सर्वत्र तसा प्रघातच होता. मी आईला समजावून सांगितलं, ''आई, मुलगीही शिकलेली आहे, सुंदर आहे, सुसंस्कृत आहे. तिच्यावरही तिच्या कुटुंबीयांनी भरपूर खर्च केला आहे . अशी व्यक्ती आपल्या घरात आल्यावर आपलीच होणार. म्हणजे उलट आपण त्यांना हुंडा द्यायला हवा.''

त्या धीरगंभीर वातावरणात आईने भांडी घासता घासता मान वर करून क्षणभर माझ्याकडे पाहिलं. तिची ती विचारी नजर मला अजून आठवते. थोड्या चर्चेनंतर तिला माझा मुद्दा मात्र पटला. आईने हुंडा न घ्यायला होकार दिला आणि लग्न बिनहुंड्याचं झालं.



काही अविस्मरणीय क्षण बाईंसोबत भाऊंचे, (१९९५)

नंतरच्या काही आठवणींनी आज हसू येतं. बायको पदवीधर आहे की नाही हे सहज गंमत म्हणून पडताळण्यासाठी लग्नानंतर तब्बल १२ वर्षांनी मी एस. एन. डी.टी. कॉलेजकडून पदवीचं प्रमाणपत्र मागितलं आणि ती पदवीधर आहे याची तेव्हा खात्री करून घेतली.

माझी पत्नी संयम, निष्ठा, प्रेम यांचं मूर्तिमंत प्रतीक असल्याने माझं जीवन रणभूमी किंवा रंगभूमी न होता 'मंदिर' झालं आहे.

## तंत्रज्ञानानेच भारतात दुसरी हरितक्रांती होणार

सुशील नवाल, धों. ज. गुरव - दै. देशदूत, मार्च १९९९

व्यवसाय माणसाला अस्तित्वाचं गणित शिकवतो. त्यातली सिद्ध प्रमेयं वापरून शेतीसारख्या क्लिष्ट तरीही बहुसंख्य जनतेच्या पोटापाण्याचा प्रश्न नव्या तंत्रमंत्रांनी सोडवायला दूरदृष्टी हवीच. अशी तळमळ दिसते या विचारांच्या गाभ्यात.

''१९६० ते १९७० दरम्यान भारतात पहिली हरितक्रांती झाली. यामुळे शेती उत्पादनातील वाढीबरोबरच इतर गंभीर समस्याही निर्माण झाल्या, त्याचा परिणाम शेतीला प्रतिष्ठा राहिलेली नाही. नवीन पिढीला शेती करण्यात रस दिसत नाही. टाकाऊ माणसांनीच शेती करायची, असं चित्र आज निर्माण झालेलं आहे. वाढत्या लोकसंख्येबरोबर धान्यांचं, फळफळावळींचं उत्पादन वाढलं पाहिजे तसं ते वाढत आहे, असं निदर्शनास येत नाही. पारंपरिक पद्धतीने



भाऊंची मुलाखत घेताना सुशील नवाल आणि धोंडिबा गुरव



तंत्राचे बारकावे उलगडताना भाऊंची भावमुद्रा

करावयाच्या शेतीसाठी आता नव्या तांत्रिक पद्धती शोधणे आवश्यक असून या तंत्रज्ञानानेच दुसऱ्या हरित क्रांतीची नांदी होणार आहे. ही क्रांती भारताला आणि भारतीय शेतकऱ्यांना वरदान ठरेल,'' असे प्रतिपादन सुप्रसिद्ध उद्योगपती जैन उद्योग समूहाचे अध्यक्ष श्री भवरलालजी जैन यांनी देशदूतला दिलेल्या खास मुलाखतीने व्यक्त केले.

पहिल्या हरितक्रांतीच्या दुष्परिणामाविषयी आपले अभ्यासपूर्ण विवेचन करताना श्री. भवरलालजी पुढे म्हणाले, ''रासायनिक खते, हायब्रिड बी-बियाणे आणि पाटाचं अमर्याद पाणी या माध्यमातून शेतीचे उत्पादन वाढले. परंतु अमर्याद पाणी वापरांमुळे जमिनीतील क्षार वर आले. दरवर्षी ऊस, केळी असल्या प्रकारची पीकं घेतल्यामुळे जमिनीचा कस घटत राहिला. बऱ्याच ठिकाणी जमिनी ओसाड पडल्या, वांझ झाल्या. त्या जमिनीत आता गवतही उगवत नाही. या सर्वांचा परिणाम म्हणून शेतीचे उत्पादन आणि उत्पन्न घटले. गेल्या आठ वर्षांपासून आपल्या भारतात शेतीचं उत्पादन आहे तेवढेच आहे, ते गोठले आहे.

शेतीसाठी पाण्याची मात्रा वाढवावी लागली, खताची मात्रा जादा द्यावी लागली. खर्चाचे प्रमाण वाढले आणि उत्पादन मात्र कमी होऊ लागले.

शेतकऱ्याचे कर्ज वाढले. तो कर्जात बुडाला. कर्जातच राहिला. या विचित्र विरोधाभासामुळे शेतकरी शेतीपासून तुटला, दूर गेला. आज जगात सिंचनाखाली शेती असणारा भारत दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. पाण्याखालची जमीन वाढली, तरीसुद्धा उत्पादन हव्या त्या प्रमाणात वाढत नाही.

शेतीसाठी अथवा शेतकऱ्यांना कर्ज देण्यासाठी शासनाच्या योजना अस्तित्वात आहेत. परंतु अशा वित्त संस्था तग धरू शकत नाहीत. त्या संस्थाही कर्जबाजारी झालेल्या आहेत. योजना चांगल्या असल्या तरी त्यांची अंमलबजावणी होत नाही. विजेचा वापर योग्य होत नाही. पाटबंधाऱ्यांचा योग्य उपयोग होत नाही. त्यामुळे जमिनीचा पोत बिघडला,'' असे सांगून भवरलालजी पुढे म्हणाले, ''भारतीय शेती निसर्गावर अवलंबून आहे. जमीन चांगली असली तर त्या जमिनीला पाणी मिळत नाही. पाणी असले तर वीज नसते. पाणी, वीज आणि जमीन असली तेव्हा करणारा शेतकरी आज हतबल झालेला आहे किंवा शेतीपासून दूर जाऊन तो पुढारी बनलेला आहे. त्यामुळे शेतीला एके काळी असलेला मानाचा दर्जा आज राहिलेला नाही.''

**सुशील–** शेतीची प्रतिष्ठा कमी झालेली आहे म्हणजे काय?

**भाऊ–** ''उत्तम शेती, दुय्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी'' ही म्हण अथवा वाक्प्रचार आज वस्तुस्थितीला धरून राहिलेला नाही. कारण शेती करण्याऐवजी शेतकरी पुढारीपणाकडे वळला. शेतकरी पुढारी अथवा कोणत्या ना कोणत्या पक्षाचा कार्यकर्ता बनल्याने शेतीचं फार मोठं नुकसान झालेलं आहे.

**सुशील–** दुसरी हरितक्रांती कशी होईल आणि किती कालावधीत अपेक्षित आहे?

**भाऊ–** *दुसऱ्या हरितक्रांतीची नांदी 'तंत्रज्ञान' असेल. केवळ भरपूर रासायनिक खते, भरपूर पाणी, भरपूर मेहनत करून आता चालणार नाही. त्याकरिता तांत्रिक व बौद्धिक क्षमतेचा वापर आवश्यक आहे. ८ ते १० वर्षात ही क्रांती होईल.*

**सुशील–** बौद्धिकतेचा वापर म्हणजे नेमके काय? विस्ताराने सांगाल काय?

**भाऊ–** आता शेतीसाठी नुसतं रासायनिक खतं व संकरित बी-बियाणे वापरून चालणार नाही, तर वेगवेगळ्या बियाण्यांचे सुपेरियर सिड किंवा प्लान्टिंग मटेरियल


वापरावे लागेल.  मोठ्या भांडवली गुंतवणुकीशिवाय हे शक्यच नाही. गुंतवणूक करून बौद्धिक तंत्रज्ञान अंमलात आणावं लागणार आहे. पारंपरिक पद्धतीच्या शेतीमध्ये जो माणूस काम करत होता तो आता चालणार नाही. आता प्रशिक्षित, कुशल माणसांची गरज आहे. रासायनिक खते वापरून चालणार नाही, तर आता नैसर्गिक खते वापरावी लागतील. कंपोस्ट खत तयार करायला ४-६ महिने लागतात. पण असले नैसर्गिक खत ४५-६० दिवसात तयार करावे लागेल. त्यासाठी अशा प्रकारच्या नैसर्गिक खताचे कारखानेच उभारावे लागतील, जेणेकरून त्या खतांच्या उपयोगाने जमिनीचा कस वाढेल.

जमिनीचा पोत सुधारण्यासाठी पाण्याचा नियोजित, नियंत्रित वापर करावा लागेल. जैविक शेती करावी लागेल. युरियाशिवाय गहू निर्माण केला पाहिजे. रासायनिक कृत्रिम औषधींचा किंवा कीटकनाशकांचा वापर न करता निंब, कांदा, लसूण, सीताफळाच्या बिया यांच्यापासून तयार होणारी जैविक औषधे वापरावी लागतील.  त्यातून उत्पादन तर वाढेलच, त्याबरोबरच पर्यावरण व आरोग्य चांगले राखले जाईल. येत्या काळात बायोटेक्नॉलॉजीचा वापर करणे गरजेचे आहे. लॅबोरेटरीमध्ये बसून हे सर्व करता येते. हरितगृहे म्हणजे अशा शेती उत्पादनाच्या लहान लहान प्रयोगशाळाच आहेत.

**गुरव-** उपलब्ध पाण्याचे नियोजन करण्यासाठी तंत्रज्ञानाची गरज आहे का?

**भाऊ-** पाण्याचे नियोजन करून पाण्याचा नियंत्रित उपयोग करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी ठिबक सिंचन, स्प्रिंकलर आदिंचा उपयोग करावा लागणार आहे. त्याशिवाय आता पर्यायच उरला नाही. हे करायचे म्हणजे तंत्रज्ञान आलेच. त्यासाठी अभ्यास करण्याची गरज आहे. मातीचे परीक्षण करणे, पाण्याचे परीक्षण करणे, शेताचा आराखडा तयार करून झाल्यावर क्रॉप पॅटर्न ठरवणे, पाण्याचे वेळापत्रक ठरवणे या गोष्टी तंत्रज्ञानानेच शक्य आहेत.

पूर्वी नद्यांचे पाणी अडवलं की, ते पाणी पाटाद्वारे मोठ्या प्रमाणात शेतीला दिले जात असे. त्याकरिता डोक्याची विशेष गरज नव्हती. पण हे सर्व नवीन तंत्रज्ञान उपयोगात आणायचे म्हटले आणि  त्यांना तदंगभूत सेवा द्यायच्या असतील आणि त्यांचे नियोजन करायचे तर त्यासाठी शिक्षण आणि प्रशिक्षण या दोन्हीची सोय करावी लागेल. शेतकऱ्यांना शिक्षण देऊन प्रशिक्षित करावे लागणार आहे. शेत मजुरांना प्रशिक्षित करावे लागणार आहे.



तुषार सिंचन

**गुरव–** दुसरी हरितक्रांती झाल्यावर भारतापुढील समस्या मिटणार आहेत का?

**भाऊ–** *दुसऱ्या हरितक्रांतीनंतर उत्पादन वाढले तरी भारत निर्यात करेल, अशी परिस्थिती राहणार नाही. भारतातून आज जी थोडी बहुत निर्यात होते ती स्थिती पुढे राहणार नाही.* याचं प्रमुख कारण लोकसंख्या वाढीचे प्रमाण होय. त्याचबरोबर उपभोगक्षमताही वाढते आहे. लोकसंख्या वाढली, काही लोकांजवळ अमाप पैसा आला. खाण्यावर जास्तीचा खर्च वाढला आणि त्यातून बेपर्वाई वाढली. नासाडी व वाया जाण्याचे प्रमाण वाढले.

**गुरव–** खाण्यावर जास्तीचा खर्च वाढला म्हणजे नेमके काय?

**भाऊ–** पूर्वीची काटकसर आता राहिलेली नाही. पूर्वी जेवण वाया जाणार नाही, याची काळजी घेतली जायची. आता नासाडी व वाया जाण्याचे प्रमाण वाढले आहे. अलीकडे हॉटेलची संख्या भरमसाट वाढते आहे. हॉटेलं वाढली, घरं तुटली. म्हणजे घरी जेवण्यापेक्षा नवरा-बायको, घरी आलेले पाहुण्यांसोबत हॉटेलमध्ये जाऊन जेवण करणे पसंत करू लागले.

नुकताच मी दिल्लीला गेलो होतो. एका पंचतारांकित हॉटेलमध्ये थांबलो होतो. आमचं जेवण साधं असल्याने मी माझा मित्र एका मद्रासी हॉटेलमध्ये गेलो. थाळी मागवली. वेटरने थाळी आणली त्यामध्ये श्रीखंडाची वाटी होती. गोड खायचं नाही म्हणून ती वाटी बाजूला काढून ठेवली. नंतर भाताची मोठी वाटी होती. एवढा

भात खाणं शक्य नाही म्हणून दोन वाट्यांपैकी एक वाटी बाजूला काढली आणि एका वाटीतील भात आम्ही दोघांनी खाल्ला. त्यानंतर बाहेर काढून ठेवलेल्या भाताचं आणि श्रीखंडाचं वेटर काय करतोय म्हणून कुतुहलाने आम्ही त्या वेटरला विचारले, तर तो म्हणाला, ''आम्ही ते फेकून देतो.''

''ते अन्न चांगले असतांना का फेकतो?'' या प्रश्नावर तो म्हणाला, ''थाळी दिल्याबरोबर तुम्ही सांगितलं असतं की भात आणि श्रीखंडाची वाटी उचला तर त्याचा वापर केला असता. परंतु एकदा तुमच्यासमोर ताट दिल्यावर जे काही आपण खाल्ले नाही त्याला आम्ही फेकूनच देतो.'' तेव्हा अशा नासाडीमुळे आपण खाण्यावरील खर्चच वाढवतोय. त्यामुळे उत्पादन आणि गरज यात तफावतच राहणार आहे.

**गुरव–** उत्पादन वाढवण्यासाठी काय करावे लागेल?

**भाऊ–** वाया गेलेली पडीत जमीन वापरात आणली पाहिजे. आज आमच्या देशातील जवळपास सर्वच जमिनीची उत्पादकता उच्च स्तराची राहिलेली नाही. ती कसण्यायोग्य करायची असेल तर पुन्हा तंत्रज्ञान आले. तंत्रज्ञान आले म्हणजे गुंतवणुकीचा प्रश्न आला. जमीन कसण्यायोग्य करायची असेल तर हिरवी खते, गांडूळ खते किंवा जैविक खते यांचा वापर केला पाहिजे. प्रतिवर्षी एक ते दीड मीटर इतकी पाण्याची पातळी जमिनीत खोल चालली असल्यामुळे किमान रब्बी पिकाला पुरेल इतक्या पाण्याचे नियोजन आपल्याला करावे लागेल. 'पाणी अडवा



दुसऱ्या हरित क्रांतीचे प्रणेता भूमिपुत्र भाऊ

पाणी जिरवा' याचा प्रभावी कार्यक्रम आखावा लागेल. अशा प्रकारे नापिक, ओसाड आणि माळरान जमिनींचा कस वाढवून त्यात पिक घेण्याचा कार्यक्रम आपण करू शकलो तरच २१ व्या शतकाला आत्मविश्वासपूर्वक आपण सामोरे जाऊ शकू, अन्यथा ते शक्य होणार नाही.

**गुरव-** शेतकऱ्याच्या मालाला योग्य भाव मिळत नाही ही ओरड असते. त्यासाठी उपाय काय?

**भाऊ-** शेतकऱ्याला त्याच्या मालाची मुक्तपणे वाहतूक व विक्री करण्याची मुभा असली पाहिजे. जोपर्यंत त्याच्या कर्जातून तो बाहेर पडणार नाही, तोपर्यंत त्याला त्याच्या मालाचे भाव नियंत्रित करता येणार नाही. शासनाने त्याच्या मालाला किमान भाव बांधून द्यावेत. इतर वस्तुंप्रमाणे त्याच्या मालाचे भावही वाढवून दिले पाहिजेत. उद्योगपती आपल्या कारखान्यातून निर्माण करणाऱ्या मालाची किंमत स्वत: ठरवतो, तशा प्रकारे शेतकऱ्याला आपल्या मालाची किंमत स्वत:ला ठरवता आली पाहिजे. हे केव्हा होईल? त्यांचेजवळ पैसा (भांडवल) असेल तेव्हाच.

*शेतकऱ्याला देण्यात येणाऱ्या कर्जावर पाच  टक्क्यापेक्षा जास्त व्याज दर आकारू नये. असे करत असताना त्याला देण्यात येणारे इतर सर्व अनुदान बंद करावे लागले तरी चालेल.*

**गुरव-** शेतकरी असंघटित आहे. त्याचे संघटनेविषयी आपल्याला काय वाटते?

**भाऊ-** आपल्या देशात जेवढ्या संघटना आहेत, त्यात आपण मोठ्या प्रमाणात यशस्वी झालो आहोत असे नाही. महाराष्ट्र आणि गुजरात त्याला काही अंशी अपवाद आहे. भारतीय माणूस हा अत्यंत व्यक्तीपूजक व व्यक्तिगत विचार करणारा आहे. सामूहिकरित्या काम करण्याची त्याची प्रवृत्ती नाही.  त्यामुळे आपण कितीही प्रयत्न केला तर हे जमेल असं मला वाटत नाही. प्रयत्न करणं हे आपले काम आहे. संघटना असावी, माझा त्याला विरोध नाही. जवाहरलाल नेहरूंनी म्हटलं होतं, 'को-ऑपरेटिव्ह हॅज् फेल्ड बट् इट् मस्ट् सक्सीड्'. नेहरू हे तर आधुनिक भारताचे प्रणेते आहेत. त्या माणसाने त्या काळात हे भाकित वर्तवलं होतं, हे महत्त्वाचं आहे.

**सुशील-** दुसऱ्या हरितक्रांतीविषयी आपण आशादायी आहात का?


**भाऊ-** मी आशादायी आहे. कारण वाढत्या जनसंख्येच्या गरजेप्रमाणे अन्नाची पूर्तता करण्यासाठी आता त्याला पर्याय नाही. राजकारण्यांनी कितीही प्रयत्न केला, तरी त्यांना साथ मिळणार नाही. आता निसर्ग साथ देतोय म्हणून ठीक आहे.

*एका वर्षी निसर्गाने पाठ फिरवली, तर सर्व राजकारणी सैरावैरा पळत फिरतील आणि जनता दंडा घेऊन त्यांच्या पाठीमागे लागेल, अशी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे.* त्यामुळे राजकारण्यांना आता शेतीच्या संदर्भात धोरण बदलावेच लागणार आहे. या बदललेल्या धोरणामुळे दुसरी हरितक्रांती नक्कीच घडेल अशी आशा आहे.

आजपर्यंत त्यांनी *शेतीला दुय्यम स्थान दिले. त्यामुळे शेती दुर्लक्षित झाली. त्यात भांडवली गुंतवणूक कमी झाली. त्यामुळे शेतीचे उत्पन्न कमी झाले.* त्याचा परिणाम दरडोई उत्पन्न कमी होण्यावर झाला.

सध्या उद्योगधंद्यामध्ये जागतिक मंदी निर्माण झाली आहे. त्याला बऱ्याच अंशी तारण्याचं काम कोणी केलं असेल तर ते शेतीनं केलेलं आहे. त्यात थोडाफार आधार शेतमालाच्या निर्यातीनं दिला आहे.

*शेतमाल, खनिज संपत्ती आणि भारतीय माणसाचं डोकं यांच्या निर्यातीमुळे उद्योगधंद्यातील मंदीला आधार मिळतो आहे.*




## मंदी अपेक्षितच होती; पण ती कायम टिकणार नाही

चंद्रगुप्त अमृतकर - महाराष्ट्र टाईम्स, ऑगस्ट १९९९

भौतिक निर्मितीच्या चक्रव्यूहात गुरफटलेल्या उद्योजकांना भविष्याचा वेध घेणं जमत असलं तरी ते परखडपणे मांडणं ते टाळतात. त्यांना अपवाद असणाऱ्या भाऊंना द्रष्टा म्हणावं की स्रष्टा?

जळगावच्या जैन उद्योग समूहाचे अध्यक्ष भवरलाल जैन यांना 'पहिल्या पिढीतील उद्योजक' मानण्यात येते. १९६३ मध्ये त्यांनी रॉकेलची एजन्सी घेतली व तीन चाकी वाहनाचा वापर करून तो व्यवसाय चालवला. केवळ ७००० रूपये बीज-भांडवल घेऊन त्यांनी सुरू केलेला उद्योग आज ४०० कोटींची उलाढाल करू लागला आहे. ६२व्या वर्षीही ते उद्योग समूहाच्या कारभारात स्वतःला झोकून देतात. गेल्या काही दशकात त्यांना आणि त्यांच्या



गौरी बंगल्याच्यामागे राजस्थानच्या वाळवंटाचं प्रतीक: उंट व शेट-शेटाणी :
भावी पिढ्यांना आपल्या पाळंमुळांची सतत आठवण

समूहाला अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित केले गेले आहे. 'ग्लोबल फिचर्स'च्या चंद्रगुप्त अमृतकर यांनी या सतत कार्यमग्न असणाऱ्या धाडसी उद्योजकाशी सध्याच्या औद्योगिक स्थितीबाबत बातचीत केली. त्यांचे काही विचार थक्क करणारे आहेत, त्याचाच हा संक्षेप.

**चंद्रगुप्त–** आपल्या देशातील उद्योगाचा विकास कसा व्हावा, असे आपल्याला वाटते?

**भाऊ–** उद्योगांच्या विकासासाठी पायाभूत सोयी व पोषक वातावरण हे पद्धतशीरपणे उभे करायला हवे. त्यात एका मुद्यावर भर द्यायला हवा. उद्योग हे कोणत्याही एका ठिकाणी केंद्रित व्हावयास नकोत, मग ते शहर असेल वा औद्योगिक वसाहत. कोणत्याही औद्योगिक वसाहतीची वा शहराची लोकसंख्या पाच लाखांवर जायला नको, त्याचे भान ठेवायला हवे. वीस वर्षानंतर ती लोकसंख्या मर्यादा १० लाख ठेवावी.

लोकसंख्या ठरवलेल्या प्रमाणाबाहेर गेली की, माणसाला माणूस म्हणून किंमत राहत नाही. सामाजिक ऋण म्हणून काही असते याची मग जाणीवच राहत नाही. प्रत्येकजण वरचढ व्हायला बघतो आणि हे कुरघोडी युद्ध सुरू राहते. त्यामुळे अशा वातावरणात उत्पादनक्षमता वाढत नाही. त्या वातावरणात असंतोष वाढतो. गुन्हेगारीत वाढ होते. इतर असामाजिक तत्त्वे वाढीला लागतात. त्याचे उदाहरण: *मुंबई, असं एक मोठं इस्पितळ, ज्या ठिकाणी माझ्या मते रूग्ण जादा आहेत व डॉक्टर कमी आहेत. त्यांना सोडलं तर तेथे इतर कुणी राहतं असं दिसतच नाही.*

**चंद्रगुप्त–** सध्याच्या मंदीबाबत आपल्याला काय वाटते?

**भाऊ–** विकासाचा दर कृत्रिमरीत्या वाढवल्यानंतर अशी मंदी येणे स्वाभाविक होते. पण ती कायमची राहणार नाही. कर्जावर घेतलेल्या निधीवर आधारित विकास कायमचा टिकत नाही. बहुराष्ट्रीय कंपन्या भारतीय कंपन्यांशी जुळवून घेऊन प्रकल्प उभारतात. त्यानंतर त्या भारतीय समाज वा म्युच्युअल फंड वा आर्थिक संस्था यांच्याकडून निधी कर्जाऊ घेतात व त्यावरील नफा पालक कंपनीला व त्यांच्या देशाला देतात. त्या मागील तारतम्यभाव मला अजून कळलेला नाही.

बहुराष्ट्रीय कंपन्यांना भारतात यावयाचे असेल, तर त्यांना १००% निधी गुंतवू द्या! ताळेबंदाच्या स्थितीनुसार नफा कसा वापरता येईल याची परवानगीही द्यावी.

त्यांना निर्यात करू द्यावी. ही निर्यात ते परत वापरणाऱ्या नफ्याच्या तिप्पट असावी. हा नफा ते कोणत्याही स्वरूपात परत आपल्या देशात घेऊन जावोत. त्याला लाभांश, मुख्य कार्यालयाची फी, तंत्रज्ञान फी काहीही नाव दिले जावे. पण आपल्या देशात परदेशी चलन यावयास हवे, एवढे खरे! वरील अटी मान्य झाल्यावर त्या कंपन्यांनी त्यांना झालेला फायदा नेण्यास अडथळा असू नये.

*विदेशी कंपन्यासाठी १०० टक्के निधी आणून गुंतवणूक, नफ्याच्या तीनपट निर्यात या अटी आवश्यक असाव्यात. कारण आपण त्यांना तयार बाजारपेठ पुरवित आहोत.*

**चंद्रगुप्त–** यात सरकारची भूमिका काय असायला हवी?

**भाऊ–** सरकारने उद्योगांसाठी ‘एक सुविधा पुरवणारी संस्था’ अशी भूमिका वठवायला हवी. सुविधा तयार करायला हव्या. सरकारने आपली गुंतवणूक शेतीमध्ये करायला हवी. ज्या देशावर आपण धान्यासाठी अवलंबून राहू त्या देशाने जर युद्धात उतरायचे वा धान्य पुरवायचे नाही असे ठरवले तर आपले लोक भुकेने मरतील.

**चंद्रगुप्त–** सार्वजनिक उद्योगांचे काय?

**भाऊ–** लवकरात लवकर ते कसे गुंडाळता येतील हे पहायला हवे, मग ते नुकसानीत असोत की फायद्यात चालत असोत. आणि तसं शक्य नसेल तर योग्य अशा व्यवस्थापकांच्या हाती त्यांचा कारभार सोपवावा.

**चंद्रगुप्त–** त्यांचा ताबा कोणी घेऊ शकणार नाही का?

**भाऊ–** नाही, नाही. त्यांचा ताबा कोणत्याही उद्योग समूहाला दिला जाऊ नये. ते सरकारी उद्योग आहेत. सार्वजनिक उद्योग नाहीत. त्यांना चुकीच्या नावाने संबोधले जाते आहे. त्यांचा ताबा दुसऱ्याना देण्याऐवजी सरकारने त्यात स्थैर्य आणण्यासाठी देशी वा परदेशी उत्तम व्यावसायिकांना निमंत्रित करावे. कामावर घेण्यासाठी व त्या माणसांना काढून टाकण्यासाठी नियमात जरूर तर बदल करावेत. व्यवस्थापन करणाऱ्या उद्योग समूहाला केवळ होणाऱ्या नफ्यातील हिस्सा द्यावा.

**चंद्रगुप्त–** आपल्या देशाच्या भवितव्याबाबत आपले मत काय आहे?

**भाऊ–** *आपल्या देशाचे भवितव्य उत्तम आहे असा मला विश्वास वाटतो. जर भारतीय जनता पक्ष स्वबळावर निवडून आला व वाजपेयी पंतप्रधान बनले तर आपण आणखी शक्तीशाली बनू.*

**चंद्रगुप्त-** परदेशी कंपन्यांचे व्यवस्थापन उत्तम असते. त्या चालवल्याही चांगल्या तऱ्हेने जातात. त्यांचे स्वागत करावे का?

**भाऊ-** (हसतात) आपण भारतातून बौद्धिक संपदा निर्यात करतो. 'नासा' मध्ये काम करणारे ३६ टक्के लोक भारतीय आहेत. तसेच अमेरिकेत ३० टक्के डॉक्टर भारतीय आहेत, हे आपल्याला माहिती आहे का? जर हे आपले लोक बाहेरच्या देशात उत्तम कामगिरी करू शकतात तर ते भारतात का करू शकत नाहीत? आपल्याला परदेशी 'ढवळाढवळ' ची गरज नाही.

**चंद्रगुप्त-** निर्यातीबाबत काय म्हणता येईल?

**भाऊ-** *सॉफ्टवेअर व शेती या दोनच क्षेत्रात भारत निर्यातीत विजेता बनू शकतो. याबाबत आपल्याला नैसर्गिक देणगी प्राप्त आहे.*

सॉफ्टवेअर हे आपल्या बुद्धीच्या व जैविक रसायनाच्या (वंशावळीच्या) देणगीमधून निर्माण झाले आहे, तर शेतीत आपल्याला निसर्गाने तारले आहे. उत्तम सूर्यप्रकाश, पाणी पुरवठा, विविध प्रकारचे हवामान इत्यादी यावरून ते दिसून येते. ही देणी अनंत काळ पुरणारी आहेत. त्यासाठी परदेशी तंत्रज्ञान वा सहाय्याची गरज नाही. म्हणूनच यातून मूल्यवृद्धी करायला खूप वाव आहे. जर अवलंबून राहावयाचेच असेल तर आपण बदलत्या निसर्गावर अवलंबून राहावे, इतकेच. बाकी इतर क्षेत्रात बहुराष्ट्रीय कंपन्यांनी वा अन्य देशांनी आपला ठसा उमटवला आहेच. त्यामुळे आपण आपल्या मूळ शक्तींवर (कोअर कॉम्पिटन्सीज) लक्ष केंद्रीत करायला हवे. त्यात नैसर्गिक देणग्या व परंपरागत उत्कृष्ट बुद्धी यांचा समावेश होतो.

**चंद्रगुप्त-** मनुष्यबळाला संस्थेत कसा वाव आहे? त्याची भूमिका काय?

**भाऊ-** कंपनीच्या उत्पादनक्षमतेवर मोठा परिणाम हा मनुष्यबळामुळे होत असतो. 'काम हेच पूजाकर्म' असे लोकांनी मानायला हवे. मिळणारा पगार हा उपस्थिती म्हणून, काम केले म्हणून वा इतके तास वेळ कंपनीत घालवला म्हणून दिला जातो, असे समजू नये. आपल्याला मिळणारा पगार हा लक्ष्य गाठले गेले व त्याचा एक भाग आपण होतो म्हणून मिळतो, हे समजायला हवे. जर मालक, कामगार केवळ पगाराचाच विचार करीत राहिले तर उत्पादनक्षमता खालावत जाणे अपरिहार्य आहे.

*एखादा तन, मन व आत्मा अर्पण करून काम करत असेल तर तो कामाचा मालक बनतो. असा माणूस पर्यायाने कंपनीच्या मालकीवर त्याच्या हिस्सेदाराचा सन्मान मिळवू शकतो.*



१९९८-९९ साली मिळालेले ११ पुरस्कार घेतल्यानंतर ना. राजीवप्रताप रुडी (केंद्रीय व्यापार व उद्योग राज्यमंत्री), यांच्यासोबत सहकारी : (डावीकडून) संजय भंडारी, प्रदीप नाईक, सतिश फालक, डोंगरमल देसर्डा, अशोक रडे, दिलीप येवलेकर, सतिश बांगर, भिकमचंद गुणधर, दिलीप चौधरी, महेश पाटील, मिलिंद खारुल.

एखादा कर्मचारी पगारावर लक्ष न ठेवता पोटतिडकीने उत्कृष्ट काम करीत राहिला तर उत्तेजनार्थ रोखे पर्याय व इतर सवलती मिळून त्याची मिळकत पगारापेक्षा दुप्पट असेल. पण 'वेळेत काम, पैशावर ध्यान'अशी विचारसरणी असलेल्या त्याच्या जोडीदाराला मात्र मिळणाऱ्या पगारावरच समाधान मानावे लागेल. एखाद्याला कामाला ठेवून त्याच्या कामाचा उपयोग करून घेता येतो. काही प्रमाणात त्याच्या मनावर ताबा मिळतो. पण त्याच्या आत्म्याला काबीज नाही करता येत. जर खरी उत्पादनक्षमता गाठायची असेल तर मन-आत्म्याचा संयोग हवा.

*पैशाने हात विकत घेता येतात. पण हृदय विकत घेता येत नाही; कदाचित बुद्धी कामाच्या ठिकाणी आणता येईल, पण माणसाचा आत्मा आणता येणार नाही.*

मनुष्यबळविकास विभागाने 'विसरून जाणे' शिकायला हवे. मानवी प्रकृतीनुसार आपण वाईट गोष्टी अधिक लक्षात ठेवत जातो. त्यामुळे वय वाढले की, स्मरणशक्तीचा मोठा हिस्साही त्याने व्यापला जातो. जग हे अत्यंत कुरूप आहे, अशी 'थिअरी' तयार केली जाते. प्रत्येकजण दुष्ट आहे, असेही मानले जाते. त्यामुळे मनामनाला सांधणारे पूल बांधण्याऐवजी भिंती उभारल्या जातात. 'माणूस' म्हणून आपण नष्ट होतो. त्याविरुद्ध जग सुंदर आहे, असा विश्वास अंगी बाणवला की उत्पादनक्षमता वाढायला लागते.

*'आपण त्यांच्यासाठी काय केले?' यापेक्षा 'त्यांनी आपल्यासाठी काय केले?' हे मनुष्यबळ विकास विभागाने लक्षात ठेवावे. त्यामुळे चांगुलपणा व सत्प्रवृत्ती वाढेल.*

**चंद्रगुप्त–** यशस्वी होण्यासाठी कंपन्यांनी कोणती व्यवस्थापन पद्धती अंगिकारावी?

**भाऊ–** इन्फॉर्मल म्हणजे अनौपचारिक, पण जी लक्ष्य पार पाडेल अशी! लवचिक पण शिस्तबद्ध अशी. पारदर्शक आणि संपूर्ण माहिती देणारी. कंपनीत काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांचा मनापासून सहभाग निश्चित करणारी. यासाठी कर्मचाऱ्यांना कामाची मालकी सोपविणारी. कामाची मालकी स्वीकारता येईल यासाठी कर्मचाऱ्याला निर्णयाचे अधिकार देणारी. संकट काळातही सर्व काही बाबी सत्यपणे सर्व कर्मचाऱ्यांपुढे मांडण्याचे साहस असणारी.

## उद्योगाचे घरी देवतालक्ष्मी ...

सुलभा कोरे - साहित्य जागर, ऑक्टोबर १९९९

अफाट उद्योग व्यवसायाची निर्मिती करताना कुटुंब, नातीगोती दुरावणं, सामाजिक बांधिलकी विसरणं, जीवनप्रवाहात विसावा देणाऱ्यांचा विसर पडणं - असले अनुभव आपणा सर्वांसाठी नित्याचेच आहेत. परंतु या सगळ्यांना घेऊन चालणारा पावलोपावली अंतर्मनाचा शोध घेणारा कर्मयोगी येथे गवसतो.

''आयुष्यात असंख्य गोष्टी शिकायच्या असतात, नव्हे परिस्थितीच आपल्याला बरंच काही शिकवीत असतेः 'चालत राहा, थांबलास तर संपलास. सतत प्रयत्न करीत राहा. यश तुझ्या मागून चालत येईल.' मला आठवतोय आमच्या घराण्याचा इतिहास, इथं महाराष्ट्रात येण्याची आमच्या पूर्वजांची कहाणी. मला आई-वडिलांनी सांगितल्याप्रमाणे ती आजही स्पष्ट आठवतेय.



प्रगल्भ मैत्री - भाऊ आणि कविवर्य महानोर

त्याचबरोबर आठवतात माझ्या बालपणाच्या आठवणी व गमतीजमतीसुद्धा. सोबत शालेय आणि त्यानंतरच्या कॉलेजचा शैक्षणिक जीवनपटसुद्धा मी आपल्या अपेक्षेनुसार मांडेल. आपण लिहून दिलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरं माझ्या पद्धतीने देण्याचा पुरेपूर प्रयत्न मी करणार आहे. त्यामुळे ही मुलाखत न राहता तो माझ्या जीवनाचा आलेख, आत्मकथनाचा भाग होईल.''

**जैन घराण्याची वंशावळी**

- कस्तुरचंदजी खापर पणजोबा
  - जवारमलजी पणजोबा
    - सागरमलजी आजोबा
      - घेवरचंदजी काका
      - हिरालालजी वडील
      - जडावबाई आत्या
      - नैनीबाई आत्या
    - मुकुनचंदजी चुलत आजोबा
      - राणीदानजी काका
    - हस्तीमलजी — दत्तक चुलत आजोबा
      - बंसिलालजी काका
      - दलिचंदजी काका
      - शिवराजजी काका
  - छोटमलजी चुलत पणजोबा (हस्तीमलजी — दत्तक)

- हिरालालजी (वडील)
  गौराबाई (आई)
  - **भवरलाल**
    **कांताबाई** (पत्नी)
    - अशोक
    - अनिल
    - अजित
    - अतुल
  - कांतीलाल (भाऊ)
    शकुंतलाबाई (वहिनी)
    - अभय
    - अंजली
    - अरुणा
    - आरती
    - अविनाश




हिरालालजी (बाबा) आणि गौराबाई (आई) यांचा परिवार - मुलं, सुना, नातू आणि नाती

**जैन कुटुंबाची पाळंमुळं**

''राजस्थानातील जोधपूर-जैसलमेर रस्त्यावरील आगोळाई हे छोटंसं गाव-आम्हा जैन कुटुंबीयांचं वतन ! या सगळ्या वाळवंटी प्रदेशात पाण्याची वानवा. प्यायलाही पाणी मिळणं मुश्किल असायचं. मग शेतीसाठी किंवा इतर गोष्टींसाठी पाण्याचा वापर ही एक चैनच असायची. त्यातच वाळूची वादळं व्हायची. जगणं खडतर असायचं. दरोडेखोरांचाही वावर असायचा. लुटीच्या घटना वारंवार घडायच्या. माझे पणजोबा, छोटमलजी या परिस्थितीला वैतागले. त्यांनी मजल-दरमजल करीत महाराष्ट्राचा आसरा घेतला. धुळ्यातील सामोडा गावी आमच्या या परिवाराने आपल्या इतर नातेवाईकांसह वास्तव्य करून व्यवसाय करायला सुरुवात केली. काही काळ तेथे कामधंदा केल्यानंतर तिथूनही उदरनिर्वाहाचा मार्ग शोधत छोटमलजी तसेच जवाहरमलजींची मुलं सागरमल, मुकुंदचंद, हस्तीमल यांचे परिवार वडाळी येथे आले.

वडाळी हे सुमारे १००-१५० वस्तीचं गाव. त्या वेळी भारतात इंग्रजांची सत्ता होती. या गावाच्या आजूबाजूला अनेक लहान-मोठी खेडी होती व त्यात अनेक जाती-जमातींचे व वेगवेगळे व्यवसाय करणारे लोक राहात होते. या गावात राहिलो तर आपल्याला उदरनिर्वाहाची फारशी चिंता करावी लागणार नाही, काही ना काही व्यवस्था होईल अन सगळं व्यवस्थित चालेल, या गोष्टीचा विश्वास बाळगीत छोटमलजींनी वडाळीत घर भाड्यानं घेतलं. छाजेडांकडे काही काळ नोकरी केली. नंतर काही काळ भुसार मालाचा व्यवसायही केला. राजस्थानप्रमाणे संघर्ष इथंही होता, पण त्याचं स्वरूप वेगळं होतं. अन तो संघर्ष झेलण्याची छोटमलजींची आणि कुटुंबीयांची तयारी होती.

पुतण्यांना त्यांनी पोटापाण्याचे व्यवसाय सुरू करून दिले. सारं काही सुरळीत सुरू होत असतानाच वडाळीत प्लेगची साथ आली, मानमोडीचा आजार आला अन त्यात छोटमलजींची ४ मुलं व पत्नी दगावली. या मानमोडीनं वडाळीची लोकसंख्या बरीच कमी केली. राजस्थानचा माणूस तसा काटक असतो. संघर्ष तर निसर्गानेच त्याच्या पाचवीला पूजलेला असतो. त्यामुळेच आपली सर्व मुलं दगावली याचं दु:ख बाजूस ठेवून छोटमलजी काकाने आपल्या पुतण्यांवर जिवापाड प्रेम केलं. परंतु मुलांचा अकाली मृत्यू व नंतरच्या काही बारीकसारीक घटनांमुळे त्यांचं वडाळी गावात मन रमे ना. त्यामुळे ४ वर्षांच्या वास्तव्यानंतर त्यांनी वडाळी गाव सोडून तिथून सुमारे ३ कि. मी. अंतरावरील वाकोद हे गाव निवडलं.




पाळंमुळांचं स्मरण : राजस्थानी शिल्प

## वाळवंटाकडून वाकोदकडे

वाकोद जळगाव-औरंगाबाद रस्त्यावर अजिंठ्याच्या पायथ्याशी वसलेलं लहानसं गाव. त्या वेळी हे गाव तेव्हाच्या मोगलाईला लागून होतं. रजाकारांच्या अत्याचारांना लोक कंटाळले होते. अचानक दरोडे पडत, बंडाळ्या होत अन त्याची झळ वाकोदलादेखील लागत असे. तसं हे गाव वाघूर नदीच्या काठावर वसलेलं आहे. जवळच अजिंठा पर्वतातून वाघूर नदीचा उगम आहे. वाकोद गाव तसं लहानसं असलं तरी मराठा, देशमुख, हटकर, धनगर, भोई, भिल, मारवाडी अशा अनेक जाती-जमातींचे लोक इथं गुण्यागोविंदानं नांदत होते. नदीला पाणी असल्यानं पिकं चांगली यायची. गावकरी उत्सवप्रिय असल्यानं वेगवेगळे सण साजरे व्हायचे. व्यापार-व्यवसायही इथं चांगला चालायचा. त्यामुळेच छोटमलजी सोबत सागरमलजी, मुकुंदचंदजी, हस्तीमलजी हे पुतणेही आपापल्या उद्योगधंद्यात गर्क झाले. थोडक्यात आडमार्गावर असलेल्या व पाण्याचे दुर्भिक्ष जिथे भासत होतं अशा लहान खेड्याला सोडून छोटमलजींनी त्यांचं कुटुंब नदीकाठच्या हमरस्त्यावर असलेल्या वाकोद या मोठ्या खेड्यात स्थायिक केलं.

सुरुवातीला छोटमलजींनी गावाच्या मध्यभागी भाड्यानं घर घेतलं व तिथंच सर्व कुटुंबीय राहू लागले. तूप व सोबत मूग, उडीद अशा भुसार मालाचा व्यवसाय सुरू झाला. निकटवर्ती खेड्यांमध्ये जायचं, तिथं आपला माल विकायचा, इतर माल खरेदी करायचा, असा त्यांचा किरकोळ व्यापारउदीम चालायचा. छोटमलजींनी इथंच आपल्या भावाच्या मुलाला, हस्तीमलजींना दत्तक घेतलं. सागरमलजी, मुकुंदचंदजी अन हस्तीमलजी यांना सामाजिक कार्याचीही आवड होती. त्याप्रमाणे अडल्या-नडल्या




जीवन संरक्षण : वाकोदचा निवारा

माणसांना ते मदत करत. गावातील सामाजिक कार्यात त्यांचा सहभाग असे. सागरमलजी व त्यांची पत्नी बरजूबाई यांना इथंच पहिला मुलगा घेवरचंद झाला. त्यांनतर हिरालाल, जडावबाई व नैनीबाई ही तीन अपत्ये झाली. परंतु दुर्दैवाने घेवरचंदवर मृत्यूनं ऐन तारुण्यात घाला घातला. या दुर्दैवी व अनपेक्षित घटनेचा खोलवर परिणाम सागरमलजींवर झाला. परंतु त्यातूनही त्यांनी स्वत:ला सावरलं. इतर अनेक आपत्तींना तोंड देत हे कुटुंबीय व्यवसायात, नित्य-कर्मात व्यस्त होते. एकमेकांना सांभाळीत, आधार देत, सावरीत त्यांची वाटचाल सुरू होती. आर्थिक परिस्थिती तशी जेमतेमच. त्यामुळेच मुलांना शिक्षण देणं काही जमत नव्हतं. परंतु व्यवहार, व्यापारउदीम यात सर्वच मुलं पारंगत होती.

हिरालालजींची आई आजारपणात वारली. त्यावेळी काकीनं - जमुनाबाईनं - सर्वच मुलांचा सांभाळ केला. हिरालालजींच्या दोन्ही बहिणींचे विवाह झाले अन मग हिरालालजींच्याही लग्नाची बातचीत सुरू झाली. हिरालालजी त्या काळात चौथीपर्यंत शिकले होते; अन गावात त्यांचा चांगला मानमरातब होता.

हिरालालजींचा विवाह करण्याचं घाटत होतं. कारण ते अठरा वर्षांचे झाले होते. त्या वेळच्या जनरीतीप्रमाणे विवाह फारच लवकर व्हायचे. हिरालालजींचा विवाह जळगावहून १८ कि.मी. अंतरावर पाचोरा रस्त्यावर असलेल्या वावडदा-जवळके खेड्यावर चंदनमलजींची मुलगी गौराबाईशी ठरला. चंदनमलजींची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची होती. जेमतेम उदरनिर्वाह व्हायचा. आईचे लहानपणीच निधन झाल्याने गौराबाईंना मातृसुख मिळालेलं नव्हतं. कष्ट तर



पिता हिरालालजी आणि माता गौराबाई

गौराबाईच्या पाचवीलाच पुजलेले होते. लग्नात फारसं काही द्यायची चंदनमलजींची स्थिती नव्हती. तरीही ५०० रुपयात त्यांचं लग्न लागलं. त्यातही ३२५ रुपयांचं वाकोद येथील  बरड शेत 'नकटी बर्डी' चा समावेश होता. गौराबाई लग्न होऊन वाकोदला आल्या. त्यांनी वडिलधाऱ्यांचा मान राखीत लहानांना प्रेम दिलं, अन सर्वांची मनं जिंकली. तापट नवऱ्याशी जमवून घेत अन त्याचं प्रेमही मिळवीत आयुष्य चाललं होतं. गौराबाईंना एकत्र कुटुंबात दिवसभर कष्ट उपसावे लागत. काळोख पडला, चंद्र उगवला की रात्र, तर सूर्य उगवला की दिवस असा हिशेब असायचा. पहिल्या प्रहरी उठून जात्यावर दळण करायचं अन जात्यावरची गाणी गायची. दिवसभर कुटुंबाचं काम वाहण्यात तसेच येणाऱ्या-जाणाऱ्या पै-पाहुण्यांच्या आदरातिथ्यात त्या गर्क राहायच्या.


हिरालालजी गौराबाई दाम्पत्याला एक दु:ख मात्र सलत होतं, अन ते म्हणजे त्यांची झालेली अपत्य न जगण्याचं! नवससायास झाले; सत्राशेसाठ उपाय झाले, पण झालेलं मूल मात्र जगत नसे. तसंही बालमृत्यूचं प्रमाण त्या काळी बरंच जास्त होतं. अशा घटनांनी गौराबाई मानसिकदृष्ट्या व्यथित झाली होती. तिला हे धक्के सहन होत नव्हते. हिरालालजींना तर अनेकांनी दुसरं लग्न करण्याचा सल्ला दिला. परंतु खंबीर हिरालालजींनी कुणाचंच ऐकलं नाही. 'माझ्या नशिबात असेल, अन मी कुणाचं वाईट केलं नसेल, तर त्याचं फळ निश्चितच चांगलं मिळेल,' असं ते म्हणायचे. त्यांचं म्हणणं तंतोतंत खरं ठरलं. १२ डिसेंबर १९३७ ला वाकोदलाच अस्मादिकांचा जन्म झाला. जन्मानंतर एक तास मी रडलोच नाही. त्यामुळे हे मूल तरी जगावं म्हणून तेवढ्या वेळात भाराभर नवस करण्यात आले. माझ्या आधीची, गौराबाई-हिरालालजींची, नऊ अपत्ये दगावलेली होती. त्यामुळे भीतीचे वातावरण असणं स्वाभाविकच होतं. तासाभरानं जेव्हा मी रडलो, तेव्हा मात्र सर्व गावालाच आनंद झाला. हस्तीमलजींनी नातवाच्या जन्माप्रीत्यर्थ गावभर साखर वाटली.

**बालपण**

हिरालालजीसारख्या प्रेमळ माणसाला पुत्ररत्नाचा लाभ झाला, हा आनंद साऱ्या गावानंच वाटून घेतला. तरीही मनात काही किंतु राहू नये म्हणून आजी-आजोबांनी महारणीला, ७ मुला-मुलींची आई अशा सोनाबाईला, बोलावून तिच्या ओटीत मला घातलं अन तिला मीठ देऊन मला परत विकत घेतलं. हेतू हाच की, मी जिवंत राहावं. आताच्या काळात कदाचित हा वेडगळपणा वाटेल, पण त्या काळी हा समज तसा आगळावेगळा नव्हता.

लहानपणी माझं कौतुक काय वर्णावं ? तसा मी शांतच होतो. दूध प्यायचं व झोपी जायचं. त्यामुळे तसा त्रास नाही दिला कुणाला ! परंतु लाडानं सर्वजण मला ‘साखरगोटी’ म्हणत ! गावाकडून आपल्या मुलाचे लाडाकोडाचं कौतुक पाहून माझ्या आई गौराबाईला कृतकृत्य वाटायचं. माझं नाव काय असावं, याबाबतदेखील गावात चर्चा झाली होती. माझ्या आजी जमुनाबाईने मात्र ठासून सांगितलं की, ती मुलाचं नाव ‘भवरलाल’च ठेवणार म्हणून! तिला नाही कोण म्हणणार ?अशा रीतीनं माझं नाव भवरलाल ठेवण्यात आलं. भवरलाल शब्दाची फोड भवर + लाल अशी आहे. मूळ हिन्दी शब्द भँवर, म्हणजे पाणी अथवा वादळ यातला भोवरा म्हणजे संकेत रुपाने कठीण किंवा बिकट परिस्थिती. लाल म्हणजे पुत्र. अर्थात भवरलाल म्हणजे बिकट परिस्थितीवर मात करणारा पुत्र. आतापर्यंतची माझी वाटचाल पाहता आजीचा उद्देश नक्कीच सफल झाल्याचा संतोष मला वाटतो !

माझं लहानपण म्हणजे कौतुकाची पखरण ! गावातील लोकांनी, घरातील सर्वांनीच माझं कौतुक केलं. आर्थिक परिस्थिती जेमतेमच होती, पण शिक्षण अन संस्कारक्षम मनावर योग्य परिणाम करणारी शिकवण सतत साथ देत होती. वाकोदचा निसर्गरम्य परिसर, प्रेमळ काका, काकू, भावंडं, आई-वडील अन गावातील लोकांचं कौतुक भरभरून मिळत होतं मला ! लहानपणी मला लोणी फार आवडायचं अन त्यासाठी वारंवार आईला ‘लोणी’ (मस्का हो!) लावण्याचा उद्योग मी करीत असे. एवढे सगळे कौतुकसोहळे होत असले, तरी घरातील शिस्तही तेवढीच दांडगी व कडक होती. मला आठवतंय एकदा एका मुलाची विटी चोरली म्हणून मी आईच्या हातचा जबरदस्त मार खाल्ला होता.



चावडीवर शाळा : शिक्षणात लळा - उपेक्षित वास्तु

अभ्यासात मी तसा हुशार होतो, नव्हे, अभ्यास करण्याची मला आवड होती. काकांबरोबर मीही चावडीवरच्या शाळेत फडक्यात पाटी बांधून जात असे. सकाळी व दुपारी अशी दोनदा शाळा भरायची. जाती-धर्माची तशी काहीच अट नसायची. सकाळी प्रार्थना व्हायची. शाळेच्या वेळात प्रामाणिकपणे अभ्यास करायचा, उरलेल्या वेळात मित्रांसोबत माळरानात हुंदडायचं, खेळायचं, फिरायचं. रात्री कंदिलावर अभ्यास करायचा. देवराम वानखेडे, तुकाराम नरवडे, गंभीर कासम हुसेन, दाऊद, माणकचंद जैन, कंवरलाल शर्मा, तंगू भोई असे माझे अनेक जाती-धर्माचे, स्वभाव-वैशिष्ट्यांचे  मित्र होते. त्यांच्याबरोबर वाघूर नदीपात्रात सूर मारायचा, पाण्यात पाठशिवणीचा खेळ खेळायचा, विटी-दांडू, सूरपारंब्या, लगोरी यांसारख्या खेळात मनसोक्त रमायचं, शेतात पळायचं, फुलपाखरांशी खेळायचं, हुरडा खायचा. बालपण किती मजेदार असतं, नाही? शाळेत अभ्यासातदेखील माझा पहिला नंबर असायचा. जे जे काही चांगलं, त्याची मला ओढ होती. वक्तृत्व, निबंध अशा स्पर्धांमध्ये मी भाग घेत असे.

याच दरम्यान माझी आई शिंग्राणीच्या आजारानं जवळजवळ सहा महिने खाटेवरच होती. त्यातून ती बरी झाली अन नंतर दुसऱ्या पुत्राच्या, कांतीलालच्या जन्मानं मोहरली. तब्येत बरी नसतानादेखील तिनं या पुत्राची सगळी उस्तवारी केली, त्याला कापसाच्या बोळ्यानं दूध पाजलं, त्याची काळजी घेतली.



अनुज कांतीलाल जैन

वाकोद गाव इंग्रज व मुघल सत्तेच्या सीमारेषेवर होतं. त्यामुळे या गावावर सतत आक्रमणे होत असत. दरोडेही पडत. असाच एकदा दरोडा पडला. दरोडा शेजारच्या श्री. लालचंद चुनीलाल छाजेडांच्या घरावर टाकणं पूर्वनियोजित असावं. दरोडेखोर आमच्या घराच्या छतावर थैमान घालत होते. हिरालालजी त्यांना चुकवून गच्चीवरून उडी मारून धावत गाव पाटील 'नामदेवराव' यांच्याकडे पोहोचले. ''हिरालाल, तुझ्या घरावर दरोडा पडणार नाही. तुझ्या केसालाही धक्का लागला तर मी जबाबदार राहीन,'' नामदेवराव पाटील धुंदीतच बोलले. पण शेवटी हिरालालच्या आग्रहास्तव बंदूक घेऊन ते आमच्या घराकडे निघाले. दरम्यान, धना वानखेड्यांनी बंदुकीचा बार टाकला. त्यात एक दरोडेखोर जखमी झाला. तेव्हा इतर दरोडेखोर त्या जखमी दरोडेखोराला घेऊन पळून गेले. हिरालालजींचं  काही नुकसान झालं नाही. नामदेवराव पाटील व धना वानखेडे

तसे दोन्हींही हिरालालजींचे मित्र. गावात एकमेकांच्या अडचणींना, हाकेला धावून जाण्याची वृत्ती होती. वाकोद गावानं अनेक स्थित्यंतरे पाहिली. गरिबी-श्रीमंती पाहिली, अनेक आक्रमणांना तोंड दिलं. गावात एकोपा होता. लोकांचं गावावर प्रेम होतं. हिरालाजी-हस्तीमलजींच्या घरीही एकत्र कुटुंबातील हा एकोपा तसाच होता.

नवसाचा म्हणून माझे फारच लाड व्हायचे. या लाडांनी मात्र मला बिघडवलं नाही, उलट एक शहाणपण दिलं. माझी आई गौराबाई म्हणजे सगळ्या गावाची आई होती. गावात अडल्या-नडल्याला तिचा मदतीचा हात सदैव मिळायचा. कुणाला ताप आला, आईचं औषध त्याला मिळायचं; कुणाला मदतीची गरज लागली, आई पुढे असायची. आईच्या या गुणांचा वारसा कदाचित आपोआप माझ्याकडे आला असावा.

भोवतालचं वातावरणदेखील मला घडवीत होतं. स्वातंत्र्यापूर्वीचा भारावलेला, धकाधकीचा काळ होता तो! फर्दापूरच्या कासम रिझवीला भारतात विलीन व्हायचं नव्हतं. तो वाकोदला त्रास द्यायचा. त्या त्रासापासून मुक्ती मिळावी म्हणून वाकोदवर, घराघरांवर मिलिटरीचा पहारा असायचा. रात्रभर सर्च लाइटचा प्रकाश गावाला दीपवीत राहायचा. हिंदु-मुस्लिम दंगाही गावानं पाहिला. या सर्व घडामोडींचा कळत-नकळत परिणाम माझ्या बालमनावरही होत होता.

घरात व्यावसायिक, व्यापारी वातावरण होतं. शाळेचं कौतुक, गुरुजनांचे सत्कार, वर्गमित्रांची सोबत, घरातील वडीलधाऱ्यांचा वचक, वाघूरचं पाणी, वाकोदचा परिसर या साऱ्या गोष्टींचा माझ्या कोवळ्या मनावर प्रभाव पडत होता. मी वाढत होतो, नकळत घडत होतो. 'पोहणं' हा माझा छंद होता व त्यात मी पारंगतही होतो. वाघूर नदीच्या अंगाखांद्यावर खेळताना कधी तिच्या पाण्याची वा पुराची भीती वाटायची नाही. एकदा असंच मी, कपड्यानिशी उडी टाकून, डोहात गटांगळ्या खाणाऱ्या एका मित्राला वाचवलं होतं.


धर्मशाळेतल्या शाळेचे भग्नावशेष

शाळा गावच्या चावडीवर किंवा धर्मशाळेत भरायची.

शाळेची स्वच्छता, आवार सफाई, सुविचार लिहिणं, सारी कामं विद्यार्थी करायचे. दिवसा शाळेत वर्ग भरायचे तर रात्री भजन-कीर्तनं रंगायची. अध्यात्म व शिक्षण याचा सुंदर मेळ वाकोद गावात होता. रात्री कंदिलाच्या प्रकाशात मित्रांच्या संगतीनं वाचन, लिखाण, पाठांतर व्हायचं; गणितं सोडविली जायची. आईकडून कहाण्या ऐकायला मिळायच्या. तसं पाहिलं तर माझी आई शिकलेली नव्हती. वडील फक्त चौथीपर्यंत शिकले होते. परंतु मुलानं शिकावं एवढी त्यांची प्रामाणिक इच्छा होती व त्याप्रमाणे शिकवणही होती.

मलाही लहानपणापासून अभ्यासाची आवड होती. वेगवेगळ्या महान व्यक्तिंच्या चरित्रांचा अभ्यास करावा, जिज्ञासेनं विविध प्रश्नांचा पाठपुरावा करावा, वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये भाग घ्यावा, एवढेच माझे छंद होते. घरची स्थिती एवढी चांगली नव्हती. एकत्र कुटुंबात व्यवस्थित कपडे, योग्य खाणं-पिणं मिळणं सोपं नव्हतं. परंतु म्हणतात ना, गरिबी किंवा अभाव माणसाला जास्त मजबूत बनवतात, पुढे काहीतरी बनण्याची प्रेरणा देतात.

मला आठवतंय, मी त्या वेळी ६-७ वर्षांचा असावा. एकदा चुलत्यांबरोबर आठवड्याच्या बाजारात गेलो होतो. मला भोवरा हवा होता. त्यामुळे मी गुपचूप दुकानातून एक भोवरा उचलून खिशात टाकला. आम्ही घरी आलो. चुलत्यांनी मला भोवरा उचलताना पाहिलं होतं. त्यांनी ही गोष्ट आईला सांगितली. आईनं मला समोर बसवून विचारलं. मीही कबूल केलं. मग आईनं बांबूची फुंकणी घेऊन मला एवढं मारलं की फुंकणी तुटली. त्यानंतर तिनं कसाबसा स्वयंपाक केला, पण ती जेवू शकली नाही. वडील बाहेरगावी गेले होते. ते रात्री थकून घरी परतले. आईनं त्यांनाही जेवू घातले. वडील जेवून झोपले. त्यानंतर मात्र आपण आपल्या लाडक्या मुलाला मारलं, या एकाच विचारानं आई रात्रभर रडत बसली.

पहाटे चार-पाच वाजता वडिलांना जाग आली. त्यांनी तिच्या रडण्याचं कारण विचारलं. आईनं सारी हकीकत सांगितली. वडिलांनी तिची समजूत काढली असावी. माझ्या आयुष्यातील आईचा मार खाण्याची ही माझी दुसरी व शेवटची घटना. त्यानंतर असा प्रसंग कधीही उद्‌भवला नाही की, ज्यामुळे आईनं मला दोन बोटं लावायची गरज पडावी. माझी आई स्वाभिमानी होती. मुलांवर तिचं निरतिशय प्रेम होतं. आधीची सर्व अपत्ये न जगल्याने त्यानंतर वाचलेला मी, तिच्यासाठी 'डोळ्यांतील बाहुली'सारखा होतो. त्यामुळे आपल्या या नवसाच्या मुलाला आपण त्याच्या चुकीसाठी का होई ना पण बेदम मारलं, या गोष्टीचं तिला एवढं दुःख झालं

होतं की, रात्रभर तिच्या डोळ्यातून गंगा-जमुना वाहत होत्या. ही घटना तशी ५३-५४ वर्षांपूर्वीची आहे. 'श्यामची आई'ची शिकवण त्या वेळी जशी मुलांच्या अंगात भिनली होती, तशीच ती त्या वेळच्या 'आयां'च्या आचार-विचारातही होती. माझ्या आयुष्याचा पाया तेव्हा या पद्धतीने मजबूत भरला गेला.

माझ्या लहान भावाचा जन्म झाला, तेव्हा एकत्र कुटुंबात २१ सदस्य होते. वाकोदचं त्या वेळचं आमचं घर म्हणजे चार अंधाऱ्या खोल्यानंतर पाचवी खोली नव्यानं बांधली गेलेली. त्या वेळी चोऱ्या वगैरे सर्रास व्हायच्या. त्यापासून बचाव करण्यासाठी घरं अगदी बंदिस्त बांधली जायची. गावात एक गढी होती. तिची माती घर उभारणीसाठी वापरली जायची. ती माती वॉटरप्रूफ असायची. आमच्या घराचा अवजड दरवाजा मोठा, काळा होता. सांडपाण्यासाठी व पावसाच्या पाण्यासाठी घराच्या चौकातून गटार होती. या गटारीतून प्रसंगी साप निघाल्याचं मला स्पष्ट आठवतं. सापाला न मारण्याची जैन धर्माची भावना असल्यानं माझे चुलते राणीदानजी सापाला धरण्यासाठी डबा बाहेर उघडा ठेवायचे. त्यात साप यायचा व त्यानंतर तो डबा नेऊन उकिरड्यावर ते सापाला सोडून द्यायचे.

उन्हाळ्याच्या दिवसातही आमचं हे मातीचं घर तेवढंसं गरम होत नसे; परंतु गरम वारे वाहायचे. तापमान ४५°-४६° सेंटीग्रेड पर्यंत चढायचं. दुपारच्या वेळी बाहेर भकास असायचं. रणरणतं ऊन्ह असे. त्यामुळे खेड्यात दुपारी बाहेर पडणं जवळजवळ अशक्यच असायचं.

घरात माझे वडील कर्ते म्हणून सर्वांत मोठे; पण त्यांना कौटुंबिक बाबींसाठी कधी वेळच मिळायचा नाही. ती परंपरा अजूनही कायम आहे. शेंगा, तूप, कापूस खरेदी करायचं, आणि बाजारात जाऊन ते विकायचं. त्यासाठी ते पहाटे चार-साडेचारला घराबाहेर पडत. मी मात्र पाच-साडेपाचला उठतो. याला प्रगती म्हणावं की अधोगती?



कलाकंदवाले राणीदान काका

राणीदानजी म्हणजे माझे थोरले चुलते, जे सापही पकडायचे, माझे अतिशय आवडते चुलते होते. ते आम्हाला शेतात नेऊन भुईमुगाच्या शेंगा, ज्वारी-बाजरीचा हुरडा खायला घालायचे. दुसरे चुलते मात्र कंजूष होते. ते राणीदानजींना जळगावमध्ये बाजारात पाठविताना एस.टी. भाड्यासाठी जेमतेम पुरतील अशा बेताने मोजून पैसे द्यायचे. अशा परिस्थितीतही

राणीदानजी कसंही करून ५० पैसे तरी वाचवायचे, प्रसंगी चालत यायचे, पण जळगावच्या घेलाभाई नानजींच्या दुकानातून निदान ५० पैशांचा कलाकंद अगदी नेमाने घेऊन यायचे व आम्हा मुलांच्यात वाटून टाकायचे.

या काकांनी मला नेहमीच प्रत्येक गोष्टीपासून, अडचणीच्या वेळी वाचवलं. त्यांच्यानं बाहेरचं काम जलद होत नसे. जरा स्थूलच होते ते ! दुपारी जेवण करून वामकुक्षी घेण्याची त्यांना सवय होती. त्यांचे पाय चेपण्याचं काम माझ्याकडे होतं. दुपारी ते झोपले की, मस्तपैकी त्यांच्या शरीरावर नाचायचो. त्यांना हवा घालण्याचं कामही इमानेइतबारे करायचो. वाळू घातलेला, झालर लावलेला, दोरीनं बांधलेला पंखा फिरवीत त्यांना हवा घालत असू.

व्यापारउदीम, फिरस्तीमुळे वडिलांना आम्हा मुलांकडे लक्ष द्यायला वेळ मिळाला नाही. पण ही कमतरता राणीकाकांनी भरून काढली. त्यांनी आम्हाला भरभरून प्रेम दिलं. मला मारणं तर त्यांना कधीच जमलं नाही. माझी शाळा सकाळी असायची. दुपारचा वेळ तसा मोकळाच असायचा. तेव्हा या काकांबरोबर मी शेतात जात असे. शेतात बायका कामं करीत असायच्या, पेरणी-विरणी चालायची. मी काकांबरोबर शेतात फेऱ्या मारायचो. पायी-पायी दोन-चार फेऱ्या मारून झाल्या की, सर्वांबरोबर झाडाखाली बसणं व्हायचं. न्याहारी कामगारांबरोबर व्हायची. शेताच्या रस्त्याच्या उजव्या हाताला बोरीचं झाड होतं. 'पाटलांची बोर' म्हणून ते झाड प्रसिद्ध होतं. या झाडाचा अर्धा भाग रस्त्यावर आलेला होता. घरी परतताना झाडावर काठी वगैरे मारून बोरं पाडण्याचा उपक्रम व्हायचा. मजा यायची. मळणीच्या दिवसात तर हा मजेचा प्रकार वेगळ्या तऱ्हेने प्रत्ययास यायचा. गाडीत कापूस भरून परतताना, गाडीत उंच बसताना, जगज्जेत्या वीराचा आविर्भाव असायचा आमचा!

त्या वेळी वाकोदला संडास वगैरे प्रकार नव्हता. ही संज्ञाच अस्तित्वात नव्हती, असं म्हटलं तर ते वावगं ठरू नये. फक्त गावच्या पाटलांच्या वाड्यातच संडासची व्यवस्था होती. अन्यथा सर्व गावकऱ्यांनी आपापली वेगवेगळी व्यवस्था केली होती. पण बहुतेक सर्वच जण प्रातर्विधीसाठी गावाबाहेर जात असत. अजूनही बऱ्याच अंशी तसाच प्रघात आहे. आम्ही प्रातर्विधीसाठी तांब्या घेऊन समोरच्या रस्त्यानं उकीरड्याकडे जायचो. गुरं चारा खायची, चघळायची. उरलेला चारा उकिरड्यावरच पडून राहायचा. त्यातच त्यांचं शेण पडायचं. प्रातर्विधीही आम्ही त्यातच उरकायचो. हा सर्व मालमसाला शेतात खत म्हणून वापरला जायचा.


कदाचित लहानपणापासूनच्या या घरगुती किंवा नैसर्गिक पद्धतींचा प्रभावच मोठेपणी माझ्यातून डोकावत असेल, आणि मी कळत-नकळत असल्या कृषि व्यवसायांकडे वळलो असेन.

उन्हाळ्याच्या दिवसात वाघूर नदीच्या डोहात पोहण्याची वेगळी गंमत होती. मला पोहायला फार आवडायचं. घरच्या लोकांना चकमा देऊन मी मित्रांकडे पळायचो. त्यावेळी वाघूर नदीतील दोन डोह प्रसिद्ध होते. पहिला महारवाड्याच्या जवळचा महार डोह होता अन दुसरा धोबी तलाव म्हणजे जिथं धोबी लोक कपडे धुवायचे तो! आम्ही वाघूर नदीला लागून डोहाजवळ असलेल्या टेकडीवर जाऊन डोहात बिनदिक्कतपणे उड्या टाकायचो, सूर मारायचो. हस्तीमलजींना, म्हणजे माझ्या चुलत आजोबांना, हा प्रकार अजिबात आवडत नसे. परंतु ते तरी आम्हां पोरांकडे किती लक्ष देणार? म्हणून मग दुर्लक्षही करायचे कधी कधी! नदीत पोहून पोहून डोळे लाल व्हायचे व त्यांना कळायचं की, या पोरांनी काहीतरी उपद्व्याप केला आहे. यावरही आम्ही एक नामी शक्कल काढली होती. पोहून झालं की, आम्ही सूर्याकडे पाहायचो. सूर्याच्या धगीनं डोळ्यांतून पाणी वाहायचं अन डोळ्यांचा लालसरपणाही त्या पाण्याबरोबर वाहून जायचा. मात्र कधीतरी एवढं करूनही चोरी पकडली जायची, कधी मार मिळायचा, पण तेवढ्यापुरताच.



जरी भितीदायक डोह, तरी पोहण्याचा मोह

**शैक्षणिक प्रवास**



संपत गुरुजी : शिस्तीची करंजी

शाळेतील आयुष्य तर फारच मजेदार होतं. अक्षर वळणदार असायचं. पण जे विषय आवडत नाहीत, त्यांच्यावर लक्ष केंद्रित करणं जमायचं नाही. आम्हाला संपत गुरुजी शिकवायचे. अतिशय शिस्तबद्ध व कडक शिस्तीचा भोक्ता माणूस. शेजारच्या मुलाशी बोललं तरी उठबशा काढायला लावणं, उभं करणं किंवा छडीचा प्रसाद देणं त्यांच्याकडून नेहमीच व्हायचं. तशी छडी खाण्याची वेळ माझ्यावर कधी आली नाही. त्यांनी मला उठबशा मात्र काढायला लावल्या. 'भवरलाल, तू हुशार आहेस. जरा जास्त अभ्यास केलास तर पुढे जाशील,'' असं ते नेहमीच सांगत असत. प्राथमिक शाळेत माझं मराठी चांगलं होतं. भाषा विषयात मला प्रथमपासूनच गती होती अन आवडही.

चौथीला मात्र मला जळगावमध्ये यावं लागलं. वाकोदची चावडीवरची शाळा आता संपली होती. ते बालपणही सरलं होतं अन जरा जास्त जबाबदारीचं आयुष्य सुरू झालं होतं. चौथीला मला विशेष शिकवणी लावण्यात आली होती. ताठे नावाचे गुरुजी शिकवायला येत. त्यांचं स्वत:चं अक्षर रेखीव तर होतंच पण माझ्या सुंदर अक्षराचंही त्यांना कौतुक होतं.




संस्कृत पाठांतर = वडजीकर सर

भाषेत चांगले गुण मिळत असले तरी माध्यमिक शाळेतील संस्कृत पाठांतर मला कधी जमलं नाही. तसं पाहिलं तर पाठांतर करणं मला आवडायचंच नाही. पाढे पाठ करणंही मला कधी जमलं नाही. तर मग संस्कृतचे श्लोक पाठ करणे तर फारच दूर! परंतु संस्कृतच्या बाबतीत श्लोक जरी पाठ झाले नाहीत तरी त्यांचे अर्थ मात्र मला पूर्णपणे माहीत असायचे. संस्कृतची तयारी नसली की, वडजीकर नावाचे सर चक्क डेस्कवर उभं करायचे. डेस्कवर उभं राहण्याचा असा प्रसंग माझ्यावरही श्लोक पाठ न झाल्यानं एकदा आला होता.


त्या वेळी मॅट्रिक म्हणजे अकरावीचं आपलं स्वत:चं असं महत्त्व होतं. तोवर विद्यार्थी खऱ्या अर्थानं समजदार होत असे. आमचे प्राचार्य श्री. एम. के. देसाई हे नावाजलेले खंदे व्यक्तीमत्व. त्यांनी स्वत: इंग्लिशमध्ये क्रमिक पुस्तकं लिहिली

होती. अतिशय विद्वान माणूस! एकदा वर्गात इंग्रजी शिकवताना त्यांनी 'हँकरचीफ' (handkerchief) या शब्दाचा अनुवाद करायला सांगितला. त्यांनाही योग्य शब्द सापडला नव्हता. या शब्दाचा मराठीत अनुवाद करायला त्यांनी मला सांगितलं. मीही आत्मविश्वासानं 'टॉवेल-वजा-रुमाल' असा अनुवाद केला. इथं 'वजा' शब्द दोन अर्थांनी आला आहे. एक 'वजा' म्हणजे 'वजा करणं' अन दुसऱ्या 'वजा' चा अर्थ 'सारखा,


प्राचार्य देसाई : विद्वत्तेचा पारखी

तत्सम' असा होतो. म्हणजे टॉवेलसारखा रुमाल हा एक अर्थ किंवा टॉवेलमधून रुमालाची साइज वजा केली तर राहिलेला शिलकी तुकडा हा दुसरा अर्थ. माझ्या या अजब अनुवादाने अन शब्दाच्या फोडीनं हशा तर पिकलाच, देसाई सरांनी माझं कौतुकही केलं. यावरून त्या माणसाची सहृदयता लक्षात येते. विद्वत्तेचा आदर करण्याची परंपरा माझ्या ठिकाणी आली, त्याचा उगम बहुधा या प्रसंगात असावा. 'जैन बोर्डिंग स्कूल'मध्ये निरोप समारंभाच्या वेळी त्यांना बोर्डिंगने प्रमुख पाहुणे म्हणून बोलावलं होतं. त्या वेळी त्यांनी अशीच जुन्या, पूर्वीच्या एक-दोन मुलांची नावे घेतली. त्यांच्या भाषणात त्यांनी माझा उल्लेख केला. 'भवरलाल चांगला उच्च न्यायालयीन नामांकित वकील होईल' असे भविष्यही त्यांनी १९५६ मध्ये या प्रसंगी वर्तवलं होतं.

इंग्लिशचे दुसरे शिक्षक म्हणजे लांडगे सर! स्थूल शरीरयष्टी, पोटसुटलेले लांडगे सर प्रथमदर्शनीच आपल्या चेहऱ्यावरील पावित्र्यानं अन सोज्ज्वळ रूपानं समोरच्या व्यक्तीला आपलेसे करून टाकायचे. मला आठवतंय, मॅट्रिकच्या मुख्य परीक्षेच्या अगोदरच पूर्वपरीक्षा घेतली जायची. त्या परीक्षेच्या वेळी पेपरवर नाव न टाकता फक्त कोड नंबर टाकला जायचा. सरांनी सर्व मुलांचे पेपर तपासून वर्गात वाटले. परंतु शेवटपर्यंत वाट पाहून माझा


इंग्रजीचे व्यासंगी लांडगे सर

नंबरच पुकारला गेला नाही. मला कळे ना, माझ्या पेपरचं नक्की काय झालंय?

तेवढ्यात शेवटी सरांनी एक पेपर फडकावीत 'हा पेपर कुणाचा?' अशी पृच्छा केली. नंबर माझाच असल्यानं मी उभा राहिलो. सरांनी सांगितलं, ''या पेपरला माझ्या हातांनी ७२% गुण दिले आहेत. याचा अर्थ बोर्डात तुला नक्कीच ७४% गुण

मिळतील. मी तशा शिकवण्या वगैरे करीत नाही, पण तुला मी उद्यापासून रोज जास्त शिकवीन. तू उद्यापासून माझ्याकडे शाळा संपल्यानंतर तासभर नक्की यायचं.''

नंतरच्या सहा आठवड्यांत लांडगे सरांनी माझी इंग्रजी भाषेतील प्रत्येक समस्या सोडविली, चूक सुधारली. मला चांगलं भरघोस मार्गदर्शन केलं. आज माझं इंग्लिश चांगलं समजलं जात असेल तर त्याचं सारं श्रेय या गुरुजनांना जातं. मला जादा वेळ शिकवणीसाठी त्यांनी काहीही वेगळा मोबदला घेतला नव्हता हे आज येथे विशेष नमूद करणं गरजेचं वाटतं.

हे लांडगे सर त्यांच्या कॉलेज जीवनात जेव्हा सिडनहॅम कॉलेजात चर्चगेटला शिकायला जात, तेव्हा डोंबिवलीला राहत असत. डोंबिवलीहून कॉलेजला येणं त्या वेळी एस. टी.नं व्हायचं. डोंबिवलीहून चर्चगेटला पोहचायला तब्बल दोन तास वेळ लागायचा. हा वेळ सत्कारणी लावण्यासाठी दररोज सकाळी ऑक्सफर्ड डिक्शनरीचं एक पान ते फाडत. आणि जाता-येता प्रवासात ते पूर्ण पान पाठ करून टाकत. अशा रीतीने त्यांनी ती डिक्शनरी चार वर्षांत तोंडपाठ करून टाकली. असा हा विलक्षण माणूस !

१९५६ मध्ये मी मॅट्रिक झालो. इंग्लिशमध्ये ७४%, मराठीत ७२% या दोनच विषयांत मला प्रावीण्य मिळालं. इतर विषय म्हणजे हिन्दी, संस्कृत, इतिहास, भूगोल, भूमिती, बीजगणित यामध्येही उत्तीर्ण झालो, फक्त आवश्यक तेवढेच गुण घेऊन ! इंग्लिशमध्ये ७४% गुण घेऊन मी लांडगे सरांचा अंदाज अगदी तंतोतंत खरा ठरवला होता. हा सरांचा माझ्यावरचा विश्वास नव्हे, तर त्यांचा स्वतःवरचा विश्वासही बोलता झाला होता. अशी माणसं तुमच्यातही आत्मविश्वास निर्माण करतात. त्यांनी मला मार्गदर्शन केलं. माझी आई अशिक्षित, वडील चौथी इयत्तेपर्यंत शिकलेले; पण या अशा गुरुजनांनी मला संस्कारित केले. ही माझी स्फूर्तिस्थानं आहेत. शिस्त, वक्तशीरपणा, अभ्यासातली गोडी इ. त्यांनीच बिंबवले माझ्या मनावर!

मॅट्रिक तर झालो. आता पुढच्या शिक्षणाचा प्रश्न होता. माझे चुलत काका, हस्तीमलजींचा मधला मुलगा दलिचंद, त्या वेळी डोंबिवलीला राहत असत. ते आमच्या घरातील पहिले डिप्लोमाधारक. मुंबईच्या प्रीमिअर ऑटोमोबाईल्समध्ये महिना २१० रुपयांवर नोकरी करत होते. जसं माझ्या वडिलांचं शिक्षण त्यांच्या




जिव्हाळ्याचा पालक दलूभाऊ

काकांनीच केलं होतं, तसं दलूभाऊंचं शिक्षण माझ्या वडिलांनीच केलं होतं. त्यामुळे जेव्हा माझ्या शिक्षणाचा प्रश्न आला, तेव्हा या काकांनी स्वत:हून माझ्या शिक्षणाची जबाबदारी उचलली. संयुक्त कुटुंबप्रणालीच्या परंपरेचा हा फायदा! डोंबिवलीला त्यांनी ४० रुपये महिना भाड्याचं तीन खोल्यांचं रेल्वेडब्याप्रमाणे असलेलं घर घेतलेलं होतं. नोकरीसाठी ते कुर्ल्याला जायचे. मी चर्चगेटच्या सिडनहॅम कॉलेजला कॉमर्ससाठी प्रवेश घेतला होता. १९५७-५८ चा काळ होता तो! ट्रेनचा अन माझा संबंध या काळात मोठ्या प्रमाणावर आला. जागृत सोळा तासांपैकी माझे सुमारे चार तास ट्रेनमध्ये येण्या-जाण्यात जात असत. कॉलेज करीता चर्चगेट जाण्यासाठी मला दादर स्टेशनला लोकल ट्रेन बदलावी लागायची.

**विसरभोळा, तुझे नाव भवरलाल**

मी प्रथमपासून तसा विसरभोळा आहे. बऱ्याच वेळा मी बऱ्याच गोष्टी विसरतो. लोकलचा पास विसरण्याची वेळ दोन-चारदा अशीच आली. एकदा मला जाणवलं की, आपण पास घरीच विसरलो आहोत. पण ही गोष्ट दादरला उतरल्यानंतर माझ्या लक्षात आली होती. मला प्रथम घाबरायला झालं, पण घाबरून चालण्यासारखं नव्हतं. मी खिशात पास आहे, अशा तोऱ्यात तिकीट चेकरच्या समोरून निघून गेलो. कदाचित माझ्या आत्मविश्वासामुळे मी सहीसलामत निसटलो असेन.

अशीच एक दुसरी घटना मला आठवते. एका दूरच्या नातेवाइकाला नायर हॉस्पिटलमध्ये ॲडमीट केलं होतं. त्यांना पाहण्यासाठी मी नायर हॉस्पिटलमध्ये गेलो. रुग्णांना भेटण्याची वेळ संपली होती. तरीही मी हॉस्पिटलमध्ये डॉक्टरच्या दिमाखात दाखल झालो. कुणीही मला अडवलं नाही. मी नातेवाइकाची विचारपूस करून परतलोदेखील. दिसायला गोरागोमटा, आत्मविश्वास जणू तोंडावरच झळकणारा! त्यामुळे कदाचित तेथल्या पहारेकऱ्यांना भुरळ पडली असावी.



काकू लिलाबाई

असाच एक प्रसंग मला आठवतो. तो मात्र माझ्या विसरभोळेपणाचा कळस असावा. जळगावचे पाहुणे, काकू (दलूभाऊंची पत्नी) व माझ्यासह इतर लोक आम्ही एकदा आरे कॉलनी पाहायला गेलो होतो. तबेले पाहायचे, तिथलं निसर्गसौंदर्य व एकंदरीत आरे दुग्धालय पाहायचं अशी ती सहल होती. त्याप्रमाणे आम्ही जेवणाचे डबे घेऊन सहलीला गेलो. तिथून दुधाच्या बाटल्या आणण्यासाठी काकूंनी मला पाठवलं.

मी थाटात आरे दुधाच्या बाटल्या आणण्यासाठी गेलो. तिथं गेल्यानंतर ध्यानी आलं, की मी पास व पैसे घरीच विसरून आलेलो आहे. लोकल फोन करण्याइतपतही पैसे माझ्याकडे नव्हते.

तेथल्या विक्री दुकानावरील माणसानं माझ्यात काय पाहिलं, कुणास ठाऊक? त्यानं विचारलं, ''तुला परत जायचंय ना, हे घे १० रुपये !'' त्यानं १० रुपयाची नोट माझ्या हातात दिली. मी त्याला कागदावर माझा डोंबिवलीचा पत्ता व फोन नंबर उतरवून देऊ लागलो. त्यानं 'नको' म्हटलं. उलट त्यानं सांगितलं, ''तुला पैसे खरंच परत करायचे असतील तर हा माझा पत्ता घे, अन द्यायचे असतील तर पैसे घरी आणून दे.'' तो माणूस कल्याणला राहत होता. मी त्या माणसाचे पैसे पोहोचते केले, ती गोष्ट वेगळी.

त्या काळी १० रुपयांची किंमत तशी कमी नव्हती, पण तरीही त्यानं माझ्यावर विश्वास ठेवला होता अन माझा पत्ताही घेतला नव्हता. सदर गृहस्थाने मला जीवनाकडे बघण्याचा एक आगळावेगळा दृष्टिकोन दिला. या एका घटनेने मी त्याच्याकडून एक गोष्ट मात्र शिकलो की, *माणूस चांगला असेल तर आंधळेपणानेही विश्वास ठेवायला हरकत नाही. त्याच्याकडून परतफेडीची अपेक्षा ठेवू नये.*

विषय निघाला म्हणून सांगतो. पस्तीस वर्षांपूर्वीची अशीच एक घटना आठवते. १९६५ चं वर्ष असावं. मला मुंबईला जायचे होते. त्यासाठी मी जळगाव रेल्वे स्थानकात पोहचलो. दुसरा एक माणूस माझ्यासोबत यायचा होता. त्याच्याकडे आम्हा दोघांची तिकिटे होती. लागोपाठ दोन गाड्या होत्या. मी आलो तेव्हा ८.४० ची गाडी उशिरा आलेली होती. आम्ही ज्या गाडीनं प्रवास करणार होतो, तीच ही गाडी असावी असं मला वाटलं. मी घाईघाईनं त्या गाडीच्या प्रथम श्रेणीच्या डब्यात चढलो. सोबतचा माणूस द्वितीय श्रेणीच्या डब्यात बसला असेल, असं मी गृहित धरलं. कारण व्यवस्था तशीच केलेली होती.

खात्री करण्यासाठी इगतपुरीला पाहिलं, तो माणूस कोणत्याच डब्यात दिसत नव्हता. कसा असेल? मी चुकीच्या गाडीत चढलो होतो. तिकीट चेकरने ते हेरलं. पण बहुधा त्याला वाटलं असावं, 'माणूस सज्जन दिसतोय.' त्यानं स्वत:च्या खिशातले पैसे भरले व मला तिकीट घेऊन दिलं. मला खिशात पैसे ठेवायचीही सवय नव्हती. दादर स्टेशनला पोहचल्यावर टॅक्सीवाल्याकडून पैसे घेऊन तिकीट चेकरचे पैसे परत केले. टॅक्सीवाल्याला आमच्या मुंबई ऑफिसमध्ये घेऊन गेलो अन टॅक्सी भाड्यासह त्याचे पैसे त्याला दिले.

त्या काळी स्वत:ची सगळी कामे मी स्वत:च करत असे, मात्र आधी रिझर्व्हेशन करून प्रवास करणं मला कधी जमलंच नाही. खिशात पैसे ठेवायची मला अजिबात सवय नाही, नव्हे तसा प्रसंगही कधी आला नाही. काम निघालं की, ऐन वेळी धावायचं, एवढंच मला माहीत होतं. एक तृतीयांश आयुष्य असंच ट्रेन, बस किंवा कार प्रवासातच गेलं. त्यामुळे अजूनही मला ट्रेनमध्ये बसलं की, झोपाळ्यात किंवा पाळण्यात बसल्यासारखं वाटतं आणि पलंगावर येते त्यापेक्षाही जास्त चांगली झोप ट्रेनमध्ये चटकन लागते.

*आपण कष्ट, काबाडकष्ट करायचे, म्हणजे यश, सफलता आपोआपच मिळणार, हा माझा विश्वास होता अन आहे. त्यामुळे आपल्याला थांबविणारा, रोखणारा कुणी नाही, आपण मोठे होणारच, हाही आत्मविश्वास त्यापोटीच माझ्यात बळावला असावा.*

सिडनहॅम कॉलेजला प्रवेश घेतल्यानंतर सुरुवातीची दोन वर्षे मी डोंबिवलीलाच होतो. परंतु डोंबिवली ते चर्चगेट प्रवासाचा ताण नको म्हणून नंतर माटुंग्याला पोतदार कॉलेज व होस्टेलमध्ये प्रवेश घेतला. मला भाषा विषय आवडायचा. अकाऊन्ट्स् काही माझ्या आवडीचा विषय नव्हता. पण कॉमर्समध्ये त्याचा अभ्यास अनिवार्य असतो. तसा मी हॉस्टेलला राहायचो. हॉस्टेलचं जेवण, तिथली व्यवस्था म्हणजे कधी कधी जेवायचा कंटाळा यायचा. जेवणही चांगलं नसायचं. मग आम्ही मेजवानी झोडायच्या उद्देशानं पायी चालत ‘दवे लॉज’वर जेवणासाठी दादरला जायचो. पण ही संधी कधी कधी मिळायची. नेहमीच अशी मजा मारायला आर्थिक स्थिती परवानगी देत नसे.

वकिलीचं शिक्षण घेताना माहिम लॉ कॉलेजमध्ये माझ्या सूक्ष्म निरीक्षण शक्तीनं मला बरीच मदत केली. जे चांगलं ते जीवनात उतरविण्याचा माझा अट्टाहास प्रथमपासून होता. मुंबई शहरात मी शिकलो, राहिलो व वावरलो, तब्बल सात वर्षे. पण मुंबई मला अजूनही तितकीशी भावत नाही. तेथे माझा जीव घुसमटतो. मुंबईचं आकर्षण कुणाला नाही? परंतु मला मात्र ५० करोड रुपयेही कुणी दिले, तरी मुंबईत राहणं जमणार नाही. जसं कुणाच्या आहारी जाणं मला जमलं नाही, तसं या शहराच्या आहारी जाणंही जमलं नाही! का, कुणास ठाऊक? मला अजूनही वाकोदचं घर बोलावतं; खळ्यात आणि अंगणात झोपायचं आकर्षण वाटतं; वाघूर नदीत पोहणं आठवतं. माझं बालपण साद देतं. माझी शाळा, शाळेतील वातावरण दृष्टिस पडतं, भुरळ टाकतं.



आताचे आर. आर. विद्यालयाची भव्य दर्शनी इमारत



सुवर्ण महोत्सव वर्ष समारंभात प्रमुख अतिथी भाऊ

शाळेवरून एक घटना आठवली. मी शाळेत वेगवेगळ्या स्पर्धांतून भाग घेत असे. वक्तृत्व, निबंध कुठलीही स्पर्धा असो, मला हमखास बक्षिसं मिळत. भाषेवरील माझं प्रेम अन आवडही तशीच होती. त्या वेळी न्यू इंग्लिश स्कूल (आताचे आर. आर. विद्यालय) मधील राव सर हिंदीच्या कोविद परीक्षेला बसले होते. त्या वेळी मीही त्यांच्याबरोबरच ही परीक्षा देत होतो. परीक्षेचे परिणाम घोषित झाले. मला ५८% व सरांना ५६% गुण मिळाल्याचे आठवते. नोटीस बोर्डावर बातमी झळकली, ''गुरू से चेला सवाई!'' बराच गवगवा झाला या घटनेचा. परंतु त्या सरांनीही माझं कौतुक केलं, हे अधिक महत्त्वाचं!

काही विषय मला कधी जमलेच नाहीत; त्यापैकी एक म्हणजे चित्रकला. चित्रकलेत माझ्या इतर कलागुणांमुळे किंवा हुशारीमुळे उत्तीर्ण केलं जायचं.


*चित्रकलेत मात्र मी तीन गोष्टी काढायला शिकलो अन त्या म्हणजे एक बादली, त्यावर नळ अन झाड ! नळातून पडणारं पाणी भरायला बादली अन ते पाणी ज्याला द्यायचं ते झाड ! लहानपणी चित्रकलेत जमलेली ती गोष्ट मी आजही करतोय. पाणी साठवून नियामक पद्धतीने झाडांना देतोय. मूळ संस्कार एवढे खोलवर रुजले याचा मलाही आश्चर्याचा सुखद धक्का बसतो.*

खेळांमध्ये तशी मला फारशी गती नव्हती. हुतुतुतील तंगड्या ओढणं किंवा खो-खोतील 'खो' देणं मला तेवढंसं कधी जमलं नाही. न्यू इंग्लिश स्कूल जळगाव, जिथे मी शिकलो, ज्या शाळेनं माझं आयुष्य घडविलं, त्याच शाळेच्या 'गोल्डन ज्युबिली' समारंभाला मला प्रमुख पाहुणा म्हणून अलीकडेच बोलावण्यात आलं होतं. तेव्हा मात्र एक वेगळं समाधान मला लाभलं. शालेय जीवनाचा चित्रपट पटापटा डोळ्यांसमोरून निघाला.

तसं मला शाळेत इतर मुलांच्या मानानं उशिराच दाखल करण्यात आलं होतं. आईच्या मते, वयाची सात वर्षें पूर्ण झाली की मुलाचं डोकं पक्कं होतं. त्यामुळे

मलादेखील त्यानंतरच शाळेत घालण्यात आलं. आय.ए.एस.च्या परीक्षेसाठी पंचवीस वर्षांपेक्षा जास्त वय चालत नाही. मी जेव्हा पदवीधर झालो तेव्हा माझ्या वयाला पंचवीस वर्षे पूर्ण व्हायला फक्त सहा महिने बाकी होते. त्यामुळे मी जेव्हा आय.ए.एस.ला एकदाच बसू शकलो. पुढच्या वर्षी बसणं 'एज बार' झाल्यामुळे जमलं नाही. म्हणून मी एम.पी.एस.सी. ची परीक्षा दिली. त्यात उत्तीर्ण झालो. तिथं सव्वीस वर्षांची मर्यादा होती. गॅझेटमध्ये माझ्या नावाची नोंद झाली. मला नोकरीही मिळाली, पण मी ती नोकरी स्वीकारली नाही.

मी लॉ ची पदवी मिळविली. त्यानंतर जळगाव इथल्या रायसोनी वकिलांकडे उमेदवारीला राहिलो. त्या वेळी जो बी. कॉम, एलएल.बी. असेल, त्याला बिना सनद घेता प्रॅक्टिस करता येत असे. मी रायसोनी वकिलांकडे त्यांच्या 'ब्रीफ' तयार करण्यासाठी सुमारे सहा महिने होतो. रायसोनी वकिलांनी माझं व्यक्तिमत्व जसं परीक्षलं होतं ते सांगण्यासारखं आहे. तसं पाहिलं तर मी एक सर्वसामान्य, साधारण कुवतीचा माणूस. माझ्यात काहीतरी वेगळी शक्ती किंवा पात्रता आहे, असं मला स्वतःला कधी वाटलं नाही. पण माझ्यात जिद्द होती, अतोनात कष्ट करण्याची वृत्ती होती अन जीवनाकडे बघण्याचा प्रामाणिक दृष्टिकोन होता. जे काही यश मला मिळालं त्याची मुख्य कारणं याच गोष्टी असाव्यात.



विधीतज्ज्ञ रायसोनी

मी रायसोनी वकिलांकडे उमेदवारी करत असताना त्यांना विचारलं, ''मला चांगली नोकरी मिळतेय. उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी, कमिशनरपर्यंत मी पोहोचू शकेन. मग मी ही नोकरी का करू नये?'' त्यांनी म्हटलं, ''मी तुम्हाला सहा महिने झाले पाहतोय. तुम्ही नामांकित वकील व्हाल, उच्च न्यायालयाचे वकील व्हाल, दुसरे पालखीवाला व्हाल. जळगावचाच विचार केला तर पहिल्या दोन नामांकित वकिलात तुमची गणना चार-पाच वर्षांतच होईल. तेवढी पात्रता, क्षमता आहे तुमची! पण नोकरी करावी की व्यवसाय करावा हे तुमचं तुम्हीच ठरवायला हवं.'' त्या वेळचे प्राचार्य एम. के. देसाई व आताचे ख्यातनाम वकील रायसोनी, दोघांच्या असेसमेन्टमध्ये पहा कशी एकवाक्यता होती!


काही लोकांकडे जन्मजात प्रतिभा असते, तशी माझ्याकडे नाही. होय! आता लोक माझ्या बोलण्याचा वेगवेगळ्या अर्थाने विचार करतात. पण तो मानमरातब

मला काही भावलेला नाही. मला साहित्य, कला, संस्कृती यांचं अतिशय आकर्षण आहे. मला माहीत आहे की, हवं तेवढं साहित्य वाचणं मला शक्य नाही. त्यामुळे जसजसा पुढे गेलो, तसतसं वाचन आणखी कमी झालं. मला त्याची बोच होतीच. म्हणूनच मी ठरवलं, आपल्याला ज्या ज्या क्षेत्रात जमलं नाही, त्या त्या क्षेत्रातील संबंधित लोक जवळ करायचे. त्यांच्याकडून जमेल तेवढं शिकायचं. त्या लोकांकडे मी सहज आकृष्ट होतो. कवी, नाटककार, कलाकार, लेखक अशा प्रतिभावंतांना पाहून माझं मन उचंबळून येतं. जळगाव जिल्ह्याचा सांस्कृतिक वारसा जुना व चांगला आहे. हा तुटलेला वारसा पुन्हा जुळावा म्हणून मी प्रयत्नशील असतो.

**जीवाभावाचे मित्र**

अनेक मोठे कलाकार इथं वेगवेगळ्या उद्देशाने, वेगवेगळ्या निमित्तांनी येऊन गेले. हे कलाकार माझ्या जीवनाचा अविभाज्य हिस्सा बनून जातात, माझे मित्र बनतात. नामदेव (ना. धों. महानोर) व माझी मैत्री अशीच आहे. कलाकारांच्या प्रेमापोटी झालेली व निखळ, निर्व्याज मैत्रीनं बांधली गेलेली. सगळ्यांना ना. धों. महानोर होता येत नाही. मेहनत करून कुणी कविता लिहू शकत नाही, पण मेहनत करून माणूस व्यवसाय करू शकतो. हुशारी व प्रतिभा यात हाच फरक आहे. माझी मैत्री अशा लोकांशी चांगली जमते.

माझे जिवाभावाचे मोजकेच पाच-सहा मित्र आहेत. त्यांच्या बायकांना माझा हेवा वाटतो कारण त्यांचा नवरा सदानकदा 'भाऊ-भाऊ' करीत असतो. मला



भाऊ, डॉ. सुभाष चौधरी
जीवाभावाचा मित्र खरा, सहवासाचा निखळ झरा

पैशांची गरज असू दे- तशी ती नेहमीच असतेच म्हणा- किंवा त्यांच्यासोबतीची गरज असू दे, माझे हे मित्र नेहमीच माझ्याबरोबर असतात.


कुणाकडेही एक दिवस न राहिलेले रायसोनी वकील माझ्याबरोबर ३२ दिवस लुधियानाला माझ्या कामानिमित्त थांबले किंवा त्यांनी आपलं राहतं घर माझ्या धंद्यासाठी जामीन म्हणून ठेवलं, ते बौद्धिक मैत्रीपोटी ! पैसे देऊन दोस्ती विकत देता-घेता येत नाही. दोस्तीसाठी बंध जुळावे लागतात, भावनिक एकरूपता यावी लागते. माझ्या नशिबाने मला चांगले दोस्त मिळाले. कारण व्यवहार हा माझ्या जीवनाचा केंद्रबिंदू कधीच बनला नाही अन त्यामुळे तो निखळ दोस्तीत कधी आडवा आला नाही.

शिक्षण संपलं होतं. नोकरी करावी की व्यवसाय करावा की वकिली अशा द्विधा मनःस्थितीत मी होतो. त्याचबरोबर माझ्या लग्नाच्या गोष्टीही घाटत होत्या. *कॉलेजपासूनच नव्हे, तर लहानपणापासून माझ्या विचारांची बैठक भारदस्त होती. प्रेमात पडायलाही थोडासा अविचार लागतो अन तो माझ्याकडे नव्हता.*

**व्यावसायिक व वैवाहिक जीवनाची सुरुवात**

पत्नी कशी असावी याबद्दलची माझी कल्पना अगदी स्पष्ट होती. एखादी हिरॉइन आपली पत्नी व्हावी, हा अघोरी विचार कधीच माझ्या मनात आला नाही. तिच्यासारखे कपडे चालतील की नाही याबद्दलही शंका होती. किटी पार्ट्या चांगल्या, पण त्या माझ्या पत्नीने कराव्यात असं काही मनात नव्हतं. मला आठवतं, वाकोदच्या आमच्या घरी आई भांडी घासत होती अन मी आईशी बोलत उभा होतो. तीन-चार स्थळं सांगून आली होती. 'तुला कशी सून हवीय?' मी आईला विचारत होतो. तेव्हा ती म्हणाली ''अरे, मी अशिक्षित. आयुष्यभर सगळ्यांचं करतेय. पण आता मला थोडा आराम देईल अशी सून हवीय. ती ऑफिसमध्ये जाईल अन मला तिचा डबा पाठवावा लागेल, असं काही करू नकोस.''

मला सांगून आलेल्या तीन स्थळांची माहिती मी तिला दिली. नाशिकचं स्थळ करायला हरकत नाही, असं तिचं मत होतं. कारण तिथून हुंडा मिळणार होता! तिचा आपला एक विचार होता, ''मी माझ्या सगळ्या मुलींना हुंडा दिला. मग माझ्या देखण्या, शिक्षित मुलाला का बरं हुंडा मिळू नये?'' मी तिला म्हटलं, ''ठीक आहे. तुझा मुलगा देखणा, हुशार! तशीच मुलगी असेल, पण तिच्या आईवडिलांकडे हुंडा द्यायची ऐपत नसेल तर तू काय करशील ?'' तेव्हा सनातन धर्माच्या तिच्या शिकवणीप्रमाणे ती उत्तरली. ''बाबा रे, तू वकील! तू काय माझं


सप्तपदीवेळी : भाऊ व उजव्या हाताला घुंघटमध्ये कांताबाई

ऐकणार? पण हुंडा देणं तिच्या बापाचं कर्तव्य आहे.'' त्या वेळी तो प्रघातच होता. पोरगी चांगली असेल व हुंडा मिळणार असेल तर दुधात साखर !

मला जी मुलगी पसंत पडली होती, तिचं घर घराणं कर्नाटक राज्यातील खानदानी घराणं, एकेकाळचं बिजापूरचं जहागीर घराणं होतं. नंतर त्यांना वाईट दिवस आले. परिणामी हुंडा देणं काही त्यांना जमणार नव्हतं. घाटकोपरला मी त्या मुलीशी जवळजवळ दीड तास बोललो. ती बी. ए. उत्तीर्ण होती. तिच्याबरोबर बोलण्यातून जाणवलं की, ही आपली साथीदार होऊ शकते. मी बाहेर येऊन वकीली थाटात ती उत्तीर्ण झाल्याचं काकांना (दलुभाऊंना) सांगितलं. दलूभाऊंनी आपल्या पारखी नजरेनं पुढे चालणाऱ्या त्या मुलीला बघून सांगितलं, ''ही पुढे जाऊन स्थूल होईल तिच्या आईप्रमाणेच.'' एवढी चांगली व सोज्ज्वळ मुलगी मिळणार नाही, असा विचार करून ४ डिसेंबर १९६१ ला आमचं लग्न नाशिक येथे झालं. नंतरचं सहजीवन निवांत सुरू झालं.

१९६३ मध्ये मी सुरेशदादा जैन यांच्या वडिलांना, श्री. भिकमचंदजींना भेटायला गेलो होतो. ते म्हणाले, ''तुम्ही मारवाड्याच्या घरात जन्मला आहात. नोकरी तुमच्यासाठी नाही. तुम्ही उपजिल्हाधिकारी व्हाल, सहाय्यक कमिशनर व्हाल, पण जेव्हा जिल्हाधिकारी किंवा कमिशनर येईल तेव्हा तुम्हाला त्या मंडळीला चहाचा कप द्यावा लागेल. वकिली नको, नोकरी नको, तुम्ही व्यापारच करा. मी तुम्हाला मदत करीन.'' आणि त्यांनी त्यांची पहूर गावची जागा पेट्रोलपंप थाटण्यासाठी मला उधारीवर  दिली.

पेट्रोलपंप सुरू व्हायला वेळ लागणार असल्यामुळे तेथेच रॉकेलची एजन्सी सुरू करायचा मी विचार केला. पण व्यवसाय सुरू करण्यासाठी लागणारे रॉकेल खरेदी करायला माझ्याकडे पैसे नव्हते. मी एके दिवशी घरून पैसे कसे मिळतील या


बन्सिकाका

विषयी विचारायचे ठरविले. माझे थोरले चुलतकाका (राणीदानजी) व वडील वाकोदला जेवत होते. वडील निवृत्त झालेले होते. व्यवसायाच्या चाव्या त्यांनी मोठ्या काकाला (कलाकंद आणणाऱ्या राणीदानजीना) दिल्या नव्हत्या, तर व्यवहार चाणाक्ष लहान चुलतकाका बन्सिलालजी यांना दिल्या होत्या. हे काका रॉकेलच्या धंद्यासाठी पैसे द्यायला फारसे इच्छुक नव्हते.

तेव्हा माझी आई सर्वांना उद्देशून म्हणाली, ''याला ७००० रुपये द्या.'' बन्सिकाका म्हणाले, ''आपल्या तीन पिढ्यांची बचत ७००० रुपये आहे. सगळीची सगळीच याला दिली तर पुढे काय ? कुणी आजारी पडलं किंवा घरात लग्न आलं वगैरे तर कुणी काय करावं ?'' आईनं संथपणे उत्तर दिलं, ''मुलगा आताच शिकून बाहेर पडलाय. त्याला प्रथमच काम करण्याची संधी मिळते आहे. त्याला किमान ७००० रुपयांची गरज आहे. मी आता या क्षणी सांगते की, या घरातील माझा हिस्सा संपला, असे समजा. त्याला ७००० रुपये द्या.'' लहान चुलत्यांनी तावातावाने चाव्या फेकल्या अन आमच्या कलाकंदवाल्या राणीदान काकानं त्या उचलून मागच्या खोलीत जाऊन पैसे माझ्या हवाली केले आणि सांगितलं, ''जा घेऊन !'' हा माझा मोठा चुलतकाका राणीदान असाच होता, माझ्यावर जीवापाड प्रेम करणारा. अशा रीतीनं माझ्या धंद्यातील पहिली भागीदार झाली माझी आई.


पहिली भागीदार : आई गौराबाई

त्या ७००० रुपयात मी रॉकेल ठेवण्याचे ५५ रिकामे सेकंडहँड बॅरल्स विकत घेतले. रॉकेल मात्र मी उधारीवर घेतलं. सहा महिन्यात कंपनीला पैसे प्रत्यक्ष नेऊन दिले. २७ फेब्रुवारी १९६३ ला मोरारजी देसाई बजेट प्रस्तुत करीत होते. रॉकेलचे भाव एकदम आकाशाला भिडले. पण असं असूनही निम्मं रॉकेल मी जुन्या भावानं प्रत्यक्ष ग्राहकाला विकण्याचं ठरवलं. तेव्हा मी दर महिना १६ रुपये



पहिला व्यवसाय - घासलेटच्या टाक्या

भाड्यानं बाजारापासून लांबवर घेतलेल्या दुकानासमोर अर्धा कि.मी. लांब रांग लागली. माझ्याकडचं अर्ध रॉकेल विकताना घाऊक विक्रेत्यांना मात्र मी अंदाजपत्रकातील पूर्ण वाढीव भावाने विकलं. कारण एरव्ही ते रॉकेलचा काळाबाजारच करणार होते. मग काळाबाजार करणाऱ्यांना सूट का द्यावी ? त्या रॉकेल विक्रीतून जो फायदा झाला, त्याने माझ्या धंद्याच्या कक्षा थोड्या रुंदावल्या. मग दुसरा केरोसीन डेपो झाला. असं करीत करीत 'भवरलाल जैन' नावाचा तरुण वेगवेगळ्या व्यवसायांना आपलंसं करीत आपले पंख पसरवीत राहिला.

कुठल्याही गोष्टीचा समग्र विचार करण्याची माझी वृत्ती मला नवीन काही सुरू करण्याअगोदर त्या गोष्टीच्या सर्वांगाची माहिती करून घेण्यास प्रवृत्त करीत असते. सरकारी यंत्रणादेखील नवीन योजनांद्वारे मदत करीत असते.

*पिन्स ते पियानो, धान्य ते मिसाइल! हा देश सर्व काही उत्पादन करू शकतो. अन अशाच विचारानं, आत्मविश्वासानं आणि प्रेरणेनं मी सुरुवात स्वत:पासून करायचं ठरवलं व व्यवसायात पावलं झपाट्याने पुढं टाकू लागलो.*

शेतीचं आकर्षण मला सुरुवातीपासून होतं. ते खळं, ते धान्य, ती कापणी, मळणी, तसेच शेतीच्या इतर कामांचं मला विलक्षण आकर्षण होतं. त्यामुळेच रॉकेल व्यवसायाकडून मी खतं, बी-बियाणं, जंतुनाशके, ट्रॅक्टर, पी.व्ही.सी. पाइप इत्यादी शेती उपयोगी साधनसामग्रीच्या आधी विक्रीसाठी व नंतर उत्पादनासाठी वेगवेगळ्या योजना आखल्या. भारताची ७०% लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. शेती हाच भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे या शेतीतच नवनवीन सुधारणा करणं आवश्यक आहे, हे मला पूर्वीच पटलं होतं.



शेतीसाठी लागणाऱ्या साधन सामग्रीचा एक खांबी पुरवठा

*माझी स्वप्नं शेतकऱ्याच्या स्वावलंबनाची, शेतीतील परिपूर्णतेची होती. निसर्गनिर्मित उत्पादनांची मूल्यवाढ करीत राहताना पर्यावरण जपणे हे माझं मूळ सूत्र होतं. त्या सूत्रावर आधारितच जैन उद्योगाच्या कार्याचा विस्तार होत राहिला.*

### औद्योगिक जीवन

जैन उद्योग समूहाची स्थापना झाली अन शेती संबंधित एका नवीन क्रांतीची सुरुवात झाली. पपयांपासून लॅटेक्स जमा करून पपेनची निर्मिती करून जैन उद्योग समूहाने जगातील सर्वाधिक शुद्धतेचे सर्वांत मोठे पपेन उत्पादक अशी ख्याती प्राप्त केली. त्यानंतर पी. व्ही. सी. पाईप्स, ठिबक सिंचन, तुषार सिंचन, टिश्यू कल्चर, ग्रीन हाऊस, विद्राव्य खते, सेंद्रिय खते, जैविक खते, कीटकनाशके, कांदा व भाजीपाल्याचे निर्जलीकरण, फळे व पालेभाज्यांवर प्रक्रिया अशा वेगवेगळ्या कृषि विषयक उत्पादनांचा कार्यविस्तार झाला. या उत्पादनांपैकी ३०% पेक्षा अधिक उत्पादन अनेक देशात निर्यात होत असते. याखेरीज जमीन, शेती व तदानुषंगिक व्यवसायात कृषि प्रकल्पांची टर्न-की तत्त्वावर उभारणी करण्याचे कामही कंपनी आता घेऊ लागली आहे.


पपया चिक संकलन, बळीराजास खात्रीचे उत्पन्न



सिंचनासाठी जलवाहिनी - पीव्हीसी पाईप

जैन उद्योग समूह म्हणजे भारतातील पीव्हीसी पाईप्स उत्पादक, भारतातील ठिबक सिंचनातील प्रणेता व सर्वांत मोठे उत्पादक, अत्याधुनिक तंत्राने पाणी व्यवस्थापनाचे नियमन करणारी सर्वात मोठी कंपनी, भारतातील सर्वांत मोठे खासगी शेती संशोधन केंद्र आणि या क्षेत्रात सर्वप्रथम 'आय.एस.ओ. ९००१' हे प्रशस्तिपत्र मिळविणारी कंपनी होय. पण हे सारं एवढ्या सहजपणे झालं नाही. विस्तृत रूपात या प्रत्येक व्यवसायाची गाथा सांगायला सुरुवात केली तर मग खंड रचले जातील.

१९७८ मध्ये मी स्वत: अमेरिकेत जाऊन पपईच्या पांढऱ्या चिकापासून रिफाइन केलेले पपेनचे नमुने नेले व त्या पपेनसाठी अमेरिकन कंपन्यांच्या मागण्याही नोंदवून घेतल्या. १९८७ मध्ये जैन इरिगेशनची स्थापना झाली, त्या वेळी अमेरिका व इटली स्थित जेम्स हार्डी इरिगेशन या कंपनीचे ठिबक सिंचनातील ड्रिपर हे भाग बनविण्यासाठी सहकार्य घेण्यात आले. आज कंपनीच्या एकूण ठिबक सिंचन निर्यातीचा बराच माल त्याच अमेरिका या देशात निर्यात होतो.



सातासमुद्रापार न्यूयॉर्क कार्यालयात अनिल जैन

कंपनीच्या केसिंग पाईप्स व पी.व्ही.सी. पाईप्सना अरब, आफ्रिका व युरोपियन देशांकडून मागणी आहे. या देशांमध्येही जैन समूहाने जैन ठिबक सिंचनाचे टर्न-की प्रोजेक्टस् यशस्वीरित्या उभे केले आहेत. पी.व्ही.सी., पॉलिकार्बोनेट शीटच्या उत्पादनात जैन



लाकडाला पर्याय, वनसंरक्षणाचा उपाय - प्लास्टिक शीट उत्पादन

समूहाचा नंबर जगात पहिल्या दहांमध्ये लागतो. 'एक्सेल' या नावाने विकल्या जाणाऱ्या या शीट्स् इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी व अमेरिकेतही ग्राहकाला प्रिय आहेत.

पुढारलेल्या, विकसित देशात खाद्यपदार्थ आयातीवर अतिशय काटेकोर निर्बंध असतात. नुसता दर्जाच नव्हे, तर हा माल जिथे बनतो तिथली स्वच्छता, निर्जंतुकता व प्रक्रियेची अद्ययावत साधने यांचाही विचार केला जातो. या सर्व कसोटीतून पार पडलेल्या मालालाच अमेरिका व युरोपीय देशात प्रवेश परवाना मिळू शकतो. जैन इरिगेशनच्या नवीन केळी, आंबा, पेरू इत्यादी फळप्रक्रिया व कांदा आणि भाजीपाला निर्जलीकरण या दोन अद्ययावत कारखान्यांना असे प्रमाणपत्र मिळालेले आहे. त्यामुळेच गेली दोन वर्षे या दोन कारखान्यांतील सर्वच माल मोठ्या प्रमाणावर निर्यात होत आहे.

जैन उद्योगानं शेतकऱ्यांची आर्थिक प्रगती घडवून आणण्यासाठी केवळ टिश्यूकल्चर, विद्राव्य व द्रवरूप खते, सेंद्रिय खते व कीटकनाशके, भाजीपाला व फळप्रक्रिया असे प्रकल्पच कार्यान्वित केले नसून हजारो एकरांच्या कृषि संशोधन व विकास केंद्रात नियमित संशोधन, प्रशिक्षण आणि कृषिज्ञान विस्तार कार्यही सुरू केले आहे.



मुल्यवृद्धी, कृषी ऋद्धी - फळ प्रक्रिया संयंत्र



जैविक तंत्रज्ञान : ऊतिसंवर्धन

जैविक दृष्टीनं वरचढ असलेल्या रोपांचा पुरवठा, पाण्याचा कार्यक्षम वापर, खत व पाण्याच्या सुयोग्य वापर, पिक लागवड तंत्र व मशागतीकडे लक्ष पुरवून आम्ही भरघोस पीकवाढ करून देण्यास शेतकऱ्यांची मदत करतो. त्यांच्याकडून ठराविक भाज्या व फळे बाजारभावानं विकत घेतो. त्यांचं मूल्यवर्धन करून निर्यात करतो. विविध प्रकारच्या जमिनींवर, पिकांवर खते व कीटकनाशकांवर संशोधन प्रयोगशाळाही आम्ही उभारल्या आहेत. अधिक उत्पादन देणाऱ्या केळीच्या मूळ वृक्षापासून टिश्यू कल्चर तंत्राने दर्जेदार व जोमदार रोपे तयार करून आम्ही त्यांना हरितगृह व शेड हाऊसमध्ये प्रत्येकी दीड महिना वाढवितो. ही रोपे मग शेतकऱ्यांना वाजवी भावाने देऊन त्यांचं उत्पादन विकत घेण्याचं कामही आम्ही करतो. सध्या या संशोधन केंद्रामध्ये संगणकाने नियंत्रित होणारी ३००० चौरस मीटर क्षेत्रफळाची तीन हरितगृहे आहेत. या व्यतिरिक्त चार छोटी हरितगृहे, बोगद्यासारखी छोटी पाच हरितगृहे असून त्यावर अतिनील किरण विरोधक आच्छादने आहेत. या हरितगृहांचा वापर ऊतीसंवर्धित केळीच्या रोपांना काटक बनविण्यासाठी केला जातो.

माळरानाला, पडीक जमिनीला, ओसाड टेकड्यांना, उजाड डोंगराला हिरवेगार करण्याची पद्धत जैन समूहानं विकसित केली आहे. भूगर्भातील पाण्याचे पुनर्भरण करून त्याचा उपयोग जमीन लागवडीलायक करण्याचा प्रकल्पही कार्यान्वित झाला आहे. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' मोहीमही आम्ही राबवली आहे. आमच्या जैन हिल्सवर आंबे, पेरू, सीताफळ लागवडीसाठी त्याचा उपयोग करून घेतला आहे. साग, कडुनिंब इ. वनशेतीदेखील डोंगरमाथ्यांच्या उतरणीवर फुलविली गेली आहे.




जैन हिल्स् : जल संवर्धन प्रकल्प पूर्णते पूर्वी आणि नंतर

जैन उद्योगास 'सौरऊर्जा' हा पर्यायही महत्त्वाचा वाटतो. वीजबिलावरील ६०% रक्कम वाचविणारा जैन 'सौरबंब' आम्ही बाजारात आणला आहे. फ्लॅट्स्, बंगले, दवाखाने आणि वसतीगृहे यासाठी हे उत्पादन खूप उपयुक्त आहे.

१९६३ मध्ये फक्त ७००० रु.च्या भांडवलावर जैन उद्योगाची सुरुवात झाली, आज उलाढाल ४०० कोटींवर गेली आहे. ४०,००० भागधारकांच्या पाठबळावर ३५०० हून अधिक कर्मचाऱ्यांच्या अविरत मेहनतीच्या बळावर जैन समूह उभा आहे. काही टक्केटोणपे खाल्ले, यशाबरोबर अपयशही आलं, पण प्रत्येक वेळी आम्ही लोकांची विश्वासार्हता आणि कठोर परिश्रमांच्या जोरावर त्यातून बाहेर पडलो. यशाची नवीन शिखरं पादाक्रांत करीत इथपर्यंत येऊन पोहोचलो. आम्ही आधी शेतकऱ्यांना उत्पादनवाढीसाठी साधनसामग्री देतो, त्यांचं उत्पादन वाढवितो, मग त्यांच्याकडून काही घेतो, तेही योग्य किंमत लावून! इथला माल निर्यात करून इंग्रजांनी भारतातून जे काही लुटलं ते परत वसूल करण्याचा मी अल्पसा प्रयत्न करतोय. हे यश माझं एकट्याचं नव्हे तर, माझ्या सहकाऱ्यांचं, शेतकऱ्यांचं अन माझे मित्र व माझ्या परिवाराचं आहे. कर्मचाऱ्यांशी जैन परिवाराचे संबंध सलोख्याचे व प्रेमाचे आहेत. गेल्या २९ वर्षांत एकदाही संप झालेला नाही, युनियनही नाही.

एकच एक उत्पादन करणे कंपनीला धोकादायक ठरू शकते, या विचाराने वेगवेगळ्या उत्पादनांनी, कामांनी जन्म घेतला. त्या प्रत्येक उत्पादनामागे माझा विचार होता तो असा :

Watch your thought, they become your words.
Watch your words, they become your habits.
Watch your habits, they become your character.
Watch your character, that is your destiny.

पूर्वी जळगाव - शिरसोली रस्त्यावर पैशांसाठी लूटमार व्हायची, आता त्या जागेला 'नंदनवनाचे'स्वरूप आलंय. येथली पडीक जमीन आता उपजाऊ झाली आहे. जे जे शक्य आहे ते ते करीत असतो मी, या भूमीचा भूमिपुत्र. जमिनीशी इमान राखणं, समाजाशी माझी बांधीलकी ठेवणं यांना मी माझी कर्तव्ये मानतो. त्यापोटीच  सारे धडपड व प्रयत्न सुरू असतात.

**पतीपत्नीतील कामाची वाटणी**

बघा, विसरभोळपणामुळं हे असं होतं. व्यापार व्यवसायाबद्दल सांगताना बाकी कुटुंबाबद्दल सांगायचं मी विसरूनच गेलो. मी माझ्या पत्नीबद्दल, तिच्या सोबतीबद्दल सांगत होतो. मला आठवतं, ते लग्नानंतरचे सुरुवातीचे दिवस होते. एके दिवशी मी रात्री ११॥ वाजता घरी आलो. पत्नी रडत बसली होती. त्या वेळी १०' X १०' च्या दोन खोल्या होत्या. आमच्या घरात त्या वेळी बारा माणसं व करणारी ती एकटी! ''तुमचे भाऊ मला अमुक तमुक बोलले,'' ती सांगू लागली.



भाटे सदन १ - तिसरा मजला (१९४७-५६)



भाटे सदन २ - दुसरा मजला (१९५७-६४)

मी म्हटलं, ''आपण आताच आपल्या जीवनातल्या परस्परांच्या भूमिका स्पष्ट करून घेऊ. तू या घरात यायच्या अगोदर माझे बंधू, आई, वडील सर्वजण होते. तुझ्यासाठी त्यांना बाहेर टाकणं/काढणं मला शक्य नाही. त्यांचे ऋणानुबंध एवढे कच्चे नाहीत. घर सांभाळणे ही भूमिका जर तुला शक्य होत नसेल, तर आपण कामाची अदलाबदल करू. तू व्यवसाय कर, मी घर सांभाळतो. आपण काम वाटून घेऊ. जर या सर्वांची व आपली उन्नती हवी असेल, तर घर सांभाळण्याची भूमिका तुला शेवटपर्यंत निभवणं भाग आहे. जो काही त्रास होईल, तो तुला सहन करावा लागेल.''


त्या दिवसापासून आतापर्यंत खरंच तिनं आपली गृहिणीची भूमिका इमानेइतबारे निभावली. त्या उदार मनाच्या देवीनं स्वत:ची वेगळी अशी ओळखच समाप्त करून टाकली. तिची स्वप्नं, प्रेरणा सारं काही पती व मुलं हेच राहिलं.

सासू-सासरे, काकू-काका, मुलं-मुली साऱ्यांचं करताना तिला १४-१४ तास राबावं लागायचं अगदी मोलकरणीसारखं. तेही तिने आनंदाने केलं.

मीही काबाडकष्ट उपसत होतो. सकाळी सहापासून माझा दिवस सुरू व्हायचा. माझ्या वडिलांचाही दिवस असाच लवकर सुरू व्हायचा. संपूर्ण कुटुंबाचा आधार होता मला ! त्या आधाराच्या बळावरच मी माझी उद्दिष्टे प्राप्त करू शकलो. स्वत:चे शील चांगलं व स्वच्छ असावं या मताचा मी आहे! त्यामुळे समाजात माझी प्रतिष्ठा आहे. खरं तर या धकाधकीच्या जीवनात मला बायको-मुलांना कधी पुरेसा वेळ देताच आला नाही. ही आमच्या घराण्याची परंपरा म्हटली तर ते वावगं ठरू नये. व्यापारउदीमामुळे माझे आजोबा माझ्या वडिलांना/काकांना पुरेसा वेळ देऊ शकले नाहीत. माझे वडील कधी आमच्या वाट्याला आले नाहीत. सारं काही आईनं पाहिलं. तद्वत माझ्या मुलांनाही मी वेळ देऊ शकलो नाही. आणि आता माझी मुलंही त्यांच्या मुलांना वेळ देऊ शकत नाहीत.

**जीवघेणे आजार व उपाययोजना**

सध्या नातवंडांना पुरेसा वेळ देण्याचा अल्पसा प्रयत्न मी करतोय. माझ्या आजारपणानं मला तेवढा वेळ दिलाय, असं म्हटलं, तर ते चुकीचं ठरू नये. १९८२ मध्ये मला हृदयविकाराचा पहिला जबरदस्त झटका आला. देवाच्या दयेनं, डॉक्टरांच्या कृपेनं अन माझ्या कुटुंबाच्या, हितचिंतकांच्या, मित्रांच्या सदिच्छांमुळे मी त्यातून वाचलो. अमेरिकेला जाऊन शस्त्रक्रिया करावी लागली. ह्युस्टन येथील जगप्रसिद्ध हृदयतज्ञ डॉ. डेन्टन कूली यांनी ती शस्त्रक्रिया केली होती.



डॉ. डेन्टन कूली (१९८३)

सहा महिन्यांच्या पूर्ण विश्रांतीच्या दरम्यान एक रीडर यायचा. तो वाचायचा, मी ऐकत असे. कादंबरी, कविता, मेडिकलची पुस्तके, बरंच काही ! मला तसा वाचनाचा पूर्वीपासूनच छंद ! देवाने हात नेले तरी चालतील, पण डोळे शाबूत ठेवावेत एवढीच माझी इच्छा आहे. माझ्या पहिल्या हार्टअटॅकच्या वेळी माझा जणू पुनर्जन्मच झाला होता. डोळ्यांना त्रास नको म्हणून मला स्वत: वाचायला बंदी होती. रीडरच्या मदतीनं मी बरंच काही वाचन केलं. मनन, चिंतन केलं. तसं पाहिलं तर मला पान, चहा, सुपारी, कॉफी कसलंही व्यसन नाही. माझ्या फॅक्टरीतूनही हेच

वातावरण आहे. माझी शरीरयष्टीही स्थूल नाही. कुटुंबातही असा इतिहास नव्हता. म्हणजे हार्ट अटॅक येण्याचं कुठलंही कारण माझ्यासमोर नव्हतं. तरीही हार्ट अटॅक आला अन म्हणून गावात चर्चेचा विषय बनला.

माझ्यावर १९९४ मध्ये दुसरी बायपास सर्जरी झाली. डॉ. लूपनी ती शस्त्रक्रिया केली. त्यानंतर १९९७ मध्ये अमेरिकेत अँजिओप्लास्टी करण्यात आली. मी तिथल्या डॉ. फय्याज शॉल यांना विचारलं ''माझ्याकडे Heart Attack साठी एकही Risk



भाऊ आणि डॉ. लूप (१९९४)



डॉ. मुंशी, भाऊ, डॉ. फय्याज शॉल व डॉ. चौधरी (१९९७)

Factor नसतानाही मला अटॅक का आले ?'' तेव्हा डॉक्टर म्हणाले, ''तुम्हाला वाईट सवयी असत्या, तर या पाच अटॅकमधून तुम्ही वाचू शकला नसता.'' त्यांचं म्हणणं खरं होतं. व्यवसायाची चिंता, तणाव असतोच. त्याचा काय बाऊ करायचा?

यशात महत्त्वाचा वाटा होता माझ्या विचारांचा अन प्रामाणिकपणाचा! आपण इमारत बांधू, कळस चढवू पण पाया मजबूत व ठोस असायलाच हवा. चुकांचाही मी अंतर्मुख होऊन साकल्यानं विचार करीत असतो. मला वाटतं दान-पुण्य करायचं तर तेही सत्पात्री करावं. मूलभूत मूल्यांशी तडजोड करणं मला कधी जमलं नाही. गरजेनुसार, प्रसंगानुरूप सरकारी कार्यालयात थोडाफार पैसा द्यावा लागत असे. तो चुकीचं काम झाकण्यासाठी देत नसे तर काम लवकर व्हावं, वेळ वाया जाऊ नये म्हणून देत असे, ही गोष्ट मी स्पष्ट सांगू इच्छितो.

माणसाची तत्त्वं स्पष्ट असावीत. स्वत:ची कमजोरी अन ताकद याबद्दलची जाणीवही प्रत्येकाला असायला हवी. धंद्यात पावलोपावली तडजोडच करायची असेल तर मग हाच व्यवसाय कशाला? वेश्या व्यवसाय चालविणे किंवा बिअरबार चालविणे काय गैर आहे ? त्यात तर भरपूर पैसा मिळतो. फक्त पैसाच मिळविणं मुख्य उद्देश असेल तर तसे करणे क्रमप्राप्त होईल. माझ्या धर्मात दारू, मांसाहार वर्ज्य आहे, पण याचा अर्थ असा नव्हे की, समोरच्यानं त्याला स्पर्शही करू नये. ज्यानं त्यानं

आपल्या मनाप्रमाणे वागावं. माझ्या घरी माझ्या सुनांपैकी एकही चहा पीत नाही. हा घरच्या वातावरणाचा परिणाम आहे. माणूस सुशिक्षित म्हणजे सुसंस्कृत नव्हे, हेही मला पटतं. सुसंस्कृतपणाला एक वेगळं महत्त्व आहे.

मध्यंतरी जैन उद्योग संक्रमणकाळातून गेला. बराच मोठा सेटबॅक बसला. म्हणतात ना, सूर्यालाही ग्रहण लागतं व ग्रहणानंतर सूर्य अधिक प्रखर तेजानं तळपतो. तद्वत आम्ही परत नव्या दमाने, जिद्दीने सुरुवात केलीय. बघू या, कितपत यशस्वी



निसर्गाशी संधान : ग्रॅनाईट खदान



अत्याधुनिक तंत्रज्ञान : मल्टिमेडिया ॲनिमेशन

होतो ते ! तसं जन्माला येताना काही घेऊन आलो नव्हतो, त्याप्रमाणे जातानाही काही घेऊन जाणार नाही. मग चिंता करायची ती कसली?

**सामाजिक बाधीलकी**

समाजानं मला बरंच काही दिलं. मान-सन्मान, प्रेम, पैसा, प्रसिद्धी अन या ऋणातून उतराई होण्यासाठी मी काहीतरी लहान-सहान गोष्टी करीत असतो. वाकोद गावाचा कायापालट करण्याचा मी निर्धार केला आहे. तिथं समाजमंदिर बांधलंय, नवीन पक्की शाळा बांधलीय. अहमदनगरचं सामाजिक हॉस्पिटल उभारण्याला मदत केलीय. जवळजवळ १ ते १.५ कोटीचा जैन फाउंडेशन ट्रस्ट आहे. त्या द्वारे शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, मेडिकल, खेळ-क्रीडा, आरोग्य सुख-सुविधा पुरविल्या जातात.

मी साहित्यप्रेमी आणि कलाप्रेमी असल्यानं मला वाटतं, जगातील श्रेष्ठ साहित्यिक, कलाकार जळगावमध्ये यावेत, त्यांचे सन्मान व्हावेत. त्या दृष्टीने मी प्रयत्न करीत असतो. बऱ्याच




हाजी नूर मोहम्मदचाचा कॉलेज
शिक्षणाला आधार - सामाजिक उद्धार

कवितांना मी फलकांवर छापून, दगडांवर कोरून जैन हिल्सवर कायमस्वरुपी जिवंत ठेवलं आहे. मला जाणीव आहे, सगळ्यांचे अश्रू काही मी पुसू शकत नाही. शक्य होईल तेवढ्यांचे अश्रू पुसण्याचा, त्यांना हवी ती मदत देण्याचा प्रयत्न करतो.

*जीवनात नीतिमत्ता, कायदा व व्यवहार यांच्यामध्ये संतुलन साधणे हीच यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली!*

निव्वळ कायद्याचा विचार केला तर व्यवहारशून्यतेमुळे कुणी यशस्वी होणार नाही. समाजाकडून आदरभाव मिळणार नाही. संपूर्ण नीतिमत्ता फक्त हिमालयात चालू शकेल. पण तिन्ही गोष्टीचं योग्य संतुलन म्हणजे यश, सफलता! राजकारण्यांसारखी खोटी पोकळ आश्वासनं देणं मला कधी जमलं नाही. मी बोलतो त्याप्रमाणेच वागण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे मला राजकारणात रस नाही. आम्ही व्यावसायिक आहोत. प्रामाणिकपणे दोन पैसे कमवायचे, त्यातला एक पैसा समाजाला द्यायचा हीच भावना असते आमची. राजकारण्यांपेक्षा कमी सेवा आम्ही करीत नाही. खोटं बोलणं, संवेदनाहीन वागणं मला जमणार नाही, अन त्यामुळेच मला राजकारणात यशही मिळणार नाही.

'Never mind the destination, journey was pleasant' या उक्तीप्रमाणे कुठे पोहचलो त्यापेक्षा आतापर्यंतचा प्रवास कसा सुखाचा झाला त्याचाच मी विचार करतो. एव्हरेस्ट गाठले गेलं की नाही, याबद्दल मी कशाला विचार करू? परंतु संस्थेला चिरस्थायी स्वरूप देण्यासाठी माझे प्रयत्न सुरू आहेत. सर्वच क्षेत्रांचा विस्तार विचार सुरू आहे. व्यवस्थापन व सहकारी यांच्यातील संबंध चिरस्थायी राहतील या दृष्टीनेही मी सतत विचार करत असतो. आयुष्यातील प्रत्येक क्षणाचा पुरेपूर उपयोग करायचा माझा निर्धार आहे. येत्या पिढ्यांना मार्गदर्शनपर काही करावं, आपली संस्था देशोपयोगी, प्रगतिशील, गतिमान तथा जागतिक पातळीवर खऱ्या अर्थाने नावाजलेली होऊ शकेल, अशी व्यवस्था करण्याचा प्रामाणिक प्रयत्न मी केला याचं मला समाधान आहे.

मी या जगाचा निरोप घेऊन जाईन तेव्हा एकच वाक्य लिहिलं जावं अशी माझी अंतिम इच्छा आहेः

"Here lies a man, for whom work was life, and life was work".

(येथे चिरविश्रांती घेणाऱ्या महामानवासाठी 'काम म्हणजे जीवन आणि जीवन म्हणजे काम' होते.)

## वाढदिवसाची संकल्पना अमान्य; प्रत्येक दिवस... आव्हानाचा

धों.ज. गुरवे - दै. देशदूत, डिसेंबर, १९९९

कर्मयोगापासून भक्तीमार्गापर्यंत, समाज उणीवांपासून समाज सुधारणांपर्यंत, घवघवीत यशापासून जीवघेण्या अपयशापर्यंत, कुटुंब वात्सल्यापासून कुटुंब उपेक्षेपर्यंत भाष्य करून न थांबणारा कृतिशील समृद्ध जीवन जगणारा विद्याधर कलावंत!

*''ज्याला वेळेची किंमत आहे त्याला घड्याळाची गरज पडत नाही. ज्याला जीवनातील एक क्षणही वाया घालवायचा नाही त्याने घड्याळाकडे पाहण्याची तशी आवश्यकता नसावी.*

सकाळी उठून आपल्या ठरलेल्या गोष्टी करायच्या आणि रात्री झोप लागली तर लगेच झोपून जायचे या निसर्गक्रमात बदल करायचे काय कारण? आपण मात्र दिवसभरातील वेळ ठरवून वाटून दिलेला आहे. सकाळी नाश्त्याची



वाट शोध कामावर भाऊ

वेळ, दुपारी कामावर जाण्याची वेळ, रात्री झोपण्याची वेळ. माझ्या हिशोबाने ही वेळेची आर्टिफिशल डिव्हीजन (कृत्रिम विभागणी) आहे. जीवन हे सलग आहे. कोणताही विचार मनात असला, तर त्याच्यामध्ये ब्रेक करण्याचे काही कारण नाही. ती सतत चालणारी बाब आहे. कधी आत्मा झोपतो का? विचार थांबतात का? नाही. हा निसर्गक्रम आहे. 'आपणावर जी कृत्रिम बंधनं आहेत ती लक्षात घेऊन त्याप्रमाणे जीवन जगण्याचा आपण प्रयत्न करतो, त्याची गरज आहे का?' हा प्रश्न मला नेहमीच पडतो. आपण जास्ती नैसर्गिकरित्या वागलो तर आपल्याला जीवनात जास्तीत जास्त फायदे मिळू शकतील.''

हे विचार आहेत प्रसिद्ध उद्योगपती श्रेष्ठ विचारवंत जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष भवरलाल भाऊंचे.

**गुरव–** तुम्ही कामाला लागलात तेव्हापासून कुटुंबाला वेळ देता आला नाही. म्हणजे काम करीत असताना कुटुंब महत्त्वाचे नाही, असे समजावे का?

**भाऊ–** तुम्ही जीवन जगताना एखादे उदाहरण डोळ्यासमोर ठेवता की नाही? आदान-प्रदान करण्याचे दोन मार्ग असतात. एक तर तुम्ही बोलून करा किंवा दुसरे कृतीने करा. जर तुम्ही स्वतःच्या आचरणाचे उदाहरण त्यांच्यासमोर ठेवले, तर त्यांना भाषण देण्याची गरज आहे का? त्या विरूद्ध समजा, मी व्हिस्कीचा प्याला पित असेल आणि माझ्या मुलाला 'पिणे फार खराब आहे' असे सांगत असेल, तर त्याचा काही योग्य परिणाम त्याच्यावर होणार आहे का?

**गुरव–** म्हणजे तुम्ही कृतीवरच जास्त भर दिला.

**भाऊ–** हो, कारण हजार वेळा बोलण्यापेक्षा प्रत्यक्ष कृती केली, तर समजदार लवकर शिकतो. आजही माझा नातू मला विचारतोः ते का पितात, ते का खातात? त्याला समजावणे मला शक्य आहे, कारण मी तसे करीत नाही. मी जर तसे करीत असलो तर त्याला 'करू नको' असं सांगू शकणार नाही. मुलांच्यासमोर आपले पूर्ण जीवनच खुलं असेल, तर त्यांना आपण वेळ दिला नाही, असं समजण्याचं कारण नाही. तो एक संपर्काचा भाग आहे. मला जर दोघांमधील पसंती विचारली तर माझा भर सांगून मार्गदर्शन करण्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीवर असेल.

माझा मुलगा डॉक्टर झाला पाहिजे, इंजिनियर झाला पाहिजे किंवा एखाद्या विशिष्ट क्षेत्रातच त्याने काम केलं पाहिजे, अशा अपेक्षांनी, प्रथेनुसार, जे पालक

आपल्या मुलांना तयार करू इच्छितात त्यांना मात्र मुलांसाठी वेळ देणे अपरिहार्य आहे. कारण त्यांनी फोकस करून ठेवले आहे. मला मात्र जीवनाकडे अशा पद्धतीने बघायला वेळ मिळाला नाही किंवा तसा विचार करण्यासही वेळ मिळाला नाही.

*विचार केलाच तर मी जीवनमूल्यांचा केला. बऱ्याच गोष्टी आपण केवळ रूढी, प्रथा आणि दुसरे करतात म्हणून करीत असतो, परंतु त्यांच्याबद्दल काही खोलवर विचार करीत नाही.*

**गुरव-** या रूढी व प्रथा समाजावर घट्ट पकड करून बसल्या आहेत, त्यामुळे इतक्या लवकर त्यांचा प्रभाव नाहीसा होईल का?

**भाऊ-** अशा प्रथा नष्ट झाल्या पाहिजेत असा हट्ट आपण कशासाठी धरावा? प्रत्येकाने आपआपल्या पद्धतीने जीवन जगायला पाहिजे. आपल्या पद्धतीने आपण जीवन जगलो, त्यामुळे 'कुठे होतो आणि कुठे पोहचलो?' याचे मूल्यमापन प्रत्येकाने आपल्या पद्धतीने करावे. ते चूक आहे की बरोबर हे आपण सांगू नये. आपणास वाटत असेल की, भवरलालजींचे जीवन अतिशय आदर्श आहे. कुणी दुसरा म्हणेल की, या माणसाने काय केले एवढ्या ३५ वर्षांमध्ये? पाच कोटी रूपयेसुद्धा या माणसाने गोळा केले नाहीत. आम्ही तर या पाच वर्षात पंचवीस कोटी रूपये गोळा केलेत. हे खरे असू शकेल. कारण जीवनाचे मूल्यांकन करण्याच्या त्या व्यक्तीच्या मापदंडातच मूळ फरक असल्यामुळे त्याच्याशी आपले सूर कसे जुळतील? म्हणून त्याच न्यायानुसार त्या व्यक्तीचे मूल्यमापन कसे करावे, हे मी ठरवू नये. आणि माझे मूल्यमापन त्यांनी कसे करावे, हेसुद्धा मी ठरवायला तयार नसावे.

**गुरव-** वाढदिवसाच्या निमित्ताने काही संकल्प आपण करता का?

**भाऊ-** प्रत्येक येणारा दिवस माझ्या दृष्टीने संकल्पाचाच दिवस असतो. 'नित्य नवदिवस असावा नव जागृतीचा' असाच माझा विचार आहे. मी वाढदिवसाच्या निमित्ताने काहीच वेगळं करीत नाही.

*प्रत्येक दिवस नवा असल्यामुळे तो नवनवीन आव्हानं घेऊन येत असतो. आज व्यवहाराचे असतील, कधी परिवाराचे असतील, कधी मित्रांचे असतील, कधी सामाजिक असतील.*

रोज असे आव्हान समोर उभे असते. त्या क्षणाला त्या *आव्हानाशी एकजीव होऊन त्या गोष्टीचा विचार करणे हा माझा निर्धार आहे* आणि तो सतत तसा राहणार आहे. मी जर एखाद्या दिवसाला महत्त्व देत नसेल, तर त्यादिवशी काय करायचे हे

कसे ठरविणार? इतर लोक मला वाढदिवसाची जाणीव करून देतात, हा भाग वेगळा. तो त्यांचा दृष्टीकोन आहे. त्यामुळे मी त्याला चांगले किंवा वाईट कसे म्हणणार? दुसऱ्याने आपल्या जीवनाकडे कसे बघावे आणि आपण त्याच्या जीवनाकडे कसे बघावे हे ठरविणारा मी कोण? माझे जीवन कसे जगावे, याचा अधिकार मला आहे आणि त्या पद्धतीने माझे जीवन मी जगत असतो.

**गुरव–** हा बुद्धी प्रामाण्यवाद्यांचा विचार. बुद्धी प्रामाण्यवादी म्हटले तर देवावर, धर्मावर त्यांचा विश्वास नसतो, कृतीवर विश्वास असतो. प्रश्न असा उपस्थित होतो की, आपण आपल्या जीवनात देवाला व धर्माला कितपत स्थान देता?

**भाऊ–** मी निश्चितपणे असे मानतो की, जगामध्ये जे घडते आणि ज्या पद्धतीने ते घडते त्याच्यामध्ये एक डेफिनेट ऑर्डर आहे. ती ऑर्डर सर्वसाधारण माणसाकडून आकलन होईल अशी नाही. संपूर्ण सृष्टीमध्ये जी सुपरपावर आहे, ती आणण्यासाठी जी काही यंत्रणा आहे, त्या यंत्रणेला जर तुम्हाला ईश्वर म्हणायचे असेल तर माझा ईश्वरावर शंभर टक्के विश्वास आहे. याच प्रकारे धर्मावरही माझा विश्वास आहे असे समजा. परंतु आपण हे विचारणार असाल की, तुम्ही कधी मंदिरात गेलात का? त्या ठिकाणी तुम्हाला आत्मिक समाधान मिळते का? तर माझे उत्तर 'नाही' असे आहे. याचा अर्थ मी मंदिरात जात नाही असा आहे का? तर तसेही नाही. मी मंदिरात जातो. मी मंदिरात गेलो तर माझ्या कुटुंबाला व मित्रांना चांगले वाटते, मग मी का जाऊ नये?

ज्या ठिकाणी तुम्हाला आत्मिक समाधान मिळत असेल आणि त्या जागेला जर तुम्ही ईश्वर म्हणणार असाल किंवा मंदिर म्हणून मानणार असाल, त्याला धर्माचे स्वरूप देणार असाल तर माझी काही हरकत नाही. मी ते मानतो, माझी ती श्रद्धा आहे. परंतु आपला असा दावा असेल की, ईश्वराकडे जाऊन आल्यामुळे तुमचे सगळे बरोबर होऊन जाईल, तर मला तो नाकर्तेपणा मान्य नाही.

**गुरव–** तुम्ही म्हणाले की, मंदिरात गेल्याने घरातील लोकांना सुख-समाधान मिळत असेल तर का जाऊ नये? मग बिअर बारमध्ये जाणाऱ्या व्यक्तीला समाधान मिळत असेल तर त्याने तेथे का जाऊ नये?

**भाऊ–** एखाद्या माणसाला बिअर बारमध्ये समाधान मिळत असेल तर त्याने अवश्य तेथे जावे, पण आपल्या तब्येतीला सांभाळून. मूळ प्रश्न असा आहे की, दारू पिणे तब्येतीला हानिकारक आहे, तर ते का करावे? त्याच्यामध्ये धर्म कुठे

आला? ती एक सवय आहे. एखादा तरी प्रमाणित धर्मग्रंथ दाखवा की, ज्यात दारू पिणे फायद्याचे आहे, सिगारेट पिणे किंवा मांसाहार करणे चांगले आहे असे लिहिलेले आहे. तुम्हाला असे कुठेच लिहिलेले आढळण्याची शक्यता फारच कमी आहे. जर ते तुम्हाला आवडत असेल, तुमच्या तब्येतीला मानवत असेल, तुमच्या कुटुंबीयांना समाधान-आनंद देणार असेल, तर मला त्याबद्दल काहीही म्हणायचे नाही. पण तुमच्या कुटुंबीयांना तुम्ही व्यसनाधीन होणे कसं आवडेल?

**गुरव-** जसे एखादे ध्येय प्रयत्न करून साधता येते, त्याप्रमाणे दैवीशक्ती साध्य करता येते का?

**भाऊ-** हो, भक्तिमार्गाने ते शक्य आहे. सर्वसाधारण माणसाला दैवीशक्ती साध्य झाली असे मला अजूनपर्यंत तरी दिसलेले नाही.

*भक्तीमार्गाने सुख, शांती प्राप्त करून घेणे आणि इहलोकीचा विचार सोडून परलोकाकडे डोळे लावून बसणे हा विचार सर्वसामान्यांना जमण्यासारखा नाही. ज्यांना तो जमला त्यांना आपण संत म्हणतो, काहींना आपण देव म्हणतो तर काहींना आपले दैवत मानतो.*


असामान्य बुद्धीमत्त्व : संत ज्ञानेश्वर

ज्ञानेश्वरांनी वयाच्या फक्त १४ व्या वर्षी 'ज्ञानेश्वरी' लिहिली. पण खरंच ते १४ वर्षांचे होते, हे मी मानायला तयार नाही. त्यांना पूर्वजन्माची ती देणगी असावी. नाही तर मला त्याचा दुसरा अर्थच लागत नाही. जेव्हा अशक्य कोटीतील गोष्ट जे कुणी लोक खरी करून दाखवितात त्यांनाच आपण संत, महात्मे असे म्हणतो. आता काळाप्रमाणे या व्याख्या बदलत आहेत.

ज्या काळात ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम होऊन गेले, त्या काळात अजून इतरही संत, महात्मे होऊन गेले. म्हणजे त्या काळातील ते वातावरणच तसे होते. आताच्या काळात असे संत का निर्माण होत नाहीत? कारण काळ बदलला आहे. ज्या वेळी लेनिन रशियात, लिंकन अमेरिकेत आणि गांधीसारखे नेते भारतात होते, त्या वेळी इतर देशांमध्येसुद्धा तसे महान नेते होते. याचा अर्थ असा की, त्या

वेळी तशा लोकांच्या उदयास पोषक असे वातावरण होते. मात्र आजच्या काळात असे नेते कुठेच दिसत नाही. हा सगळा काळाचाच महिमा म्हणावा लागेल.

**गुरव–** यशाच्या बाबतीत प्रयत्न आणि परिश्रम यांच्यावरच तुमचा जास्ती विश्वास आहे. पण काही लोक म्हणतात, 'मी खूप कष्ट व मेहनत केली, पण नशिबाने साथ न दिल्यामुळे मला अपयश आले.' या नशिबाच्या बाबतीत आपल्याला काय वाटते?

**भाऊ–** जे घडते ते केवळ प्रयत्नामुळे घडते असे विधान जर आपण केले, तर ते चुकीचे ठरण्याची शक्यता आहे. कारण खूप प्रयत्न करूनही अपयश मिळते अशी हजारो उदाहरणे आहेत. मग असे म्हणायचे का की, त्यांनी अपयशासाठी प्रयत्न केले. प्रयत्नांनी सगळं घडत असेल, तर प्रयत्नांनी अपयश मिळाले असे म्हणायचे का? कर्मयोगाचा अर्थ मूळ तसा नाही. गेल्या तीन वर्षांपासून आम्ही खूपच आर्थिक संकटातून जात आहोत. जवळजवळ १८५ कोटी रुपयांचा तोटा झाला. मला सांगा, याच्यासाठी आम्ही प्रयत्न केले का? नाही. तरी अपयश आले. मग त्याचे कारण काय? तुम्ही जो नशिबाचा मार्ग यशासाठी किंवा अपयशासाठी शोधला आहे, तो फार सोपा मार्ग आहे.

*आपण अपयशात नशिबाला जबाबदार धरणार असू तर यशातसुद्धा नशिबालाच जबाबदार धरले पाहिजे. परंतु अपयशाच्या वेळेला नशीब आणि यशाच्या वेळेला स्वप्रयत्न हे जे दुटप्पी धोरण आपण वापरतो, त्याच्यामध्ये मला विरोधाभास वाटतो.*

तथापि यशाच्या वेळेला नशीब आणि अपयशाच्या वेळेलाही नशीब मानणारे लोक समाजात आहेत. म्हणजे प्रयत्नांची त्यांना आवश्यकताच वाटत नाही. जर आपण नशिबालाच जास्ती महत्त्व द्यायला लागलो, तर दुसरे विषय अर्थहीन ठरतात, प्रयत्नसुद्धा. तसे करणे अयोग्य आहे.

**गुरव–** हे लोक नशीब व आळस यांना सारखे समजतात का?

**भाऊ–** माझे वैयक्तिक मत असे आहेः प्रासंगिक स्वरुपी जी काही विशिष्ट वास्तववादी परिस्थिती निर्माण होते आणि तिला धरून जे काही निर्णय घेतले जातात ते उचित ठरले, तर ते निर्णय आपल्या कर्तृत्वाचे प्रतीक म्हणून मानतात. परिस्थिती बदलली व अपयश आले, तर ती बाब आपण नशिबाचा हवाला देऊन सोडून देतो. जर परिस्थितीजन्य निर्णय घेतले असतील आणि तिच्यात फरक पडला

असेल आणि याला जर आपण नशीब म्हणत असू, तर माझी काही हरकत नाही. प्रत्येक काम करताना आपण जे काही गृहीत धरतो तसे घडले नाही तर कुणासही दोष देता येणार नाही. उदाहरणार्थः पुढील वर्षी महाराष्ट्र सरकार ठिबक सिंचनासाठी ५० कोटी रू. सबसिडी देईल असे गृहित धरून मी १०० कोटी रुपयांचा माल शेतकऱ्यांना देऊन टाकला. परंतु सरकारजवळ पैसा नसल्यामुळे ५० कोटी रु. ऐवजी फक्त २५ कोटी रु. सबसिडी दिली. मग याला आपण नशिबाचा खेळ म्हणणार की प्रयत्नाचा खेळ म्हणणार? मी याच्यासाठी प्रयत्न केले का की, सरकारने मला पैसे देऊ नये? मी काहीच केले नाही. तरी मी नशिबाला दोष द्यावा का?

**गुरव–** हरित क्षेत्रात आपण मोठी क्रांती केली. परंतु मागील ३-४ वर्षांपासून आपली कंपनी तोट्यात जात आहे. याची आपणास कितपत खिळ बसली?

**भाऊ–** खिळ नक्कीच बसली. कंपनीच्या विकासाची गती कमी झाली. आम्ही विचार करण्याच्या पद्धतीत परिस्थितीजन्य बदल केला. पूर्वी ज्या पद्धतीने आम्ही माणसांवर विश्वास ठेवत होतो, तो नंतर ठेवता येणं शक्य राहिलं नाही. एखाद्या माणसाला कामाची जबाबदारी दिल्यानंतर तो ते काम बरोबर करीत आहे की नाही, हे तपासण्याची यंत्रणा आधी नव्हती. ही यंत्रणा निर्माण केल्यानंतर अशा प्रकारचा विश्वास टाकणे अधिक योग्य ठरेल. त्याच्या आधी तो टाकणे धारिष्ट्याचेच ठरते. प्रत्येक माणूस चांगला आहे, असे गृहीत धरायला हरकत नाही. परंतु तो तसाच चांगला राहील यासाठी निरीक्षकाची यंत्रणा उभी करणे आवश्यक आहे. त्यानुसारच त्याच्या हातात अधिकार देणे जास्ती योग्य आहे. याचाच अर्थ असा की, तो प्रत्येक वेळा काम करीत आहे आणि त्याने काय करायचे होते ते होत आहे की नाही, याचे मूल्यमापन वेळोवेळी झाले पाहिजे. त्याने प्रमुख उद्दीष्ट किती प्रमाणात साधले याचाही अभ्यास काटेकोरपणे केला पाहिजे.

समजा, एखाद्याने तुमच्या पेपरचे सरक्युलेशन एक लाख करण्याचे उद्दीष्ट ठरवले. मग त्यासाठी त्याने काही विशिष्ट वर्गाला लाच देणे, त्यांना स्त्रिया पुरवणे किंवा काही लोकांना ब्लॅकमेल करणे, त्यांच्याकडून पैसे मागणे वगैरेसारखी कामं करून पैसा कमविला आणि त्या पैशांचा उपयोग स्वतःसाठी केला नाही, तर त्याचा उपयोग पेपर पुढे नेण्यासाठी केला. आणि अशा पद्धतीने उद्दीष्ट सफल झाले. पण त्याने संस्थेची जी ध्येयधोरणं, मूल्यं होती त्यांच्याशी समझोता केला, तडजोड केली, त्यांची पायमल्ली केली, तर ते योग्य ठरेल का? आपण तसे घडू द्यावे का?

मूल्य आणि उद्दीष्ट, साध्य आणि साधन या दोन्ही गोष्टींचा सारासार विचार करून प्रत्येक वेळा तो जे काही करीत आहे ते योग्य आहे की अयोग्य, त्याचा निकष लावून वेळोवेळी दोन-तीन महिन्यात आपल्याला त्याची पडताळणी करता आली पाहिजे. तशी यंत्रणा आपल्याजवळ नसेल, तर आंधळेपणाने विश्वास टाकणे हे गाढवपणाचे ठरू शकते, हे मी अनुभवाने सांगू शकतो.

विश्वास ठेवायचा की नाही ठेवायचा, हे प्रत्येकाच्या स्वभावावर अवलंबून असते. व्याजाचा हिशोब करणारा माणूस सहसा कुणावर विश्वास ठेवत नाही. त्याची श्रद्धा, साधनं, साध्य एकच आहे आणि ते म्हणजे पैसा. त्याने पैसा कमविणे ठरविले आहे, तेव्हा त्या माणसाला तुम्ही साध्य, साधनांविषयी सांगितले तर त्याला पटणार नाही. साध्य व साधनांची शुचिता ठेवूनही जर कुणी वागत असेल तरीही त्याच्या कामाच्या मूल्यमापनासाठी एक सिस्टीम असणे, यंत्रणा असणे आवश्यक आहे. अशा यंत्रणेअभावी आपण इतरांवर विश्वास टाकत राहिलो, तर आपण त्रासात येऊ शकू. आम्ही तसे अडचणीत आलो होतो.

**गुरव–** चांगला समाज बंधन घालून निर्माण होईल की संस्काराने? आपण विचार करतो की, गुटखा खाल्ल्यामुळे किंवा दारू प्यायल्यामुळे शरीराची हानी होते. मग यांच्या उत्पादनावरच शासनाने बंदी घालावी किंवा कसे? याबाबतीत उद्योगपती या नात्याने आपण काय सांगू शकाल?

**भाऊ–** समाजातील मूलभूत व्यवस्था कायद्याच्या अधिकाराने कधीच बदलता येत नाही. ती बदलण्याचा प्रयत्न जरी केला तरी तो वायफळ जाणार आहे हे निश्चितच समजा. परंतु समाजामध्ये समाजाने स्वीकारलेल्या काही सवयी असतात. संस्कार ही बाब सवयीपेक्षा वेगळी आहे. दारू पिणे, गुटखा खाणे हा संस्काराचा भाग नाही. त्याला सामाजिक मान्यता नाही. कुठेही ते पिण्याबाबत, खाण्याबाबत शिफारस केलेली आढळत नाही किंवा कोणत्या धर्मात असे सांगितलेले नाही. याला धर्माचा, संस्काराचा, संस्कृतीचा कुठेही आधार नाही. एखाद्या माणसाने स्वार्थापोटी समाजाची दिशाभूल करून समाजाच्या गळी उतरवलेली ती गोष्ट आहे.

समाजातून या गोष्टीला बाहेर काढायचे असेल, तर काही वेळेला असल्या प्रकारची बंधने टाकणे क्रमप्राप्त आहे. कारण दुसरी पद्धत आहे संस्कारित करून किंवा सुशिक्षित करून बदल घडवून आणणे. ती फार लांबच्या पल्ल्याची मजल आहे. तिच्यामध्ये आपल्या दोन पिढ्या घालवायच्या की नाही, हे समाजाने निश्चित करायला पाहिजे. ५० वर्षानंतर संस्काराने लोक बदलतीलही. पण तोपर्यंत १०

टक्के लोक त्यामुळे मरण पावलेले असतील. अशा पद्धतीने तुम्ही केवळ संस्काराने व शिक्षणाने ते घडवून आणणार असाल, तर ते योग्य होणार नाही. कारण मध्यंतरीच्या काळामध्ये समाजाचे अतोनात नुकसान झालेले असेल. ते असह्य असल्यामुळे कायद्याचा वापर करून घेणे आणि सक्तीची उपाययोजना करणे, हे गैर आहे असे मला वाटत नाही. तुम्ही कितीही उदारमतवादी असलात तरीसुद्धा तसा विचार करणे कठीण आहे.

**गुरव-** तुमच्या दिनचर्येतील बहुतांशी वेळ आर्थिक नियोजन आणि मार्केटींग परिस्थितीच्या अवलोकनात जातो. त्यामुळे आपण चांगल्या संकल्पनांना वेळ देऊ शकत नाही याची आपणास खंत वाटते का?

**भाऊ-** माझ्या उभ्या आयुष्याला 'रात्र थोडी, सोंगे फार' ही व्याधीच लागली आहे. म्हणून मी एकाच वेळी एवढ्या योजना आखत असतो की, त्या खऱ्या अर्थाने संपणार नाहीत. ते अशक्य आहे आणि ते अशक्य असल्यामुळेच मी त्या नजरेसमोर ठेवतो, जेणेकरून मला थांबायला कुठे जागा नसावी. मी ठरविले की, ५०० एकर शेतामध्ये जिथे जिथे एक एक इंच जमीन दिसत असेल तेथे तेथे चांगले पिक लावता आले पाहिजे; उगवत नसेल तर तिथे उगवता आले पाहिजे; वांझ जमिनीला फुलविता आले पाहिजे. आणि तसं मी जैन हिल्सवर घडवू शकलो.

या जगामध्ये जे जे आपण करीत आहोत त्याच्यापेक्षा चांगल्या प्रकारे करता आले पाहिजे, असे उद्दीष्ट आपण ठेवले तर कधी तरी ते साध्य होईलच ना? आणि नाहीच झाले तर आपण डोळ्यासमोर उद्दीष्ट ठेवायचे नाही का? ठेवायचे. त्याच्यामुळेच मग काळ, वेळ, वर्ष यांचा विसर पडतो. माझा प्रत्येक संकल्प चांगलाच असतो, आहे आणि असेलही.

**गुरव-** आपल्या संपूर्ण आयुष्यामध्ये अत्युच्च आनंदाचा क्षण कोणता?

**भाऊ-** मला हा प्रश्न नेहमीच विचारला जातो. पण मला त्याबद्दलचा प्रसंग काही आठवतच नाही - दुःखाचाही आठवत नाही आणि आनंदाचाही आठवत नाही. मला सांगा, आनंद व दुःख हे सापेक्ष नाहीत का? आहेत. त्याला सामोरे जाणे ही वृत्ती असेल तर प्रश्नच उरत नाही. आनंद मला विलक्षणपणे कधी जाणवत नाही. मला आनंद-दुःख या संकल्पना आवडत नाहीत. त्यांच्यामुळे माणसाने जो लहानलहान गोष्टीत आनंद घ्यायला पाहिजे, त्यापासून तो वंचित राहतो. तसं कधी माझ्याकडून घडलं तर त्याची मला खंतही वाटते.



प्रसन्नतेचा धबधबा : नातवंडांसह आजोबा
जैन हिल्स, वर्षाऋतु (२००६)

नातवंडांच्या सोबत खेळून किंवा फुलांच्या सहवासात राहून जो आनंद माणसाला मिळायला पाहिजे तो आनंद घेण्यासाठी जी मनःस्थिती लागते ती समोर असली तर त्याच्यात आनंद वाटतो. पण त्याचसारखी दुःखाची परिस्थिती माझ्यासमोर आली तर त्या वेळी मला तेवढेच दुःखही वाटते.

मी अत्यंत संवेदनशील आहे. राजाला दिवाळीची आठवणही नसते. तसेच कामगारालासुद्धा प्रत्येक दिवस कामाचा असल्याने तो सारखाच वाटतो. मी मनाने राजा आहे व कामासाठी कामगार आहे. त्यामुळे माझ्यासमोर असले दिवस आलेत तर मला त्यातील फरक तो कसा कळेल? कुणी तरी मला जाणीव करून देते की, आज दिवाळी आहे. पण मी ते विशेष मनावर घेत नाही. माझा संपूर्ण दिवस त्याच्यात जाईल असे कधी घडत नाही.

*मी मनाचा राजा आणि कामाचा गुलाम. मला सारेच क्षण सारखे.*

**गुरव-** तुम्ही जीवनातील दुःख कसे पचविता?

**भाऊ-** या अगोदर सांगितले आहे की, मला जशी सुखाची जाणीव होत नाही तशी दुःखाचीही होत नाही. सुख व दुःख या कल्पना एवढ्या मोठ्या आहेत की, त्या खऱ्या अर्थाने सरळ आपल्या आत्म्याशी संबंध ठेवतात. पण त्यांना आपण

सर्वसामान्य माणसांनी अगदी लहान समजून टाकले आहे. एखादा पुढारी भाषणामध्ये सर्रास सांगत असतो की, मला तळागाळातील लोकांसाठी कार्य करायचे आहे. तसे आपण सहज सांगत असतो की, मला दुःख झाले किंवा सुख मिळाले. सांगा, कसले दुःख आणि कसले सुख? एखाद्या वेळी लोकांना आनंद वाटला म्हणजे तुम्हाला वाटला इथपर्यंत ठीक आहे. पण तुम्ही स्वतःचे मूल्यमापन करून स्वतःला वेगळे समजून घेता. मला तसे कधीच वाटले नाही.

मी माझ्या सहकाऱ्यांसोबत नेहमी असतो. येथील झाडांच्या सावलीत बसतो. मला याची कधीच जाणीव झाली नाही की, मी एवढा मोठा उद्योगपती माणूस आहे आणि मी येथे त्यांच्याबरोबर काय करीत आहे. बऱ्याच वेळेला लोकांना याचे आश्चर्य वाटते. माझ्या मुलांनाही त्याचे आश्चर्य वाटते. लोक तर मला नेहमी म्हणत असतात की, शेती व्यवसायात पडण्यापेक्षा एखादा गाड्यांचा किंवा इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंचा कारखाना टाकला असता, तर गडगंज संपत्ती कमविता आली असती. जमीन घ्यायची आणि विकायची असाही व्यवसाय केला असता, तर अर्धे जळगाव आपले राहिले असते. पण मला मात्र वाटतं की, हे सर्व कशासाठी? मला त्यातून काहीच समाधान लाभले नसते. आतापर्यंत जी निर्मिती झाली त्याच्यामुळे दुसऱ्यांना जो दिलासा मिळाला त्यातच मला खूप आनंद आहे. दुसऱ्यांच्या जीवनात आनंद निर्माण करण्यातच माझा आनंद आहे.

मोठेपणाच्या मोहात मी कधी कुणाकडे गेलो नाही. मी तुमच्याकडे येऊन अशी अपेक्षा व्यक्त केली का की, तुमच्या पेपरमध्ये माझ्याबद्दल चांगले छापा. असं करणं मला आवडत नाही. मी असे कधीच करीत नाही. मला लहान किंवा मोठा बनविण्याचे अधिकार मला दुसऱ्या कुणाच्या हातात द्यावयाचे नाही. आपल्या मूल्यमापनात मी मोठा असेल तर आहे आणि नसेल तर नाही. माझ्या मनामध्ये मात्र मी काय आहे याची मला जाणीव असावी. माझ्या सद्सद्विवेकबुद्धीला धरूनच मी वागत असतो.

**गुरव-** या तुमच्या मर्यादित गरजा झाल्यात, पण अमर्यादित गरजा वाढत आहेत त्याचे काय?

**भाऊ-** परवा माझ्या थोरल्या नातवाला मी गुजराथमधील एका प्रसिद्ध तीर्थक्षेत्रावर घेऊन गेलो होतो. त्या ठिकाणी धर्मशाळेत जेवताना माझा नातू माझ्या बाजूला बसलेला होता. त्याने एका भिंतीवर फलक वाचलाः 'थाली धो कर पीजिए।'

त्याने मला विचारले की, याचा अर्थ काय? मी उत्तरलो की, ताटातील सर्व जेवण संपल्यानंतर ताट धुऊन ते पाणी पिणे असा त्याचा अर्थ आहे. जेवण झाल्यानंतर त्यात काही शिल्लक राहू नये हा त्यामागील उद्देश आहे. तो मला म्हटला, ''माझ्या ताटात तर जास्ती जेवण आहे. मला ते खाणे शक्य नाही.'' मी त्याला म्हटले, ''काही हरकत नाही. मी खाऊन घेईल. तुला जेवढे शक्य आहे, तेवढे खा.'' तुम्हाला आश्चर्य वाटेल की, त्याने ताटात वाढलेले जेवण जास्त असूनही ते पूर्ण खाऊन झाल्यानंतर, मला पुढे काहीही न विचारता, ताट धुऊन पाणी पिऊन घेतले. त्याच्या लक्षात आलं की:

*लहान-सहान वस्तूसुद्धा वाया न जाऊ देता त्यांचा वापर करणं गरजेचं आहे. गरजा मर्यादित ठेवणं, हे जीवन सुख-समाधानाने जगण्याचं गुपित आहे.*

**गुरव-** हीच कृती तुम्ही फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये कराल का?

**भाऊ-** हो, बिनधास्त करेल. कारण दुसरे काय म्हणतील हा प्रश्न माझ्यासमोर सहसा नसतोच. ते माझे पैसे देतात का? मग ते काय म्हणतील याची मला फिकीर करायचे काय कारण? आपल्या पद्धतीने जगायला आपण शिकले पाहिजे. आपल्या सुखाचा रिमोट दुसऱ्यांच्या हातात देत असलो, तर आपण सतत धावतच राहू. त्यामुळे दुःखच पदरी येईल.



पुस्तकांचा संग, चिंतनाचा व्यासंग : वाचनात मग्न भाऊ

**गुरव-** या धकाधकीच्या जीवनातही तुम्ही वाचन कसे काय करता?

**भाऊ-** मी आजकाल जास्ती वाचू शकत नाही, याची मला खंत आहे. परंतु मी जे काही वाचतो त्याच्यावर अंमल करतो. वाचन केलेले मला जर पटले, तर तसेच जीवन जगतो आणि तो वाचन झालेला मुद्दा माझ्या जीवनाचा अविभाज्य घटक होऊन जातो. त्यामुळे तुम्हाला वाटते की, मी खूप वाचन करतो. मी कोणतीही गोष्ट विचार केल्याशिवाय करीत नाही. त्यामुळे वाचनामागे माझे विचार असतात. एक उदाहरण सांगतो.

माझ्या नातवाने काळा चष्मा लावला आणि जीन्स पॅन्ट घातली. मी त्याला विचारले की, तू टिव्ही पाहतो त्यातील डाकू, स्मगलर कसे कपडे घालतात? त्याने त्याचे वर्णन सांगितले, ''काळा चष्मा व भडक रंगाचे कपडे घालतात.'' मी त्याला म्हटले की, तूसुध्दा तसेच कपडे घातले आहेस. त्याने सांगितले, ''आईने ते मला घालायला दिले होते.'' मी म्हटले, ''तुझ्या आईने तुला विहिरीत उडी मारायला लावली, तर तू मारशील का? तुला जर कळते की, ते वाईट आहे मग ते कशाला करतोस?'' त्या दिवसानंतर त्याने तसे कपडे घालणे बंद केले.

*केवळ पुस्तक वाचून जमत नाही. मुलं, माणसं, घटना यासुद्धा वाचता आल्या पाहिजेत. तरच समृद्ध जीवन जगता येईल.*

**गुरव-** जीवनात कुणाला आदर्श मानता?

**भाऊ-** व्यावसायिक व उद्योग क्षेत्रामध्ये जमशेदजी टाटा यांना आदर्श मानतो आणि नवीन पिढीमध्ये राहुल बजाज. साहित्यात वि.स. खांडेकर, राजकीय क्षेत्रात जवाहरलाल नेहरू, वीर सावरकर, लोकमान्य टिळक. जीवन जगण्यासाठी गांधीजी.

**गुरव-** आत्मचरित्र लिहिण्याबाबत आपण काही विचार केला आहे का?

**भाऊ-** मी आत्मचरित्र लिहावे असा बऱ्याच जणांचा आग्रह आहे. खरं म्हणजे माझ्याही मनात ते आहे. विचार नव्हे, पण माझे जे अनुभव आहेत त्याचे शब्दांकन करावे. त्याचे कारण असे, जर मी आत्मचरित्र लिहू शकलो तर कदाचित माझ्या हातून झालेल्या चुका आणि माझ्या विचारांमध्ये किंवा जीवनामध्ये जे काही खाचखळगे आले ते दुसऱ्यांना टाळता येतील. त्यांना एक विचार करण्याची दिशा प्राप्त होईल, ही एक शक्यता आहे. हे विचार पुढील काळामध्ये किती परिणामकारक असतील ते मला माहित नाही. परंतु असे काही लिहिता आले, तर आपण अवश्य लिहावे, असे मला वाटायला लागले आहे.

**गुरव-** या निमित्ताने तरूण पिढीसाठी काही सूचना करू इच्छिता का?

**भाऊ-** कठोर परिश्रम, कठोर परिश्रम. मग ते यश मिळविण्यासाठी असो की अपयशातून बाहेर पडण्यासाठी. अपयश असेल तर त्याच्यातून मार्ग काढण्यासाठी आणि यश असेल तर ते सातत्याने टिकवून ठेवण्यासाठी- फक्त कठोर परिश्रम!

## जीवनातील संकटे हा खरा परीक्षेचा क्षण

शिबिरार्थी मुलं मुली - दै. देशदूत, जून,२०००

मोठ्या माणसाकडून 'चांगला माणूस' होण्यासाठीचे विचार थेट शाळकरी मुलांच्या स्तरावर जाऊन सांगणारे भवरलालजी तुम्हाला इथं भेटताहेत. प्रश्नांमधील निर्व्याजता अधिक भावते का उत्तरांमधला प्रामाणिकपणा हे आपलं आपणंच ठरवा!

जळगाव प्रोग्रेसिव्ह लेडिज ज्युनिअर चेंबरतर्फे गत सप्ताहात शालेय लहान मुला-मुलींसाठी 'नालंदा ए-वन व्यक्तिमत्व विकास' शिबीर घेण्यात आले. जैन हिल्सवरील 'जैन गुरूकुल' मध्ये या शिबिराचा समारोप झाला. या प्रसंगी जैन उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष उद्योगपती भवरलालजी जैन यांनी शिबिरार्थी मुला-मुलींना मार्गदर्शन करण्याऐवजी त्यांना ''तुमच्या मनातील कोणताही प्रश्न विचारा, त्यास मी उत्तर देतो'' असे आवाहन केले. त्यामुळे सर्व शिबिरार्थींची कळी खुलली. जस-जसे प्रश्न विचारले गेले आणि त्यांची




शिबिरात प्रश्न विचारताना विद्यार्थी

भवरलालजी उत्तरे देत गेले तस-तशी या कार्यक्रमाची रंगत वाढत गेली. शालेय लहान मुला-मुलींनी मोठ्या कल्पकतेने प्रश्न विचारले आणि त्या प्रश्नांची भवरलालजी जैन यांनी तेवढ्याच खुमासदारपणे उत्तरे दिली.

**शिबिरार्थी-** आपल्या जीवनातील यशाचे रहस्य काय?

**भाऊ-** तुला दोन मिनिटात कसं सांगणार? ते समजून घेण्यासाठी तुलाही ३५ वर्षे काम करावे लागणार ! तरीही मी दोन महत्त्वाच्या गोष्टी सांगतो. जीवनात यश संपादन करावयाचे असेल तर प्रामाणिकता व कठोर परिश्रम हे दोन खांब आहेत. मी जीवनात संपूर्णपणे यशस्वी झालो, असे मानत नाही. परंतु यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले आहेत.

**शिबिरार्थी-** तुमच्यासारखे मोठे बनण्यासाठी मी काय करू?

**भाऊ-** माझ्यासारखेच का? माझ्यापेक्षाही मोठं बना... आपली उद्दिष्टे मोठी ठेवा. मी मोठा माणूस आहे, असं मला वाटत नाही... शिवाय नक्कलच कशाला करावी? मला अनेक वेळा बायपास सर्जरीला सामोरे जावे लागले आहे... तुमच्या नशिबी असं काही येऊ नये, अशी माझी इच्छा आहे. माझ्यापेक्षा तुम्ही निश्चित मोठे बनू शकता. कारण आमच्या काळापेक्षा आताचे सामाजिक वातावरण बुद्धी विकास-विस्तारासाठी खूपच पोषक आहे. आधुनिक तंत्रज्ञान सहजतेने उपलब्ध आहे. संपर्कसाधनेही भरपूर वाढलेली आहेत.



भाऊंच्या उत्तरावर प्रसन्न, उत्सुक व तल्लीन शिबिरार्थी

**शिबिरार्थी–** मला 'चांगला माणूस' होण्यासाठी काय केले पाहिजे?

**भाऊ–** पहा, किती चांगला प्रश्न विचारला आहे या मुलाने? या शिबिरार्थीला 'मोठा माणूस' व्हायचे नाही, 'चांगला माणूस' व्हायचं आहे. सर्वच मोठी माणसं चांगली असतात, किंवा सर्वच चांगली माणसं मोठी असतात, असं नाही.

*चांगला माणूस होण्यासाठी प्रामाणिकता व कठोर परिश्रमाबरोबरच आवश्यकता आहे ती स्वत:ला विसरून दुसऱ्यांना मदत करणाऱ्या प्रवृत्तीची!*

इतरांसाठी संवेदना व दयाभाव असेल तर त्यांना मदत करणे सोपं जाईल. एकटा माणूस कधीही मोठा होऊ शकत नाही. त्याला इतरांची मदत घ्यावीच लागते. या नात्याने प्रत्येकाने इतरांना मदत करणेही महत्त्वाचे आहे. याशिवाय कोणत्याही चांगल्या किंवा मोठ्या कामासाठी चुकीचे काम करावे लागणार नाही, याची दक्षता घ्यावी लागेल. त्यासाठी वेळ लागला तरी धीर धरणं आवश्यक आहे.

**शिबिरार्थी–** आपण जीवनात आलेल्या संकटांशी मुकाबला कसा केला?

**भाऊ–** जीवनातील कोणत्याही संकटाशी सामना करण्यासाठी तुमच्यामध्ये 'आत्मविश्वास' हा निश्चित असावा. संकटावर मात कशी करता येते याचे ज्ञान असणे आवश्यक आहे. संकटसमयी डगमगता कामा नये. हा जीवनातील परीक्षेचा क्षण असतो. अशा वेळी चुकीचा मार्ग अवलंबता कामा नये.

**शिबिरार्थी–** 'प्रत्येक यशस्वी पुरूषामागे स्त्रीचा हात असतो,' असं म्हणतात. आपल्या यशस्वीतेचे रहस्य काय?

**भाऊ–** पुरूषाच्या यशस्वीतेमागे स्त्रीचा हात असतो, हे बरोबर आहे. ही सुरुवात आईपासून होते. आईचा सहवास व शिक्षण (संस्कार) सर्वांनाच जास्त काळ लाभतो, असं नाही. ज्यांना ते जास्त काळ लाभते ती भाग्यवान माणसं. मध्यम वयात पुरूषाचे यश हे 'पत्नी' च्या सहकार्यावर अवलंबून असते. महिलांमध्ये 'निगेटीव्ह पॉवर' (नकारात्मक शक्ती) मोठ्या प्रमाणात असते. माणसाच्या यशस्वीतेसाठी पत्नीच्या त्यागाची तेवढीच आवश्यकता असते. त्या दृष्टीने माझ्या पत्नीने स्वत:च्या व्यक्तीत्त्वाला विसरून मला सहकार्य केले.

**शिबिरार्थी–** यशस्वी जीवनासाठी आपण कोणाला आदर्श मानले?

**भाऊ–** जीवन जसजसे पुढे सरकते तसतसे 'आदर्श'ही बदलत जातात. गरीब व सर्वसामान्य माणसांजवळूनही घेण्यासारखे भरपूर आहे. काही मित्रही आदर्शवत असतात. एवढेच कशाला... लुधियानातील एक बुटपॉलिशवालाही मला

आदर्शवत वाटला... हॉटेलातून बाहेर पडलो. रस्त्यावर बूट पॉलिश करण्यासाठी थांबलो. त्या बूट पॉलिशवाल्यास विचारले, ''कसं काय चाललं आहे?'' त्याने दिलेले उत्तर जीवनातील एक आदर्श ठरेल असेच होतं. माझे बूट पॉलिश करीत असताना तो पुटपुटला, ''साहेब, काय सांगू?

*मृत्यूचं दु:ख नाही, जगण्याचं सुख नाही. सकाळी उठतो... स्वत:च्या आणि माझ्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींच्या पोटाची खळगी भरण्यासाठी धडपडतो. मनात नाराजी असली, तरी 'कर्तव्य' विसरू शकत नाही.''*

**शिबिरार्थी–** आपल्या जीवनात आपण वेळेचे नियोजन कसे केले?

**भाऊ–** जीवनात वेळेचे नियोजन महत्त्वाचे आहे. मी जीवनात कधीही 'अलार्म वॉच' वापरला नाही. शरीर हाच एक अलार्म आहे. तब्बल दीड वर्ष तर घड्याळ वापरणे सोडून दिले होते. वेळेचा अपव्यय करायचा नाही, असा निर्धार करणे महत्त्वाचे आहे. वेळेचे नियोजन हा जीवनाचा अविभाज्य हिस्सा झाला पाहिजे. प्रत्येक क्षणाचा उपयोग करण्याचे शिका. वेळेचे नियोजन केले नाही, तर आपण जीवनाचे नियोजन करू शकणार नाही.

# रेल्वेच्या धर्तीवर शेतीसाठी वेगळे केंद्रीय अंदाजपत्रक हवे

विजय पाठक - महाराष्ट्र टाईम्स, फेब्रुवारी, २००१

विचारातील विविधता व एकमेवता ही भाऊंची एक बाजू आहे. मूळ ध्येयधोरणांना जपत त्याची तर्कशुद्ध मांडणी करणं आणि आपल्या मतांना तेवढ्याच ठाम व पारदर्शकतेने मांडणं यात भाऊंचा जणू हातखंडाच आहे.

भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारतातील हवामान शेती व्यवसायाला अत्यंत पोषक आहे. शेती व्यवसायासाठी पुरेसं पाणी उपलब्ध आहे. त्यात ठिबक सिंचन हे शेत जमीन ओलितासाठी उपलब्ध आधुनिक तंत्रज्ञान अधिक जमीन सिंचनाखाली आणू शकते.

भारतातील सुमारे ७०% जनतेचा उदरनिर्वाह शेती व शेती संबंधित व्यवसायावर चालतो. राष्ट्रीय सकल उत्पन्नाचा जवळजवळ २५% पेक्षा अधिक भाग या शेती व्यवसायातून उपलब्ध होतो. मात्र शेती विकासासाठी राष्ट्रीय अंदाजपत्रकात एकूण खर्चाच्या केवळ १०% च्या जवळपास पैसा उपलब्ध केला जातो. शेती विकासाकडे सर्व साधारणपणे सर्वच राजकीय पक्षांचे दुर्लक्ष असल्याचे हे निदर्शक आहे.

*'देशाचा विकास साधायचा असेल तर शेती विकास हा एकच मार्ग विश्वसनीय आहे'*, असं मत जळगावच्या जैन उद्योग समूहाचे शिल्पकार व अध्यक्ष भवरलाल जैन यांच्याशी केंद्रीय अर्थसंकल्पपूर्व त्यांच्या अपेक्षांसंबंधी चर्चा करीत असताना त्यांनी व्यक्त केले.

*'कृषी विकासाला योग्य न्याय द्यायचा असेल तर रेल्वे अंदाजपत्रकाप्रमाणे कृषी क्षेत्रासाठीसुद्धा वेगळं अंदाजपत्रक असावं'* हे त्यांच्याशी झालेल्या चर्चेचं सार आहे.

**विजय-** केंद्रीय अर्थसंकल्पात शेतीला कितपत महत्त्व दिले जाते?

**भाऊ-** गेल्या ५० वर्षांत प्रत्येक अर्थमंत्र्याने मांडलेल्या अर्थसंकल्पांमध्ये शेती, पाणी व शेतकामांसाठी लागणारी वीज याबद्दल अतिशय गौरवपूर्ण गंभीर प्रतिपादन अगदी काव्यमय भाषेत केले. परंतु सुरुवातीस शेतीमधील भांडवली गुंतवणूक एकूण गुंतवणुकीच्या ५% होती, ती आज ०.२% झाली आहे. शेती माऊली ६४% लोकांना रोजगार पुरविते. एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या २६% उत्पन्न देते, १८% परकीय चलन मिळवून देते. महत्त्वाच्या कारखान्यांना कच्चा माल पुरविते. तरी या शेतीची दैना केल्यामुळेच एकूण खाद्य पिकांसाठी वापरात असलेली जमीन ७७% वर येऊन ठेपली आहे. अन्नधान्यांचे उत्पादन थिजले आहे. यावरून शेतीला नेहमीच सापत्नभावाची वागणूक दिली जाते, असे माझे ठाम मत झाले आहे.


*शेतीबद्दल राष्ट्रीय धोरण बनविणे १९९५ पासून चालूच आहे. हे काम अद्यापि अपूर्ण आहे. शासनाला शेतीबद्दल वाटणाऱ्या प्रेमाचा वेगळा पुरावा दुसरा काय असावा? १९५६ पासून उद्योगांसाठी राष्ट्रीय धोरण असताना, शेतीची मात्र ही अशी विटंबना अद्यापि चालूच आहे.*

**विजय-** यावर उपाय काय असे आपल्याला वाटते?

**भाऊ-** शेतीची खरीखुरी प्रगती व्हावी असे वाटत असेल, तर रेल्वेच्या धर्तीवर शेतीचेही केंद्रीय व राज्यपातळीवर वेगळे अंदाजपत्रक मांडले जावे. देशाची लोकसंख्या अनिर्बंधपणे वाढत आहे. गावांकडून शहरांकडे वस्तीचा महापूर वाहतो आहे. आवडो वा नावडो 'ग्रामीण भारत आणि अर्बन इंडिया' अशी स्पष्ट व वेगवेगळी ध्रुवीकरणे होताना दिसत आहेत. कारखानदारीला सुरुवातीपासून आजपर्यंत झुकते माप मिळत असल्याची भावना बळावली आहे. अशा पार्श्वभूमीवर शेतीला भारतीय समाजजीवनात असलेले उच्च स्थान पुनश्च मिळावे म्हणून अशी काहीतरी ठोस उपाययोजना करणे जरूरीचे आहे.

**विजय-** या वेगळ्या अर्थसंकल्पात नेमके काय असावे?

**भाऊ-** या शेतीच्या अर्थसंकल्पात जमीन, माती, जलसंपदा व तिचे नियोजन, पाणलोट विकासक्षेत्र व सिंचन, ग्रामीण विकासाच्या व गरिबी निर्मूलनासाठी असलेल्या इतर सर्व योजना त्याचप्रमाणे मूलभूत सुखसोयी म्हणजे ग्रामीण रस्ते, वीज, बाजारपेठांचा विकास, त्यासाठी लागणाऱ्या तंत्रज्ञानाची उपलब्धता या सर्व विषयांचा समावेश असावा.



कृषी उत्पन्नाच्या मुल्यवृद्धीसाठी भाजीपाला निर्जलीकरण

**विजय–** शेतमाल प्रक्रिया उद्योगांची परिस्थिती काय आहे?

**भाऊ–** शेती आधारित प्रक्रिया उद्योगांवर एकूण उद्योगांवर झालेल्या भांडवली गुंतवणुकीच्या फक्त ६% लागत आहे. त्यांच्या उत्पादनांची किंमत एकूण औद्योगिक उत्पन्नाच्या १३.५% असून त्यात देशाच्या एकूण श्रमशक्तीच्या १८% लोकांना रोजगार मिळतो. असे असतानाही आज अन्नधान्य व फळभाज्या प्रक्रिया कारखाने चक्क बंद पडलेले आढळतात किंवा नुकसानीत चाललेले दिसतात. त्यांच्या कारणांचे तपशीलवार व वस्तुनिष्ठ विश्लेषण करून योग्य ते निर्णय घेण्याची तयारी मात्र कोणाचीच नाही. केवळ घोषणा व आशीर्वाद देण्याचे काम अव्याहत चालूच आहे.

**विजय–** शेतीबाबतच्या या अनास्थेचे मूळ, सरकारी धोरणाप्रमाणेच शेतीच्या शिक्षणातही आहे का?

**भाऊ–** शेती शिक्षणाला मानपानाची जागा तर राहूच द्या, पण साध्या सोयीही लाभणे दुष्कर आहे. *शेती विद्यापीठे राजकारणाचे अड्डे झाले आहेत. अर्थबळाअभावी आता त्यांच्याकडून काहीही अपेक्षा करणे अनाठायी ठरते. त्यांच्या खाजगीकरणाचा वा संयुक्त व्यवस्थापनाचा विचार का होऊ नये?* त्यांच्या मालकीच्या हजारो एकर जमिनीवर गवताशिवाय काहीही उगवत नसले, तरी त्याची फिकीर कुणाला नाही. शेतीबद्दल इस्रायलचा गवगवा मोठ्या प्रेमादराने केला जातो. इस्रायलची लोकसंख्या मुंबईपेक्षा कमी असूनही त्यांच्याकडे आठ शेती महाविद्यालये आहेत. त्यांच्यासारखी शेतीत प्रगती करण्यासाठी आपल्याकडे किमान हजार तरी शेती महाविद्यालये स्थापावी लागतील. आज ही संख्या १०० च्या आसपास असावी.



कृषितंत्र जागरुकता वाढीव शेती उत्पादकता

शेती, शेती उत्पन्न व उत्पादकता, शेती संबंधित पाणी व जमीन, त्यांचे कार्यक्षम नियोजन व मूल्यनिश्चिती, शेती आधारित उद्योग व शेती शिक्षण यांचा एकात्मिकतेने विचार व्हावा म्हणून शेतीविषयक वेगळी केंद्रीय व राज्य अंदाजपत्रके असणे जरूरीचे वाटते. तसे करणे तितकेसे सोपे नाही याची मला जाणीव आहे. परंतु शहरी व ग्रामीण अर्थव्यवस्थांमधील वाढता दुरावा कमी करण्याचा दुसरा मार्ग दिसत नाही. यामुळे कृषीसाठी होणारा खर्च, भांडवली गुंतवणूक, अनुदान, त्यापासून मिळणारे उत्पन्न याबद्दल पारदर्शीपणा येऊन एवढ्या मोठ्या समाजाला आपण जवळ केल्यासारखे वाटू लागेल. डब्ल्यूटीओच्या संदर्भातच नव्हे, तर अन्य बऱ्याच कारणांनी ही माहिती जाहीर होणे अगत्याचे आहे. त्या निमित्ताने, शासनाला एकूण अंदाजपत्रकीय खर्च व शेतीसाठी गुंतवणुकीची किमान टक्केवारी निश्चित करणे क्रमप्राप्त होईल.

## भगवान ऋषभदेवांची कृषी संस्कृती अनुसरली!


आबासाहेब पटवारी - विवेक, फेब्रुवारी २००२

'अहिंसा' या व्यापक संकल्पनेत निसर्ग, पर्यावरण व शेती यांचाही समावेश आहे. त्यातूनच मानवता, आध्यात्मिकता जन्माला येते. या मूलभूत विचारांशी अधिभौतिक व्यवहारांची सांगड घालणं आणि त्यातच कर्तव्यपूर्तीचं समाधान शोधणं या उद्योजकाला दार्शनिकांच्या रांगेत बसवू शकेल.

कृषी उद्योगात जागतिक स्तरावर अग्रपूजेचा मान प्राप्त करणारे जैन उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष भवरलालजी जैन शेतकऱ्यांना मात्र आजही आपले भाऊच वाटतात. कृषी उद्योगात आर्थिक उपलब्धिपेक्षा जीवनाची दिशा शोधणारे आणि आपल्या या क्षेत्रातील वाटचालीचे श्रेय जैनधर्मीय परंपरेला देणारे भवरलालजी खऱ्या अर्थाने 'तुलसीपत्र' आहेत. तराजूच्या एका पारड्यात सर्व प्रकारची भौतिक संपत्ती टाकली आणि दुसऱ्यात त्यांचे व्यक्तिगत जीवन तोलले तर ते दुसरे पारडेच खाली जाईल.

**आबासाो-** जैन धर्माचा विचार आणि त्यानुसार आचरण याबद्दल आपले काय अभिमत आहे?

**भाऊ-** अद्वैतवाद हा जैन धर्माचा आधारस्तंभ आहे. *बदलत्या काळात आपण धर्माचे रीतीरिवाज, आचारपद्धती पाळू शकलो नाही, तरी त्याची मूलभूत तत्त्वप्रणाली* (Core Philosophy) *सांभाळलीच पाहिजे.* अगदी मंदिरांची गोष्ट घेतली, तरी त्याला कालमर्यादा असू शकतात. परंतु धर्म या संकल्पनेला आयुष्य नाही. माझा विश्वास जेवढा धर्मावर आहे, तेवढा त्याच्या बाह्यांगांवर नाही. तुम्ही मला विचाराल मी धार्मिक आहे का? तर मी म्हणेन, मी स्वत:ला धार्मिक मानत नाही. परंतु असे जर विचाराल, ईश्वरावर विश्वास आहे की नाही? तर निश्चितपणे आहे. मी कदाचित चुकत असेन, पण त्याला शोधण्यासाठी मंदिरातच जाण्याची



हलधर – भवरलाल जैन, कवी – ना. धों. महानोर
दुःख, दैन्य अन् दारिद्र्यातील शेतकरी माझा । जुन्या पुराण्या शेती मधला रुतलेला फासा ॥
आम्ही सोडवू फासा रुजवून थेंबाचे पाणी । थेंबाचे पाणी नवे आकाश पांघरोनी ॥

गरज आहे, असे नाही. तो कुठेतरी माझ्यातच आहे आणि म्हणून मला तो जसा अभिप्रेत असेल तसं वागायचा मी प्रयत्न केला पाहिजे.

**आबासाो–** आपण ज्या जैन धर्माच्या मूलभूत मूल्य (कोअर व्हॅल्यूज) संकल्पनांबद्दल बोललात, त्या जरा स्पष्ट करून सांगा.

**भाऊ–** जैन धर्माच्या कोअर व्हॅल्यूज म्हणजे प्रथमत: अहिंसा. 'या जगात जे जे हिंसेच्या विरूद्ध आहे ते अहिंसा' अशा पारंपरिक अर्थाने या शब्दाकडे पाहता कामा नये. अहिंसा हा मूळ शब्द एक संकल्पना मानली पाहिजे. तिच्याविरूद्ध ती हिंसा. सकारात्मक अर्थाने तो शब्द घेतला पाहिजे. अहिंसा ही मूलभूत संकल्पना आहे असे मानले नाही, तर निसर्ग जसा निर्माण झाला, राहतो, वागतो आणि वाढतो ही 'order' च नाकारल्यासारखे होईल. सारी सुसूत्रताच नष्ट होईल, सगळी व्यवस्थाच कोलमडेल. केवळ निसर्गाचीच नाही, तर जगाची देखील. म्हणून अहिंसा हे मध्यवर्ती मूल्य (Central value) आहे आणि तिच्या सभोवती अनेकान्तवाद इत्यादींचे वलय आहे. तुमच्याकडे शाश्वत सत्य आहे आणि माझ्याकडेही ते आहे, तर मी विरोध कोणत्या आधारावर करू शकेन? अहिंसेचा हा मूलभूत विचार आहे.


*निसर्गनियमांचे परिपालन करणे, त्याचा समतोल सांभाळणे ही अहिंसा आहे. हा समतोल बिघडला तर मानवी जीवनावरदेखील वाईट परिणाम झाल्याशिवाय राहत नाही, निसर्ग आहे तसा राहत नाही.*

त्याचे दु:खद परिणाम मानवजातीलाच भोगावे लागले. निसर्गाने अहिंसा जपली आहे, नव्हे ती साऱ्या विश्वातच जर सामावलेली आहे, तर या विश्वाचा छोटासा भाग असलेल्या मानवजातीने तरी तिचे पालन का करू नये?

*अहिंसा हेच वास्तव आहे. हिंसा हा अपवाद आहे.*

**आबासाो-** आपल्या कृषी उद्योग संकल्पनेशी हा विचार जोडता येईल?

**भाऊ-** मला तसे वाटते. जीवनात कृषी उद्योग-व्यवसाय उत्तम समजला गेला आहे. अगदी जैन तत्त्वज्ञानाच्या सुरुवातीपासून त्याला मान्यता आहे. ऋषभदेवांनी सर्व प्रथम कृषीची संकल्पना अमलात आणल्याचे मानले जाते. त्यांनी मानवाला प्रथम शेती करायला शिकवले. जैन धर्मीयांचे कृषी क्षेत्राशी निकटचे नाते जुळलेले आहे. जैन माणूस इथे आला. तो अगदी सुदूरच्या खेड्यापर्यंत पोहोचला. असे म्हणतात की, ''जहाँ न जाये बैलगाडी, वहाँ भी पहुँचे मारवाडी.'' जिथे जिथे तो गेला तिथे तिथे तो कृषी क्षेत्राशी निगडित राहिला. शेतकऱ्याची आर्थिक नड त्याने भागवली. थोडा पैसा जमा होताच त्याने शेत विकत घेतले व शेतकरी झाला किंवा शेतमालाचा, अन्नधान्याचा व्यापार करू लागला.



प्रथम तीर्थंकर ऋषभदेव

ऋषभदेवांनी दिलेली कृषीसंस्कृती मी स्वीकारली आहे. कालमानाप्रमाणे चढउतार जरूर झाले असतील. पण ते वास्तव आहे आणि तेच मी स्वीकारले आहे. मी काही विशेष केले आहे असे नाही. ऋषभदेवांनी शिकवलेला मार्गच मी अनुसरत आहे. सुदैवाने माझ्या अगदी निरक्षर पण सुसंस्कृत आईनेदेखील या कार्यालाच दुजोरा दिला आहे.

*अहिंसेमधूनच निसर्ग, शेती व शेती उद्योगाचा विचार माझ्यापर्यंत आला आहे. तो योगायोग आहे असे म्हणण्यापेक्षा तो ऋषभदेवांचा वारसा मी चालवला आहे अशी माझी धारणा आहे.*

**आबासाो-** आपण कृषी उद्योगाची एक मोठी संकल्पना अंगीकारली आहे. ती जैन धर्माशी सुसंगत आहे. तरीदेखील जैन धर्मीयांमधे ती अगदी अल्पांशाने अवतरलेली आढळते. ती प्रभावी होण्यासाठी काय करावे लागेल?

**भाऊ-** कृषी उद्योग हा सोपा व्यवसाय नाही. जैन धर्मही सोपा नाही. म्हणूनच तो जास्त पसरलेलाही नाही. आचाराला कठीण आहे, विचारालासुद्धा कठीण आहे.


२४ वे तीर्थंकर महावीर

आचार म्हणजे एक तपस्याच आहे आणि तपस्या हा मुक्तीचा मार्ग असू शकतो हे जैन दर्शनाने प्रथम प्रतिपादन केले. भक्तीचा सोपा मार्ग प्रतिपादन केला गेला, परंतु तिच्या माध्यमातून गैर गोष्टी प्राप्त केल्याची उदाहरणे कमी नाहीत. जैन धर्माला तप अभिप्रेत आहे. जैन धर्माने स्त्रीलादेखील बरोबरीचे स्थान दिले. तीर्थंकरपददेखील दिले.

*कृषी उद्योग हा एका अर्थाने वेगळ्या प्रकारचा उद्योग आहे. इथे केवळ आर्थिक नफ्याची संकल्पना नाही. ज्याला निर्मितीचा आनंद मिळवायचा आहे, त्यालाच या उद्योगात रमता येईल. त्यामुळे अभावानेच लोक याकडे वळतात.*

*आपण दीपस्तंभ व्हायचं की जहाज व्हायचं हे ज्याचं त्याने ठरवायला पाहिजे.*

**आबासो–** दहशतवादाचा उगम कशात आहे असे आपणास वाटते?

**भाऊ–** जैन धर्मामध्ये अपरिग्रहावर भर दिला आहे. अपरिग्रह आपण विसरलो आणि पैशाचा अतिरेक स्वीकारला. मागील तीन शतके विज्ञान आणि तंत्रज्ञान यावर भर दिला गेला. पण त्याचबरोबर आध्यात्मिकता (Spirituality) आवश्यक आहे हे विसरले गेले. त्यामुळे पाश्चिमात्य समाजांमध्ये एक प्रकारे पोकळी निर्माण


'मनुष्य जन्माने नाही केवळ कर्मानेच महान होतो.'
भगवान महावीरांच्या या उक्तीचा जीवंत आदर्श : भवरलाल जैन

झाली. तसेच काही देशांना सहजपणे पैशाचा जो अमाप लाभ झाला, त्यामुळे देखील आध्यात्मिकतेला संबंधित लोक दुरावले. शारीरिक सुखाच्या अतिरेकात आंतरिक आनंदाचा लोप झाला. त्यामुळे दहशतवादासारख्या अपप्रवृत्ती वाढीस लागल्या. तथापि नैसर्गिक जडण-घडण जर आवश्यक असेल, तर त्यांना आध्यात्मिकता स्वीकारावीच लागेल.

**आबासाो-** या निमित्ताने तरुणांना काय संदेश द्यावासा वाटतो?

**भाऊ-** साधन आणि साध्य यांचा योग्य समतोल सांभाळणे आवश्यक आहे. आमच्या तरुणांना मला मुद्दाम सांगावेसे वाटते की, निसर्गाचे नियम समजून घ्या. प्रत्येक बाबीला नैसर्गिक मर्यादा असतात. त्यांचा भंग करून चालत नाही. निसर्गाचे एक ठराविक चक्र आहे, ते पाळले जावे. घाईगर्दी करून योग्य फळ मिळत नाही. तसेच जरूर तेवढा कालावधी व नियमन आवश्यक आहे. तरुणांनी दिशाहीन होऊ नये. प्रथम आपल्या जाण्याची दिशा निश्चित केली पाहिजे. त्यानंतर आपले लक्ष्य निश्चित केले पाहिजे. गंतव्यस्थान आणि दिशा निश्चित असेल, तर आपण ठराविक (इप्सित) ठिकाणी निश्चित पोहोचू शकाल. वेळ लागला तरी चालेल. आवश्यक तेवढा संयम पाळणे अनिवार्य आहे. या गोष्टी सांभाळल्या तर आपल्या समाजातील तरुणांची योग्य दिशेने वाटचाल होईल असा मला विश्वास वाटतो.

**आबासाो-** या सर्व अथक मेहनतीचे फळ या कंपनीला भरभरून मिळालं आहे. जैन इरिगेशनला आतापर्यंत राज्यांतर्गत २५ आणि राष्ट्रीय पातळीवर ६० पारितोषिके मिळाली आहेत. असाधारण निर्यात प्रयत्न, संशोधन आणि विकास कार्यक्रमातील यश तसेच उद्योजकतेबद्दल ही पारितोषिके मिळालेली आहेत.



कष्टांची तालिका, पुरस्कारांची मालिका

जैन उद्योग समूहाचे अध्यक्ष मा. श्री. भवरलाल जैन यांना व्यक्तिश: सिंचन क्षेत्रातील त्यांनी केलेल्या अमेरिकेबाहेरील महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल 'दि क्रॉफर्ड रीड मेमोरियल' हे जागतिक इरिगेशन असोसिएशनचे आंतरराष्ट्रीय पारितोषिक मिळाले आहे. १८ वर्षात फक्त १२ व्यक्तींना हा गौरव प्राप्त झाला आहे. असा हा दुर्मिळ सन्मान मिळालेले ते एकमेव भारतीय असून संपूर्ण आशिया खंडातील दुसरी व्यक्ती आहेत.

**आईचे प्रशस्तीपत्र मोलाचे!**

कृषी उद्योगाचा मी अनुसरलेला मार्ग योग्य आहे याचे सर्वश्रेष्ठ प्रमाणपत्र मला माझ्या आईकडून मिळाले आहे. तो किस्साच ऐकण्यासारखा आहे. दूरदर्शनची 'यशस्वी उद्योजकाच्या आईची मुलाखत' प्रक्षेपित करण्याची योजना होती. माझ्या एका मित्राने मोठ्या कष्टाने तिला बोलते केले. मुलाखतीच्या वेळी मी तिथे नव्हतो आणि नंतर मी ती चित्रफीत पाहिली देखील नव्हती. आईच्या निधनानंतरच्या बारा दिवसांच्या काळात मी ती ऐकली आणि त्या दु:खाच्या दिवसात आईने मला दिलेले प्रशस्तीपत्र ऐकून धन्यता वाटली.

तिला प्रश्न असा विचारला होता की, भाऊ (भवरलाल जैन) नी कृषी उद्योगापेक्षा कमी कष्टाचा एखादा उद्योग उभारला असता तर त्यांना अधिक नफा मिळवता आला असता. (प्रश्नकर्त्याचा रोख मला येऊन गेलेले हृदयविकाराचे झटके आणि दोनदा झालेल्या बायपास सर्जरी यानंतरही मी करीत असलेले दिवसाचे चौदा तास काम, याकडे असावा.) त्यावर आईने दिलेले उत्तर असे होतेः

''होय, अधिक नफा मिळविता आला असता, जास्त लोकांना नोकऱ्या दिल्या जाऊ शकल्या असत्या, कदाचित कुटुंबही अधिक श्रीमंत झाले असते. पण माणसांबरोबर पशुपक्षी, निसर्ग यांचीही काळजी घेण्याची जबाबदारी देवाने माणसांवरच सोपवली आहे ना! भाऊ तेच काम करतो आहे आणि तेच सर्वथा योग्य आहे!''

## व्यक्तिमत्त्व असे घडते

उत्तम कोळगावकर - आकाशवाणी, मे २००२

माणूस घडला जातो तो मुख्यतः तीन घटकांनी: आनुवंशिकता, जडलेले संस्कार व मिळविलेले शिक्षण, आणि साथसंगत! या तिघांवर उभा असतो विचारांचा डोलारा, त्याची खोली, उंची आणि व्यापकता. प्रत्येक घटकाचा भवरलालजींच्या व्यक्तित्वावर कसा व कितीसा परिणाम झाला, याचं हे प्रतिबिंब !

पहिल्या पिढीतला उद्योजक स्वगुणांमुळे घडतो. साहसाने काम करताना त्याच्या आव्हानात्मक कार्यमार्गावर अनेक अडचणींना तोड देता देता त्याचं व्यक्तीमत्त्व विकसित होतं, उजाळत जातं, प्रकाशित बनतं. असंच एक व्यक्तीत्व - जैन ठिबक प्रणेते, शेतकरी हितैषी, द्रष्टा भवरलाल जैन.

**उत्तम–** भाऊ, आपण महाराष्ट्रातले एक नामवंत आणि यशस्वी असे उद्योगपती म्हणून ओळखले जाता. परंतु उद्योगपती हा आपल्या व्यक्तिमत्वाचा एक पैलू झाला. असे अनेक पैलू आपल्या व्यक्तिमत्वाचे आहेत. आपलं हे व्यक्तिमत्व कसं कसं घडत गेलं, हे जाणून घेण्याची आमच्या असंख्य श्रोत्यांची, विशेषतः आमच्या विद्यार्थी वर्गाची इच्छा आहे.

सुरुवातीला आम्हाला आपलं बालपण, शालेय शिक्षण, महाविद्यालयीन शिक्षण याबद्दल सांगा.

**भाऊ–** कोळगावकर, माझा जन्म वाकोद या ४०० लोकवस्तीच्या खेड्यामध्ये झाला. वाकोद अजिंठ्याच्या पायथ्याशी जळगाव जिल्ह्यातच आहे. मराठी चौथीपर्यंत तेथेच शिक्षण घेऊन पाचवीपासून मी जळगावला आलो आणि त्यानंतर ११ वी पर्यंत (मॅट्रीकपर्यंत) मी जळगावला शिक्षण घेतले. नंतर बी.कॉम. व एलएल.बी.चे शिक्षण मी मुंबईला ७ वर्षे राहून पूर्ण केले.


**उत्तम-** एका लहानशा खेड्यात आपला जन्म झाला आणि शिक्षणाच्या क्षेत्रात प्रगती करीत आपण एवढं शिक्षण घेतले. त्या काळात एवढं शिक्षण घेतल्यावर एखादी मोठी नोकरी तुम्हाला मिळू शकली असती.

परंतु तुम्ही बालपणी असे काही ध्येय ठरवले होते का की, आपल्याला पुढे काय व्हायचे आहे? आपण आपले ध्येय गाठू शकला किंवा नाही?

**भाऊ-** तसं पाहायला गेलं तर महाराष्ट्र पब्लिक सर्व्हिस कमिशनकडून माझं सिलेक्शन झाले होते. नाव गॅझेटही झालं होतं. आज कुठे तरी कमिशनर, कलेक्टर राहिलो असतो. नोकरी न स्वीकारता मी व्यवसाय सुरू केला पाहिजे असा सल्ला मला त्या वेळेला मिळाला आणि म्हणूनच आज आपण बघता, नोकरीच्या ऐवजी मी बहुतांश शेती आधारित उद्योगव्यवसायाकडे वळलो.

**उत्तम-** भाऊ, तुम्हाला उद्योगधंद्याकडे वळण्यासाठी प्रेरणा कोणाकडून मिळाली? कोणाकोणाचे मार्गदर्शन मिळाले?

**भाऊ-** विद्यमान आमदार श्री सुरेश जैन यांचे दिवंगत वडील श्री भिकमचंदजी जैन यांच्याकडून ही प्रेरणा मला मिळाली. त्यांनी मला स्पष्ट भाषेत सांगितलं की, नोकरी केलीत तर ५-१०-५० लोकांचं भलं करू शकाल. परंतु आपल्या रक्तामध्ये, हाडामध्ये व्यापार-उद्योग हाच विषय असल्यामुळे आपण नोकरीच्या ऐवजी उद्योगव्यवसायात पडावं. विशेष म्हणजे माझ्या आईनेही नोकरी न करता उद्योग-व्यवसायांपैकी कृषि आधारित उद्योग व्यवसाय निवडावा असे स्पष्ट निर्देश दिले. त्या दोघांच्या मार्गदर्शनाने माझ्या करियरची मी सुरुवात केली. पहुर येथील लहानसा पेट्रोलपंप या व्यवसायाने श्रीगणेशा झाला.



मदतीचा हात : भिकमचंद जैन

**उत्तम-** बरं भाऊ, आपल्या घराण्यात ही व्यापाराची किंवा उद्योगाची अशी काही परंपरा होती की काय?

**भाऊ-** तसं पहायला गेलं तर माझ्या घराण्यात, शेती आणि लहान व्यापार एवढ्यातच आमचा तीन पिढ्यांचा कालावधी व्यापला गेला असे आढळते. माझ्या घरातला मी पहिलाच पदवीधर. शालेय जीवनामध्ये प्राचार्य एम.के.देसाई यांनी सेंड-ऑफ कार्यक्रमाच्या वेळी जाहीर केलं होतं, ''भवरलाल हा नामांकित

वकिलांमध्ये प्रसिद्ध होईल आणि निश्चितपणे तो वकिली करेल.'' मला जर आपण विचारलं, 'जीवनात तुमचं काही ध्येय असेल किंवा होतं का?' तर मी हे म्हणेन की, मी जीवनात काही ध्येय ठरवलं होतं ते पालखीवालासारखा एखादा मोठा वकील व्हावं, असंच ठरवलं होते. मात्र ते घडलं नाही, याची खंत अजूनही अधूनमधून मला वाटत असते.

**उत्तम–** तुम्ही व्यवसायाला प्रारंभ केला तेव्हा भांडवलाची गरज लागली असेलच. ती भांडवल उभारणी आपण कशी केली किंवा किती भांडवलावर आपण हा व्यवसाय सुरू केला आणि आज या भांडवलाचे स्वरूप काय आहे?

**भाऊ–** उत्तर देतो. पण, कोळगावकर, आपल्याला ते पटेल की नाही याबद्दल साःशंक आहे. भांडवलाची आवश्यकता प्रत्येक व्यवसायाला असतेच. मी जेव्हा व्यवसाय करायचा निर्णय पक्का केला त्या वेळेला जवळजवळ तीन पिढ्यांचे मिळून कुटुंबाकडे फक्त ७,००० रू. शिलकी होते. माझ्या आईने घरात विरोध असतानासुद्धा ते ७,००० च्या ७,००० रू. मला माझ्या व्यावसायिक जीवनाची सुरुवात करण्यासाठी मिळवून दिले. मला सांगायला आनंद वाटतो की, आज जैन उद्योग समूहाचं एकूण भांवडल सुमारे १७ - १८ कोटी रूपये आहे.

**उत्तम–** म्हणजे फार मोठ्या प्रगतीचा टप्पा आपण गाठलेला आहे. यावरून दिसून येतं की, ही प्रगती आपण स्वत: केलेली आहे. या मागं पूर्वसूरींची काही परंपरा नसतानासुद्धा आपण ही प्रगती एकट्याने साधली हे विशेष महत्त्वाचे आहे

भाऊ, आणखी एक विशेष जाणवतं ते असं की, आपण उद्योग व्यवसाय करता, तो विशेषत: शेती व्यवसायाशी संबंधित आहे- उदा. पी.व्ही.सी. पाईप म्हणा किंवा ठिबक सिंचन योजना म्हणा. यासाठी निश्चित ध्येय ठरलेलं आहे का? त्याची प्रेरणा कुठून मिळाली?

**भाऊ–** या प्रेरणेबाबतीत एक विशिष्ट असा प्रसंग मी आपल्याला नमूद करून सांगू इच्छितो. एका संध्याकाळी आमच्या जळगाव पेट्रोलपंपावर बसून होतो. त्या वेळेला महाराष्ट्रामध्ये काम करणाऱ्या स्कॉटीश मिशनची एक ड्रिलिंग रीग डिझेल भरण्यासाठी पेट्रोलपंपावर आली. त्या रिगच्या पाठीमागे स्पष्ट मोठ्या अक्षरात एक ध्येयवाक्य लिहिलेलं होतंः 'Agriculture – a profession with future.' मी असा विचार केला की, ज्या देशामध्ये ७०% लोक एका अथवा दुसऱ्या कारणासाठी शेतीवर अवलंबून आहेत, त्या देशामध्ये शेतीपेक्षा जास्ती चांगला व्यवसाय किंवा

उद्योग काय असू शकतो. त्या एका वाक्याच्या प्रेरणेने माझ्या व्यावसायिक जीवनाची दिशा त्या वेळेला बदलली. मी पेट्रोल पंपाच्या व्यवसायातून शेती संबंधित व्यवसायाकडे वळलो आणि त्याचीच पुढे वाढ होत राहिली. अर्थात त्यासाठी आईने आधी दिलेला आशीर्वाद आणि संकेत हे मूळ बीज मनात रुजलेले होतेच.


**उत्तम-** म्हणजे ज्या व्यवसायातून एक प्रकारे समाजसेवासुद्धा घडते, अशा प्रकारचा व्यवसाय तुम्ही निवडला.

सुरुवातीला तुम्ही कोणत्या स्वरूपाचा शेतीपूरक व्यवसाय सुरू केला?

**भाऊ-** सुरुवातीला फर्टिलायझर, बी-बियाणे, आणि कीटकनाशके या व्यवसायात फार मोठ्या प्रमाणात उलाढाल केली. महाराष्ट्राच्या पातळीवर आणि राष्ट्रीय पातळीवर या सगळ्याच व्यवसायांमध्ये उच्चांक गाठला. त्याचबरोबर शेतीला लागणारी अवजारे आणि यांत्रिक सामग्री, जसे थ्रेशर, ट्रॅक्टर, ट्रेलर, नांगर इ. साहित्यसुद्धा आम्ही मार्केट केले. त्याच्यातसुद्धा प्रामुख्याने महाराष्ट्रात खूप लौकिक मिळवला.

**उत्तम-** बरं, तुम्ही पाईप किंवा ड्रीप/ठिबक सिंचन संच आणलेले आहेत. त्यांची गुणवत्ता निर्माण करण्यासाठी, टिकवण्यासाठी किंवा वाढविण्यासाठी अलीकडे काही खास प्रयत्न केलेत का?

**भाऊ-** जीवनामध्ये नेहमीच मला दोन गोष्टींचे मोठे अ‍ॅट्रॅक्शन राहिले. मला त्या नेहमीच ओढत राहिल्या. एकतर लायब्ररी आणि दुसरी लॅबोरेटरी म्हणजे संशोधन हा विषय मला फार जवळचा राहिला. मी स्वत: सायन्टिस्ट नाही आणि लेखक नाही किंवा साहित्यिकही नाही. परंतु लायब्ररीमुळे जिथे जिथे जसं जसं ज्ञान असेल त्याचं संकलन करणे आणि लॅबोरेटरीमुळे जिथे संशोधन करणे शक्य आहे तेथे



वाचनाची गोडी, ग्रंथांची गढी

संशोधन करून आपली मजल गाठणं, या दोन विषयांकडे अगदी पहिल्या दिवसापासून माझं लक्ष केंद्रित राहिलं. ह्या कामासाठी जिथे जिथे जसंजशी चांगली माणसं मला आढळली, ती संग्रही करायचं आणि त्यांना सांभाळून ठेवण्याचंच माझं कौशल्य आहे असं मी समजत राहिलो; आणि त्याप्रमाणे मी ज्ञान संकलन, संशोधन आणि माणसं जमवायचं काम करत राहिलो.

**उत्तम-** यातून मग ही गुणवत्ता वाढत गेली, ती कशी?

**भाऊ-** केवळ लायब्ररी आणि लॅबोरेटरी म्हणजे संशोधन आणि त्याला लागणारी चिकाटी, त्याला लागणारा अभ्यास या दोन गोष्टींमुळेच प्रत्येक उत्पादनाची गुणवत्ता किंवा त्याची प्रत ही आंतरराष्ट्रीय तोलामोलाची घडवू शकलो. या दोन्ही गोष्टींकडे बघितलं, त्यांचं पालन करू शकलो व त्या बरोबरच ग्राहकांकडूनही गुणवत्तेचे धडे शिकत गेलो. यामुळेच उत्पादनांची गुणवत्ता विकसित होत राहिली.

**उत्तम-** भाऊ, तुम्ही मघाशीच लॅबोरेटरीचा उल्लेख केला. नवनवीन तंत्रज्ञानाचा आपण अवलंब केला असेलच, तो कसा?

**भाऊ-** उदाहरणासाठी सांगतो. १९७८ च्या सुमारास भारतातून निर्यात होणारं पपेन निकृष्ट प्रतीचं म्हणजे क्रुड फॉर्ममध्ये होतं. ज्या वेळेला मी पपेन उत्पादनाच्या उद्योगात शिरलो त्या वेळी आपण क्रुड किंवा कच्चा माल येथून पाठवण्यापेक्षा त्याच्यावर प्रक्रिया करून रिफाईन्ड पपेन निर्यात करू शकलो तर जास्ती चांगलं राहील, असं मला वाटलं. त्या विचाराच्या पोटी मी पपेनची गुणवत्ता वाढविण्याच्या प्रक्रियेसाठी संशोधनाला सुरुवात केली. त्या संशोधनामधून जगामध्ये एक नंबरचे रिफाईन्ड पपेन उत्पादक व केवळ उत्पादनक्षमतेच्या आधारावर दोन नंबरचे पपेन उत्पादक म्हणून जैन उद्योग समूहाला बहुमान प्राप्त झाला. भारतातून पहिल्यांदाच रिफाइन्ड पपेन आम्ही निर्यात करू शकलो. नवनवीन तंत्रज्ञानाच्या अवलंबनाशिवाय हे शक्य झाले नसते. ही परंपरा पुढे विभिन्न उत्पादनात चालूच राहिली.



कल्पनांचा झरा : प्रयोगशाळा

**उत्तम–** भाऊ, मार्केटींग आणि खेळते भांडवल या बाबतीत आपले काय म्हणणे आहे?

**भाऊ–** मला जो थोडाफार अनुभव आहे त्याच्यात निश्चितपणे असं लक्षात आलं आहे की, जे जे तरुण व्यवसायात किंवा उद्योगात पडले, विशेष करून कारखानदारीत पडले, त्यांना जर अपयश आलं असेल तर त्याची दोन मुख्य कारणं आहेत. एक तर त्यांना मार्केटींग जमलं नाही किंवा त्यांना त्यांच्या मालाची गुणवत्ता आहे ती सातत्याने सांभाळता किंवा सुधारता आली नाही.

कारखानदारीत जर आपल्याला यशस्वी वाटचाल करायची असेल, तर खेळत्या भांडवलाचं व्यवस्थापन चांगलं करता यायला पाहिजे. ते करीत असताना आपण ज्यांना ज्यांना शब्द देतो ते शब्द आपल्याला पाळता आले पाहिजे, दिलेली वेळ साधता आली पाहिजे. असं जर असलं अन घडू शकलं, तर आपण विश्वासार्हता इतरांच्या मनामध्ये निर्माण करू शकता. ज्याला आपण क्रेडिबिलिटी म्हणतो ती निर्माण झाली, तर मग पुढचा प्रवास सुकर जातो.

**उत्तम–** भाऊ, आतापर्यंत आपण आपल्या व्यक्तिमत्वाच्या उद्योगपती या एका पैलूची चर्चा केली. परंतु आपल्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू आहेत.

आपण अनेक सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक किंवा धार्मिक कार्यांमध्ये सक्रीय सहयोग देत असता. या मागचा अनुभव काय? ही प्रेरणा कशी मिळाली?

**भाऊ–** माझ्या स्वभावाचा एक भाग म्हणून सांगतो की, जी गोष्ट माझ्यात नाही ती गोष्ट जिथे जिथे आढळत असेल ती ती आपण अंगीकारावी. ज्या व्यक्तीमध्ये असे गुण असतील जे आपल्यात नाहीत, त्या व्यक्तीशी आपण जवळीक साधावी. परत मला नेहमीच असं वाटत राहिलं की, *मनुष्य आयुष्यामध्ये आल्यानंतर जाण्याच्या पूर्वी त्याला काहीतरी परतफेड करायची असते. जन्मदात्यांचं ऋण, नंतर जन्मभूमीचं ऋण आणि त्यानंतर कर्मभूमीचं ऋण यातून त्याला मुक्त व्हायला पाहिजे.* या विचारापोटी, जिथे जिथे शक्य आहे असंच नव्हे तर, जिथे जिथे संधी प्राप्त झाली तिथे तिथे सगळ्याच क्षेत्रामध्ये- मग तो मंदिराचा जीर्णोद्धार असो, शाळा असो, कॉलेज असो की एखादा मेडीकल कॅम्प असो किंवा एक व्यायामशाळा असो- कोणतीही ॲक्टिव्हिटी जळगावमध्ये किंवा आजूबाजूच्या परीसरात घडणार असेल तर त्याच्यात आपला सहभाग असावा, हा माझ्या जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे असं मी मानतो.

**उत्तम–** तुम्ही उद्योगपती असल्यामुळे लोक तुमच्याकडे लक्ष्मीपुत्र म्हणून बघतात. आपण स्वत:ला मात्र भूमीपुत्र म्हणविता. आपले विचार ऐकताना, आपल्याशी चर्चा करताना किंवा आपलं ग्रंथालय पाहिल्यावर जाणवतं की, आपण सरस्वतीचेही उपासक आहात.

आपल्या एकट्याच्या व्यक्तिमत्वात लक्ष्मीपुत्र, भूमिपुत्र व सरस्वतीपुत्र ही तिन्ही रुपे सामावणे कसे शक्य झाले?


**भाऊ–** कोळगावकर, हा वाद फार जुना आहे. लक्ष्मीपुत्र आणि सरस्वतीपुत्र. मला व्यक्तिगतरित्या असं वाटतं की, या दोन्ही जुळ्या बहिणी असाव्यात. परंतु त्यांना मात्र जुळ्या बहिणी न समजता सावत्र बहिणी समजलं जातं. मला जर आपण विचारत असाल तर मी असं म्हणेन,

*'मी सरस्वतीची उपासना करत असताना लक्ष्मीने मला माळ घातली. भूमीला लागून ज्या गोष्टी व्यावसायिक म्हणून मला करता येतील अशा सगळ्या गोष्टी मी केल्यात, म्हणून मला प्रेमाने भूमीपुत्र म्हणतात.'*

ज्यांना पूर्ण ओळख नाही, ते मला लक्ष्मीपुत्र म्हणतात आणि ज्यांनी जवळीक साधली आहे ते मात्र सरस्वतीचा उपासक मानतात.

**उत्तम–** भाऊ, आपल्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू घडत गेले. या बहुविध स्वरूपाच्या व्यक्तिमत्त्वावर कायम स्वरूपी ठसा उमटविणाऱ्या अशा काही व्यक्ती, नेते किंवा नेतृत्व आहे का?

**भाऊ–** हो, आपण जर माझ्या घरी कधी आलात, तर सबंध घरामध्ये नेत्यांपैकी दोन फोटोग्राफ आपल्याला आढळतील. त्यांच्यात एक आहेत जवाहरलाल नेहरू आणि दुसरे आहेत जॉन एफ. केनेडी. दोन्हीही ध्येयवादाने पछाडलेले असे महान गृहस्थ होते. ते समवयस्क नव्हते. परंतु, आपल्या विशिष्ट गुणांनी आणि कार्यपद्धतींनी त्यांनी माझ्या मनावर, जीवनावर एक कायमस्वरूपी ठसा उमटविला. आदर्श जीवनासाठी गांधीजींच्या जीवनक्रमाचा मी अभ्यास केला.


उद्यम उद्‌गाता - जवाहरलाल

औद्योगिक क्षेत्रामध्येसुद्धा मला जर कुणी स्फूर्ती दिली असेल, प्रेरणा दिली असेल, ज्यांच्याबद्दल मी खूप जवळून वाचन केलं असेल आणि ज्यांच्या पायावर

पाय टाकून ज्यांचा कित्ता आपण गिरवावा असं वाटलं असेल तर त्यांच्यात जे.आर.डी. टाटा हे नाव मी प्रामुख्याने सांगेल.

**उत्तम–** भाऊ, आपले काही छंद किंवा व्यासंग आहेत का?

**भाऊ–** हो, वाचन, निसर्गरम्य अशा ठिकाणी जाऊन शक्य असेल तेवढं निरीक्षण आणि चिंतन या दोन गोष्टी आपण माझ्या छंदात मोडू शकाल.

**उत्तम–** बरं भाऊ, आपण मिळवलेलं यश उज्ज्वल आहे, देदिप्यमान आहे. या यशाचं गमक काय? कोणत्या गुणांमुळे हे यश मिळालं?

**भाऊ–** दोन-तीन गुणांचीच किंवा गोष्टींचीच चर्चा करायची असेल तर,

*कठोर परिश्रम, दुर्दम्य आशावाद आणि Strong sense of commitment! म्हणजे दिलेला शब्द पाळायचा, ठरलेली वेळ ही साधायची, जिद्दीने, नेटाने ते काम रेटायचं. अशा या Sense of commitment ने आयुष्यात मी इथपर्यंत पोहचू शकलो.*

तरुण पिढीने जर हेच तीन गुण अंगीकारले, तर मला असं वाटतं की, हे सगळं त्यांनाही शक्य आहे.

**उत्तम–** भाऊ, या मुलाखतीद्वारे प्रकट झालेल्या आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंमधून प्रेरणा घेऊन बरेच विद्यार्थी किंवा तरुण ज्याच्या त्याच्या क्षेत्रात यशस्वी होण्याचा प्रयत्न करतील, ही आशा व्यक्त करू या.

## ... दुःख तळघरात कोंडलं

शंभु पाटील - लोक टीव्ही, डिसेंबर २००५

आकडेवारी, हिशेबठिशेब, जमाखर्च - केवळ व्यवहाराला केंद्रभूत मानणाऱ्या महत्वाकांक्षींना पावलोपावली तडजोडीला सामोरे जावं लागतं. पण गुणात्मक पैलू अधिष्ठित जीवनध्येयाने व तत्त्वाधारित गुणवत्ता साधनेने साधं, सात्त्विक व समृद्ध जीवन जगणं, सुखदुःखामध्ये स्थितप्रज्ञ राहणं शक्य होतं, कसं?

जळगावचं नाव जगाच्या नकाशावर अधोरेखित करणारे उद्योजक, कुटुंबवत्सल, विचारवंत, सेवाभावी व अष्टपैलू नेतृत्व तसेच दूरदृष्टी असलेले श्री. भवरलालजी जैन (मोठेभाऊ). उच्चविद्या विभूषित, उच्चपदस्थ शासकीय सेवेची संधी झुगारून पदरी पैका नसतानाही, केवळ आईच्या मौलिक सल्ल्यानं, शेती-शेतकऱ्यांविषयीच्या निष्ठा, पशु-पक्षांविषयी आस्था... त्यातून कृषि उद्योगात प्रयास. उद्योगाची सुरुवात, वाटचाल, उद्‌भवलेले प्रश्न, समस्या, प्रकृतिच्या नाना समस्यांना सामोरं जाऊन अहर्निश सेवा बजावलेले कर्मयोगी. एका छोट्याशा व्यवसाय ओढ्याचं उद्योग महासागरात रूपांतर करणारे धुरंधर.

**शंभू पाटील–** आज १२ डिसेंबर, जळगावकरांसाठी विशेष महत्त्वाचा दिवस. कारण जळगाव शहराच्या औद्योगिक, सांस्कृतिक, सामाजिक, अशा सर्वांच्या विकासात ज्यांचा मोठा वाटा आहे ते तुमचे, आमचे, सर्वांचे आदरणीय मोठेभाऊ यांचा आज वाढदिवस आहे.

प्रत्येक गावात एक मोठं घर असतं, ते मोठं घर म्हणजे त्या गावाची प्रतिष्ठा असते. जळगावचं देखील तसंच म्हणता येईल. ज्यांनी आंतरराष्ट्रीय किर्तीचं उद्योग-साम्राज्य उभारलं, ज्यांचं जीवन म्हणजे एखादी दंतकथा वाटावी, असे कर्तृत्व ज्यांनी उभारलं, असे कर्मयोगी आज आपल्यात उपलब्ध आहेत. त्यांच्याशी आपण हितगुज करू या.

भाऊ, या विशेष कार्यक्रमात मी तुमचे मन:पूर्वक स्वागत करतो.

तुम्ही विदेशातून नुकतेच हृदयावर शस्त्रक्रिया करून परत आलात. आपल्या शरीरावर, मनावर कुठलाच ताण-तणाव दिसत नव्हता, दिसत नाही. खरंच, एवढ्या सहजतेनं ही शस्त्रक्रिया स्वीकारायची आत्मिकशक्ती आपण आणली कोठून ?

**भाऊ–** प्रामाणिकपणे सांगायचं म्हणजे, तिथे जाण्याआधी माझ्या मनात बरेच प्रश्न उपस्थित झाले होते. माझ्या हृदयाशी इतकं खेळलं गेलं आहे की, त्याच्यात आणखी काही करण्यासारखं शिल्लक राहिलेलं नाही, असं मला वाटत होतं. ही प्रक्रिया जरी यशस्वी झाली असली तरी आपण त्याच्यातून यशस्वी बाहेर पडू किंवा नाही हा प्रश्न माझ्या मनात घर करून होता. आत्तापर्यंत अशा तीन प्रोसिजर्स झाल्या - दोन बायपास सर्जरी, एक ॲन्जिओप्लास्टी. या वेळी हवा तेवढा आत्मविश्वास नव्हता. जी गोष्ट मला करावी लागणार (ICD बसविणे) होती त्या गोष्टीचा डायरेक्ट उपयोग होईल किंवा नाही याबद्दल मी साशंक होतो.

मी, डॉ. सुभाष चौधरी, मुंबईचे डॉ. मुन्शी आणि डॉ. कर्णिक - आम्ही अमेरिकेला गेलो. तेथे गेल्यावर आम्ही तेथील डॉक्टरांना 'आमच्या मनातील शंकांचे निरसन झाल्याशिवाय ही शस्त्रक्रिया होऊ शकणार नाही' असं सांगितलं. त्यांनी आमच्या सर्व शंकांचे निरसन केलं. 'आपल्या शंकांचं निरसन झालं नसेल, तर तुम्ही ही शस्त्रक्रिया करू नका', असा सल्ला त्यांनी दिला. माझ्या सर्व शंकांचं निरसन झालेलं होतं. म्हणून शस्त्रक्रिया करण्यास मी राजी झालो. 'मी दोन वेळा वर जाऊन



AICD बसविण्यासाठी क्लिव्हलॅन्ड (अमेरिका) येथे भाऊंवर शस्त्रक्रिया : डॉ. विल्कॉफ, (२००५)

खाली आलेलो. आता तिसऱ्या वेळी काही परत येण्याची शक्यता कमी आहे,' असं माझ्या मनात यायचं. येथून गेलो तेव्हा मला टेन्शन होतं. परंतु डॉक्टरांशी चर्चा केल्यावर माझ्या मनातील सर्व ताणतणाव दूर झाले.

खरं पहायला गेलं तर त्यांनी माझं हृदय उघडलं नाही किंवा त्याची चिरफाडही केली नाही. फक्त एक मशीन बसविलं जे हृदयाची गती व ठोके नियंत्रित ठेवतं. तसं करण्यासाठी आवश्यक तेव्हा ते शॉकसुद्धा देतं. अशी दुतर्फी व्यवस्था त्याच्यात आहे. ३ बाय ४ इंचाचा छोटा कॉम्प्युटर, असं मशीन त्यांनी बसविलं आहे. हे मशीन बसविल्यावर माझ्या हृदयाची गती जास्त किंवा कमी झाली नाही. त्याचं काम पडलं नाही. असं असलं तरी त्याचा मानसिक आधार आहे ही एक आत्मिकशक्ती आपण समजा.

**शंभू पाटील-** भाऊ, तुमच्या आजाराचा दैनंदिनीवर वा कामावर परिणाम झाला आहे का?

**भाऊ-** आतापर्यंत चार प्रोसिजर्स झाल्या. जळगाव येथून या शस्त्रक्रिया करण्यासाठी निघालो त्या दिवसाच्या दिनचर्येत व परत पोहोचण्यानंतरच्या दिवसाच्या माझ्या दिनचर्येत काहीही फरक पडलेला नाही. मी सर्वसाधारणपणे पाच-साडेपाच वाजता उठतो. रात्री साडेनऊ-दहाला झोपतो. या हृदयावर फार अत्याचार झालेला आहे. १९८२ ला हृदयविकाराचा पहिला झटका आला. त्या वेळी पन्नास ते पंच्चावन्न टक्के हृदय निकामी झालं होतं. म्हणजे ४५ टक्के चांगल्या राहिलेल्या हृदयावर मी तब्बल २४ वर्षे काढली. माझी दिनचर्या नियंत्रित आहे. मी काळजी घेतो. डॉक्टर्स मित्रही आहेत. ते लक्ष ठेवतात. असं असलं तरी स्वतःची आत्मशक्ती आणि सर्वांच्या सदिच्छा यामुळेच मी ते आजपावेतो साधू शकलो. मला वाटतं, मी करीत असलेल्या कामातूनच मला ही ऊर्जा मिळत असावी.

**शंभू पाटील-** भाऊ, आपला जन्म वाकोद येथे शेतकरी कुटुंबात झाला. आपण एमपीएससी झालात, प्रशासनात चांगल्या हुद्याच्या नोकरीत सुखाने जगता आलं असतं. तरी आपण व्यापार उद्योगक्षेत्र स्वीकारलं.

सुरक्षित क्षेत्रात सुखानं तुम्हाला काम करता आलं असतं, परंतु तरीही शेतीसंबंधित उद्योगात का उतरलात? ही असुरक्षितता आपण का ओढवून घेतली?

**भाऊ-** मला याच्यातून पैशांच्या स्वरूपात काय मिळालं किंवा काय मिळणार आहे याचा मी कधीही विचार केला नाही. माझ्या मनात एकच विचार पक्का होता की, हा व्यवसाय मला चांगल्या प्रकारे व मोठ्या प्रमाणावर कसा करता येईल. माझं

ध्येय निराळं होतं. मला वाटलं, आपण जर बी-बियाणे विकण्याचा व्यवसाय करीत असू, तर सगळ्यात जास्त बी-बियाणे विकणारा माणूस किंवा फर्म म्हणून आपण नावलौकिक कमविला पाहिजे. असं घडवायचं असेल तर त्याच्यासाठी काय काय करायला हवं, हे मी नक्की केलं. त्यात मी ग्राहकाची सेवा चांगली केली पाहिजे, त्याच्याशी प्रामाणिकपणाने वागलं पाहिजे, हे ठरविलं. ही दोन्ही कामं केली तर तो आपल्याला कधीही विसरणार नाही, हे माझ्या लक्षात आलं. असं करत करत शेतकरी व शेती हा माझ्या व्यवसायाचा केंद्रबिंदू धरला. त्या गोष्टींशी संबंधित सर्व गोष्टी एका मागे एक करत गेलो.

व्यापार व्यवसायात खूप ॲक्टिव्हिटीज असतात. परंतु त्यामधून फारसा नफा निघत नाही. म्हणजे काय? दुसऱ्याचा माल आपण विकतो. उदा. आधी केम्प्लास्टचे पी.व्ही.सी. पाईप विकत होतो. महाराष्ट्रात नव्हे तर, देशात त्यांचे जास्तीत जास्त पी.व्ही.सी. पाईप विकले. एक वेळ अशी आली की, त्यांच्याकडून आपल्या मागणीची पूर्तता करण्यात विलंब होऊ लागला. इकडे ग्राहकांचा रेटा पाईप पुरवठ्यासाठी होता. केम्प्लास्टने आम्हाला सांगितले की, 'आमच्याकडे सध्या पाईप नाहीत, त्यामुळे पाईप देऊ शकत नाही.'

आपण एवढी मेहनत करूनसुद्धा ग्राहकाला पाईप पुरवू शकत नाही याची खंत वाटू लागली. ''मला काहीतरी पर्याय उपलब्ध करून द्या,'' मी त्यांना विनंती केली. पण 'यातून काहीच मार्ग नाही,' असं उत्तर मला मिळालं. मग ''मी पाईपचा



हलक्या पाईपांवर भारी संतुष्ट घरधनीण

कारखाना टाकू काय?'' असा प्रश्न मी त्यांना विचारला. त्यावर ते म्हणाले की, ''तुम्ही आमचे स्पर्धक होणार? तुम्हाला कारखाना टाका याबद्दल आम्ही होय कशाला म्हणू? तुम्हाला कारखाना टाकायचा असेल तर आम्हाला विचारायची गरज नाही.'' परंतु 'मला तांत्रिक सहकार्य, मार्गदर्शन लागेल' असं मी त्यांना सांगितल्यावर त्यांनी ते देण्याचे नाकारले. अशा प्रकारे त्यांनी मला जवळपास डिवचलं. 'हे आपल्याला तांत्रिक सहाय्य देणार नाही, तरी आपण हा व्यवसाय केलाच पाहिजे,' असं माझ्या मनानं घेतलं. माझी अस्मिता चाळवली गेली. त्यामुळे मी या व्यवसायात आलो. १९८० पासून उद्योग सुरू केला. अवघ्या ३-४ वर्षात देशभर पी.व्ही.सी. पाईप पुरवू लागलो.

आपण एखादं 'ध्येय' समोर ठेवलं तर 'पैशाचा विचार' मागे पडतो. गुणात्मक ध्येयपूर्तीला मर्यादा नसतात. जेथून मी सुरुवात केली त्याच्यापेक्षा खाली मी जाऊ शकत नाही ह्याची मला खात्री होती. मी जळगावला आलो त्या वेळी सोळा रूपये महिन्याच्या चाळीत राहत असे. वाकोदला होतो तेथे तर पोत्यावर झोपत होतो. घराच्या बाहेर उकिरड्यावर शौचाला जात होतो. जेव्हा हंगाम असे त्या वेळी खळ्यात रखवालदार म्हणूनही झोपत असे. मी मोठा व्यावसायिक धोका पत्करला तरी आता याच्यापेक्षा निकृष्ट प्रतीची कोणती गोष्ट माझ्या जीवनात होऊ शकेल, या विचारानेच मी वाटचाल करीत असतो. जीवनात स्थैर्य कधी आलेच नाही. प्रत्येक वेळा एक गोष्ट झाल्यावर त्याच्यामागे तशाच प्रकारचे गुणात्मक ध्येय असल्यामुळे मी आपला चालत राहिलो. अजूनही चालतोच आहे. मी थांबलो नाही. त्यामुळे मला रिस्कबाबत विचार करायला वेळच मिळाला नाही.

**शंभू पाटील-** एका छोट्याशा दंतकथेप्रमाणे आपण अतिशय छोट्या प्रमाणावर व्यवसायाला आरंभ केला. मूळ उद्देश होता की, शेतीमध्ये देश समृद्ध झाला पाहिजे यासाठी ठिबक सिंचनाचे तंत्र आपण आणलं. त्या विषयी सांगा.

**भाऊ-** महाराष्ट्राचे उपलब्ध भूमीगत पाणी उपसा सिंचन पद्धतीने वापरायचे म्हटल्यास कमाल २०/२२ टक्के जमीन ओलिताखाली येऊ शकेल. बाकीच्या जमिनीचं काय? पाण्याचं दुर्भिक्ष महाराष्ट्रात तरी कायम राहणार, याबद्दल माझी खात्री होती. म्हणून मी शेतीत सिंचनासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्यात बचत करेल, अशा तंत्राच्या शोधात होतो. घरांसाठी व कारखानदारीसाठी लागणारं पाण्याचं प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे, आणि शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याची उपलब्धता कमी कमी होत आहे. कमी पाण्यामध्ये शेतीची उत्पादकता योग्य प्रमाणात वाढेल.

इतरही फायदे मिळू शकतील अशा तंत्राच्या शोधात होतो. पाहिजे तेवढं व तितकं पाणी देण्याचं तंत्र मला अमेरिकेतील एका प्रदर्शनात पाहायला मिळालं. त्या प्रदर्शनात अण्णासाहेब शिंदे, आप्पासाहेब पवार यांची भेटही झाली. अमेरिकेत पाहिलेली ती ड्रिप टेक्नॉलॉजी मला भावली. सर्व माहिती घेऊन ती पद्धती मी येथे आणली.

मला जर तुम्ही विचारलं, ''भाऊ तुम्ही जीवनात येऊन काय केलंत?'' तर मी सांगू शकेल की, शेतकऱ्याला ज्या गोष्टीची नितांत आवश्यकता आहे अशा गोष्टी उपलब्ध करण्याचा प्रयत्न केला. ते करीत असताना उत्पन्न वाढीसाठी त्याच्या खिशात आधी चार पैसे टाकले. त्याच्यातला एक किंवा अर्धा पैसा मी घेतला. मी टिव्ही किंवा साबण बनविला नाही, शर्ट किंवा कपडा बनविला नाही. या वस्तू आपण वापरून टाकून देतो. त्यामुळे उत्पादकता वाढवितो, असे म्हणता येत नाही. उपभोगाच्या वस्तू बनविण्यापेक्षा मी कृषि उद्योगात आलो. माझ्या आईने तत्त्व घालून दिलं होतं की, 'असं काही तरी काम कर की, जेणेकरून तुझंच पोट नव्हे तर तुझ्या आजूबाजूच्या लोकांचंही पोट तर भरेलच शिवाय पशु-पक्षी, प्राणिमात्रांचंही पोट भरेल.' आईच्या इच्छेनुसार मी या व्यवसायात आलो.

*माझ्या कृषि औद्योगिक जीवनाची सुरुवात तिच्या प्रेरणेमधून झाली. त्यामुळे नोकरी किंवा त्यात गवसणारी सेफ्टी हा विषय मला लागू पडला नाही. माणसाच्या जीवनात पहिला व शेवटचा गुरू आई असते.*

अहो, आई तिचं रक्त आणि श्वास बाळपणीच आपणास देते.

आईचे संस्कार किती खोलवर जडतात याचं उदाहरण एका छोट्याशा प्रसंगातून सांगतो. मी सहा-सात वर्षांचा असेल त्यावेळची गोष्ट. माझ्या चुलत्यांसोबत मी आठवडे बाजारात गेलो होतो. एका खेळण्याच्या दुकानात भोवऱ्यांचा ढिग पडला होता. एक भोवरा मी उचलला आणि खिशात घातला. चुलत्यांच्या ते लक्षात आलं. पण ते मला काही बोलले नाहीत. घरी गेल्यावर त्यांनी आईला हे सांगितलं. आईनं मला एवढं मारलं की, ज्या फुंकणीनं ती मारत होती, ती फुंकणी तुटली. माझ्या पाठीवर वळ उमटले. ही आईची शिकवण मी कायम स्वरूपी लक्षात ठेवली. खऱ्या अर्थाने माझ्या जीवनाचे ध्येय व ते साध्य करण्याची पद्धत तिने मला दिली. त्या पद्धतीनुसारच जगायचा प्रयत्न करीत आहे.

**शंभू पाटील–** भाऊ, तुमच्यामध्ये क्षमता भरपूर आहे. तुम्ही 'आयटी' क्षेत्रात गेला असता तर प्रचंड एक्स्पान्शन झालं असतं, कंपनीचा फार विकास झाला असता. ती कंपनी कितीतरी पटीने मोठी झाली असती. तेवढी क्षमता आपल्या ठिकाणी

आहे. परंतु तुम्ही शेती या गोष्टीला प्रमाणभूत, केंद्रस्थानी मानून या क्षेत्रात काम करीत आहात व तुमचा सगळा उद्योग या सभोवताली उभारला आहे. 'असं का?' याचे उत्तर आपल्या आईने दिलेले आहे. तुम्ही यशस्वी उद्योजक आहात. परंतु मुळ शेतकरी किंवा कुणबी आहात, हे तुमचं खरं मूळ आहे. इतरांच्या दृष्टीने आपण यशस्वी उद्योजक आहात, परंतु शेतकऱ्यांच्या दृष्टीने आपण शेतकरी आहात.

आज नैतिकतेचा धागा दिवसेंदिवस क्षीण होत आहे. परंतु तुमच्यात तो ठायी ठायी दिसतो. त्याचं मूळ कशात आहे?

**भाऊ–** नैतिकतेच्या धाग्याचा विचार करताना माझ्या मनात माझे वडील येतात. माझे वडील एका कॉटन जिनींग प्रेसिंग फॅक्टरीचे 'बायींग एजंट' होते. म्हणजे मालकाने सांगायचं की, तू या भागातून इतका कापूस खरेदी कर. शेतकऱ्यांशी जर वडिलांनी हातमिळवणी केली असती तर ते मालकाला फसवू शकले असते. परंतु माझ्या वडिलांवर मालकांचा त्यांच्या स्वतःच्या नातेवाईकांपेक्षाही अधिक विश्वास होता. म्हणून त्यांनी प्रत्येक वेळा माझ्या वडिलांनाच खरेदीला पाठविले. वडिलांनी जो प्रामाणिकपणा त्यांच्या व्यवसायात बाणवला, त्यांच्या त्या जिन्समधून तोच प्रामाणिकपणा माझ्याकडे आला असला पाहिजे. दुसरं, नैतिकपणाचा संस्कार अंगवळणी पडण्यात आई-वडिलांचे जेवढे महत्त्व असते, तितकेच महत्त्व तुम्ही किती सकस वाचन करता, ज्यांच्याबरोबर तुम्ही वावरता ते मित्र यांनाही आहे.

आणखी महत्त्वाचं म्हणजे निसर्ग आपला गुरू आहे. बी.कॉम., एलएल.बी. झालो. मुंबईहून परत वाकोदला आलो. ७२ ते ७४ जळगावहून अप-डाऊन केले. वाकोदला मी शेती केली. स्वतःचे पहिले घर शेतात वाकोद येथे बांधले. त्यानंतर सुमारे ३० वर्षे मी जळगावला भाड्याच्याच घरात राहिलो. आज तू जैन हिल्सवर माझी मुलाखत घेत आहेस. इथेसुद्धा बघत असशील तर वाकोदसारखाच निसर्ग परत आला. निसर्ग माझ्या जीवनाचा भाग झाला आहे. आता तू मला सांगितलं की, न्यूयॉर्कमध्ये जाऊन रहा. मी तुम्हाला दहा हजार कोटी रूपये देतो. मी म्हणेन दहा हजार कोटी एखाद्या दवाखान्याला दे. परंतु मी काही निसर्ग सोडणार नाही. काँक्रिटच्या जंगलात राहायला जाणार नाही. सभोवतालच्या पर्यावरणाचा देखील तुमच्या वागण्या-बोलण्यावर परिणाम होतच असतो, असं नाही का वाटत तुला?

आई-वडिलांच्या संस्कारात, निसर्गात, मित्रांमध्ये आणि पुस्तकांमध्ये प्रामाणिकपणा भरलेला आहे. त्याचेच प्रतिबिंब माझ्या स्वभावात आलं असलं पाहिजे किंवा व्यक्तिमत्वात उमटलं असावं.

**शंभू पाटील-** भाऊ, तुम्ही एवढं उद्योगविश्व उभं केलं. ते उभारताना विचारांशी तडजोड करावी लागली का? जगण्याच्या तडजोडी प्रत्येक क्षणाला कराव्या लागल्या असतील. या तडजोडी करताना माणूस जी नैतिकता गमावून बसतो त्याच्या संदर्भात काही सांगता येईल का?

**भाऊ-** माझ्या जीवनात असा एकच अनुभव आला असे नाही, तर अनेक अनुभव आले आहेत. मूलभूत (Fundamental) गोष्टींबाबत कधीच तडजोड करायची नाही. ''ज्यांचं महत्त्व नाही किंवा ज्या तात्कालिक (Incidental) बाबी आहेत, त्यांच्यावर तडजोड करायची असेल तर मग जास्त खोलवर विचार करायचा नाही.'' या तत्त्वांना धरून मी आयुष्यभर वागलो. मी पाण्यासारखा नितळ आणि साधुसारखा सरळ आहे, असं म्हणता येणं कठीण आहे. एक मात्र सत्य आहे की, कोणत्याही मूलभूत गोष्टींवर मी तडजोड केली नाही व ती करण्याची मला गरज भासली नाही. आता प्रासंगिक गोष्ट व मूलभूत गोष्ट कोणती?

मला एक शाळा स्थापन करायची असेल किंवा दवाखाना सुरू करायचा असेल, तर ते पवित्र काम आहे. त्यासाठी माझ्या जमिनीला एन.ए. करायचे असेल व त्यासाठी संबंधित कारकून १०० रूपये घेतल्याशिवाय कागद पुढे सरकवित नसेल, त्या वेळी तुम्ही शंभर रुपये द्यायचे की नाही, असा प्रश्न उपस्थित होतो. मी असं म्हणेल की, प्रथम आपण ते पैसे न देण्याचा प्रयत्न करायला हवा, आग्रह धरायला हवा. परंतु वेळच आली, तर आपल्या घरासमोर एखादा कुत्रा येतो, तो भुंकतो, त्याचे भुकणं बंद करण्यासाठी आपण त्याला तुकडा टाकतो, तसा एक तुकडा अशा परिस्थितीत टाकायला हरकत नाही. परिस्थिती तशीच आहे, तर त्यासाठी हे पवित्र काम सहा महिने लांबवायचं का? परंतु तोच कारकून १०० रूपये घेण्याऐवजी बाई किंवा बाटली मागत असेल तर मी ते करणार नाही.

माझ्या आयुष्यात तसल्या गोष्टी करण्याची गरज वाटली नाही. समोरचा माणूसही तुमचा अभ्यास करीत असतो. समाजात आपल्यापेक्षा जास्त चाणाक्ष, हुशार असे लोक आहेत. ते सर्व जाणून असतात. मला असं वाटतं की, तुम्ही जर सोज्ज्वळ असं रेप्युटेशन निर्माण केलं, तर तुमच्या पुढे असे प्रश्न सहसा उपस्थित होणार नाहीत. तथापि सुरुवातच जर अप्रामाणिकपणाची असेल, तर तुम्हाला त्याच पद्धतीने ते चालवणे भाग पडेल. सुरुवातीपासूनच तुम्ही प्रामाणिकपणा अवलंबला तर गैर गोष्टी करण्याची तुम्हाला गरज भासू नये. दुसरं महत्त्वाचे म्हणजे तुमच्या *महत्त्वाकांक्षांना तुम्हाला कुठं तरी मर्यादा/गवसणी घालून द्यावी लागेल. ही मर्यादा*

*जर तुम्ही घातली नाही व वेड्यासारखे पैशांमागे धावत राहिलात, तर तुम्हाला सरसकट सगळ्या तडजोडी करणं भाग पडेल.*

मी तत्त्वाधारित ध्येयनिष्ठ राहिल्याने मला अशा तडजोडी करण्याची आवश्यकता पडली नाही.

**शंभू पाटील–** भाऊ, मी ऐकलं आहे की, आपल्या जीवनावर सर्वात जास्त प्रभाव महात्मा गांधीजींचा आहे. तुम्ही गांधीजींकडे कोणत्या दृष्टीने बघता?

**भाऊ–** शंभू, मी गांधीजींना प्रत्यक्षात पाहिले नाही. परंतु त्यांच्या फोटोकडे पाहून मी नतमस्तक होतो. गांधीजींनी जीवनाकडे बघण्याची आगळी दृष्टी दिली. त्यांनी देशाकडे बघण्याचा जो पायंडा टाकला त्याला इतिहासात तोड नाही. माझ्या आयुष्यात गांधीजींसाठी काही करता आले तर मी अवश्य करीन. सद्या त्या दृष्टीने गांधीजींवर लायब्ररी करीत आहे. त्यात गांधीजींनी व इतरांनी लिहिलेली पुस्तकं, त्यांची हस्तलिखितं, त्यांची छायाचित्रं संकलित करणार आहे. आतापर्यंत सर्वसाधारणपणे दहा हजार छायाचित्रे गोळा झाली आहेत. त्यांच्या ध्वनीफिती आणि चित्र-ध्वनीफितीही गोळा केल्या आहेत. हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी मला एक वर्ष लागेल. त्यासाठी जवळजवळ पन्नास लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. हे कुणाला दाखविण्यासाठी मी करीत नाही. या लायब्ररीत गांधी विचारांवर दर वर्षी



महात्मा गांधी रिसर्च इंस्टिट्यूटच्या पायाभरणी समारंभानिमित्त :
भाऊ, डॉ. आर.एस. माळी, सुरेशदादा, नामदेवराव, लेले काका, दलुभाऊ, शिरीष बर्वे आदि.



अहिंसा-सत्य-प्रेममूर्ती : बापू

दोन विद्यार्थी पीएच. डी. करू शकतील. माझ्या जीवनात मी ज्यांच्याकडून काही शिकलो त्यांच्या ऋणातून उतराई होण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे.

१९२० ते १९४८ या काळातील गांधीजींच्या विचारांची दिशा आजदेखील समर्पक व प्रसंगोचित वाटते. ग्लोबलायझेशनच्या आजच्या काळात सामान्य किंवा तळागाळाच्या व्यक्तीला काय होतं आहे, हे जर विसरलो तर आपण जेथे आहोत तिथेच परत येणार आहोत. दहा किंवा पंधरा टक्के लोकांचं चांगलं, भलं होऊन आपण हा देश पुढे नेऊ शकू का? ते काम चीरस्वरूपी झालं पाहिजे, असं मला वाटतं. माझा जागतिकीकरणाला विरोध नाही. परंतु ८५ टक्के लोकांच्या भल्याचा विचार त्या आधी करावा लागेल. जागतिक पातळीचे उद्योजक भारतात येतात. उद्योगात गुंतवणूक करू इच्छितात. त्यांना शेतीमध्येदेखील गुंतवणूक करण्याबाबत आपण आग्रहाने सांगितलं पाहिजे. असं केलं नाही, तर समाजातील असलेली गरीब आणि श्रीमंत यांच्यातली दरी वाढेल. ही दरी वाढू नये असे वाटत असेल, तर गांधीजींनी दिलेल्या विचारांनुसार आपण विकास करायला पाहिजे.

**शंभू पाटील-** भाऊ, मी आपल्याला एक अत्यंत खाजगी स्वरूपाचा प्रश्न विचारू इच्छितो. या विषयावर फारसं बोललं जात नाही. आपला उद्योग समूह आर्थिक संकटातून जात असताना (१९९६ ते २००१ दरम्यान) आपल्या भावना काय होत्या? त्यातून आपण कसे सावरलात?

**भाऊ-** आम्ही अचाट अशा विकासाकडे वळलो होतो. त्या विकासाचा अपेक्षित दर अफलातून होता. तुला आठवत असेल की, मनमोहन सिंग आणि चिदंबरम् या दोन व्यक्ती त्या वेळी म्हणत होत्याः ‘स्काय इज द लिमिट !’ म्हणजे

'आकाशाला गवसणी टाकायची असली तरी हरकत नाही. तुम्ही विकास करा, आम्ही तुमच्याबरोबर आहोत.' त्यांच्या या विचाराचा माझ्या मनावर खूप प्रभाव पडला. दुसरा विचार मी पुस्तकातून वाचला होता. त्यात असं नमूद केलं होतं की, सिंगल प्रॉडक्ट कंपनी नसावी; मल्टीप्रॉडक्ट कंपनी असायला पाहिजे. एकाच विषयात तुम्ही कितीही मोठे झालात तरी त्याचा उपयोग नाही. तुम्ही वेगवेगळ्या विषयांना हात घातला पाहिजे. जेणेकरून एका क्षेत्रात चढउतार झाले, तर तुम्हाला कंपनी म्हणून त्रास होणार नाही, तुमची कंपनी त्रासणार नाही. म्हणजे तुम्ही डायव्हर्सीफाय करायला हवे, हा एक संदेश होता. तुम्ही विकासाचा दर खूप वाढविला पाहिजे, हा दुसरा संदेश होता. या दोन्ही विचारांनी मी झपाटला गेलो. आणि त्यातून कल्पना आली वेगवेगळ्या प्रकल्पांची.



संवाद संचार : संपर्क माध्यम



तरल उर्वरक : जमिनीची सुपिकता

टेलीकम्युनिकेशन, लिक्विड फर्टिलायझर, सॉफ्टवेअर, ग्रॅनाईट यांसह निरनिराळे १२ प्रॉजेक्ट आम्ही एकाच वेळी सुरू केले. या विषयांची विशेष माहिती नसतानादेखील आपण यात यश मिळवू शकू, असा आत्मविश्वास होता. या निरनिराळ्या क्षेत्रात काम करणाऱ्यांना आपल्याला एकत्र करता येईल आणि ते जमू शकेल. माझा अंदाज असा होता की, ४०० कोटी रुपये टाकले तर दोन वर्षांमध्ये हे सर्व प्रोजेक्ट व्यवस्थित कार्यान्वित होतील. ते जर व्यवस्थित झाले, तर आपण बाजारपेठेतून भाग भांडवल उभे करू शकू. नंतर २०० कोटी रुपये भांडवल उभारणीसाठी घेतलेले बँकांचे कर्ज परत करू शकू. आपल्यावर कर्ज राहणार नाही. शंभर कोटी उभे केले. त्याच्या जोडीला बँकांनी ३०० कोटी रुपये दिले. एकूण चारशे कोटी रुपये आम्ही व्यवसायात गुंतविले. बँकेचे व्याज त्या

वेळी १८ ते २२ टक्के होते. ते व्याज कंपनी सर्व्हिस करू शकली नाही. ज्या वेळी भांडवल उभे करण्याची वेळ आली, त्या वेळी इक्विटी शेअरचे मार्केट कोसळलेले होते. त्यामुळे भांडवल उभारणी करता आली नाही. परिणामतः बँकांच्या कर्जाची परतफेड होऊ शकली नाही. शिवाय या १२ प्रॉजेक्टपैकी काही प्रॉजेक्ट फेल गेले, काही लेट सुरू झाले. व्याजाचा फटका मात्र अहर्निश बसतच राहिला. हा मार एवढा मोठा होता की, या ३०० कोटी रुपयांच्या कर्जावर २१० कोटी रुपये व्याज झाले. दिवसेंदिवस व्याजाचा बोजा वाढत गेल्याने आम्ही संकटात आलो.

या चक्रातून बाहेर पडण्यासाठी मला सहा वर्षे लागली. त्यात सुमारे पाच हजार सहकाऱ्यांचाही त्याग होता. या काळात त्यांना मी बढती देऊ शकलो नाही. परंतु एकही माणूस कंपनी सोडून गेला नाही. कारण त्यांना ही कंपनी त्यांची कंपनी वाटत होती. हा कौटुंबिकपणा आम्ही येथे राबवू शकलो. याचा स्वतंत्र अभ्यास व्हावा असा माझा आग्रह आहे. माझ्या एकट्याचा निर्णय चुकला. परंतु त्याचा त्रास पाच हजार सहकारी कर्मचाऱ्यांना सहा वर्षांपर्यंत सहन करावा लागला. म्हणून मी एक जाहिरात दिलीः 'हे माझ्यामुळे झाले. मला माफ करा.' ही जाहिरात ज्या समाजात मी वावरतो, ज्यांच्याकडून पैसे घेतले होते व जे माझ्यासोबत कामाला होते त्या सर्वांच्यासाठी होती. पण त्याहीपेक्षा अधिक महत्त्वाचं म्हणजे मी ही जाहिरात माझी सद्‌सदविवेकबुद्धी कायम जिवंत ठेवण्यासाठी दिली. कारण ते ओझं कमी करू शकलो नसतो, तर ते मला सतत बोचत राहिलं असतं.

**शंभू पाटील–** भाऊ, एक कौटुंबिक प्रश्न विचारतो. रिलायन्स असो की मफतलाल उद्योग समूह! त्यांच्यात कौटुंबिक कलह आहेत. काही उद्योग विनाशाच्या खाईपर्यंत गेल्याची उदाहरणं आहेत. आपल्याला चार मुले आहेत. सुदैवाने ती चांगली आहेत, आदर्श आहेत यात संशय नाही. तो विषयच नाही. परंतु आपण त्या संदर्भात विचार केला आहे काय?

**भाऊ–** विचार केला आहे. घरात जोपर्यंत वडील असतात बहुधा तोपर्यंत असे कलह होत नाहीत. त्याच्यासोबत मुलांना दिले गेलेले संस्कारदेखील महत्त्वाचे असतात. मुलांचंच म्हणणं आहे की, गांधीजींची विश्‍वस्ताची (ट्रस्टीशिपची) संकल्पना मी अवलंबावी. अजून त्याच्यावर विचार चालू आहे. आपले सर्व शेअर्स कुणाच्याही व्यक्तीगत नावावर नसावेत, असा विचार त्यांनीच पुढे केला आहे. सगळ्या भांडणाचे मूळ पैसा. हा पैसाच समोर नसेल, तर भांडणं होणार नाहीत. पैसा (शेअर्स) एका ट्रस्टमध्ये टाकला म्हणजे कुणालाच काही करता येणार नाही.

येणाऱ्या पिढीला हे माहिती असेल की, हा पैसा आपल्या एकट्याच्या मालकीचा नाही. हा सगळ्या समाजाचा आहे. ही संपत्ती जर आपण विश्वस्त म्हणून वापरली तर किंवा टाटांनी केलेल्या मॉडेलप्रमाणे आपण वागलो तर चांगलं होईल. मुलांनी स्वतःच हे सुचविल्याने सगळ्यांना धन्यवाद द्यावेसे वाटतात की, त्यांनी आपल्या घराण्याचा संस्कार जपला आहे.

**शंभू पाटील-** भाऊ, तुमच्या आयुष्यात तुमच्या जवळ असलेले तुमचे मित्र कोणते?

**भाऊ-** मोजायचे असतील तर मोजकेच आहेत. एवढा मोठा उद्योग समूह सांभाळणं कठीण, तसेच मोठ्या प्रमाणावर मित्र समूह सांभाळणंही कठीण आहे. मला असं वाटतं की, एकेका क्षेत्रातील मित्राचं नाव घेणं अधिक चांगलं आहे

राजकीय क्षेत्रात म्हटलं म्हणजे शरद पवार. दादांची आणि माझी मैत्री घनिष्ठ होण्याआधीच माझे संबंध शरदराव पवारांशी आले होते. शरदरावांकडे मी एक चतुरस्र व्यक्ती म्हणून बघतो. त्यांना उद्योगक्षेत्र, कला, साहित्य, संस्कृति, नाट्य, चित्रपट अशा विविध क्षेत्रात रस आहे. ते मला एक चांगले रसिक वाटतात. बालकविंची 'आनंदी आनंद गडे, जिकडे तिकडे चोहीकडे' ही कविता आणि तद्स्वरुप इतर कवितासुद्धा आजही त्यांना तोंडपाठ आहेत. शरदरावांकडे बघून मला नेहमीच एक प्रश्न असतो की, अनेकविध विषयांमध्ये गाढ रस घेऊन ते जीवन किती चांगल्या रितीने जगतात. त्यांचं शेतीविषयक ज्ञान इतकं सखोल आहे की, ते इतर कोणत्याही राजकीय



चंद्राबाबू नायडू (हैद्राबाद) यांच्या निवासस्थानी शरद पवार, चंद्राबाबू, भाऊ आणि अजित जैन.

व्यक्तीकडे नसावे. शेतीविषयी अधिकारवाणीने बोलणारा, विचार करणारा, जिव्हाळा असणारा मला तरी एकच माणूस जवळून माहित आहे, तो म्हणजे ना. शरदराव पवार! बहुधा शेतीविषयक सामाईक जाणीवेमुळेच आमची मैत्री असावी.

राजकीय क्षेत्रातले व दुसरे मित्र म्हणजे सुरेशदादा. गुण, स्वभावानुसार म्हटलं तर माझ्यात जे नाही ते दादांमध्ये आहे आणि माझ्यात जे आहे ते जवळपास दादांमध्ये नाही. आम्ही दोघे एकमेकांवर प्रेम करतो. दादा आधी ॲक्शन घेतो व नंतर विचार करताना दिसतो. मी आधी विचार करतो आणि नंतर ॲक्शन घेतो. हा माझ्यातला आणि दादामधला मुख्य फरक आहे. म्हणून आम्ही दोघं एकमेकांना पूरक आहोत. लोकांना कुतुहल आहे की, आम्हा दोघांच्या स्वभावात साम्य नाही तरी देखील आम्ही चांगले मित्र कसे? जैन इरिगेशन म्हणजे सुरेशदादांचाच उद्योग समूह आहे, असा बऱ्याच जणांचा समज आहे. कदाचित आमची घट्ट मैत्री त्याचं कारण असू शकेल.

साहित्यक्षेत्रात नामदेवराव आहेतच. त्यांची व आमची नाळच एक आहे. ते जेथून आले तेथूनच मीही आलो. गाव-खेड्यातून ते व मी निर्माण झालो आहोत. त्यांचे वडील व माझे वडील परस्परांना चांगले ओळखत असत. तेव्हापासून आमचीही मैत्री चालू आहे. त्यांच्यामुळे त्यांचे जे साहित्यिक मित्र आहे ते देखील माझे मित्र झाले. मला साहित्याची आवड आहे. साहित्यिकांपासून मला खूप काही शिकायला मिळालं आहे.

जीवनात खऱ्या अर्थाने चांगुलपणा बघायचा असेल तर राजाभाई मयुर यांच्याकडे बघा. त्यांचादेखील आज वाढदिवस आहे. संबंध सांभाळायचे कसे, त्याच्यासाठी किंमत किती मोजायची, याचा दंडक जर तुला शोधायचा असेल, तर त्यांच्याकडे सापडेल. जीवनात अनेक चांगले-वाईट प्रसंग येत असतात. अशा वेळी जे खांद्याला खांदा लावून जवळ असतील ते खरे मित्र.

डॉ. सुभाष चौधरी १९८२ पासून माझे चांगले मित्र आणि डॉक्टर आहेत. मी डॉक्टरसाहेबांना किंवा त्यांची पत्नी, माझी बहीण शारदा यांना साधारणत: रोज भेटलो नाही, तर चुकल्यासारखं वाटतं. डॉ. चौधरींकडून वक्तशीरपणा, आपल्या विषयाबद्दल सखोल ज्ञान व असाधारण स्मरणशक्ती हे गुण घेण्यासारखे आहेत.

डॉ. जे. के. डोशी आहेत, ते सकाळी सहा वाजेच्या आत जैन हिल्स येथे येतात. मी कुठेही गेलो तरी ते स्वतःच्या घरादाराची फिकीर न करता सावलीसारखे माझ्यासोबत येण्यास एका पायावर तयार असतात. त्यांनी दिलेला जिव्हाळा आणि प्रेम हे अविस्मरणीय व अतुलनीय आहेत.

जिवाभावाचे असे दहा मित्र आहेत. या मित्रांना मी सांभाळू शकलो पाहिजे. ते जमू शकत नसेल तर मैत्री चिरस्थायी टिकू शकणार नाही. प्रत्येक माणसाकडून काहीतरी शिकण्यासारखं आहे. आजीवन शिक्षण प्रेमामुळे मी जीवनात शिकतच राहत आहे, या मित्रांकडूनसुद्धा.

**शंभू पाटील–** जळगाव शहराच्या औद्योगिक विकासाबद्दल आपण काय सांगू शकाल? आपल्याला काय वाटतं?

**भाऊ–** जळगाव शहराचा औद्योगिक विकास म्हणावा तितका झाला नाही, हे माझं प्रामाणिक मत आहे. जळगावमध्ये कल्पकतेची, पैशांची कमी नाही. वास्तविक पाहता जळगावचे दरडोई उत्पन्न महाराष्ट्राच्या इतर जिल्ह्यांच्या तुलनेत बरंच जास्ती आहे. येथे कारखानदारीची आवश्यकता आहे. म्हणून बाहेरच्या कारखानदारांना येथे आणायचे असेल, तर मूलभूत सेवा-सुविधा पुरविल्या पाहिजेत. मध्यंतरी संप संस्कृतीची वाढ झाल्यामुळे उद्योगाला खिळ बसली. काही गोष्टी आपल्याला विचारात घ्याव्या लागतील. त्यात पाण्याची उपलब्धता असणे आवश्यक आहे. आपल्याकडे जळगावात तर पाण्याचे दुर्भिक्ष आहे. काही कारखान्यांना पाणी फार मोठ्या प्रमाणावर लागते. कारखाना म्हटलं म्हणजे वीज हवी. मला असे सांगण्यात आले की, जळगाव डी-झोनमध्ये गणले जाते. म्हणजे येथे विजेची चोरी जास्त होते. त्यामुळे जळगावला वीज सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अग्रक्रम दिला जात नाही.

सुरेशदादांनी जळगावचा व्यवसाय शॉपिंग कॉम्प्लेक्स निर्माण करून वाढविला. व्यवसाय वाढला त्यामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगारसुद्धा निर्माण झाला. परंतु उद्योगक्षेत्रात म्हणावी तितकी मुसंडी जळगावला मारता आली नाही. सुरेशदादांना तशी राजकीय शक्ती मिळू शकली नाही. जर मिनिस्टर म्हणून त्यांना चांगल्या पोर्टफोलिओमध्ये दीर्घ काळ काम करायला मिळाले असते, तर कदाचित फरक पडला असता. येथील इतर नेते मंडळी आणि सुरेशदादा यांच्यातील कलहामुळे औद्योगिक विकास खुंटला. जर सगळ्यांनी खांद्याला खांदा लावून काम केले असते, तर औद्योगिक विकाससुद्धा झपाट्याने झाला असता.

'उद्योग मानसिकता' तयार करण्यात माझंही योगदान असायला हवं होतं. परंतु मध्यंतरी सहा वर्षे कठीण आर्थिक संकटाचे गेले. त्या वेळी ते काम तडीस नेण्यासाठी आम्हाला दुप्पट शक्तीने काम करावं लागलं. पर्यायाने आम्हाला तिकडे लक्ष देता आलं नाही. त्यामुळे हा विषय मागे पडला असावा.

**शंभू पाटील–** भाऊ, आपल्याला जळगावच्या जकातीच्या प्रश्नाविषयी काय वाटतं?

**भाऊ–** जकात हे नगरपालिका किंवा महानगरपालिकेचे उत्पन्नाचे महत्त्वाचे साधन आहे. फार जाचक जकात असेल, तर उद्योग कसे चालतील? जिथे मुळात दोन टक्के नफा असेल आणि तीन टक्के टॅक्स घेत असाल तर कसे चालेल? मार्जिन कमी आणि किंमत जास्त अशा वस्तुंवर जकात कमी आकारायला हवी. चुकीने हे समीकरण बदललं, तर तो व्यवसाय ठप्प होईल व तो जळगावच्या बाहेर जाईल याच्यात काही वाद नाही. परंतु तसं घडता कामा नये. त्यासाठी डोळसपणे काम करायला हवे. केवळ जकातीमुळे विकासाला खीळ बसेल असं नाही, परंतु व्यवसाय बाहेर जाऊ शकतो हे शक्य आहे. नवीन उद्योग येणार नाही हेही शक्य आहे.

**शंभू पाटील–** भाऊ, आपल्या घरात नुकतीच दुर्दैवी घटना घडली. आपल्या धर्मपत्नी स्व. कांताबाई यांचे काही दिवसांपूर्वी दुःखद निधन झाले. महानोर दादा एकदा मला बोलले होते की, भाऊ आपलं दुःख चेहऱ्यावर कधी दिसू देत नाहीत. परंतु या घटनेमुळे ते फार अस्वस्थ आहेत. त्या गेल्यानंतर तुमच्या आयुष्यात काय जाणवतं?



जीवन संगिनी सौ. कांताबाई

**भाऊ–** सर्वसाधारणपणे भूतकाळाकडे केवळ रेफरन्स म्हणून पहायचं, ही वृत्ती मी फार जाणीवपूर्वक जोपासली. भूतकाळाचा जास्त विचार न करता भविष्याचा विचार करायचा. तब्बल ४४ वर्षे एकजीवपणे सोबत राहून माझ्या पत्नीने मला सहयोग दिला. त्या सहयोगाची भरपाई आता होऊ शकणार नाही. आज माझ्या आयुष्यामध्ये व्यक्तिगत जीवनात जी अगाध पोकळी निर्माण झाली आहे, ती भरून निघण्यासारखी नाही. हे जर मी स्वीकारले नाही, तर मी माझ्या जीवनात शेवटपर्यंत दुःखी राहणार आहे. ते दुःख माझ्या नातवंडांसाठी चांगलं नाही, कुटुंबासाठी चांगलं नाही, भविष्यासाठी चांगलं नाही; या समाजासाठी ते चांगलं नाही. ते दुःख जर मी दुःख म्हणून मानलं तर ते कुणासाठीच चांगलं नाही.

*एखादा दोषारोप, एखादं अपयश, यशदेखील आपल्याला पचविता आलं पाहिजे, तसेच दुःखसुद्धा पचविता आलं पाहिजे. यश, अपयश आणि दुःख आपण पचवू शकलो नाही, तर जीवनात आपण मिळविलं किंवा कमावलं काय?*

हे माझं वैयक्तिक दुःख आहे. मी जर त्या दुःखाला कवटाळून बसलो, तर त्याचे परिणाम मुलां-नातवंडांपासून तर समाजापर्यंत पोहचणार आहेत. मी तसं कसं करू? तसं न करता माझ्या पत्नीला जे हवं होतं, तिने जसे आमच्या मुलांवर संस्कार दिले, तसे संस्कार देणारी शाळा काढावी म्हणतो. माझं मन त्या कामाकडे वळवू शकलो, तर ते अधिक योग्य नाही का? ती शाळा विद्यार्थ्यांची आई बनू शकेल. समाजासाठी म्हणजे माझ्या तिसऱ्या पिढीसाठी, नातवंडांसाठी ते अधिक योग्य आहे, असे मला वाटते.

पुढच्या जन्मात सहचारिणी म्हणून कांताबाईच पत्नी म्हणून लाभावी याच्यात सुतराम वाद नाही. ४४ वर्षांच्या काळात आम्ही ४४ तास देखील परस्परांशी बोललो नसू. परंतु ४४ तासही न बोलता तिने सर्व साध्य केले. एवढ्या मोठ्या कुटुंबाचा सांभाळ तिने केला. कुटुंबात एकूण ३४ जण होते. सगळ्या कुटुंबाला संस्कारित करण्याचं काम तिने अबोलपणे केलं. आज आपण या संस्कारांचे फळ बघतो आहोत. लग्नानंतर ती दोन महिन्यात स्वतःला विसरली. स्वतःचे कोणत्याही प्रकारचं अस्तीत्व तिने जिवंत ठेवलं नव्हतं. तिने स्वतःला माझ्यात विलीन करून टाकलं होतं. मला आवाज उंचावण्याचीसुद्धा गरज कधी भासली नाही. डोळे जरी उंचावले तरी तिच्या डोळ्यात अश्रु दिसत असत. हिंदु संस्कृतीत पत्नी म्हणून जी पात्रता हवी, त्याचं जिवंत उदाहरण म्हणजे कांताबाई. हा आघात झेलण्यासाठी माझं मन मला मोठं करावं लागेल. माझ्यावर जबाबदाऱ्या खूप आहेत, त्या मला पार पाडावयाच्या



भाऊंचे दुःखावेगात सांत्वन करताना कांतीभाऊ, सुरेशदादा, दलुभाऊ

आहेत. सामाजिक बांधीलकीचा तो एक भाग आहे. म्हणून कांताबाई गेल्याचं दु:ख बाजूला सारून मला स्वत:ला कामात झोकून द्यायचं आहे.

**शंभू पाटील–** गेल्या तासाभरापासून आपण मोठ्याभाऊंची मुलाखत बघत आहात. ते जसे थोर उद्योजक आहेत तसे विचारवंतदेखील आहेत, समाजसेवकसुद्धा आहेत. भूतकाळात त्यांना रमायला आवडत नाही. भविष्यकाळाचा वेध घेणं हे ज्यांचे ध्येय आहे असे भाऊ. खरं म्हणजे सुरेश भट असं म्हणतात,

''माझं सुख-सुख झुंबर ते टांगलं,
माझं दुःख-दुःख तळघरात कोंडलं.''

मला वाटतं भाऊंच्याबाबत या अतिशय सार्थ अशा ओळी आहेत. अतिशय सुंदर जीवनप्रवास आणि जीवनाकडे बघण्याची व्यापक दृष्टी त्यांच्याकडे आहे.

भाऊ, तुमचा हा उद्योगसमूह ९०० कोटींवरून ९००० कोटींवर पोहचावा, तुम्ही शंभर वर्षे जगावं, तुमच्यावर समाजाने भरभरून प्रेम करावं. तुमच्यामुळे समाजाची भरभराट होणारच आहे याविषयी आमच्या मनात संशय नाही. परमेश्वर तुम्हाला उदंड, सुखा-समाधानाचे आयुष्य देवो, या शुभेच्छा मी सर्व प्रेक्षकांच्यावतीने व्यक्त करतो.



कोवळ्या मनांचं जतन संगोपन, आजाआजीद्वारा लालन पालन
डावीकडून घड्याळगतीक्रमाने : आरोही, अथांग, अमोली, अभेद्य, आशुली, अभंग आत्मन.

## सामोपचार आणि सामाजिक बांधीलकी : विकासाचे खरे मंत्र

शामकांत देशपांडे - आकाशवाणी, फेब्रुवारी, २००६

‘कर्ता करविता वेगळाच असतो, आपण निमित्त मात्र’ या तत्त्वाला कवटाळणाऱ्या चिंतनशील व संवेदनशील भवरलालजींचा जीवनप्रवास शेतीशी बांधील राहिला. वाटेवरच्या मानसन्मानांची मालकी आपल्या ध्येयबिन्दु शेतकऱ्यांकडे वर्ग करण्यात त्यांच्या मनाचा मोठेपणा दिसतो.

जैन इरिगेशनचे संस्थापक शिल्पकार, अध्वर्यु, आधुनिक पाराशर, जलतपस्वी मा. भवरलालजी जैन यांचा उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ विद्वत्सभेद्वारा गौरव करण्यात आला. कृषी, उद्योग आणि सामाजिक क्षेत्रात केलेल्या अलौकिक कामगिरीबद्दल त्यांना विद्यापीठाची ‘डि.लिट.’ ही सर्वोच्च सन्मानाची पदवी प्रदान करण्यासाठी कुलपती, व्यवस्थापन परिषद व अधिसभा यांनी एकमताने मान्यता दिली. ‘खानदेशातील या भूमिपुत्राने या भूमीसाठी आणि जनतेसाठी केलेले कार्य अनमोल आहे’ अशी भावना त्यांनी व्यक्त केली. भवरलाल जैन यांना हा सर्वोच्च सन्मान मिळत असल्याने विद्यापीठाशी निगडित असलेल्या प्रत्येक घटकाला अतिशय आनंद झाला.

फक्त उद्योग व्यवसायात रममाण न होता, ‘जगाच्या कल्याणा संताच्या विभूती, देह कष्टविती उपकारे’ या न्यायाने कृषी, सामाजिक, कला, शिक्षण, साहित्य, संस्कृती, आरोग्य इत्यादी अनेकविध क्षेत्रात पुरस्कारांचे आयोजन करून त्या त्या क्षेत्रात असामान्य कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना कायमस्वरूपी प्रतिष्ठा देण्याचे व त्यांना उत्साहित करण्याचे प्रशंसनीय कार्य सामाजिक बांधीलकीपोटी अनेक वर्षांपासून ते करीत आहेत. यामुळे भूमिपुत्रांना, प्रतिभावंतांना, विचारवंतांना, संशोधकांना, कलाकारांना नवचैतन्याची प्रचिती सातत्याने येत असते. व्यक्तिश: त्यांचं साहित्य व वाङ्मयप्रेम त्यांना केवळ एक कृषी उद्योजक न राहू देता विचारवंतांच्या पंक्तीत

बसविते. अभ्यासपूर्वक अभिव्यक्ती, उदार तथापि पारदर्शक परीक्षण, समाजस्थितीचे मार्मिक व सखोल निरीक्षण, त्याचे संवेदनशील व सडेतोड विवरण हे त्यांच्या चिंतनशीलतेचं मर्म आहे. उभा समाज त्यांच्या ठायी सरस्वती व लक्ष्मीचा मधुर संगम अनुभवतो, तो यामुळेच! आपल्या आयुष्यासाठी ते एक सूत्र धरून आहेत. जगण्यासाठी एक भूमिका बांधून आहेत. अंगीकारलेल्या तत्त्वप्रणालीचे ते उपासक आहेत.

भारताचा आत्मा खेड्यात वसतो. 'भारत बलसागर होऊन शोभिवंत होणार असेल, तर त्यासाठी खेड्यांकडे जायला पाहिजे,' या ध्यासानं झपाटले जाऊन ते त्यांच्या जन्मगावास परिपूर्ण खेडं किंवा आदर्श खेडं करण्यासाठी अविरत कार्यमग्न आहेत.

**शामकांत–** डी लिट पदवी स्वीकारताना आपल्या मनात कोणते विचार आले? आपल्याला कसं वाटलं?

**भाऊ–** श्रोते हो, मला सांगतांना आनंद होत आहे. त्या दिवशी माझ्या मनात एकच विचार आला, तो असाः 'खऱ्या अर्थाने माणसाचा सत्कार होतो का?' मला वाटतं, माणसाचा सत्कार होत नाही. माणूस असतो, तो तसाच असतो. त्याच्या कार्याचा सत्कार होऊ शकतो. परंतु हा माझ्या ठायी असणाऱ्या माणसाचा किंवा




भाऊंच्या विद्वत्तेचा सन्मान : विद्यापीठातर्फे डी.लिटचा बहुमान

त्याच्याकरवी झालेल्या कामाचा सत्कार झाला असे नाही, तर ज्याच्यासाठी मी कार्य करतो त्याचा तो सत्कार आहे, असं मला वाटतं. 'मी एखाद्या साबणाचा, टूथपेस्टचा किंवा दैनंदिन गरजेसाठी लागणाऱ्या वस्तुचा कारखाना काढला असता, देशभरात सर्वाधिक उत्पादन केले असते, तर माझा डी लिट ने सत्कार झाला असता का?' या प्रश्नाचं उत्तर मला स्वच्छ 'नाही' असं मिळालं. असे कित्येक उद्योगपती आपल्या देशात आहेत. उद्योगपतींचा किंवा उद्योगसेवकांचा डी लिटने सत्कार झाल्याची उदाहरणं कमी आहेत. याचा अर्थ असा आहे की, हा त्या माणसाचा सत्कार नाही तर तो ज्या ध्येयाने, उद्दिष्टाने काम करीत आहे, त्याचे जे लक्ष्य, जो केंद्रबिंदु आहे, त्या शेती-शेतकऱ्याचा तो सत्कार आहे.

मी आयुष्यभर शेती व शेतकऱ्यांसाठी काम करीत आलो आहे. शेतकरी वर्ग समाजात सुमारे ७० टक्के आहे. तो आजही मागासलेला, उपेक्षित, पीडित, रंजलेला-गांजलेला आहे. त्या वर्गासाठी आपण काम केलं, तर आपल्या कामाचं चीज होईल असं मला वाटलं. त्यामुळे मी हे काम केलं, करीत आहे व करीत राहीन. तुम्ही काम मोठं करता की छोटं याला महत्त्व नाही. परंतु ते काम कुणासाठी करता आहात, त्यावर त्याचं महत्त्व आहे. गांधीजींनी इतकं मोठं काम स्वतःसाठीच केलं असतं, तर त्यांना आपण 'महात्मा' म्हटलं असतं का? सबंध भारताला स्वातंत्र्य मिळविण्याचं मोठं ध्येय त्यांनी डोळ्यासमोर ठेवलं होतं, म्हणून आपण त्यांना महात्मा किंवा राष्ट्रपिता संबोधतो.

मला त्या दिवशी असं वाटलं की, हा माझा गौरव नाही, माझ्या कामाचा गौरव नाही, पण ज्याच्यासाठी मी काम करीत आहे त्यांचा तो गौरव आहे. ज्या दिवशी मला हा सन्मान मिळाला त्या वेळी मी म्हणालो होतो, ''हा मिळालेला सन्मान असाच मी शेतकऱ्यांकडे वर्ग करीत आहे. त्यांचे खांदे इतके सुदृढ आहेत की, तेच हा सन्मान पेलू शकतील.''

**शामकांत-** भाऊ, आपण उद्योजकतेबरोबर जैन चॅरिटीजच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक कार्यांना अत्यंत महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. विशेषतः साहित्यिक म्हणून आपलं जे पुस्तक आहे, 'आजची समाजरचना...' त्यात आपण परखड विचार मांडून समाजाचे डोळे उघडले. त्याला आपल्या गुणसमुच्चयाचा आदर्श म्हणावं लागेल.

भाऊ, आपण १९६३ पासून व्यवसायाला सुरुवात केली.

अवघ्या ७,००० रु.च्या बीजभांडवलातून सुरू झालेल्या या उद्योगाची आजची उलाढाल जवळपास १,००० कोटी रु. आहे. वाकोद ते वॉशिंग्टन असा जगभर पसारा आहे. या औद्योगिक टप्प्यांबाबत आपण काही सांगू शकता काय?

**भाऊ-** माझ्या व्यावसायिक जीवनाची सुरुवात झाली ती १९६३ या वर्षात. १९६३ ते १९७८ अशी तब्बल १५ वर्षें मी व्यापार करण्यात लावली. व्यापार करीत असताना मी शेतीशी निगडितच व्यापार-व्यवसाय केला. म्हणजे खतं, बी-बियाणं, ट्रॅक्टर्स, थ्रेशर्स, इलेक्ट्रिक मोटर्स, आणि त्या काळात जेथे इलेक्ट्रीसिटी नव्हती तेथील पंपांसाठी क्रुडऑईलचा व्यवसाय केला. कृषी साधनसामग्री हाच माझा विषय राहिला. या पंधरा वर्षात आवश्यक ते विपणन कौशल्य मिळविण्याचा प्रयत्न केला. त्या वेळी आमच्या नावाची ओळख नव्हती. माझ्याकडे भांडवलाची कमतरता होती. तरीही दहा नामांकित कंपन्यांचा माल विकला व नावलौकिक मिळविला. प्रामाणिकपणे काम केल्यानं या कंपन्यांनी मला खूप काही मदत केली. त्या वेळी चांगलं विश्वसनीय दुकान म्हणून महाराष्ट्र पातळीवर नाव कमावलं. हा माझ्या व्यावसायिक जीवनातला पहिला टप्पा.

त्यानंतर जळगावतील १४ वर्षें बंद असलेली केळी पावडर फॅक्टरी १९७८ मध्ये विकत घेतली. या फॅक्टरीचं उद्घाटन १९६४ मध्ये यशवंतराव चव्हाण यांनी केले होते. या उद्घाटन समारंभात ते बोलले होतेः ''साखर कारखाना काढणं सोपं आहे, पण केळ्याच्या भुकटीचा कारखाना सहकार क्षेत्रात काढणं खूप कठीण आहे. एवढी मोठी झेप आपण घेत आहात. त्याच्या यशस्वीतेसाठी खूप परिश्रम घ्यावे लागतील.'' त्यांच्या ठिकाणी किती दूरदृष्टी होती. त्यांनी त्या काळी नोंदविलेली प्रतिक्रिया आजही आमच्याकडे संग्रही आहे. त्यांचे ते शब्द किती खरे ठरले. चौदा वर्षें हा कारखाना बंद राहिला.



पहिला उद्योग प्रकल्प : पपई पासून पपेन

त्या कारखान्याची खरेदी करून मी उद्योग जगात आपलं पहिलं पाऊल रोवलं. तिथं केळ्याची पावडर मीसुद्धा यशस्वीपणे बनवू शकलो नाही. मात्र केळीच्या पावडरऐवजी पपईच्या चिकापासून पपेन बनविण्याचा उद्योग मी तिथेच सुरू केला. त्याचं उत्पादन करीत असताना 'जे काही करायचं ते उत्तम करायचं' असा ध्यास मी घेतला. पुढे तो माझा स्थायीभावच झाला. देशातून पहिल्यांदाच प्युरिफाईड व रिफाईंड पपेन पाठविण्याचं काम आपल्या कंपनीने केले. जवळजवळ २५ वर्षे आम्ही हा उद्योग केला व त्यात अग्रणी राहिलो. जागतिक व्यवहार कसे असतात, मालाचा दर्जा कसा ठेवावा लागतो आदिंबाबत आम्ही फार सतर्क राहिलो. गुणवत्तेचं बाळकडू त्या पपेनच्या उद्योगातून मिळालं.

माझ्या औद्योगिक जीवनाचा नंतरचा टप्पा म्हणजे पी.व्ही.सी. पाईप उत्पादन. १५ ऑगस्ट १९८० ला हा कारखाना सुरू झाला. त्या वेळी एका तासात केवळ ५०० किलो पाईप आपण बनवीत असू. आज तो आकडा काही हजार किलोंवर गेला आहे. देशातील पहिल्या एक दोन क्रमांकावरील पी.व्ही.सी. पाईप निर्मिती करणारे 'जैन पाईप' म्हणून आपण पुढे आलो.

तिसरा टप्पा म्हणजे ठिबक सिंचन. सर्वसाधारणपणे १९८७ ला ठिबक सिंचनाचा व्यवसाय सुरू केला. पूर्वी आमची कंपनी खाजगी क्षेत्रात होती. त्यानंतर तिचे रूपांतर सार्वजनिक कंपनीमध्ये झाले. लोकांकडून समभागातून भांडवलाची उभारणी केली. त्या वेळी खऱ्या अर्थाने सार्वजनिक क्षेत्रात काम करणारी कंपनी म्हणजे जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. या कंपनीचा जन्म झाला. या कंपनीच्या माध्यमातून लोकांपुढे ठिबक सिंचनाची संकल्पना मांडली. त्या वेळी ही संकल्पना नवीन होती. सर्वसामान्य माणूस, शेतकरी, पुढारी, अधिकारी यांना कुणालाच त्याची माहिती नव्हती. पाण्याचं महत्त्व इतकं आहे, याची जाणीवसुद्धा बहुतेकांना नव्हती. त्या काळी पाण्याची पातळीही इतक्या खाली गेलेली नव्हती.

ठिबक सिंचन म्हणजे काय हे समाजातील प्रत्येक घटकाला समजविता, समजविता नाकी नऊ आले. पाणी वाचविण्याची गरज आहे, अशा स्वरूपाची पहिली जाहिरात दिली. त्याच्यात कुठेही उत्पादनाचं किंवा ठिबक सिंचनाचं नाव नव्हतं. ते समाज प्रबोधनाचं काम होतं. तेव्हापासून १५ वर्षे ते काम सातत्याने करीत राहिलो. म्हणून आपल्याला हे दिवस दिसत असावेत. ठिबक सिंचन या क्षेत्रातले देशातील प्रेरणास्थान, प्रेरक किंवा पायोनियर त्यामुळेच गणले जातो. ठिबकचा अवलंब करणारा भारत जगाच्या पातळीवरील दोन नंबरचा देश आहे.

जगात ठिबक सिंचनाखाली सगळ्यात जास्त क्षेत्र अमेरिकेत आहे व त्यानंतर भारताचा क्रमांक लागतो. भारतात ठिबक सिंचनाचे क्षेत्र वाढविण्यात आजही भरपूर वाव आहे. परंतु दुर्दैवाने तसं झपाट्याने घडत नाही. मात्र भविष्यात असं घडेल अशी मला खात्री आहे.

लाकूडतोड, जंगलतोड होऊ नये, नैसर्गिक साधनसंपत्तीला वाचविता यावे, या दृष्टीने प्लास्टिकचे शीट बनवायला १९९१ ला सुरुवात केली, ती १०० टक्के निर्यातीसाठी. पैसा कमावणे हेच उद्दिष्ट न ठेवता समाज व पर्यावरणाशी बांधीलकी हे दोन विषयही डोळ्यासमोर ठेवले. त्यामुळे हा चौथा टप्पा महत्त्वाचा ठरला, असं मी मानतो. तदनंतर कांदा व फळ प्रक्रिया यांचे दोन भव्य प्रकल्प उभारले गेले. हजारो टन कांदे व आंबे, पेरू, आवळे, केळी यांच्यावर प्रक्रिया करून देशी व परदेशी बाजारपेठेत माल विक्रीचे सत्र सुरू झाले. हे प्रक्रिया उद्योग शेतीनिगडित असल्यामुळे निसर्गलहरी व परदेशी बाजारपेठ यांच्या अस्थायीपणाचे झटके आणि चटके या उद्योगालाही बसले. गर्भगळीत झालो होतो, पण हरलो नाही.


सामूहिक जैविक वायू पुरवठा व्यवस्था

उद्योग व्यवसायातील पुढचा टप्पा सुरु केला तो आहे बायोगॅस व बायोडिझेल. त्यात संशोधन सुरू आहे. तेथे देखील मुसंडी मारू असा भरवसा वाटतो.

**शामकांत-** आपण लिहिलेल्या 'आजची समाजरचना ...' या पुस्तकात परखड विचार व्यक्त केले आहेत. आपण तत्त्वांशी तडजोड केली आहे का?

**भाऊ-** इथे असं सागावंसं वाटतं की, ते पुस्तक मी समाजावर टीकाटिप्पणी करण्यासाठी लिहिलेलं नाही. त्याच्यात टीकाही नाही. समाजाचे यथार्थ चित्रण करायचा प्रयत्न आहे. आज समाज कुठं आहे व समाजाची जी विविध महत्त्वाची अंगे आहेत, उदा. विधी, प्रशासन आणि न्यायसंस्था, या तिघांची आजची परिस्थिती काय आहे, याचं अगदी यथार्थ व हृदयस्पर्शी वर्णन सडेतोड भाषेत केलं आहे. त्याला तुम्ही परीक्षण किंवा निरीक्षण म्हणा. परंतु त्याला टीका म्हणता येणार नाही. एकूणच सबंध समाजरचनेबद्दल ते निरीक्षण आहे. एक मुद्दा प्रकर्षानं मांडावासा वाटतो की, त्यातल्या काही गोष्टी शासनाने स्वीकारल्या आहेत.




‘आजची समाजरचना...’ पुस्तक प्रकाशन कार्यक्रमः
अच्युतराव अत्रे, यशवंत महाजन, भवरलाल जैन (भाऊ), डॉ. संभाजी पाटील, पद्मश्री कुमार केतकर

शासन गंभीरपणे काही निर्णय घेत आहे. त्या पुस्तकात (२००१ मध्ये) माहितीचा अधिकार मिळावा, असे मत व्यक्त केले होते. अलिकडेच हा कायदा अंमलात आला आहे. प्रशासनात काय बदल करणे अपेक्षित आहे, निवडणूक पद्धती, आमदार-खासदारांच्या अधिकाराच्या मर्यादा आदी सर्वांबद्दल शासनाचा गांभीर्यानं विचार चालू आहे. याचा अर्थ असा की, पाच वर्षांपासून आपण ज्याची अपेक्षा केली होती, ते आज होत आहे. या पुस्तकात त्या काळी मी सद्यःपरिस्थितीवर उपाययोजना सुचविली होती, तीसुद्धा बऱ्याच अंशी हळूहळू स्वीकारली जात असल्याचं दिसत आहे. तुटीचा अर्थसंकल्प करू नये अशी त्यात मांडणी होती, तेही घडलेलं आहे.

**शामकांत–** भाऊ, आपण एक विचार असा मांडला होताः प्रत्येक अर्थसंकल्प हा कृषी, अर्थव्यवस्था, कररचना आणि सुलभ बँकिंग प्रणाली यांचा सुंदर संगम साधणारा असावा. त्याविषयी आपलं मत सांगा.

**भाऊ–** होय, शेती आणि शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र अर्थसंकल्प मांडला पाहिजे असं सांगितलं होतं. हा मुद्दा मी महाराष्ट्र टाईम्समध्ये (२००१) आग्रहाने मांडला होता. त्यांनीदेखील पहिल्या पानावर प्रकाशित केला होता. पण ते अद्याप झालं नाही. कारण अशा अंदाजपत्रकाला दुसरी बाजू कोणती आहे? जमेची बाजू काय? याला खर्चाची किंवा गुंतवणूकीची बाजू आहे काय? निधी आणायचा कसा? हे प्रश्न शिल्लक आहेत. रेल्वेचा अर्थसंकल्प स्वतंत्र असतो, त्याला दोन्ही बाजू

असतात. ते अजून कृषीक्षेत्रात जमलं नाही. हे होणं अत्यंत महत्त्वाचं आहे. जेणे करून जे काही बोललं जातं तसं घडतं की नाही, घडलं की नाही याच्यासाठी त्यांना प्रत्येक वेळी उत्तर द्यावं लागेल. आज ना उद्या हा मुद्दा पुढे येणारच आहे. कृषी क्षेत्रातही पारदर्शकता आलीच पाहिजे.

'इंडिया शायनिंग'चं उदाहरण घ्या. 'इंडिया शायनिंग' झाला किंवा नाही, हा प्रश्न आहे. परंतु 'शायनिंग' असताना केंद्र सरकार मात्र पडलं. ते सरकार का पडलं? कारण शेतकऱ्यांना ते आवडलं नाही. शेतकऱ्यांच्या हातात सरकार बदलविण्याचे अधिकार लोकशाहीमुळे आलेले आहेत. सर्वसामान्य जनता, शेतकरी सरकार पाडू शकतं याची त्यांना जाणीव झाली आहे, ही फार मोठी जमेची बाजू म्हणावी लागेल. 'द प्राईस ऑफ लिबर्टी इज व्हिजिलन्स!' आपणास खऱ्या अर्थानं स्वातंत्र्य उपभोगायचं असेल, तर आपण सदैव सतर्क, जागृत राहायला पाहिजे. ते शेतकरी, सर्वसामान्यजण जागते होते, हे त्यांनी सिद्ध केलं आहे. जर दुसऱ्यांदाही तशी वेळ आली तर गरजेनुसार ते तसं करतील, असं मला वाटतं.

**शामकांत-** आपल्या अपयशाबाबत आपण जाहिरात दिली. भारतातील नव्हे, तर जगातील औद्योगिक क्षेत्रातली ही दुर्मिळ व वेगळी घटना म्हणावी लागेल.

आयुष्याच्या जमाखर्चात सलणारं अपयश आपल्याला सांगता येईल का?

**भाऊ-** डी लिट पदवी मिळाली त्या वेळी मी भाषण केले होते. त्यात मी म्हटलं होतं की, ४० मिनिटांचे लेखी भाषण दिलेले आहे. त्या भाषणात मी माझ्या आयुष्यात काय चुका केल्या याचंच विवरण दिलेलं आहे. परंतु चुका मांडून थांबलेलो नाही, तर त्यांच्यापासून काय धडे घेतले हेसुद्धा मांडलं आहे, जेणे करून पुढच्या पिढीला ते मार्गदर्शक ठरू शकेल. मुद्दा असा आहे की, जो माणूस चुका करत नाही, ज्याच्या हातून काहीच चूक झाली नाही, त्यानं जीवनात काहीतरी साध्य केलं आहे का? मला वाटतं, काहीच नाही. 'झालेली प्रत्येक चूक ही यशाची पहिली पायरी आहे,'असं समजून डोळसपणे विचार केला पाहिजे. अशी शिदोरी आपण बांधली, तर ती यशामध्ये मदत करणारी गोष्ट ठरते. 'चूक करायला घाबरा' हा संदेश मी माझ्या जीवनात कुणाला देणार नाही. चूक जरूर करा, एकदा नव्हे अनेकदा करा. परंतु प्रत्येक वेळी तीच ती चूक करू नका आणि तीच घडली तरी चूक कमीत कमी मात्रेत घडावी. चूक झाली तर तिच्यातून धडा शिका व पुढे जा. तुम्ही नोकरी करीत असाल तरी हाच नियम लागू होतो. नोकरीतदेखील उपक्रमशीलता हवी. तरच या देशाला चांगले दिवस येण्याची शक्यता आहे.



हार्दिक आभार, पुरस्कार स्वीकार

**शामकांत-** भाऊ, जळगाव शहराची औद्योगिक प्रगती खुंटली आहे, असं म्हटलं जातं. असं चित्र फक्त जळगाव शहरापुरतं मर्यादित नाही, तर संपूर्ण देशात दिसतं. त्याविषयी आपलं काय मत आहे?

**भाऊ-** जळगावची किंवा देशाची औद्योगिक प्रगती खुंटत आहे, हे मी मानत नाही किंवा त्यावर विश्‍वास ठेवण्यास मी तयार नाही. फक्त आमचं उदाहरण घेतलं तर आम्ही येत्या दीड वर्षात अजून दीडशे ते दोनशे कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहोत. एकूण आलेख जर पाहिला तर विकासाकडे जाईल. येथल्या कल्याणी ब्रेक्सने ती कंपनी विकलेली असली, तरी ती कंपनी येथून गेलेली नाही; तो रोजगार काही बंद झालेला नाही. फरक इतकाच की, त्याचा मालकी हक्क बदलला. उद्योग वाढतच जाणार आहेत.

**शामकांत-** खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या संदर्भातील आपले गेल्या दहा वर्षांचे परखड अनुभव सर्वांना उद्‌बोधक व प्रेरणादायी ठरतील. त्या संदर्भात आपण लघुउद्योजक व उद्योजकांना कोणता कानमंत्र द्याल?

**भाऊ-** भारतीय लोक विदेशात जाऊन तिकडचे कारखाने विकत घेत आहेत. आपल्या देशात अशा एक डझन कंपन्या आहेत. अनेक क्षेत्रात तर भारतीय कंपन्या पहिलादुसरा नंबरसुद्धा पटकावित आहेत. जगातील सर्वाधिक श्रीमंत लोकांमध्येसुद्धा भारतीय कंपन्यांच्या व उद्योजकांचा समावेश वाढत्या प्रमाणात होत आहे. सांगायला

मला आनंद वाटतो की, जैन इरिगेशनदेखील बहुराष्ट्रीय कंपनी होण्याच्या मार्गावर आहे. आपल्याला खाऊन जाईल इतके आपण नेभळट नाही. हे सशक्त भारतीय व्यवसायांना लागू आहे. जे दुर्बल आहेत त्यांना मात्र उदारीकरणाचे झटके बसत आहेत. त्याच्यातून काय मार्ग निघेल, हे फक्त काळच सांगू शकेल. व्यवहारात कठोर परिश्रम व प्रामाणिकपणा या गोष्टींना प्राधान्य दिले, तर भारतीय माणसाच्या अंगी जे अभिजात गुण आहेत ते इतके मोठे व चांगले आहेत की, त्यांना 'त्यांची' (परदेशी कंपन्याची) भीती वाटायला नको.

**शामकांत–** आपण आपल्या चारही मुलांना- अशोक, अनिल, अजित व अतुल यांना आणि नातवाला दिलेले संस्कार आमच्या डोळ्यासमोर आहेत.

आजच्या पिढीला, विशेषतः शिक्षण घेणाऱ्यांना एकत्र कुटुंब पद्धती आदि विषयी विद्यार्थ्यांना कोणता संदेश देऊ शकाल?

**भाऊ–** *'तू वाटेल ते कर, परंतु ते करीत असताना तुझं कुटुंब, समाज व देश यांच्याशी कायम बांधीलकी ठेव.'*

आपण आपलेपणा घालवीत आहोत काय? समाजात जो एकजिनसीपणा, एकजीवपणा, सामोपचार आहे तो घालवतो आहोत काय? हे मूळ प्रश्न आहेत. देश म्हणून आपण अतिरेकी, हिंसाचारी होत आहोत का, याचा विचार प्रत्येकानं केला पाहिजे. प्रत्येक माणूस अशा प्रश्नांचा विचार करत राहिला तर सकारात्मक विचारसरणीचा विकास होऊन भारत महासत्ता होईल. तरूण पिढीच भारताला महासत्ता बनविणार आहे. तरूण पिढी हे काम करू शकते, असा विश्वास मी त्यांना देऊ इच्छितो. हा मंत्र या तरूण पिढीने ध्यानात घ्यावा.

## कृषिसमर्पित जीवन : भवरलाल जैन

शिबिरार्थी मुलं-मुली - लो. टि. विद्यामंदिर, २२ जून २००६

पाण्याच्या उपलब्धतेची हमी ते कृषि उत्पादनाला वाजवी दाम अशा विस्तृत क्षेत्रांमध्ये कार्य करून भवरलालजींनी एक अनुसरणीय नमुना तयार केला आहे. देशाच्या विकासासाठी अशा ५०-१०० उद्योजकांची गरज आहे.

रत्नागिरी जिल्हयातील दापोली तालुक्यातील चिखलगाव येथील 'लोकमान्य टिळक विद्यामंदिर' या शाळेच्या ८८ विद्यार्थ्यांची व १० शिक्षकांची शैक्षणिक सहल दि. १८ जून ते २२ जून २००६ दरम्यान आयोजित केली गेली. विद्यार्थी व विद्यार्थिनींनी या निसर्गरम्य मनमोहक परिसराचा आनंद लुटला. त्यात शिक्षकही सहभागी झाले. चोख व्यवस्था, मनस्वी आत्मीयता, सखोल मार्गदर्शन आणि दुर्मिळ दूरदृष्टी यातून यशस्वी झालेला सहलीचा हा कार्यक्रम सर्वांच्या हृदयात कायमचे घर करून बसला.

''विद्यार्थीदशेतच मुलांमुलींना कृषिची प्रत्यक्षात माहिती मिळावी, त्यांना कृषि कामाचे मोल कळावे, त्यांच्या विचारसरणीत कृषिसंस्कृती घट्ट रुजावी, मनात कृषिक्षेत्राबद्दल आवड निर्माण व्हावी, कृषितंत्राविषयी बौद्धिक तसेच अभ्यासकीय दृष्टीकोन तयार व्हावा आणि कृषिक्षेत्रात उतरण्याची आंतरिक भावना जन्मास यावी.'' अशी विशाल विचारधारा प्रत्येक उमद्या कृषि उद्योजकाने एक आदर्श म्हणून स्वीकारण्यासारखी आहे. जळगावच्या जैन उद्योग समूहाचे संस्थापक शिल्पकार भवरलाल जैन उपाख्य भाऊ यांनी अशा भूमिकेतूनच या सहलीचं आयोजन करण्यात स्वतःच रस घेतला.

२२ जूनला संध्याकाळी प्रकृती ठीक नसतानाही भाऊंनी मुलामुलींची भेट घेऊन त्यांच्याशी सुसंवाद साधला, मनमुराद गप्पागोष्टी केल्या. मुलामुलींनी त्यांना स्वतःला भावलेले प्रश्न भाऊंना मनमोकळेपणे विचारले. भाऊंनी अगदी

सहजतेने त्यांना आपले विचार सांगितले. प्रश्नोत्तराचा असा आगळावेगळा संयोग जुळून आला की, त्याचं गप्पागोष्टीत रूपांतर केव्हा झालं, हे कळलंच नाही.

**सौ. रेणु दांडेकर–** भाऊ, प्रकृती ठीक नसतानाही आपण आम्हां शिक्षकांना व आमच्या विद्यार्थ्यांना भेटण्यासाठी आलात, खेड्यातल्या मुलांसाठी आमच्यात आलात, खरंच याचं अप्रूप वाटतं! आपल्याला त्रास दिला, असं वाटतं! आपलं मन किती मोठं आहे, हे कसं सांगावं?

**भाऊ–** चांगल्या कार्यास माझा सतत पाठिंबा असतो. सकारात्मक गोष्टींना मी सातत्याने आधार देतो. तेव्हा आपल्या सर्वांना भेटण्यात त्रास कसला? मला सुसंवाद साधणं आवडतं. मी जीवनात लहान-मोठा हा फरक केला नाही. मनुष्य आपल्या कर्तव्यानं मोठा होतो. आमच्या उद्योग व्यवस्थापनात कार्यरत सर्वांना आम्ही 'सहकारी' म्हणतो. मी सामान्य सहकाऱ्यापासून ते वरिष्ठ सहकाऱ्यांशी संपर्कात असतो. त्यांची विचारपूस करतो.

आपण कोकणच्या ग्रामीण भागातून एवढ्या दूरवरून जळगाव येथे आलात, कृषिदर्शन सहल आयोजित केलीत. बालमनावर कृषिसंस्कृतीचे सुसंस्कार घडावेत हे उद्दीष्ट ठेवून जळगावला भेट दिलीत. यातून निकोप भावी पिढी निर्माण होईल, या उद्देशाची कास धरलीत. त्यामुळे खरं तर मी आपलं कौतुक करायला हवं. ग्रामीण भागाशी माझी बांधीलकी आहे. तेथून येणारे विद्यार्थी-विद्यार्थिनी मला जवळचे आहेत, मग ते कोकणचे असोत की राजस्थानचे, मध्यप्रदेशचे असोत की तामिळनाडूचे. मी त्यांच्या गप्पागोष्टीत रमतो. आजारपणासाठी असं हितगुज आणि कार्यमग्नता हीच माझी औषधी आहे, असं माझं ठाम मत आहे.

**कु. शिल्पा पान्दे–** आम्ही ऐकलं, आपल्यावर अनेक शस्त्रक्रिया झाल्यात, तरी आपण सतत कार्यरत असता. हे आपण कसं शक्य करता?

**भाऊ–** मुली, जीवनातील संकटे हा खरा परीक्षेचा क्षण असतो. प्रवाहाच्या दिशेने पोहणं सोपं, पण प्रवाहाच्या विरूद्ध दिशेनं पोहणं आव्हानात्मक असतं. आत्मिक समाधानासाठी परिश्रम हेच अधिष्ठान समजावं. मी कुठल्याही व्यसनांच्या अधीन झालो नाही. व्यसन हे जगण्याचा आनंद नष्ट करतं. मी चहा-कॉफीसुद्धा घेत नाही. मी शाकाहारी अल्पाहार घेतो. तरीही हृदयविकाराने मी जेरबंद झालो. आतापर्यंत बरीच ऑपरेशन्स झाली, हे खरं. पण त्याची तमा न बाळगता मी माझे दैनंदिन काम अगदी सुरळीत पार पाडत असतो. आजही माझ्या दिनचर्येत फारसा



संगत निसर्गसृष्टीची, भरारी दूरदृष्टीची

फरक पडलेला नाही. मी सकाळी ५-५:३० ला उठतो व रात्री १० ला झोपतो. प्रातःकाळी निसर्गसृष्टी परिसरात फिरणं, नंतर सहकाऱ्यांशी उद्योगाविषयी चर्चा करणं, मित्रमंडळीशी हितगूज करणं, याशिवाय सामाजिक, सेवाभावी कामांमध्ये सहभागी होणं हा माझा नित्यक्रम आहे. दिवसभर कामात व्यस्त असतो. 'सतत कार्यमग्न राहणं' हीच मी स्वीकारलेली कार्यसंस्कृती आहे. कार्य, कष्ट करूनच माणूस विकास साधू शकतो. हृदयावर अनेक शस्त्रक्रिया होऊनही माझा नित्यदिनक्रम न चुकता आजही पार पाडत असतो, ते या कार्यमग्नतेमुळेच, असं मला वाटतं.

**सौ. रेणु दांडेकर–** भाऊ, लोक गडगंज पैसा मिळवतात, श्रीमंत बनतात. परंतु आपण मात्र मातीचं भान ठेवणारे भूमिपुत्र आहात. हे कसं घडलं?

**भाऊ–** आपणास कदाचित माहित नसेल. माझी आई अशिक्षित तर वडील अल्पशिक्षित. एकत्रित मोठे कुटुंब. आर्थिक परिस्थिती बेताची. अशा खडतर परिस्थितीतही त्यांनी मला शिकायला प्रवृत्त केलं; पदवीधर केलं, वकील बनवलं. एम.पी.एस.सी. परीक्षेत यशस्वी होऊन मी वरीष्ठ सनदी अधिकाऱ्याची नोकरीही मिळविली. परंतु मला पारंपरिक व्यवसाय-धंदा करावा असा सल्ला मिळाला. आईनं, ७००० रुपये, आमच्या कुटुंबाच्या तेव्हापर्यंतची तीन पिढ्यांची शिल्लक, मला व्यवसाय-भांडवल म्हणून मिळवून दिली. सुरुवातीला जरी मो केरोसिन विक्रीचा व्यवसाय केला, तरी तदनंतर शेती निगडित खतं, बी-बियाणं, ट्रॅक्टर, थ्रेशर आणि

इतर साधनसामग्रीचा विक्री-व्यवसाय केला. आईच्या सल्ल्यानं मी कृषि व्यवसाय निवडला. आईनं सांगितलं, 'मानव, जल, जमीन, पशु-पक्षी, निसर्गाशी जुळता व्यवसाय कर.' आईचा हा मौलिक सल्ला मला जीवनात फार मोठ्या ध्येयापर्यंत घेऊन गेला. आज मी स्वतःला उद्योगपती न म्हणून घेता या मातीतला सामान्य 'भूमिपुत्र' समजण्यात धन्यता मानतो. सातत्यानं या मायभूमीचं भान ठेवण्यात गर्क राहतो.

**सौ. रेणु दांडेकर-** भाऊ, आपण खान्देशाचे भूमिपुत्र आहातच, आता कोकणाचेही 'भूमिपुत्र' झालात. कसं वाटतं?

**भाऊ-** हो, मी इथल्या मातीचा सुपुत्र आहे यात मला धन्यता वाटते. मी विविध माध्यमांतून या मायभूमीच्या लोकांची सेवा बजावण्याचं कार्य सातत्याने करीत आहे. 'शेतीतून गावागावाचा, राज्याचा, देशाचा, संपूर्ण विश्वाचा विकास होऊन शेतकरी, कष्टकरी व सामान्य माणूस सुखी व्हावा' अशी माझी विचारसरणी व संकल्पना आहे. अथक कष्ट, उदात्त ध्येय, असीम जिद्दीने मी कृषि संबंधित अनेक उत्पादनं सुरू केली. उद्योगाबरोबर साहित्य, कला, संस्कृती व जनसेवेची बांधीलकी स्वीकारली. कोकणाबद्दल म्हणायचं तर कोकणाच्या निसर्ग सौंदर्यानं मला प्रभावित केलं आहे. आता तर कोकण कृषि विद्यापीठानं ''डॉक्टर ऑफ सायन्स'' हा बहुमान दिला. या सन्मानानं मला एका मोठ्या जबाबदारीची जाणीव झाली आहे. त्या प्रेमबंधनाचा मी स्वीकारही केला आहे.



जया कार्य महान, तया गौरव सन्मान

**सिद्धेश महाडिक-** कष्ट न करता श्रीमंत होणे हा एक शाप आहे. आपली भूमिका काय?

**भाऊ-** बाळ, तुझा विचार उदात्त आहे. प्रत्येक मनुष्याला श्रीमंतीचा ध्यास असतो. मानवी जीवन सुंदर, सुकर करण्याचा प्रत्येकाला अधिकारही आहे. जीवनचरितार्थ, वाढ-विकास, उन्नतीसाठी अर्थप्राप्ती आवश्यक आहे. श्रमसाधना ही पवित्र मानून कर्म करावं. सत्कामापोटी रसाळ मधुर फळं चाखायला मिळतात. कामाजीपंत झाल्याशिवाय दामाजीपंत होता येत नाही, हे लक्षात ठेवावं. दैववादी न राहता प्रयत्नवादी व्हावं. कष्ट न करता मिळालेलं धन हवेसारखं येतं, पाण्यासारखं वाहून जातं. मोठं होणं सोपं नसतं. नैतिकपणे पैसा, किर्ती मिळविणं, सर्वोच्च स्थानी पोहचणं यासाठी करावी लागते अखंड मेहनत, असावी लागते दुर्दम्य इच्छाशक्ती, ठेवावा लागतो श्रेष्ठत्वाचा निखळ ध्यास, बाणावी लागते अपार जिद्द! तेव्हा कुठे उभी राहते शुन्यातून आपल्या स्वतःला हवी असलेली सृष्टी!

**उदय म्हातले-** केवळ पैसे कमविण्यासाठी काम करावे का?

**भाऊ-** केवळ पैसाच कमवणं हे सीमित ध्येय नसावं. फक्त अर्थप्राप्तीला व्यापक अर्थ लाभत नसतो. केवळं जगणं, कमवणं, कमवण्यासाठी जगणं याला अर्थ नाही. जे काही मिळेल त्यात आनंद मानायला हवा. कर्तव्यपरायणतेला जीवनात उतरवणं यातून जगण्याला अर्थ प्राप्त होतो. मला किती पैसा मिळणार किंवा पैशांच्या स्वरूपात मला काय मिळालं याचा मी कधीही विचार केला नाही. व्यवसाय चांगला करावा, तो मोठा करावा हा माझ्या ध्यास होता. 'जे काही करावं ते चांगलं, उत्कृष्ट करावं,' हा आईनं माझ्या जीवनावर एक चांगला 'मार्क' सोडला आहे. मी जे जे केलं ते ते उत्कृष्ट करण्यासाठी धडपडीने, तडफेने कार्य केलं. माता-पित्याचं नाव, मायभूमीचं नाव सार्थक करण्यासाठी झटायचं काम केलं. 'कृषि उद्योगाचा मी अनुसरलेला मार्ग सर्वश्रेष्ठ आहे,' हे माझ्या आईचं 'प्रमाणपत्र' मला मिळालं. पैशाच्या मोलापेक्षा या प्रमाणपत्राचं मोल कितीतरी पटीनं अधिक आहे.

कुठल्याही कार्यात, उद्योग-व्यवसायात जे अंगीकारलं जातं, त्यासाठी स्वतःच्या व्यक्तिगत जीवनाची किंमत मोजावी लागते; ध्येयवेडं व्हावं लागतं. कामामधून झिरपणाऱ्या आनंदासाठी कर्तव्यपूर्तीची मनोभूमिका स्वीकारत नाही तोपर्यंत हातून भव्य, दिव्य, अप्रतिम असं काही होणार नाही. अंगीकारलेलं काम करीत असताना त्या कामातून काय ज्ञान मिळालं, कोणता अनुभव जमा झाला, नवीन निर्मिती कशा प्रकारे झाली या गोष्टींवर अधिक भर हवा. म्हणजेच कामातून

संस्कारमय, सुशिक्षित व्हावं. 'सतत काम' हा आदर्श ठेवावा. भगवान कृष्णाने सांगितल्याप्रमाणे 'कर्मण्यवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' हे तत्त्व मनी बाळगलं तर कामात समाधानाचा झरा सापडेल. पण यातील गुपीत हे आहे की, कामाच्या या पद्धतीतून प्रत्येकाचं ज्ञान, आकलन वाढतं, अधिक अनुभव जमेस पडतो, नवनवीन निर्मितीची कामं साध्य होतात. आपोआपच अधिक आकर्षक मोबदला मिळू लागतो. परिश्रमाचं फळ उत्कृष्टच असतं, हे मी अनुभवाने सांगू शकतो. परिश्रमानं संपत्ती मिळते. पण तिचा समाजपयोग व्हावा हा दृष्टीकोनही ठेवावा.

**निखिल चाफे-** शेती करूनही सधनता होऊ शकते, हे येथे अनुभवले. अशी एकटीदुकटी उदाहरणे पुरेशी वाटत नाहीत, या शंकेचं आपण निरसन करा.

**भाऊ-** तुझी शंका काही अंशी निदान वरवर रास्त वाटली, तरी आपण याचा खोलवर विचार करू या. शेतीप्रधान देशात शेतीला प्राधान्य देऊन जर ध्येयधोरणं राबविली गेली तर त्याचा आपल्या कल्पनेपलिकडे लाभ होईल. २५% पेक्षा अधिक राष्ट्रीय उत्पादन देणाऱ्या कृषिक्षेत्राला अंदाजपत्रकाचा केवळ १०% वाटा मिळतो. तरीही कृषिक्षेत्र आपलं योगदान देतं. अधिक वाटा मिळाला तर खरोखर जादूच होईल. शिक्षणाचीही पुनर्रचना झाली आणि कृषि आधारित प्रात्यक्षिक, ज्ञान, प्रशिक्षण मिळू लागले तर सुरुवातीपासूनच विद्यार्थ्याला शेतीत आवड निर्माण होईल.

आधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण, पारंपरिक कृषिलाभ पद्धती आणि ग्रामीण भारतीयांची कठोर परिश्रमक्षमता यांचा त्रिवेणी संगम साधून 'जैन हिल्स' सारख्या विकासाच्या प्रतिकृतींची नक्कल केली गेली, तर चित्र कसं झपाट्याने बदलेल हे समजणं फारसं कठीण नाही. ही काल्पनिकता नाही, पोकळ आशावाद नाही. पण जसं कृषिक्षेत्रात परिवर्तन घडत चाललं आहे, त्यावरून ही कल्पना आता प्रत्यक्षात उतरू लागलेली आहे, हेही नजरेस पडू लागलं आहे. आमच्या कंपनीने उत्पादन विक्री आणि सोबत कृषिसेवा यांचं देशभर जाळं पसरविलं आहे. इतर अनेक कंपन्याही या क्षेत्रात आता उतरत आहेत. तेव्हा कृषिक्रांती नजीकच्या भविष्यकाळात घडून येईल, असं समजायला आधार आहे.

**कु. नयना माने-** 'शेतीची श्रीमंती, देशाची उन्नती' हे समीकरण समजलं. गावोगावी, खेडोपाडी यासाठी काय करायला हवं?

**भाऊ-** शेती करताना ज्या व्यापक अडचणी येतात त्यावर गावोगावी खोलवर विचार करणं आवश्यक आहे. आज ज्याला त्याला स्वतःच्या पायापलीकडे बघायला सवड नाही. आणि यातच प्रत्येकाची शक्ती, संपत्ति, बुद्धि व्यर्थ खर्च पडत आहे.

एक उदाहरण घेऊन सांगतो. गावच्या पिण्याचा पाण्याचा प्रश्न किंवा शेतीला सिंचनासाठी मिळणाऱ्या पाण्याचा प्रश्न, हे काही कोण्या एकट्याचे प्रश्न नाहीत. एकट्याच्या साधनसामग्रीने, प्रयत्नाने ते सुटणारही नाहीत. या उलट सर्व गावकरी एकत्र आलेत, तर गावासाठी पाण्याचा साठा, शेतीसाठी तलाव, जलसाठे या गोष्टी करणं गावाच्या व गावकऱ्यांच्या आवाक्याबाहेरचं राहणार नाही.

खेडोपाडी पाण्याच्या उपलब्धतेमुळे स्त्रियांचे पाण्याच्या शोधात भटकंतीचे त्रास वाचतील. सिंचनामुळे शेतीचे उत्पन्न वाढेल. हिरवळीमुळे गुरंढोरं पाळता येतील. त्यातून घरच्या मुलाबाळांना पोषक आहार मिळू शकेल; शिवाय दुग्ध व्यवसायही होऊ शकेल. शेती आणि शेती आधारित उद्योग-व्यवसाय वाढल्याने ग्रामीण भागातच रोजगार मिळू लागेल. शहराकडे जाणारी खेड्यातील समृद्धी खेड्यातच नांदायला लागेल. हे स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्यासाठी गावकऱ्यांनी एकत्र होऊन कामाला लागायची गरज आहे.

**कु. मिलन आदावडे-** 'ओसाड डोंगर हसरा झाला, उजाड-नापिक माळरान हिरवं झालं!'अगदी स्वर्गातली शेती या भूमीवर आपण उतरवली याचं खरोखरच आश्चर्य वाटतं! हे आपण कसं घडवून आणलं?

**भाऊ-** बी-बियाणे, खते इ. शेतीशी निगडित छोट्या-छोट्या व्यापार-व्यवसायातून जो काही पैसा प्रामाणिकपणे व कष्टाने मिळविला, तो मी कृषि-



डोंगरमाथी जलसंग्रहण, हरित जाहला माळरान

आधारित उद्योग-व्यवसायात गुंतवला. अनेक वर्षे भाड्याच्या घरांमध्ये राहिलो. स्वतः काही सुखचैन न करता अहोरात्र कष्ट करून मी माळरानाचा विकास केला. यासाठी पाणतळी तयार केलीत. जलसंधारणाचा उपक्रम केला. पाण्याच्या उपलब्धतेची खात्री झाल्यावर विविध वनवृक्ष, फळझाडे, फुलझाडे लावलीत. त्यातून ही जैन हिल्सची भूमि बहरली, हिरवीगार झाली. या माझ्या कामात माझ्या निष्ठावंत सहकाऱ्यांचीही मोलाची साथ मिळाली. त्यामुळेच अथक परिश्रमानं निर्माण झालेलं इथलं हे हिरवं ऐश्वर्य आपण सर्व पाहू शकत आहोत.

**कु. मिलन आदावडे–** भाऊ, जैन हिल्सवरची माती शेतीयोग्य नाही. त्यात येथे पाण्याचा तुटवडा. यातून आपण मार्ग काढून यशस्वी झालात. आमच्या कोकणातल्या शेतकऱ्यांना काय मार्गदर्शन कराल?

**भाऊ–** कोकणाचं काय काय वैशिष्ट्य सांगावं? कोकण म्हणजे दिग्गज आणि कर्तृत्ववान नररत्नांची खाण. ७०० कि.मी. लांबीचा लाभलेला निसर्गरम्य समुद्र किनारा! भरपूर पाऊस. ५३% बांधव शेती करणारे. आंबा, फणस, काजू, कोकम, भात, नारळ, सुपारी ही येथली मुख्य उत्पादनं. कोकणातला माणूस काटक तेवढाच हळवा. वितंडवाद आणि चळवळीपासून दूर राहून त्याने निसर्गाच्या वरदानाचा लाभ घ्यायला हवा. आंब्याचं माहेरघर कोकण. काजू उत्पादनात कोकण अग्रेसर. या फळांच्या प्रक्रियांवर आधारित उद्योग उभारणी करता येईल. इतरही कृषिमालावर प्रक्रिया करून त्याचं मूल्य वाढवून उत्पादनात भर घालता येईल.

कोकण हे नैसर्गिक हरितगृह आहे. ठिबक सिंचन तंत्राद्वारे फळं-फुलं, भाजीपाला, तेलबिया इ. चे कृषि उत्पादन वाढवायचे प्रकल्प राबविता येतील. ठिबक सिंचनामुळे कोकणातली उपलब्ध १००% जमीन ओलिताखाली आणता येईल. कोकणामधील पावसाचे ९०% पाणी समुद्रात वाहून जाते, त्यासोबत शेतजमिनीचा कसही धुतला जातो. हे थांबवायला पाहिजे. त्यासाठी जागोजागी बांध, बंधारे, धरणे बांधून जलसाठे निर्माण करायला हवेत. हे सर्व घडलं पाहिजे, घडवलं गेलं पाहिजे. कोकणाचा विकास त्यातच दडलेला आहे.

**कु. प्रिती कंगणे–** जमीन डोंगराळ, पाणी नसल्यासारखं, अशा परिस्थितीत आपण या जागेचं सोनं केलं. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या तंत्राला आपण कशा पद्धतीने अमलात आणलं त्याविषयी आम्हाला सांगा.

**भाऊ–** चांगल्या व्यक्तींच्या सहवासाला मी जीवनात फार महत्त्व देतो. माझी अनेक क्षेत्रातील गुणी जनांशी मैत्री आहे. या सोबत्यांच्या सहवासातून मी खूप



जल संचित, जग जीवित

काही शिकलो, शिकत असतो. माझे एक जीवलग स्नेही आहेत, कविवर्य ना. धों. महानोर. त्यांची एक अर्थपूर्ण आणि खेड्यातील ग्रामीण जीवनाचे यथार्थ चित्रण करणारी कविता आहे:

''आम्ही या खेड्यात जन्मलो, दुःखाची गाथा
या खेड्याचे पांग फेडण्या उन्नत हा माथा
दुःख दैन्य, अन दारिद्र्यायातील शेतकरी माझा
जुन्या पुराण्या शेतीमधला रुतलेला फासा''

ज्या मायभूमीत मी जन्मलो, वाढलो, शिकलो तिचं ऋण फेडण्यासाठी माझ्या आईनं मला उद्युक्त केलं. यानं भारावून मी मायमातीशी नातं असणारं माझं काम सुरू केलं. या भागाचे उपग्रहाद्वारे सर्वेक्षण झालेले होते. त्याचा निष्कर्ष असा होता की, येथे भूगर्भाचे पाणी नाही. म्हणून मग मी प्लास्टिकचे अस्तर लावून शेततळं तयार केलं, जेणे करून साठविलेलं पाणी झिरपून वाया जाऊ नये. पण हे पाणी कमी पडलं. पाण्याचा साठा वाढावा म्हणून बंधारा बांधला. सरकारी बंधाऱ्यापासून पाण्याची गळती व्हायची ती बंद केली. पाणी संग्रहणाची कामे वाढवीत गेलो. डोंगरमाथ्यातून एकेक दगड वेचून मी ही भूमी सजवली. पाणसाठे तयार केले. वृक्ष लावले. फुलझाडं फुलवली. फळझाडं जोपासली. या कामी माझ्या अनेक विश्वासू कार्यक्षम सहकार्यांनीही घामाच्या धारा आपल्या स्वतःच्या अंगावर जिरवल्यात. बहिणाबाईंच्या शब्दात सांगायचे तरः

''आधी हाताला चटके, तेव्हा मिळते भाकर.''

**कु. नयना माने–** 'पाणी आडवा, पाणी जिरवा', राबवलं म्हणजे आपण नेमकं काय केलं?

**भाऊ–** तुमच्या कोकणासारखं इथं मुबलक पाणी नाही. पावसाळ्यातही पाऊस किती पडेल याची शाश्वती नसते. या परिस्थितीला समर्थपणे तोंड देण्यासाठी पावसाचे जे पाणी उपलब्ध होते, ते पाणी पाऊस पडतो तेथेच साठवायचे उपक्रम केले. आधी सांगितल्याप्रमाणे त्यासाठी बांध, बंधारे बांधले. पाण्याच्या योग्य वापर आणि संग्रह व्हावा यासाठी जागजागी विहिरी आणि ट्यूब वेल्स बनविल्या. नंतर या जलस्रोतांच्या पुनर्भरणाची व्यवस्था केली. पडणाऱ्या पाण्याचा प्रत्येक थेंब पडतो तिथेच वापरात येईल, तेथल्याच जमिनीत झिरपून भूगर्भात साठेल, पावसाचे पाणी जमिनीवरून वाहून जाणार नाही अशा पद्धतीने पाण्याचा साठा करण्याची योजना प्रत्यक्षात राबविली.

**कु. शिल्पा पान्दे–** आपल्या इथे पाऊस अत्यल्प पडतो. पाण्याचा बेभरवसा. असे असूनही मुकी जनावरंही जिथं फिरकत नव्हती अशा ठिकाणी आपण ही किमया कशी साधली?

**भाऊ–** आपल्या देशात पाऊस पडणं हे कोडं आता अनाकलीय झालं आहे. महाराष्ट्रही याला अपवाद नाही. निसर्गचक्रातील बदल, पर्यावरणातील असमतोल अशी बरीच त्यामागची कारणे आहेत. जळगाव तर कमी पाऊस पडणारं क्षेत्र. त्यामुळे पाण्याचे नियोजन करून पाण्याचे साठे नियंत्रित ठेवणे अत्यंत गरजेचं आहे. हे करताना अनेक समस्यांना सामोरं जावं लागलं. ५-६ वर्षांसाठी जलसंधारण म्हणजे पावसाचे पाणी त्याच ठिकाणी अडवण्याच्या प्रकल्पातील समस्या सोडविण्याची खटपट चालूच राहिली. शेवटी 'केल्याने होत आहे रे, आधि केलेचि पाहिजे' या उक्तिप्रमाणे यश मिळालं. पण यातून उपलब्ध पाणी आमच्या कृषि संशोधन व विकास कार्यांना पुरेसं होणार नव्हतं, हे लक्षात आले. त्यावर उपाय म्हणून ठिबक-तुषार सिंचन तंत्राचा उपयोग ही काळाची गरज ओळखणं व पर्याय स्वीकारणं हे महत्त्वाचं झालं.

पूर्वी नद्यांचे पाणी अडवलं जायचं. कालव्यातून, पाटातून ते पाणी शेतीला दिलं जायचं. तिथं बुद्धीची, डोक्याची गरज नव्हती. पाण्याचं ठिबक सिंचन आलं की, त्याचं नियोजन, शिक्षण, प्रशिक्षण, शेतकऱ्यांना मार्गदर्शन, मजुरांना प्रात्यक्षिके इ. अनेक प्रकार करणं आलं. अन्नधान्याची वाढती गरज बघता त्यासाठी जास्तीत जास्त क्षेत्र ओलिताखाली आणून कृषि उत्पादन वाढवणं हे ठिबक सिंचनावर शक्य

होईल, हे लक्षात घेऊन त्या निर्मितीकडे आम्ही वळलो. त्या ठिबक सिंचनाचाही या जैन हिल्सच्या विकासात मोठा वाटा आहे.

**कु. मेघा फिलसे–** कृपया आम्हाला ठिबक सिंचनाबद्दलही सांगा.

**भाऊ–** जास्तीत जास्त शेतजमीन ओलिताखाली आणण्यासाठी पाण्याचा काटकसरीने वापर करून कृषि उत्पादन वाढविले. पारंपरिक पद्धतीत असलेल्या अनेक त्रुट्या लक्षात घेऊन पाणी ठिबक पद्धतीनं देण्याची प्रणाली सुरू केली. ठिबक सिंचनानं मोजकं पण हवं तेवढंच पाणी पिकाच्या मुळाशी पोहचतं. यामुळे ६०% ते ७०% पाणी तर वाचतेच, शिवाय पाणी इतर जमिनीवर न पुरविलं गेल्यानं तण वाढत नाही. या सिंचन पद्धतीद्वारे पिकाला खतही देता येतं. उत्पादन जास्त मिळतं. पण पुरेशा पाण्याच्या उपलब्धेसाठी निसर्गाचं पाणी वेळीच साठवलं पाहिजे. जलबंधारे, जलतळी, जलसाठे, अशी साखळी तयार केली पाहिजे. यातून तयार झालेल्या जलसंग्रहामधून अधिक क्षेत्राचे सिंचन करता येईल.

**कु. प्रीती कंगणे–** आपल्याकडील कमी पावसाच्या समस्येवर आपण तोडगा काढला. पण आमच्या कोकणात तर पाऊस खूप पडतो. तरीही पाण्याची वानवा असतेच. यासाठी कोकणात काय करता येईल?

**भाऊ–** पाऊस अधिक पडूनही पाण्याचे दुर्भिक्ष असणं हे काही नवीन नाही. तुम्हाला माहितच आहे की, चेरापुंजी परिसरात जगात सर्वाधिक पाऊस पडूनही उन्हाळ्यात तेथील स्त्रियांना पाण्यासाठी वणवण फिरावं लागतं. काहीसं असंच



बालगोपालांचं चित्त वेधलं, भाऊंनी सखोल उत्तर दिधलं
चित्तरंजन कौल, सौ. रेणू दांडेकर, ना. धों. महानोर व भाऊ

चित्र कोकणातही आहे. 'पाणी आडवा, पाणी जिरवा' हे तंत्र अशा भागांमध्येही उपयोगाचे आहे. विशेष म्हणजे या तंत्राचा वापर केल्याने केवळ पाण्याचाच साठा करायचं काम साध्य होत नाही, तर पडीक जमीन सुपीक बनण्यास मदत होते. हिरवळ वाढते. भूजलाची पातळी वाढते. अधिक जमीन वर्षाभरातील जास्त काळासाठी ओलिताखाली आणता येऊन कृषि उत्पादन वाढविता येते.

एकीकडे हिरवळ, कृषि विकास यामुळे कृषिशी संलग्न पशुपालन, वनसंपदा अशा क्षेत्रात प्रगती होते; दुसरीकडे कृषि उत्पादनाशी, वन उत्पादनाशी संबंधित उद्योग-व्यवसाय वाढीस लागतो. केवळ कृषिक्षेत्रातच रोजगार अधिक प्रमाणात मिळत नाहीत, तर उद्योग व्यवसायाच्या क्षेत्राची दारंही त्यासाठी उघडतात. पाण्याला एक पर्यायी शब्द आहे 'जीवन'. 'पाणी म्हणजे जीवन आणि जीवन म्हणजे पाणी.' पाण्याची उपलब्धता झाली की प्राणी, वनस्पती यांच्या जीवनाचं पालनपोषण, रक्षण होतं. पाण्याच्या उपलब्धतेमुळे सृष्टीची पुनर्निर्मिती होऊ लागते. त्यातून पर्यावरणाचं रक्षण होऊन जीवसृष्टीच्या जीवनचक्राचा समतोल साधला जातो. म्हणून कोकणातही जलसंधारणाचे प्रकल्प मोठ्या प्रमाणावर राबविले गेले पाहिजेत ही प्राथमिक आवश्यकता आहे.

**कु. छाया म्हातले-** आपल्यासारखी उद्योग निर्मिती आमच्या कोकणात निर्माण करता येईल का?

**भाऊ-** मुलांनो, इच्छा आणि दृढ निश्चय असला की, कोणतीही गोष्ट अशक्य नाही. उद्योग उभारताना स्थानिक निकष विचारात घ्यावे लागतात. कोकणातला निसर्ग परिसर, फळ-फळांचे सर्वाधिक उत्पादन, यांना पाहता आधीच म्हटल्याप्रमाणे कोकणात फळ प्रक्रिया उद्योग उभे करता येतील. सिंचनक्षेत्रातही बरंच काही करता येण्यासारखं आहे. शेती विकासासाठी ठिबक सिंचन तंत्रज्ञान फार महत्त्वाचं योगदान देणारं आहे. ठिबक सिंचनाने दुसरी हरित क्रांती कोकणातही घडू शकेल. या हरित क्रांतीचा ओनामा जैन उद्योग समूहाने १९८९ साली केला आहे.

पडत्या पावसाचं पाणी कोकणात जेथल्या तेथे अडवून, जिरवून, साठवून पाण्याचा पुरवठा वर्षभर उपलब्ध राहील अशी व्यवस्था झाली की, कोकणातील ओसाड माळरानेसुद्धा लागवडीखाली आणता येतील. त्यात हिरवी खतं, कम्पोस्ट खतं, गांडूळ खतं वापरून जमिनीची सुपीकता वाढविता येईल. अशा प्रकारे शेतीसाठी उपलब्ध जमीनही वाढेल आणि जमिनीची उत्पादकताही वाढेल. कोकणाचा शेतकरी काबाडकष्टात कोणापेक्षा मागे नाही. पण शेतीची उत्पादकता

वाढल्याशिवाय त्याच्या कष्टाचं उचित फळ त्याला मिळणार नाही. म्हणून शेतीतील उत्पादन कसे वाढेल यासाठीही प्रयत्न करावे लागतील. कृषि उत्पन्न वाढलं की, कोकणातल्या शेतकऱ्याचं जीवन गतिमान होईल. शेतमजुराच्या हाताला कामधंदा मिळेल. कृषि उत्पादन वाढल्याने कृषि मालाचा खात्रीशीर पुरवठा होऊ शकेल. त्यामुळे उद्योगाची साखळी तयार होऊ शकेल.

**उदय म्हातले–** कोकणातील तरुणाची सर्वसाधारण मानसिक घडण 'लाव कमरेला टॉवेल, जा मुंबईला आणि शोध तेथे नोकरी,' अशी आहे. ही मानसिकता बदलावी कशी?

**भाऊ–** कोणतीही गोष्ट समाजात, मनात खोलवर रुजायला बराच अवधी लागतो. आजची 'चाकरमानी' मानसिकता जी सगळीकडे पसरलेली दिसते याचं मोठं कारण म्हणजे 'कसायला मिळणारी कमी जमीन आणि त्यामागे भरायची तोंडं मात्र अनेक' असं हे व्यस्त प्रमाण! याशिवाय पारंपरिक पद्धतीने शेती करीत राहिल्याने आणि तेच तेच पीक पुनःपुन्हा त्या शेतीच्या लहानशा तुकड्यावर घेत राहिल्याने जमिनीची उत्पादकता आणि सुपीकता कमी झाली. त्याचाही शेती उत्पन्नावर विपरित परिणाम झाला. यामुळे जवळच असलेल्या 'आर्थिक राजधानी' मुंबईकडे कोकणचा तरुण आकर्षित झाला. परिस्थितीचा तो परिणाम होता. त्यामुळे खरं तर आश्चर्य वाटायचं कारण नाही.

अर्थात ही परिस्थिती बदलायलाही वेळ लागेल. त्यासाठी तुमच्यातून तयार होत असलेल्या नवीन पिढीने आपली विचारसरणी बदलली पाहिजे. आधी सांगितल्याप्रमाणे पाण्याची उपलब्धता, ओसाड माळरानाचं सुपीक जमिनीत परिवर्तन, जैविक शेतीमुळे मातीची वाढलेली सुपीकता आणि उत्पादकता यामुळे कोकणातील ग्रामीण तरुणाला इतरांच्या तोंडाकडे बघायची गरज पडणार नाही, ही उघड शक्यता आहे. यासाठी वस्तीवस्तीतील, खेड्याखेड्यातील, गावागावीतल लोकांनी एकत्र येऊन ही एकात्मिक कार्यपद्धती अमलात आणायला हवी, रुजवायला हवी. यामध्ये सर्वांचेच हित आहे. तेव्हा तुमच्या पिढीने यात पुढाकार घ्यायला हवा, ही कळकळीची सूचना आहे. तसं पाहतां नोकऱ्यांची उपलब्धताही आता अनिश्चित आहे. शहर-शहर, दारोदार फिरूनही नोकरीची शाश्वती नाही. अशा परिस्थितीत तुम्ही निश्चयाने काही करायचं ठरविलं तर काय अशक्य आहे? तुकाराम महाराजांनी म्हटलंच आहे:

"निश्चयाचे बळ, हेचि फळ".



संस्कृति रक्षण, ग्रामीण शिक्षण

**निखिल चाफे–** भाऊ, आम्ही एक एकर शेती करू शकत नाही! आपण एक हजार एकर शेती कशी करतात? आपण एवढं शिकलात तरीही शेती व्यवसायात का शिरलात?

**भाऊ–** शेती व्यवसाय हा आपल्या देशाचा केवळ कणा नसून ती आयुष्यरेषा आहे. त्या आयुष्यरेषेला प्रदीर्घ आणि बलशाली करणं ही आपली खरी प्रगती आहे. If you rub your hands with the lands, you can earn the notes by crores. जल, जमीन, जनावरं हे निसर्गसंस्कृतीचे घटक आहेत. मी माझ्या कुवतीनं भरघोस नफा देणारी अन्य उत्पादने निर्माण करून गडगंज पैसा मिळवू शकलो असतो. पण आईच्या सल्ल्यानं सृष्टीतील जन-जन, जिवाणु-जंतु, जीव-जनावर, वृक्ष-वेली या सर्वांसाठी कल्याणकारी असलेल्या कृषिक्षेत्राची निवड केली. गुणी व कष्टकरी सहकारी निवडून कृषि उद्योगांची यशस्वी मालिका स्थापित केली. मला शिक्षणामुळे शासकीय उच्च अधिकाराची प्रशासकीय नोकरी मिळाली होती, पण मी ती सोडली. मुंबईसारख्या प्रगतीशील शहरात उद्योग उभा करता आला असता, पण मी तसं केलं नाही. सारासार विचार करून मी शेती-व्यवसायात पाऊल टाकलं.

नोकरी करून मी, माझे कुटुंब, फार तर आप्तगण यांचं भविष्य उत्तम रितीनं घडवू शकलो असतो. मात्र शेती उत्पादन क्षेत्रात उद्योग उभारून आज मी सर्वार्थे सेवा बजावतो आहे. ३००० पेक्षा अधिक हातांना काम मिळालं आहे. ग्रामीण भारताच्या विकासात मी योगदान करू शकतो आहे. त्यात मला धन्यता वाटते. कृषिप्रधान देशात 'कृषि हाच भविष्य असलेला एक व्यवसाय ठरेल' या विचाराने माझ्या निर्णयाला अधिक बळकट बनविलं. आणि १९७८ मध्ये लहानशा कृषि उद्योगाने सुरुवात करून आज आमची कंपनी कृषि उद्योगातली भारतातील अग्रेसर कंपनी झाली आहे, याचा मला रास्त अभिमान आहे.

**सिद्धेश महाडिक–** आज नोकरीसाठी तरुणांचा लोंढा शहरांकडे जाताना दिसतो. हा प्रकार थांबविता येईल काय? कसा?

**भाऊ–** 'पैशामागे वेडे, पळती शहराकडे' हा प्रवाह नक्कीच थांबविता येईल, असं माझं प्रांजळ आणि ठाम मत आहे. यासाठी आपल्याला या प्रश्नाचं मूळ शोधावं लागेल. सर्वसाधारणपणे तरुण पिढी शिक्षण संपल्यावर नोकरीच्या शोधाला लागते. त्यांना शेतीत काबाडकष्ट करायची एक प्रकारे लाज वाटायला लागते. मुळात तरुण पिढीची मनोधारणाच अशी आहे की, आपण घेत असलेले शिक्षण हे नोकरीसाठीच आहे. आणि तसं पाहिलं तर इतर अनेक कारणं या वृत्तीला पोषकच

आहेत. शिवाय शेतीची दुर्दशा झाल्याने, आहे त्या उपलब्ध शेतीवर, वापरात असलेल्या पद्धती आणि पारंपरिक तंत्र यामुळे शेतीतून पाहिजे तेवढा रोजगार उपलब्ध होत नाही. मग स्वाभाविकपणे ही तरुण पिढी शहराकडे पलायन करते. तेथे नोकऱ्या आहेत असं भासतं, वाटतं, जाणवतं.

याहूनही दुर्दैवाची गोष्ट म्हणजे शेतकऱ्यांची मुलंही शेती संबंधित शिक्षणात फारसा रस घेत नाहीत. जे थोडेफार शेतीचं शिक्षण घेतात, तेही स्वतःची शेती न करता नोकरीच्या शोधात भटकत राहतात. शिवाय कृषि शिक्षणात शेती करायचा अनुभव न मिळाल्यामुळे त्या शिक्षणाचाही प्रत्यक्ष शेती करायला फारसा उपयोग होत नाही. शेतीचा अनुभव, शिक्षण आणि आधुनिक कृषितंत्र यासोबत पारंपरिक पूरक गोष्टी यांची शेती करताना सांगड घालणं अत्यंत महत्त्वाचं आहे.

आधीच सांगितल्याप्रमाणे पडीक जमिनीला सुपीक करून, उपलब्ध जमिनीची सुपीकता वाढवून, ठिबक सिंचनासारख्या आधुनिक तंत्राचा उपयोग करून जमिनीची उत्पादकता वाढविता येईल. शिवाय पारंपरिक उत्पादनांऐवजी बाजारपेठेतील मागणी बघून नगदी पिकांची लागवड लाभदायक ठरेल. सुदैवाने फळांचा राजा आंबा, सुक्या मेव्यातील सम्राट काजू, भरघोस आर्थिक उत्पन्न देणारे पण थोडीच निगा मागणारे नारळ, सुपारी यासारख्या अनेक उत्पादनांसाठी कोकणचं हवामान पोषक आहे. त्यामुळे कृषिक्षेत्रातून रोजगार वाढ व्हायला भरपूर वाव आहे. आणि येत्या नजीकच्या काळात परिस्थिती बदलेल याबाबतीत मी खूप आशावादी आहे.

**विशाल तेलप–** भाऊ, आपण मोठ्या प्रमाणावर शेती करून शेतीशी पूरक उद्योगधंदे उभे केले. शेतीचं हे बाळकडू पाजण्यासाठी, तरुणांना आणि शेतकरी बंधुंना मार्गदर्शन करण्यासाठी तुम्ही कोकणात केव्हा याल?

**भाऊ–** केवळ शेती, उद्योगधंदे करून भारत विकासाकडे जाईल असे नाही. या देशात दुसरी हरितक्रांती घडवून आणण्यासाठी सिंचन क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान वापरलं पाहिजे. ठिबक सिंचन म्हणजे झाडांच्या मुळाशी समदाबाने, हळूवारपणे हव्या तेवढ्याच प्रमाणात पाणी देण्याची शास्त्रशुद्ध पद्धत अवलंबिली पाहिजे. हवामानाचा अभ्यास करून ऋतुसिंचनचक्र ठरविणं, पिकाच्या वाढीनुसार पाण्याची मात्रा ठरविणं, ती ठरविताना जमिनीचा पोत लक्षात घेणं या आणि अशा उच्च कृषितंत्राच्या अनेक बाबीही महत्त्वाच्या आहेत.

कोकणातही याच धर्तीवर निरीक्षण करून योग्य प्रमाणात सुधारणा घडवणं शक्य आहे. कोकणच्या विकासासाठी राजकीय इच्छाशक्ती, सामान्य माणसांची कृति,

प्रशासकीय मदत यांचा मेळ व्हायला हवा. कोकणच्या शेतकऱ्यांची मनाची तयारी होते आहे. त्यामुळे आम्हाला कोकणात लवकरच यायची संधि आहे, असं वाटतं.

शेतकऱ्यांच्या कृषितंत्राबद्दल जागरूकतेसाठी, कृषितंत्रांचा प्रत्यक्ष यशस्वी वापर पाहता यावा यासाठी आमच्या जैन उच्च कृषितंत्र, संस्थानातून कृषि स्रोतावर संशोधन, विकास, प्रात्यक्षिक, प्रशिक्षण आणि शिक्षण विस्तार यांचं कार्य केलं जातं. 'आपल्या ऐकण्यात आणि पाहण्यात चार बोटांचं अंतर आहे,' असं म्हटलं जातं. पण शेतकऱ्यांच्या दृष्टीने हे अंतर फार मोठं आहे. म्हणून त्यांनी आमच्या गुरुकुलला भेट देऊन विकासाची दिशा स्वतःच्या डोळ्यांनी पाहावी, अनुभवावी, असं सुचवावंसं वाटतं. त्यानंतर ज्या ज्या मार्गदर्शनाची गरज पडते त्यासाठी कंपनीचं कृषि शास्त्रज्ञांचे जाळंच आम्ही देशभर पसरविलं आहे, त्याचाही उपयोग शेतकरी करू शकतील.

**कु. मेघा फिलसे–** आपण डोंगराळ भागात शेती केली. खरीप/रब्बी पिके, फळबागा व वनशेती असा त्रिवेणी संगम केला. यामागे निश्चित योजना काय होती?

**भाऊ–** मेघा, तुझा प्रश्न माझ्या चिंतनाचा विषय आहे. आपला निर्धन शेतकरी त्याच्या २-४ एकरच्या लहानशा तुकड्यात नवनवीन प्रयोग करूच शकत नाही. तेव्हा आधुनिक शेतीचे लाभ त्याला मिळणार तरी कसे? आणि त्याने तसं ठरवलंच तरी तो पैसा उभारणार कुठून? या कठीण परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी 'पाहिल्यावर विश्वास बसतो' या तत्त्वाचा उपयोग करायचं ठरवून मी या जैन हिल्सवर ''कृषि स्रोत संशोधन, विकास, प्रात्यक्षिक आणि शिक्षण विस्तार केन्द्र'' उभारायचं ठरविलं. शेतीतील प्रयोग प्रत्यक्ष पाहता यावे, याकरिता सामान्यशेती, वनशेती आणि फळबागा या तिनही प्रकारांवर संशोधन कार्य करणं आवश्यक होतं. पाण्याच्या व्यवस्थापनाच्या तंत्राचा उपयोग आणि फायदा हेही दाखवून द्यायला हवं होतं. आणि पुढे शेतकऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण देण्यासाठी 'गुरुकुल' निर्मितीही पूरक आहे, असा निर्णय मी घेतला. आज या गुरुकुलच्याच एका दालनात आपण बसलो आहोत.

**कु. पल्लवी आडविलकर–** आपल्या वेगवेगळ्या प्रकल्पांना पाहून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती ही की, आपली सर्व उत्पादने शेतीशी निगडित आहेत. आपण हे सर्व काही ठरवून केलंत का? तशी आखणी केली होती का?

**भाऊ–** विद्यार्थी मित्रांनो, मी बहुतांशी वर्तमान काळात जगलो, कारण मागच्या आठवणींनी मन कटू होतं, आणि उद्याच्या चिंतेत आजचा आनंद विरून जातो. म्हणून मी वास्तववादी बनलो, जगत आलो. साध्य काय करायचं, त्याची आखणी-जोडणी आणि त्या अनुषंगाने विचारसरणी ठेवली. सतत कार्य करीत राहिलो.


आपलं काम प्रामाणिकपणे केलं. एक मात्र नक्की की, जेव्हा शेतीशी निगडितच व्यवसाय-उद्योग करायचा निश्चय केला तेव्हाच एक अंधुकशी कल्पना होती की, कृषि क्षेत्रासाठी, शेतकऱ्याच्या हितासाठी आपल्या उद्योग-व्यवसायातून जे जे काही करता येईल ते करायचं. पण त्याचा स्पष्ट आराखडा आखला नव्हता.

ठिबक संचांचा उद्योग यशस्वी करण्यासाठी सखोल विचार करावा लागला. या सखोल व सर्वांगीण विचारातून 'एकात्मिक दृष्टिकोन' ही कल्पना विकसित झाली. याच कल्पनेचा विस्तार म्हणजे 'शेतीसाठी संपूर्ण बस्त्याचं दुकान.' पाण्यासाठी पी.व्ही.सी. पाईप आणि ठिबक संच यातून पुढे सिंचनासाठी पाण्याचा स्रोत आणि नापीक जमिनीचे सुपिकीकरणापासून ते शेतकऱ्यांकडून त्यांचा कांदा, आंबा, पेरू ही कृषी उत्पादनं विकत घेणे अशी विविध कार्यसाखळी आमच्या कंपनीत सुरू झाली. विशेष म्हणजे हे सर्व उद्योग जळगावातच केल्याने जळगावच्या आजूबाजूच्या ग्रामीण भागातील लोकांना रोजगार मिळू लागला. केवळ ३ सहकाऱ्यांपासून सुरू केलेल्या या कंपनीत आज ३००० पेक्षा अधिक सहकाऱ्यांना रोजगार मिळतो आहे. आणि हा आकडा वाढवायच्या दिशेनेही कंपनी वाटचाल करीत आहे.

**सिद्धेश महाडिक–** आपले बैलगाडी हाकतानाचे छायाचित्र पाहून वाटलं की, शेती फुलवून भारत देश समृद्ध करायचं स्वप्न कसं साकार करता येईल?

**भाऊ–** भारताचं वैविध्यपूर्ण हवामान वेगवेगळ्या ऋतुंमधील पिकांसाठी, फळांसाठी उपयुक्त आहे. या विशाल देशाला सृष्टीनं विविधतेने नटलेलं, थाटलेलं आहे. तसं पाहिलं तर भारतात पाण्याचं प्रमाणही कमी नाही. पण एक तर पाण्याच्या वाढत्या दुरुपयोगामुळे आणि पर्यावरणावरील आघातामुळे दिवसेंदिवस हे प्रमाण कमी व्हायला लागलं आहे. पण हे चित्र पालटता येईल. त्यास सकारात्मक विचारांची आणि सोबत भरीव कामगिरीची आवश्यकता आहे. 'देशाच्या समृद्धीत आपली स्वतःची समृद्धी सामावली आहे,' या प्रेरक विचाराने जपानचा इतका कायापालट झाला की, तो लहानसा देश आज औद्योगिक क्षेत्रात जगामध्ये अग्रेसर आहे, हे सर्वांना माहीत आहे. आपणही आपल्या उपलब्ध स्रोतांचा उचित वापर केला तर आपला देशही जगातील पुढारलेल्या १० देशांमध्ये स्थान प्राप्त करू शकेल.

आपल्या देशाची प्रमुख साधनसंपदा आहे कृषि, हवामान, पाणी आणि कष्ट करणारा ग्रामीण समुदाय. या परस्पर पूरक घटकांचा जर कालानुरूप उपयोग करता आला, तर आपल्या देशाची कल्पनेच्या पलिकडे प्रगति होऊ शकेल. प्रत्येक जण झटला, तर देशाची उन्नति साधेल. आणि देशाच्या अशा उन्नतीतच प्रत्येक



धरू बैलांचे आसूड, करू नित्य कष्ट काबाड

नागरिकाचं हित व कल्याण दडलेलं असतं, हे सत्यही समजेल. या समृद्धीचं सूत्र आता नवीन पिढीच्या हाती आहे. नोकरीच्या शोधात भटकत, निराशेच्या अंधारात चाचपडत, हतोत्साही मानसिकदशेत कोलमडत जगायचं आहे की उपलब्ध स्रोतांचा उपयोग करत, प्राप्त ज्ञानाचा अवलंब करत, अपयशांवर मात करत जिद्दीने, उमेदीने, निर्धाराने आणि उत्साहाने कृषिविकासासाठी आपल्या ऊर्जेला समर्पित करायचं आहे, याबद्दल निर्णय नव्या पिढीने घ्यायचा आहे.

**उदय म्हातले–** भाऊ, आपल्या देशाच्या विकासासाठी आम्ही काय करायला हवं? याबद्दल आपले विचार सांगा.

**भाऊ–** आपला भारत कृषिप्रधान देश आहे. महात्मा गांधी म्हणत, ‘‘देशाचा विकास घडवायचा असेल तर खेडी जिवंत ठेवली पाहिजेत.’’ प्रत्येक हाताला काम, कामाला दाम मिळाले पाहिजे. देशाची विकास व्यवस्था शहरं आणि महानगरं यामध्ये न जखडता, राजकीय चौकट व प्रशासकीय पद्धती यांच्या विळख्यात न

अडकता, ती असंख्य गावागावात, खेड्याखेड्यात, पाड्यापाड्यात, वस्त्यावस्त्यात पोहचून सबळ झाली पाहिजे. शिक्षण, प्रशिक्षण, आधुनिकीकरण, तंत्रज्ञान, वैज्ञानिक आधार यामुळे होणारा फायदा आणि विकास तळागाळातल्या माणसापर्यंत पोहोचला पाहिजे. प्रांतवाद, भाषावाद, धर्मवाद यामध्ये न अडकता, कर्मशील, उद्यमशील, कर्तृत्वशील व सृजनशील एकजिनसी समाज उभ्या जगापुढे यायला हवा.

आपल्या शिक्षण पद्धतीतही बदल घडायला हवा. शिक्षणात कृषि आधारित अभ्यासक्रम व प्रात्याक्षिकांवर भर हवा. मुलांमध्ये कृषि कार्यसंस्कृतीविषयी आस्था निर्माण करणारी शिक्षण व्यवस्था व्हावी. इंग्रजांनी सुरू केलेली नोकर निर्माण करणारी शिक्षण प्रणाली बंद व्हायला हवी. पण हे सर्व घडायला काही काळ जावा लागेल. तोपर्यंत तुमच्या नवीन पिढीने आपली शक्ती कृषि कार्याकडे वळविली पाहिजे. तुमच्या शिक्षणाचा उपयोग तुम्ही कृषि साक्षरता, कृषि जागरुकता, कृषि तंत्रज्ञान, आणि कृषि काम यांच्यासाठी केला, तर तुमच्या ग्रामीण भागातील शेतीला ऊर्जितावस्थेत आणता येईल. अलिकडे असे प्रयत्न बऱ्याच खेड्यांमध्ये देशभर होत आहेत. 'गाव करी, ते राव न करी' या उक्तीप्रमाणे गावाच्या एकीत अफाट शक्ती आहे. गरज आहे ती ही शक्ती ओळखायची, त्या शक्तीची बेरीज करायची, तिला योग्य व उपयुक्त ठिकाणी वापरायची. नवीन पिढीच्या खांद्याला ही एक भव्यदिव्य जबाबदारी पेलायची आहे.

**कु. मेघा फिलसे–** 'नवीन पिढीवर जबाबदारी आहे, नवीन पिढीने हे केले पाहिजे, नवीन पिढीने ते केले पाहिजे', असं सांगणारे पुष्कळ भेटतात. पण भाऊ, आपल्याकडून याबाबतीत भरीव मार्गदर्शनाची अपेक्षा आहे.

**भाऊ–** मेघा, तुझं म्हणणं सत्य आहे. 'पर उपदेश कुशल बहुतेरे' या उक्तिप्रमाणे वागणारे खूप आढळतात. पण स्वतःच उदाहरण बनून मार्गदर्शन करणारे फार थोडे. तुमच्यापैकी प्रत्येकालाच तुमच्या स्वतःच्या खेड्यात असा ग्रामीण नमुनेदार दाखला बनायची संधि आणि आव्हान आहे. हे करण्यासाठी भरपूर परिश्रम, आटोकाट प्रयत्न, दुर्दम्य इच्छाशक्ती आणि औत्सुक्यपूर्ण उभारीची नितांत गरज आहे. 'भाग्यासि काय उणे रे, केल्यावाचुनि राहिले,' असं संतांनी जे म्हटलं आहे, त्यात हाच अर्थ गर्भित आहे, याचं मी अनेकदा प्रत्यंतर घेतलं आहे.

माझा हा उद्योग-व्यवसाय आज इतका समृद्ध दिसत असला तरी अनेक लहान-मोठ्या समस्यांसह सुमारे ४५ वर्षांच्या या खडतर प्रवासात दोनदा अशी संकटंही आली की, हा उद्योग कोसळायच्या किनाऱ्यावर येऊन ठेपला होता. पण

अशाही परिस्थितीत काम, मेहनत, कठोर परिश्रम हा मंत्र आम्ही सोडला नाही. आणि चक्रवाताच्या भोवऱ्यात सापडलेल्या या उद्योगाला आम्ही तावून-सुलाखून बाहेर काढू शकलो आणि यशस्वी करू शकलो.

मुळातच शेती व्यवसाय व कृषि आधारित उद्योग जोखमीचे मानले जातात आणि ते बव्हंशी खरंही आहे. पण या आर्थिकदृष्ट्या असुरक्षित व्यवसाय-उद्योगात मी जाणीवपूर्वक प्रवेश केला. वाटेत आलेल्या अगणित अडचणींना तोंड देत देत आजवरचा प्रवास केला. यातूनच निर्मिती झाली ती 'एकछत्री सेवाकार्य उद्योगाची'. अगदी शेतीसाठी पाण्याचा स्रोत व बी-बियाण्यापासून तर शेतीवरील पिकाची निगा, मालाचा हंगाम आणि विक्री यापर्यंत सर्व प्रकारची मदत आमची कंपनी शेतकऱ्याला करते. तुम्हालाही कदाचित अशाच प्रकारच्या प्रसंगांचा सामना करावा लागेल. पण कृषिसंबंधी कोणतीही समस्या आल्यास ती सोडवायला आमची कंपनी तुम्हाला सहाय्य करील, याची खात्री असू द्या. 'शेतीत काम करणं म्हणजे कनिष्ठ दर्जाचं काम,'' ही विचारसरणी मनातून काढून टाका. आपली साधनसंपत्ति आणि उमेदशक्ती यांचा मेळ घाला. शेतीतल्या कामातून नोकरीसारखी ५ तारखेला हमखास पगाराची रक्कम नसली तरी १ दाण्यातून १०० दाणे उत्पादनाची क्षमता आहे, हे ध्यानी ठेवा. धैर्याने वाटचाल करीत रहा, कारण शेतीतून फळ मिळायला वेळ लागतो.

**कु. नयना माने-** आपण शुन्यातून निर्मिती केली. अनेक गुणी व मेहनती लोकांना जवळ करून उद्योगविश्व उभं केलं. त्याबद्दल जरा विस्ताराने सांगावे.

**भाऊ-** मी आपलं काम प्रामाणिकपणे केलं. ध्येय उराशी बाळगून कष्ट केले की प्रचंड यश गाठता येतं, हे अनुभवलं. कठोर परिश्रमाअंती मधुर फळे चाखायला मिळतात. व्यवहारात अहोरात्र मेहनत करताना चांगले सहकारी, मित्र निवडावे लागतात. छत्रपती शिवरायांनी जसे निवडक मावळे मिळवले होते, त्याप्रमाणे मी माझ्या उद्योगव्यवसायासाठी माणसं पारखून जवळ केलीत. त्यांना जबाबदार जाणून निर्णयाचा अधिकार दिला. त्यांच्यात विश्वास निर्माण केला, त्यांना प्रशिक्षण दिले. त्यांच्यात आमच्या कार्यसंस्कृतीची आवड निर्माण केली.

शेतकऱ्यांना कृषितंत्राची, कष्टकऱ्यांना कामाच्या उपलब्धतेची मोलाची साथ मिळवून दिली. त्यांच्या कष्टाला योग्य व हमी भाव दिला आणि मिळत आहे. यामागे प्रमुख प्रेरणा होती ती कृषितून विकासाची. आणि तुम्ही पाहिलं की, आमचे सर्व कारखाने हे कृषि निगडित उत्पादनांशी संबंधित आहेत. हे करत असताना अपयश आलं तेही पचवावं लागलं. 'अपयश ही यशाची पहिली पायरी आहे,' हे

ध्यानी ठेवलं. अपयशातून धडे घेत आम्ही मार्गक्रमण करीत राहिलो. उत्पादनांची मालिका वाढत राहिली. रोजगार वाढत राहिला. अधिक गुणी आणि मेहनती लोक भेटत राहिले, सहभागी होत राहिले, जुळत राहिले.

**कु. पल्लवी आडविलकर–** कोकणात विविध फळांचं उत्पन्न होतं. आपण चिकू, पेरू, आंबा, केळी, डाळिंब इ. प्रकारच्या फळांवर प्रक्रिया केली. त्याबद्दल अधिक जाणून घ्यावंसं वाटतं.

**भाऊ–** मी नेहमीच लक्षात ठेवतो की, आपला देश हा कृषिप्रधान देश आहे. ७०% लोक ग्रामीण भागात राहतात. त्यांचा उदरनिर्वाह शेतीवरच चालतो. याशिवाय आपली अर्थव्यवस्था शेतीशी निगडित आहे. ग्रामविकास, कृषिविकास जेवढ्या गतीने होईल त्या प्रमाणात आपल्या दरडोई उत्पन्नात वाढ होईल. आपण जी फळउत्पादनं घेतो, ती नाशवंत असल्यामुळे त्यांवर प्रक्रिया करून ती द्रव किंवा घन रूपात हवाबंद बरण्यात किंवा पुडक्यात साठवावी लागतात. पण प्रक्रियेसाठी लागणारी फळं मिळण्यासाठी फळझाडं लावल्यापासून तर फळ येईपर्यंत ती झाडं जोपासावी लागतात. निर्यातीचे मानदंड सांभाळण्यासाठी खाद्यान्न विभागाचे सारे नियम कसोशीने पाळावे लागतात. प्रक्रिया करताना हातावरील धूळ, शरीरावरील घाम, डोक्यावरील केस या उत्पादनात पडू नयेत यासाठी वैयक्तिक आरोग्य आणि योग्य गणवेषावर भर द्यावा लागतो.

प्रक्रिया होत असताना HACCP प्रमाणे तिच्यावर नियंत्रण ठेवावं लागतं. उत्पादनाची जागतिक मानकांप्रमाणे परीक्षा/चाचणी घ्यावी लागते. यातून आम्ही जागतिक गुणवत्तेचे उत्पादन तयार करतो. पण आम्ही निवडलेले उत्पादन हे फळप्रक्रिया क्षेत्रातील अनेक उत्पादनापैकी एक आहे. याच श्रेणीत लोणची, मुरब्बे, चटण्या (सॉसेजेस), अशी विविध उत्पादनांची मालिका आहेच. कोकणातील विविध फळांसाठी हे फायदेशीर क्षेत्र आहे.

**सौ. रेणू दांडेकर–** मोठी माणसं इतरांपेक्षा वेगळीच असतात. पण अशा महान माणसांचं वेगळंपण कशात आहे, हे सहजपणे लक्षात येत नाही. आपण यावर प्रकाश टाकावा.

**भाऊ–** माझ्या अनुभवावरून मी हे ठामपणे सांगू इच्छितो की, माणसाचं आगळंवेगळंपण हे त्याच्या राहणीच्या साधेपणात, विचारांच्या शहाणपणात, मनाच्या मोठेपणात, कृतीच्या विद्वत्तेत आणि वागणुकीच्या प्रभावीपणात आहे. आणि या सर्वातच माणसाचं माणूसपणही दडलेलं आहे. अलिकडे असं चित्र

साधारणपणे बघायला मिळतं की, कपडेलत्ते, साजसरंजाम, छानछोकी इत्यादिंवर मिळकतीतला खूप मोठा वाटा खर्च केला जातो. काही जण तर कर्ज काढून सजावट, डामडोल दाखवून स्वतःची दिशाभूल करत असतात. केवळ शेजाऱ्याकडे आहे, म्हणून ते सर्व माझ्या घरीही असावे असा त्यांचा अट्टाहास असतो. अशा वेळी गांधी-विनोबा आठवतात ते त्यांच्या साध्या राहणीमुळे. 'अंथरूण पाहून पाय पसरावे,' या विचाराने जीवनाची मांडणी केल्यास कुटुंबाची ओढाताण होत नाही. यालाच विचारांचं शहाणपण म्हणता येईल. संपत्ति अधिक मिळू लागल्यावरही तो संयम तसाच राखला जावा. यात विचारांच्या शहाणपणाची खोलवर रुजलेली पाळंमुळं दिसतात.

जीवनात प्रत्येकाला अनेक प्रकारचे कडु-गोड प्रसंग अनुभवायला मिळतात. कुणी चुकलं, रागावलं, तर नकारात्मक प्रतिक्रिया सहजपणे बाहेर पडते. पण अशा वेळी क्षमा करणं, चूक दुरुस्त कशी करता येईल त्याविषयी मार्गदर्शन करणं, किंवा फसवणूक करणाऱ्याला सुधारण्यासाठी एकदा तरी संधी देणं अशा प्रकारे मनाचा मोठेपणा दाखविता आल्यास भविष्यात याचे फार उत्कृष्ट परिणाम मिळतात.

आपल्या शब्दांपेक्षा आपल्या कृतीकडे लोक अधिक गंभीरतेने बघत असतात. संत तुकारामांनी म्हटलं आहे, 'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले'. या उक्तीचा जीवनात वापर करणाऱ्या व्यक्तीला खरा विद्वान म्हणून गौरव प्राप्त होतो. अशा व्यक्तीला त्याने स्वतःच्या कृतीमधून उदाहरणं घालून दिल्यामुळे इतरांची ऊर्जा योग्य दिशेला वळविता येऊ शकते. ज्याचं शरीर, मन, हृदय आणि आत्मा सर्व काही कामात रममाण आहे अशा व्यक्तीच्या कृतीतून, विचारातून, भावभावनातून, श्रद्धाविश्वासातून जे काही बाहेर पडतं, दिसतं, अनुभवास येतं त्याचा प्रभाव व्यापक असतो. आणि त्यामुळेच अशी व्यक्ती महान कार्य करू शकते. त्यात हजारो-लाखो लोकांचं योगदान सहजतेनं मिळतं.

**कु. मिलन आदावडे–** तुमच्यासारख्या मोठ्या व्यक्तीची भेट होणं व तुमचे विचार ऐकणं हे आमचं भाग्य. आम्हाला आपल्या मार्गदर्शनाची गरज आहे. जीवनात मोठे होण्यासाठी आम्ही कोणत्या गुणांची कास धरायला हवी?

**भाऊ–** उद्योग उभारणीतून केवळ अर्थार्जन, विकासाकडे न पाहता त्यातून जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा आविष्कार झाला पाहिजे ह्या विचारसरणीचा मी माणूस आहे. तत्त्वज्ञ उद्योजक असणं हे सुसंस्कृत माणूस घडायला व सुदृढ समाज बांधणीला पोषक ठरतं, ह्यावर माझी गाढ श्रद्धा आहे. सुसंस्कार, उद्यमशीलता, सकारात्मक

दृष्टिकोन, प्राणिमात्रावर दया, मानवसेवा हे सुप्तगुण बालपणीच माता-पिता, ज्येष्ठ आप्तगण, नंतर गुरू, मित्र, ग्रंथ यांनी माझ्यात पेरले, रुजविले. त्यामुळे त्याची रसाळ फळं आपण सकृद्दर्शनी पाहत, अनुभवत आहात. सुसंधीचा सदुपयोग, धोका स्वीकारण्याचं धैर्य, व्यवहारातली नितिमत्ता, उद्योगात नावीन्याचा अंगीकार, विश्वासार्ह वागणूक, स्वत्त्व जपण्याची धडपड, आचरणातली सचोटी, जेही काही करायचं त्यात एकाग्रता या विविधेतून माणूस उत्कृष्ट कामगिरी साध्य करून घेतो. मुलांनो, मलाही तुमच्यासारखा असतांना शिकवलं गेलं आणि त्यातून मी शिकत गेलो, वर्तनातून घडत गेलो. सतत शिकायची तयारी ठेवल्याने जसा मी घडलो तो तुमच्यासमोर आहे.

**कु. प्रीती कंगणे–** 'आपल्या यशाचं रहस्य काय?'

**भाऊ–** अगदी थोडक्यात सांगायचं तर आत्मविश्वास, मनाचा निर्धार, जोखीम उचलायचं धाडस, अडचणींना सामोरं जायची हिम्मत आणि सतत परिश्रम यामध्ये यशाची गुरूकिल्ली आहे. सर्वसाधारणपणे आत्मविश्वासाची उणीव किंवा कसर अपयशाला कारणीभूत ठरते. एकदा का आत्मविश्वास बळावला की, कोणतीही गोष्ट करायला मनाचा निर्धार करणं कठीण जात नाही. त्यातूनच जन्म घेते जोखीम स्वीकारायची धाडसी वृत्ति. ही वृत्ती काम करताना आलेल्या अडचणींमधून मार्ग काढण्यासाठी हिम्मत, शक्ती देत असते. आणि मी या आधीच म्हटलं आहे की, सतत परिश्रमापेक्षा चांगला कोणताच पर्याय या जीवनात व्यक्तीला खऱ्या अर्थाने यशस्वी बनवू शकत नाही.

**विशाल तेलप–** आदर्श व्यक्ती होण्यासाठी काय करावं?

**भाऊ–** 'आपण या जगात नसू तेव्हाही जगाने आपल्याला विसरायला नको,' असं वाटत असेल तर त्यासाठी आपल्याला असं कार्य करावं लागेल की, त्यावर लोक बोलत राहतील, त्याबद्दल लोक लेखन करतील व इतर लोक ते वाचत जातील. म्हटलंच आहे, 'मरावे, परि किर्ती रूपे उरावे.' कामाच्या बाबतीत तुच्छ काम आणि श्रेष्ठ काम अशी गणना करणारा किंवा कष्टाची लाज बाळगणारा माणूस कधीही चांगलं काम करू शकणार नाही. शरीर, मन, हृदय व आत्मा एकवटून कार्य करायला शिका. ज्ञानार्जन करा, सतत शिकत राहायची कास धरा. सुशिक्षित तर व्हाच, सुसंस्कृतही व्हा. जे जे काम कराल ते ते उत्कृष्ट करा. जीवन असं जगा की, केलेल्या कामातून आदर्श उभा राहील. 'मनुष्य जन्माने नाही तर कर्माने महान होतो,' हे नेहमी लक्षात असू द्या. सामान्य परिस्थितीवर मात करून अद्वितीय कार्य

साधणाऱ्या व्यक्तीच पुढच्या पिढीसाठी प्रेरणास्थान आणि मार्गदर्शक ठरतात. 'प्रत्येक कार्याला वेळ व प्रत्येक वेळेला कार्य,' हे कार्यक्षमतेचं, कार्यशीलतेचं आणि नवनिर्मितीचं सूत्र आहे. या सूत्रातच आदर्श व्यक्ती होण्याचं बीज दडलेलं आहे.

**कु. नयना माने-** भाऊ, आपण निर्मित केलेले उद्योग साम्राज्य आणि विकसित केलेली हिरवी जैन हिल हे प्रत्यक्ष बघितल्याशिवाय खरं वाटणार नाही इतकं आश्चर्यदायी आहे. पण एवढ्या विविध उद्योगात गुंतलेले असूनही आपण सेवाभावही जपता, हे आपल्याला कसं साध्य होतं?

**भाऊ-** एका विशिष्ट ध्येयानं झपाटून आणि एक व्यापक दृष्टिकोन ठेवून १९६३ साली ७००० रुपयांच्या भांडवलावर तीन कष्टाळू सहकाऱ्यांच्या मदतीने मी उद्योगाची मुहूर्तमेढ रोवली. छोट्या-मोठ्या यशांनी हुरळून न जाता आणि पराभवाच्या संकटांनी खचून न जाता मी काम करीत राहिलो. अथक परिश्रम, सचोटी, विश्वासार्हता यावर मी उद्योगाची उभारणी केली. हे करीत असताना सामाजिक बांधीलकीही सांभाळू शकलो. कला, साहित्य, संस्कृतींना मी नेहमीच मानाचं स्थान देत आलो. या माझ्या जीवनप्रवाहात माझी पत्नी सौ. कांताबाईंचा मोलाचा सहभाग लाभला. तिचा अपूर्व त्याग माझ्या कार्याला उभारी देत राहिला. माझे चारही पुत्र अशोक, अजित, अनिल आणि अतुल यांनीही त्यात योगदान दिलं. माझ्या एकत्र कुटुंबातील सदस्यांचीही मला साथ मिळत राहिली. विशेष म्हणजे आमच्या उद्योगात काम करणाऱ्या अनेक सहकाऱ्यांची मदत मिळाली. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे माझं सामाजिक बांधीलकी जोपासण्यातलं यश!

**अजित पाते-** मी आता १० वी शिकत आहे. पुढे काय करावे याचे मार्गदर्शन द्याल का?

**भाऊ-** विद्यार्थ्यांनो, मीदेखील तुमच्यासारखाच एका छोट्या गावात जन्माला आलो. प्राथमिक शिक्षणाचे धडे खेड्यातच घेतले. मी फार हुशार विद्यार्थी नव्हतो. परंतु जिद्द, चिकाटी प्रथमपासून जोपासली. मनुष्य स्वकष्टाने, प्रामाणिकपणाने मोठा होऊ शकतो. जीवनात शिक्षण, सुसंस्कार, परिश्रम, सचोटी आणि निर्धार ह्या महत्त्वाच्या गोष्टी आहेत. शिक्षण केवळ नोकरी मिळविण्याचं साधन न समजता, त्याच्या उपयोगाने सृजनतेचा ध्यास धरून नवीन निर्माण करण्याची अभिलाषा बाळगायला हवी. या दृष्टीने विचार केल्यास आपल्यापैकी प्रत्येकाने सर्वात आधी आत्मविश्वास वाढवायला हवा. मनाला काय भावते याचा निर्णय करायला हवा. माणसाला जे आवडते ते तो मन लावून करतो. जी गोष्ट करायला मन साथ देईल,

साक्ष देईल ती करणे अधिक श्रेयस्कर. हा मार्ग सरधोपट नाही. त्यामुळे अफाट कष्ट करायची, अपयश पचवायची, मार्ग काढत राहायची आणि स्वीकारलेल्या कामात स्वतःला पूर्णपणे झोकून द्यायची वृत्ती जोपासायला हवी. पण शिक्षण पूर्ण झाल्यावर आपल्या आवडीचंच काम करायला मिळेल असं बव्हंशी घडत नाही. अशा वेळी काय करावं हा मुख्य प्रश्न असतो. तेव्हा मात्र खरं तर 'शेतकऱ्याच्या, शेतमजुराच्या मुलाने काय करावं?' या प्रश्नाचं उत्तर शोधावं लागतं. ज्याची कठोर परिश्रम करायची तयारी असेल त्याला शेतीत मेहनत करणं हा आज तरी चांगला पर्याय दिसतो. पण हे करताना शिक्षण आणि अनुभव यातून शिकत राहायला हवं.

*(यानंतर गप्पागोष्टी थांबून मुलामुलींनी मनात दाटलेल्या भावना व्यक्त केल्या.)*

**कु. मिलन आदावडे –** भाऊ, आमच्या शाळेची ही शैक्षणिक सहल केवळ आपल्यामुळेच आयोजित होऊ शकली. आपण आमच्यासाठी अगदी परमेश्वराच्या जागी आहात. एरव्ही कोकणातल्या चिखलगावसारख्या आडवळणाच्या गावच्या विद्यार्थ्यांची कोण दखल घेतो? त्यांच्यासाठी येऊन-जाऊन जवळपास १००० कि.मी. च्या प्रवासाची व्यवस्था कोण करतो? ४ दिवस आपल्या जैन हिल्ससारख्या रमणीय नैसर्गिक सौंदर्याच्या ठिकाणी राहायची त्यांची खबरदारी कोण घेतो? तुमच्यासारख्या मोठ्या व्यक्तीची भेट होणे, तुमचे विचार ऐकणे हे आमचं थोर भाग्य! भाऊ, आपले आभार मानायला माझ्याकडे शब्द नाहीत. पण माझ्या भावना मात्र आपल्याला कळतील, ही हार्दिक इच्छा.

**कु. शिल्पा पान्दे–** भाऊ, आपण केलेल्या प्रयत्नांनी, अफाट मेहनतीने पडीक टेकड्यांचे हिरव्यागार वनराजीत रूपांतर झालेले प्रत्यक्ष पाहिल्यानंतर वाटतं की, सुजलाम, सुफलाम भारतमातेला तिचं पूर्वरूप प्राप्त करून देण्यासाठी काबाडकष्टाची, निर्धाराची आवश्यकता आहे. भाऊ, प्रकृती ठीक नसूनही आपण आमच्याशी गप्पागोष्टी केल्यात. या आत्मीयतेला तोड नाही. आपले आभार मानावे तेवढे थोडेच.

**उदय म्हातले–** भाऊ, कधीही विसर पडणार नाही अशी ही सहल झाली. आपल्या सहकार्यानं, आशीर्वादामुळे आपल्यापर्यंत पोहचून हे कृषिवैभव आम्ही न्याहाळू शकलो. डोंगरावरची फुललेली हिरवीगार पालवी पाहून मन प्रफुल्लित झालं. आमच्यासारख्या विद्यार्थ्यांनी भव्यदिव्य पाहिलं तरच नंतर काही तरी भव्यदिव्य होऊ शकतं. हा केवळ विचार नाही, तर तुम्ही तो कृतीत आणला आहे हे प्रत्यक्ष दिसतं. आपल्याला प्रश्न विचारून त्यांची उत्तरे घेणं याचं परिवर्तन गप्पागोष्टीमध्ये केव्हा झालं

हे खरं तर कळलंच नाही. पण या गप्पागोष्टींमधूनच आम्हाला खूप बोध घेता येईल. शेतीशी बांधीलकी काबाडकष्ट करायला प्रेरित करते. निर्धाराने आपण कठीण परिस्थितीवरही मात करू शकतो. आणि आणखी बरंच काही. भारतासारख्या खंडप्राय देशाला जगात मानाचं स्थान मिळवायचं असेल तर त्यासाठी आपल्यासारख्या कृषि किमयागारांची आवश्यकता आहे. म्हणून ईश्वरचरणी प्रार्थना आहे की, आपल्याला उदंड आयुष्य, उत्तम स्वास्थ्य लाभू दे.

**कु. पल्लवी आडविलकर–** भाऊ, चार दिवसात चार वर्षांचे ज्ञान मिळाले. बंधारे, बांध, तलाव, जलसाठे यातून पाण्याची उपलब्धता पक्की करून त्याचा डोंगरउतारावरच्या जमिनीवर लागवडीसाठी उपयोग केला. त्याकरिता ठिबकची व्यवस्था केली आणि स्वर्ग जमिनीवर उतरविला. अशीच ज्ञानकेंद्रे ठिकठिकाणी उभी राहिली, तर भारताचा कायापालट झपाट्याने होऊ शकेल. मात्र त्यासाठी गरज आहे आपल्यासारख्या शिल्पकाराची, आणि त्याच्या दीर्घायुष्याची, निरोगी प्रकृतीची. ईश्वराने आमच्या आयुष्यातील काही भाग आपल्या आयुष्याला जोडून द्यावा, ही त्या परमेश्वर जगन्नियन्त्याकडे मागणी. धन्यवाद. जय हिन्द!

*(टाळ्यांच्या गजरात आणि भावविभोर वातावरणात या गुजगोष्टी संपल्या.)*



# मुलाखतकारांचा परिचय

# मुलाखतकारांचा परिचय



**हेमंत शंकरराव काळुंखे** *(पृष्ठ ६, १८)* - १९७१ ला 'दै. गावकरी'मध्ये मुद्रणशोधक. १९७६ पर्यंत संपादकीय विभागात विविध जबाबदाऱ्या. १९७६-९० या काळात 'दै. जनशक्ती'चे उपसंपादक(प्रशिक्षणार्थी), उपसंपादक, मुख्य उपसंपादक. 'दै. जनशक्ती'च्या 'चित्ररूप' सिनेनाट्य कला पुरवणीचे १२ वर्षे संपादन. १९९० ला जळगाव जिल्ह्यातील पहिलं ऑफसेट प्रिंटीग असलेलं स्वतःचे 'साप्ताहिक खासबात' सुरू करून विविध विषयस्पर्शी स्फूटलेखन. १९९० मध्ये 'चाफा' या प्रकाशनाची मुहूर्तमेढ. १९९२ चा 'चाफा दिवाळी अंक' वैशिष्ट्यपूर्ण ठरला. १९९७ च्या 'चाफा दिवाळी अंक' राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेत तृतीय पारितोषिकाचा मानकरी. १९९२-९७ काळात 'दै. जनशक्ती'त संपादन विभाग प्रमुख. १९९८ ला 'दै. देशदूत'मध्ये वाणिज्य प्रतिनिधी, नंतर उपसंपादक आणि प्रादेशिक विभाग प्रमुख म्हणून कार्य. 'दै. देशदूत-सार्वमत' सिनेनाट्य पुरवणी 'मायानगरी' चे २००० पर्यंत संपादन. २०००-०२ काळात 'दै. देशोन्नती'ला वाणिज्य प्रतिनिधी, उपसंपादक आणि जळगाव, धुळे, नंदुरबार आवृत्ती प्रमुख. २००२-०४ काळात 'दै. आव्हान', 'सा. पिचकारी', 'सा. ब्लास्ट टाईम्स' संपादक. २००३ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर फेलोशिप. २००५ पासून लोकल न्यूज चॅनल 'लोक टिव्ही' मध्ये संपादकीय विभागात कार्यरत. सु. ग. देवकर पालक शिक्षक संघाचे २ वर्षे अध्यक्ष. जळगाव जिल्हा पत्रकार संघात १२ वर्षांपासून सहचिटणीस. २००५ सालचा उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार.



**देवचंद रामजी छेडा** *(पृष्ठ १४)*- शिक्षण बी.ए., एलएल.बी. आरंभी स्वतःचे 'कच्छ रचना' मासिक. १९७० ला मुंबईच्या 'जन्मभूमि' वृत्तसमूहाच्या 'साप्ताहिक व्यापार' या नियतकालिकात वाणिज्य संपादक. सोबत 'दै. व्यापार' (गुजराथी आणि हिंदी) संपादनाची जबाबदारी. ३७ वर्षांपासून संपादकीय विभागात कार्य. सद्या 'व्यापार' या दैनिकाचे संपादक. 'कच्छ कार्पोरेट फोरम' औद्योगिक संस्थेचे संस्थापक. एम.डी. कॉलेज (मुंबई) गुजराथी साहित्य मंडळाचे सहसचिव. वाणिज्य पत्रकारितेत हजारहून अधिक लेख, उद्योजकांच्या मुलाखती आणि स्फूटलेखन.



**विजय मधुकर बाविस्कर** *(पृष्ठ २६)*- पदवी शिक्षण जळगावला मु. जे. महाविद्यालयात. विद्यार्थी दशेपासून लेखनाची आवड. १९८३ मध्ये 'दै. लोकमत'च्या संपादकीय विभागात रुजू. १९८३ मध्ये 'पंचम' या नाट्य सांस्कृतिक संस्थेचे संस्थापक. १९८५-८७ काळात लोकमत स्कूल ऑफ जर्नलिझम, औरंगाबाद येथे प्रशिक्षण. कार्यपद्धती आणि संपादकीय ज्ञानाच्या आधारावर १९८७ पासून उपसंपादक म्हणून जळगावला नेमणूक. १९९५ पासून वरिष्ठ उपसंपादक आणि प्रमुख मुख्य उपसंपादक. 'दै. लोकमत' नाशिक आवृत्ती प्रारंभी प्रमुख वृत्तसंपादक. १९९७ पासून जळगाव 'दै. लोकमत' कार्यकारी संपादक, शिवाय शाखा व्यवस्थापक. अकोला व नाशिक आवृत्तीचे संपादन. सलग तीन वर्षे 'पां. वा. गाडगीळ पत्रकारिता पुरस्कार', २००४-श्री क्रिएशन्स मुंबईतर्फे 'साने गुरुजींची धडपडणारी मुले' पुरस्कार, २००५-विजय कुवळेकर ट्रस्टतर्फे 'प्रबोधनरत्न' पुरस्कार. आकाशवाणी, दूरदर्शनवरून 'युवक रंगतरंग', 'बालविश्व' व 'नभोनाट्य' कार्यक्रम सादर. जळगाव व. वा. वाचनालयाचे उपाध्यक्ष.



**मंगेश सूर्यकांत कपटकर** *(पृष्ठ ४०)*- सिम्बायॉसिस (पुणे) मधून संख्याशास्त्र व एम. बी. ए. कम्युनिकेशन आणि जर्नलिझमची पदवी. 'अथर्व कम्युनिकेशन प्रा. लि.' पुणे या इव्हेन्ट मॅनेजमेंट पब्लिकेशन कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर. श्री. अक्कलकोट स्वामी समर्थ या वार्षिक दिवाळी अंकाचे १० वर्षांपासून संपादक. आतापर्यंत त्यांच्या नावावर १६ पुस्तके. 'श्रम गंगेच्या काठावरती' (१९९७), 'श्रमिकांचे भेटी' (१९९९) पुस्तकांना महाराष्ट्र राज्य शासनाचे 'इडिपी पुरस्कार'. 'तेजोनिधी' (२००४-चरित्रात्मक लेखन) पुस्तकास महाराष्ट्र राज्य शासनाचा विशेष पुरस्कार. आपल्या लेखन काळात ३०० हून अधिक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या उद्योजकांच्या मुलाखती घेऊन त्यांचे प्रकाशन. बायोडिझेलवर सखोल अभ्यासपूर्ण अहवाल महाराष्ट्र राज्य शासनास सादर. सामाजिक, आर्थिक प्रश्नांच्या संदर्भात बांगला देशचा १९९९-२००१ असा सलग ३ वर्षे प्रवास व माहिती संकलन.

टिप- महाराष्ट्र गॅझेट (१९९९) नोंदीनुसार मंगेश सूर्यकांत कपटकर आता मंगेश सूर्यकांत कश्यप म्हणून परिचित आहेत.



**राबिया हिरा** *(पृष्ठ ५४)*- मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषांवर प्रभुत्व. मुक्त पत्रकारीतेची आवड. नाशिक येथील अग्रगण्य प्रकाशन 'नॉर्थ वेस्ट नेटवर्क' च्या प्रकाशिका. या व्यापार-उद्योगविषयी महत्त्वाकांक्षी नियतकालिकातून सकारात्मक पत्रकारिता. महाराष्ट्रातील शेकडो यशस्वी आणि प्रेरणादायी उद्योजकांच्या यशोगाथा, मुलाखती, जीवन प्रवास यांचे शब्दांकन. विविध नियतकालिकातून सातत्याने अनेक वर्षे लेखन. 'न्यू व्हेंचर्स डायजेस्ट' व 'महाराष्ट्र डाटाबेस'चे प्रकाशन. सद्या बांधकाम क्षेत्रात कार्यमग्न. विविध देशांमध्ये पर्यटनात रस.



**गोरख रामभाऊ पगार** *(पृष्ठ ६०)*- तेवीस वर्षांपासून पत्रकारितेत. औरंगाबाद येथील 'दै. मराठवाडा', नाशिक येथील 'दै. रामभूमी', 'दै. सकाळ' मध्ये उपसंपादक. १९९४ पासून नाशिक येथील 'अर्थ-उद्योग' मासिकाचे संपादक. उद्योगाच्या विविध विषयांवर ६५ विशेषांकांचे प्रकाशन. एक हजाराहून अधिक मान्यवर उद्योगपतींच्या मुलाखती स्वतः घेऊन प्रसिद्धी.



**शैलेश हरिश्चंद्र वाडेकर** *(पृष्ठ ७४)*- अभियांत्रिकीची पदवी (१९९३). महाविद्यालयीन शिक्षण फर्ग्युसन आणि इंजिनियरिंग कॉलेज पुणे येथे. व्यवसायाने मेकॅनिकल इंजिनियर असूनही पत्रकारितेत रममाण. 'ओपेल इलेक्ट्रॉनिक्स', पुणे, चे संचालक आणि मुक्त पत्रकार. 'चित्रलेखा' चे प्रतिनिधी. विद्यार्थी जीवनातच १९८९ पासून 'दै. प्रभात' मध्ये लेखनास आरंभ. १९९१ पासून 'कॉलेज आणि युवक' या विषयासाठी वाहिलेल्या 'कॉलेज कट्टा' या साप्ताहिकात रुजू. कार्यकारी संपादक कालात युवकांना ज्यांच्याकडून दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन होईल अशा आदर्श व्यक्तींच्या मुलाखती प्रकाशित करून पत्रकारितेत निराळा व वैशिष्ट्यपूर्ण प्रयोग.



**सुशील श्यामसुंदर नवाल** *(पृष्ठ ८४)*- सिम्बायॉसिस (पुणे) मधून वाणिज्य शाखेत पदवी. समाजकार्याची आवड. घरच्या पारंपरिक कापड विक्री व्यवसायाची दहा वर्षात आपल्या बुद्धीकौशल्याने आणि निरनिराळ्या संकल्पनांमधून भरभराट. नंतर 'दै. देशदूत'मध्ये साडेतीन वर्षे कार्यकारी संचालक म्हणून व्यवस्थापन, उत्पादन, वितरणात छाप उमटवून अल्पावधीत 'दै. देशदूत'ला नावलौकिक. २००१ मध्ये 'मल्टी मिडीया फिचर्स प्रा. लि.' ही स्वतःची जाहिरात एजन्सी स्थापन. सामाजिक, व्यावसायिक, शैक्षणिक, राजकीय आणि सनातन विषयांवरील विविध प्रकारच्या कार्यक्रमांचे संयोजन, नियोजन, प्रसिद्धी माध्यमांतून यथायोग्य प्रसिद्धी कार्य. ग्राहक पसंत सेवेमुळे या संस्थेची खान्देशात उत्तम प्रतिमा.




**सौ. सुलभा श्रीकांत कोरे** *(पृष्ठ ९८)*- अर्थशास्त्राची पदवी, हिंदी साहित्यात भाषारत्न परीक्षेत मुंबईत प्रथम, हिंदी पदव्युत्तर अभ्यासानंतर पी एच डी साठी नोंदणी; संस्कृत साहित्यात पूर्वमाध्यमा. युनियन बँक ऑफ इंडिया, मुंबई, मध्ये व्यवस्थापिका. बँकेचं गृहपत्रक 'युनियन धारा' च्या संपादिका. गेल्या पंचवीस वर्षांपासून दिवाळी वार्षिक 'साहित्य जागर' च्या सहसंपादिका. लोकसत्ता, लोकप्रभा, महाराष्ट्र टाईम्स, वृत्तमानस, महानगर, नवशक्ती या मराठी आणि नवभारत टाईम्स, मनोरमा, जनसत्ता, मेरी सहेली, जनसत्ता, दोपहर का सामना आणि जागरण सखी या नियतकालिकातून चौफेर लेखन. झी अल्फा टिव्ही आणि विविध भारती कार्यक्रमांसाठी मराठी व हिंदीत लेखन. १९८८ 'स्पर्शिका' काव्यसंग्रह मराठी साहित्य संस्कृती मंडळातर्फे प्रसिद्ध. डॉ. अशोक शहाणे यांच्या दीर्घकथेचे 'इस शहर में हर शख्स' नावाने १९९०-९१ मध्ये भारतीय ज्ञानपीठसाठी हिंदीतून भाषांतराचा 'भारतीय कथाएँ' मध्ये समावेश. याशिवाय 'जगायचंय प्रत्येक सेकंद', 'एक नया आकाश', 'दिपवा' या पुस्तकांचे लेखन. १९९६ ला 'सारस्वत सन्मान' म्हणून गौरव. २००० मध्ये स्व. मधू लिमये यांच्या चरित्रावर आधारित 'आत्मकथा' हे हिंदी आणि मराठी पुस्तक प्रसिद्ध. २००० मध्ये 'एक नया आकाश' ला महाराष्ट्र हिंदी साहित्य अकादमीचा पुरस्कार. २००३ मध्ये हिंदी पत्रकारितेत योगदानाबद्दल 'अग्निशिखा' मंचचा पुरस्कार. २००४ ला 'वाङ्मयीन स्त्री कार्यकर्त्री' कोंकण मराठी साहित्य परिषदेचा पुरस्कार देऊन सन्मान. २००४ मध्ये राज कपूर यांच्या चित्रपट आणि जीवनावर 'सपनों का सौदागर' स्टेज शोचे संशोधनात्मक लेखन. 'काव्य रसिक मंडळ' डोंबिवलीच्या २ वेळा मुख्य.



**धोंडिबा जयवंत गुरव** *(पृष्ठ १३४)*- उस्मानाबाद जिल्ह्यातील हंबरगा या छोट्याशा खेड्यात प्राथमिक शिक्षण. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत सोलापूर, परभणी, औरंगाबाद आणि नागपूर येथे पुढील शिक्षण. पत्रकारितेच्या शिक्षण काळातच १९७६ ला नागपूर 'दै. लोकमत'मध्ये मुद्रणशोधक. १९७७ ला वृत्तपत्र विद्येचा अभ्यास पूर्ण केल्यावर 'दै. लोकमत' जळगाव आवृत्तीसाठी उपसंपादकपदी नेमणूक. १९८० ला धुळे जिल्हा प्रमुखपदी बढती. १९८२ ला जळगाव आवृत्ती प्रमुख म्हणून जबाबदारी. १९९७ पर्यंत 'दै. लोकमत'मध्ये सकारात्मक पत्रकारिता. १९९७ ला 'दै. देशदूत' जळगावच्या संपादक आणि प्रमुख या भूमिका निभावून खान्देशात या दैनिकाला रुजविले. २००१ पासून सुशिल नवाल सोबत सुरू केलेल्या 'मल्टीमिडीया फिचर्स प्रा. लि.' या जाहिरात संस्थेची संपादकीय विभागाची धुरा सांभाळून तिला अल्पावधीत खान्देशात नावारूपाला आणण्यात सिंहाचा वाटा.



**विजय रमाकांत पाठक** *(पृष्ठ १५२)*– ला.ना. सार्वजनिक विद्यालय, मु.जे. महाविद्यालय जळगावमध्ये शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण. बी. कॉम, एम. ए. आणि एम. एड. पदव्या. १९७३ पासून आर. आर. विद्यालयात शिक्षक. पत्रकारितेच्या क्षेत्रात नोकरी सांभाळून कार्य. स्थानिक वृत्तपत्रात सांस्कृतिक, शैक्षणिक विषयावर स्तंभ लेखन. १९७८ ला नागपूर पत्रिका आणि नागपूर टाईम्स (इंग्रजी) चे पत्रकार. १९८२-२००२ : टाईम्स ऑफ इंडियासाठी महाराष्ट्र टाईम्स (जळगाव जिल्हा) प्रतिनिधी. १९८२ ते आज तागायत युएनआय वृत्तसंस्थेचे जळगाव, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्याचे वरिष्ठ प्रतिनिधी. राज्य शासन पत्रकार पुरस्कार निवड समितीत सन्माननीय प्रतिनिधी म्हणून २ वर्षे काम. १९९० ला 'धनाअण्णा' पुरस्काराने सामाजिक कार्याबद्दल गौरव. पत्रकारितेच्या योगदानाबद्दल जिल्हा पत्रकार संघाचा 'प्रबोधन' पुरस्कार.



**आबासाहेब श्रीपाद वामन पटवारी** *(पृष्ठ १५६)*– शिक्षण एम कॉम, जी डी सी ॲन्ड ए. १९७४ ते ८१ पर्यंत डोंबिवलीचे लोकनियुक्त नगराध्यक्ष. पत्रकारितेस १९८० पासून आरंभ. शेकडो उद्बोधक लेख लिहून पत्रकारितेत भरीव कार्य. वाचकांना वैशिष्ट्यपूर्ण साहित्य देणाऱ्या 'ज्येष्ठपर्व' या पुस्तकाचे अलिकडेच संपादन. डोंबिवलीच्या विकासात महत्त्वाचे योगदान. डोंबिवली ग्रंथ संग्रहालयाचे अध्यक्ष. अमेरिकेतील 'फ्रेन्ड्स् ऑफ लायब्ररी' या संकल्पनेचा भारतात सर्व प्रथम वापर. 'साप्ताहिक विवेक'चे कार्यकारी संपादकपद सांभाळून सामाजिक, शैक्षणिक, राजकारण व अर्थकारणात आजही सक्रिय. डोंबिवलीच्या नागरिकांचे श्रद्धास्थान 'डोंबिवली गणेश मंडळ'चे अध्यक्ष. पाडव्याला भारतीय नववर्ष स्वागतयात्रेचे प्रणेते. डोंबिवली नागरी सहकारी बँकेचे व पेंढारकर कॉलेजचे संस्थापक. कोंकणात नागरी बँकांची स्थापना, बँकस्थापने आरंभीची रचना वगैरेसाठी महत्त्वाची भूमिका.



**उत्तम कोळगावकर** *(पृष्ठ १६२)*– मराठीतील नामवंत कवी. १९७० पासून लेखन. १९८१ पासून जळगाव, धुळे, सोलापूर आणि नाशिक आकाशवाणीत सेवा. 'छापापाणी' (बाळकविता १९७८), 'कविता दशकाची' (ग्रंथाली १९८०), 'जंगलझडी' (मौज प्रकाशन १९८२), 'जम्मतपूर' (बाळकविता १९८९), आणि 'तळपाणी' (मौज प्रकाशन २०००) हे पाच कवितासंग्रह प्रकाशित. 'तळपाणी' कवितासंग्रहास मराठवाडा साहित्य परिषद (औरंगाबाद), महाराष्ट्र साहित्य परिषद (पुणे), शिवगिरिजा प्रतिष्ठान (कुर्डुवाडी) आणि रा. ना. पवार प्रतिष्ठान (सोलापूर) या संस्थांचे पुरस्कार; 'जम्मतपूर'या पुस्तकास महाराष्ट्र राज्य पुरस्कार. हिंदी, इंग्रजी, गुजराथी, उर्द, जर्मन या भाषांतून कवितांचे अनुवाद प्रसिद्ध. ५वी (मराठी माध्यम), ९ वी (इंग्रजी माध्यम) या इयत्तांसाठी तसेच महाराष्ट्रातील आठ विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात कवितांचा समावेश.



**शंभु (राजेंद्र) बाजीराव पाटील** *(पृष्ठ १७०)*– बी.कॉम. पर्यंत शिक्षण. हौशी रंगभूमीवर गेल्या १५ वर्षांपासून कार्य. प्रभावी निवेदन शैली आणि भारदस्त आवाज. नैसर्गिक अभिनयाची जोड. 'एक विहंग वादळात' नाटकातील 'वकिलाच्या' भूमिकेसाठी १९९८ मध्ये अभिनयाचं महाराष्ट्र शासनाचे सर्वोच्च पारितोषिक. अभिनय, लेखन, दिग्दर्शन, अभिवाचन अशा चौफेर कामगिरीबद्दल अनेक सन्मान, मानपत्र, गौरव आणि पारितोषिके. दूरदर्शनवरील 'खान्देश रत्न' मालिकेचे लेखन. 'विसाव्या शतकाची कविता' या कार्यक्रमात कवितेचे वैशिष्ट्यपूर्ण प्रायोगिक वाचनाला रसिकांची भरभरून दाद. आंतरराष्ट्रीय पातळीचे जल ऋषी राजेंद्रसिंह राणा, पर्यावरण आणि पुनर्वसन क्षेत्रातील कार्यकर्त्या मेधा पाटकर, सिने-नाट्य अभिनेता सदाशिव अमरापूकर, अभिनेत्री मृणाल कुलकर्णी अशा अनेक दिग्गज व्यक्तींच्या प्रकट मुलाखती. सांस्कृतिक, सामाजिक आणि शैक्षणिक कार्याची आवड. भालचंद्र नेमाडे यांच्या 'कोसला' कादंबरीचे पुणे आकाशवाणी केंद्रावरील अभिवाचन. 'हरिजन सेवक संघ'चे कार्याध्यक्ष.



**डॉ. शामकांत देशपांडे** *(पृष्ठ १८८)*– वाणिज्य पदवी, सी.ए. (चार्टर्ड अकाऊंटंट). इंस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च, जळगावचे संचालक. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे माजी अधिष्ठाता आणि व्यवस्थापक परिषदेचे सदस्य. १९८७-८८ मध्ये अमेरिकेत वास्तव्य. आयकर सल्लागाराचे कामकाज. दरवर्षी अंदाजपत्रकाआधी सूचक बदलांवर विश्लेषणात्मक लेखन आणि अंदाजपत्रक प्रसिद्ध झाल्यावर त्यावर अभ्यासपूर्ण भाष्य.



**उमलले संवाद**

'जे करायचं ते उत्तमात उत्तमच' या ध्यास व ध्येयाने प्रेरीत हा प्रथम पिढीचा प्रणेता उद्योजक एक आगळावेगळा उत्पादक म्हणून आपणासमोर उभा राहतो. त्यांनी त्यांच्या उद्योगविश्वाला, शोधविकास केन्द्राला जे आकार, उकार आणि संस्कार दिले त्यातून उभरते त्यांची शोधप्रतिमा, कृषिविकासाशी एकात्मता. या जागरूक भूमिपुत्राच्या चिंतनामधून जाणवते त्यांची सामाजिक विकासाची तळमळ, अनेकविध विषयांचा सखोल अभ्यास आणि स्वतंत्र विचारांची बैठक. भारतीय परंपरा, योगसाधना आणि आध्यात्मिकतेकडे कल यातून घडला हा एक शिस्तभोक्ता पण प्रेमळ कुटुंबप्रमुख.

त्यांच्या लेखन, वक्तृत्व, संवाद, व्यवस्थापन पद्धतींमधून शिक्षण-प्रशिक्षण होतं, सल्ला-मार्गदर्शन मिळतं, दिग्दर्शन-प्रबोधन साधतं. विचारमंथन हा त्यांच्या स्थायीभाव. सामाजिक अनुबंध ही त्यांची उत्कट भावना. ग्रामीण विकास आणि कृषि कल्याण ही त्यांची हार्दिक तळमळ. कौटुंबिक एकजिनसीपणाचा मिळालेला आनुवंशिक ठेवा पुढे चालविणे ही त्यांची बांधीलकी.

या सर्वांचे प्रतिबिंब 'उमलले संवाद' या त्यांच्या मुलाखतींवर आधारित प्रस्तुत पुस्तकातून दिसते.

मुलाखती घेणारे हाडाचे पत्रकार, मुलंमुली, अर्थतज्ज्ञ व शेतकरी आहेत. संकटांवर मात, तारूण्यातील 'प्रेमभावना', खाजगी आयुष्य किंवा तत्त्वांना व्यावहारिकपणापुढं मुरड घालणं अशा नाना बाबी जाणून घेतात. हे संवाद एखाद्या सुंदर कमलपुष्पाप्रमाणं हळूहळू उमलतात! त्यातूनच तुम्हाआम्हासारख्या सामान्य माणसाचं असामान्य यश आपणाला मंत्रमुग्ध करतं, आणि त्यापलिकडे जाऊन सर्वांना हव्या असणाऱ्या समाधानाचा सुगंधही आपणापर्यंत पोहचवतं.

**श्री. भवरलालजी जैन यांची साहित्यसंपदा**

१) 'आजची समाजरचना, तिचे स्वरूप व पुनर्बांधणी'
२) 'कहाणी कष्टलाटांच्या पाणलोटाची'
३) (जैन इरिगेशनचा इतिहास) - आगामी

**श्री. भवरलालजींच्या व्यक्तिमत्त्वावरील साहित्य**

१) 'वाकोदचा वटवृक्ष'
२) 'पाषाणातून पाझर'
३) 'वाघूरचं पाणी'

**श्री. भवरलालजी जैन यांचे वैचारिक अधिष्ठान**

१) '... .... .... ' - भाषणे (प्रकाशनाधीन)
२) '... .... .... ' - लेख (आगामी)
३) '... .... .... ' - चिंतनीय अवतरणे (आगामी)

**प्रेरणा आणि प्रमोद...**

नातवाचं कौतुक आजोबा नेहमीच करतात. आजोबांचं कौतुक करताना नातू अथांग.



प्रसंग : कृषी विद्यापीठ, दापोली यांनी भवरलालजींना सन्माननीय 'डॉक्टर ऑफ सायन्स' पदवी दिल्यानंतर. दापोली समुद्रकिनारा, २५ एप्रिल २००६

**रचना प्रकाशन**